7


उत्सवी प्रवृत्ती

•

लग्नसमारंभ

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक



जीवनसाथ

दुसरी आवृत्ती

जीवनसाथ - 12 पुस्तकांच्या संचापैकी

पुस्तक क्र. 7

उत्सवी प्रवृत्ती
•
लग्नसमारंभ

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजे जीवनसाथ

अनिल भागवत
वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

प्रकाशक
अनिल भागवत
ई 3/21 गिरिजा शंकर विहार
कर्वे नगर, पुणे 411052


प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर2015

मुखपृष्ठ : आभा भागवत

टाइपसेटिंग
स्मिता टाईपसेटर्स
1120, सदाशिव पेठ,
पुणे 411030

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स,
1019, सदाशिव पेठ,
पुणे 411030

किंमत 200 रुपये



अनिल भागवत – ओळख

- बांधकाम व्यवस्थापनाचं अमेरिकेत शिक्षण आणि नोकरी
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत बायकोबरोबर प्रवास
- भारतात अतिजलद आणि दर्जेदार बांधकाम व्यवस्थापनाचा अनेक वर्षं व्यवसाय
- तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचा रोजच्या आयुष्यात उपयोग करण्याविषयी खास अभ्यास
- 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयात डॉक्टरेटचं काम पूर्ण
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह-शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 500 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- जीवनसाथ अभ्यासमंडळ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ समुपदेशन केंद्र – प्रमुख समुपदेशक
- पालक विद्यापीठ – सल्लागार
- इंग्लिश संभाषण वर्ग – प्रमुख शिक्षक
- रोजच्या आयुष्याचं व्यवस्थापन – डायरी प्रशिक्षण – प्रमुख प्रशिक्षक
- सुंदर हस्ताक्षर वर्ग – प्रशिक्षक

• लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून अनेक वर्षं लिखाण

पुस्तकं -

1. घर पाहावं बांधून (5 वी आवृत्ती)
2. लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)
3. व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (2 री आवृत्ती)

●



शोभा भागवत – ओळख

- मराठी, संस्कृत, इंग्लिश भाषेत पदव्या
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत नवऱ्याबरोबर प्रवास
- 2 वर्षं युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार
- गरवारे बालभवन, सारसबाग, पुणे. च्या संचालक (1985 ते 2015)
- भारत सरकारतर्फे शैक्षणिक कार्यक्रमासाठी ब्राझिलला भेट
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 1000 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- पालक विद्यापीठ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ अभ्यासमंडळ – सल्लागार
- अक्षरनंदन शाळा – सल्लागार
- महाराष्ट्र पालक शिक्षक संघ – कार्याध्यक्ष
- डॉ. स्नेहल अशोक स्मृती न्यास – विश्वस्त
- हुजूरपागा नियामक मंडळ – सदस्य
- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून सातत्यानी लेखन

पुस्तकं

1. आपली मुलं (राज्य पुरस्कार प्राप्त)
2. गारांचा पाऊस (राज्य पुरस्कार प्राप्त)
3. मूल नावाचं सुंदर कोडं
4. दिवास्वप्न (अनुवाद)
5. दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा
6. बहुरूप गांधी (अनुवाद)
7. आनंदाच्या पाऊलवाटा
8. देणारं झाड (अनुवाद)
9. मांजरांची वरात (अनुवाद)
10. गंमत जत्रा
11. विश्व आपलं कुटुंब
12. स्त्रियांचे प्रश्न
13. खेळण्यांचा जादूगार - अरविंद गुप्ता
14. सिंह आणि चिंगुली लाल चिमणी (अनुवाद)
15. खट्याळ उंदीर (अनुवाद)
16. अमरपत्र (अनुवाद)
17. शहाणी मुलं छान मुलं (अनुवाद)
18. बियांचे प्राणी (अनुवाद)
19. अंगठ्याची चित्रं (अनुवाद)
20. बोलणारे दगड (अनुवाद)

आगामी पुस्तकं

21. सारं काही मुलांसाठी
22. शिक्षण आणि शांती (अनुवाद)

नाटक – आम्ही घरचे राजे (थिएटर अकादमी)

अनेक लेख, कविता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रमांचं लेखन आणि सादरीकरण

●

प्रस्तावना – शोभा भागवत

आमचं 'जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ' 1997 मधे सुरू झालं. आमची दोन्ही मुलं तेव्हा लग्नाच्या वयाची होत होती. अनिलला तेव्हा असं सारखं वाटत होतं की, आपण दोघांशी लग्नाबद्दल सूत्रबद्ध बोलायला हवं, पण या वयातली मुलं कुठं आई-वडलांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत असतात? त्यांच्या मित्र-मैत्रिणींचा गट जमवणं, त्यांच्या पालकांनाही बोलावणं आणि दर रविवारी 2-3 तास एकत्र चर्चा करणं ही कल्पना मात्र त्यांना आवडली, आणि आमच्या घरीच 'जीवनसाथ' सुरू झालं.

'जीवनसाथ' म्हणजे स्पष्ट विचारांची जीवनभराची साथ. खूप जणांना असं वाटतं की, अविवाहित मुला-मुलींसाठी हे गट चालवतात, म्हणजे हे वधूवरसूचक मंडळ आहे. पण असं लग्न जमवण्यासाठी मंडळ चालवण्यात आम्हा दोघांनाही रस नाही. अर्थात, मंडळाच्या निमित्तानी एवढ्या वर्षांत लग्नाचा अभ्यास करता करता परिचय होऊन बरीच लग्नं ठरली, झाली, टिकली आणि ती विचारपूर्वक झाली याचं आम्हाला समाधान वाटतं.

18 वर्षांच्या अनुभवानी आम्हाला असं वाटतं की, तरुण मुली लग्नाबद्दल खूप विचार करतात. कारण, त्यांना जाणीव असते की, लग्नानंतर पुरुषाचं आयुष्य फार बदलणार नाही, पण बाईचं सगळंच बदलून जातं. या उच्चशिक्षित मुली असं म्हणतात की, लग्न हे काही आयुष्यभराचं 'अल्टिमेटम' नाही हे आमच्या पिढीला कळलेलं आहे. त्याचप्रमाणे, एका व्यक्तीशी आयुष्यभर आपण जोडले जाणार, तर ती कशीतरी उरकून टाकायची पण गोष्ट नाही. लग्नानंतर आपलं आयुष्य घडूही शकतं किंवा बिघडूही शकतं. त्यामुळं स्वतः विचार करून स्वतःच निर्णय घ्यायचा.

ठराविक 'कांदापोहे' कार्यक्रमाचं स्वरूप बदललं आहे. तरीही अजून परिचयात मोकळेपणा नसतो. शिक्षण, पगार, घरदार, दिसणं या व्यावहारिक गोष्टींकडेच झुकतं माप असतं. माणूस म्हणून एकमेकांची ओळख होत नाही.

एखाद्या जोडीत कुटुंबातल्या पार्श्वभूमीमुळे, वातावरणामुळे मनमोकळा संवाद असला, तरीही लग्नाच्या वेळी विचार नेमका कशाकशाचा करायचा याबाबतीत पालकांना काही कल्पना नसते. मुलांना वाटतं पालक काहीतरी सांगू शकतील. त्याचवेळी पालकांना वाटतं, आजकालच्या मुलांना सगळं माहिती असतं. शेवटी दोघांकडून मिळून आवश्यक असलेला स्पष्ट विचार कमी पडतो.

आज प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा ध्यास आहे. अशा वेळी वरवर भेटून, बोलून आयुष्यभराचा निर्णय कसा घ्यायचा? लग्न म्हणजे काय एक दिवसाचा सोहळा आहे का? ती आयुष्यभराची दोघांनी केलेली 'कमिटमेंट' आहे. खरं म्हणजे सोहळ्याचा भाग कमी केला तरी चालेल. कमिटमेंटचा विचार व्हायला हवा. हे मनातून पटणारी मुलं-मुली बरीच आहेत.

लग्नाच्या वयात घरून प्रचंड मानसिक दबाव असतो, असंही मुली सांगतात. त्यात घरात आई-वडलांचंच आयुष्य अत्यंत असमाधानी पाहिलेलं असलं, घरात त्यांची एकमेकांना, मुलांना मारपीट पाहिलेली असली, तर लग्नाबद्दल प्रचंड साशंकता असते. अनेक कुटुंबांत दुर्दैवानी तरुण मुलांना मोकळेपणानी बोलता येत नाही. अनेकदा पालकांशी संवादच तुटलेला असतो.

याला उपाय म्हणून, आपल्या समाजात या मुला-मुलींसाठी काय सोयी उपलब्ध आहेत? वधू-वर सूचक मंडळं आहेत, ती पालकांना जेवढी आकर्षक वाटतात, तेवढी मुला-मुलींना वाटत नाहीत. मेळाव्याचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. विवाहपूर्व समुपदेशन अर्थपूर्ण पद्धतीनी चालू नाही. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. इंटरनेटवर फसवणूक झाल्याची बरीच उदाहरणं ऐकलेली असतात. इंटरनेटवर माहितीचा धबधबा असतो, पण त्यातली बरीचशी पाश्चात्त्य असते. स्वतःला उपयोगी असं फारच कमी सापडतं.

अशा वेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का, मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव नाही, जिथे कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल, जिथे

तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील, अशा ठिकाणाच्या शोधात मुलं-मुली आहेत. ही गरज ओळखून 'जीवनसाथ'ची सुरुवात झाली.

'जीवनसाथ' सुरू केल्यापासून अनिलनी वैवाहिक जीवनात येणाऱ्या प्रश्नांची यादी करून अभ्यासाला सुरुवात केली. प्रश्नांचा आणि उपायांचा अभ्यासक्रम तयार केला. त्याचं 'मॅनेजमेंट' या विषयाचं शिक्षणही आहे आणि व्यवसायही आहे. त्यातली तत्त्वं वैवाहिक जीवनात उपयोगी आहेत. आपण कसे आहोत हे कळणं आणि दुसऱ्याला पारखता येणं, यासाठी त्यानी व्यक्तिमत्त्वाच्या प्रकारांचा अभ्यास केला आहे. विवाहासाठी काय प्रकारची प्रगल्भता हवी हे शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. त्याचं मानसशास्त्राच्या अंगानं 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयातलं डॉक्टरेटचं काम पूर्ण आहे. पीएच.डी. हातात मिळणं बाकी आहे. क्रिटिकल ॲनॅलिसिस या पद्धतीनी तो तरुण मुला-मुलींना आपले प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास देतो आहे. अतिशय सातत्यानी 'ग्रुप काउन्सेलिंग' आणि 'इंडिव्हिज्युअल काउन्सेलिंग' करतो आहे. त्याची अभ्यासू वृत्ती, शिस्त, चिकाटी, तरुणांशी संवाद साधण्याचं कौशल्य, हे काम करण्यासाठी 'ट्रेनर्स' तयार करणं, हे सगळं पाहणं, त्यात मदत करणं हा माझ्या आनंदाचा भाग आहे.

'जीवनसाथ'मधे अविवाहित तरुण-तरुणी तर येतातच, पण नवविवाहित, मध्यमवयीन विवाहित जोडपी, घटस्फोटित व्यक्ती, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेली मंडळीही येतात. त्यांच्यामधल्या विचारांच्या देवाण-घेवाणीचा सर्वांनाच उपयोग होतो. इथल्या काहींच्या प्रतिक्रिया बरंच काही सांगतात.

'जीवनसाथ'मधे येणारी कॉम्प्युटर इंजिनिअर मुलगी एकदा सांगत होती– ''माणसाच्या दिसण्यापेक्षा माणसाचं असणं महत्वाचं असतं, ते कसं पारखावं याचं सहज, सोप्या शब्दांत मार्गदर्शन तुम्ही करता, ते मला आवडलं. केवळ नवरा-बायको या नात्यातच नव्हे, तर इतरही नात्यांत प्रत्येकाला 'स्पेस' देऊन जे नातं जोपासलं तर ते अधिक सशक्त ठरतं, हे मला इथे कळलं. लग्न करायचं तर अफाट अपेक्षा ठेवून कसं चालेल? आपल्याला आयुष्यात काय चालणार नाही, पेलणार नाही, कोणाला नाही म्हटलं पाहिजे याबद्दलचे माझे विचार इथेच स्पष्ट झाले. लग्न या प्रक्रियेकडेच जाणीवपूर्वक पाहण्याचा मार्ग मला इथे सापडला.''

चर्चेत एकदा एक मुलगा म्हणाला होता, ''एखाद्या सुंदर, मादक मुलीशी लग्न आणि मग हनिमून इथपर्यंतचा मुलग्यांचा 'प्लॅन रेडी' असतो, पण पुढं सगळी गडबड गडबड असते. खरं म्हणजे लग्न या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात शाळेत आणि महाविद्यालयातच व्हायला हवी.''

एक मध्यमवर्गीय घरातला खूप न शिकलेला मुलगा. तो सांगत होता – ''आमच्या घरात जे विषय उच्चारले सुद्धा जात नाहीत त्यावर इथे मोकळेपणानी बोलतात हे पाहून मी चक्रावूनच गेलो. मित्राच्या सांगण्यावरून मी इथे आलो आणि मला कळलं की, इथे केवळ लग्नाविषयी नाही, तर इतर खूप विषयांबद्दल चर्चा होते. आयुष्य स्वस्थ आणि समाधानी कसं होईल हे कळतं. 'ग्रुप डिस्कशन'मधे अनेक माणसांचे विचार कळतात. इतरांच्या प्रश्नांची आणि उपायांची कल्पना येते.''

मॅनेजमेंटचा अभ्यास करणाऱ्या अतिशय संवेदनक्षम मुलीला काही वेगळेच फायदे जाणवले. ''प्रश्नाच्या मुळापर्यंत जाणं आणि मूळ प्रश्नाचं उत्तर शोधणं यांचे संस्कार इथे माझ्यावर झाले. वास्तवाची जाण आली आणि अपेक्षांचा क्रम लावता आला. इथल्या 'प्रेझेंटेशनचा' मला माझ्या 'मॅनेजमेंट स्टडीज'मधे उपयोग झाला. अनिलदादांचा 45 वर्षांपूर्वीचा अमेरिकेतला मॅनेजमेंटचा अभ्यास आजही तेवढाच लागू आहे असं वाटलं.''

दुसरी एकजण म्हणते, ''विवाहबाह्य संबंधांवरच्या चर्चा बैठक संपल्यावरही मनात ठसठसत राहिल्या. घटस्फोट होऊ नये यासाठी काय करावं, झालाच तर काय करावं, किती मुलं हवीत, संगोपन कसं करावं, आपलं मरण, जोडीदाराचं मरण, आप्तजनांचं मरण या अत्यंत अप्रिय अशा विषयांवरच्या चर्चांनी मनोधैर्य वाढलं. प्रत्येक बैठकीला येताना, आज काय नवीन शिकायला मिळेल अशी उत्सुकता असते.''

एक अतिशय गंभीर मुलगी आहे. तिनी अतिशय विचारपूर्वक लग्न केलं आहे. ती एकदा चर्चेत सांगत होती– ''लग्न म्हणजे तडजोड आणि ती बाईलाच करावी लागते. पण 'जीवनसाथ'मधे येऊन मुलांमधेही तडजोडीची जाणीव आणि इच्छा निर्माण होते. एकमेकांत खेळीमेळीचं वातावरण असण्यासाठी वैचारिक पातळी जुळणं आवश्यक आहे. विचार जुळले तर 'कम्फर्ट लेव्हल' वाढते. एकमेकांचे दोष स्वीकारणं सोपं जातं. प्रत्येक माणसात गुणांबरोबर दोष असणारच, मतभेद असणारच, पण ते कमी कसे करायचे ते इथे आल्यावर उमगलं.''

''आम्ही दोघं लग्नापूर्वी एकमेकांशी करिअर, पैसे, मित्रमैत्रिणी, कुटुंब यांविषयी बोललो. आमचे बरेच विचार जुळत होते. यावेळी निर्णय घेताना आम्हाला अनिलदादांनी सांगितलेली 'क्रिटिकल ॲनॅलिसिस'ची पद्धत उपयोगी पडली. आता लग्न झाल्यावर हा विचार किती महत्त्वाचा होता, ते लक्षात येतं आहे.''

एक रोखठोक मुलगी सांगते, ''मी 'हेडस्ट्राँग' आहे. पटल्याशिवाय काही करणार नाही. मुलं बघताना मी खूप विचार करत होते. पण मुलगे 'टिपिकल माइंडेड' असतात. मग नकार सुरू झाले. बाबांना त्याचा त्रास होऊ लागला. अजूनही मला जे हवंय ते मला सापडत नाही. जीवनसाथमधे लग्न जमलं तर मला आवडेल, पण इथे स्वतःला समजून घेण्याचा आणि इतरांना समजून घेण्याचा एक दृष्टिकोन मिळाला. तो मला उपयोगी पडतो आहे. सर्वांना मतं असतात. ती एकमेकांवर लादू नयेत, हे मी इथे शिकले. आपल्या समाजात मुलग्यांची मतं खूप पारंपरिक आहेत. माझ्यासारख्या मुलींना फार निराशा येते. अशा वेळी जीवनसाथचा मला खूप आधार वाटतो.''

आमच्या एक घटस्फोटित सभासद म्हणतात ते मला फार महत्त्वाचं वाटतं– ''सध्या विवाहसंस्थेला आलेलं बाजारी बजबजपुरीचं स्वरूप घातक आहे. नको त्या गोष्टी लग्नसंस्थेत घुसून मूळ मूल्यांनाच छेद देत, पार बोजवारा उडवत आहेत. लग्नाच्या निमित्तानी एकूण मानवी सूक्ष्म, नाजूक, तरल नाती आणि भावभावना यांचा हळुवार गोफ गुंफला जात असतो. त्याचा नितांत सुंदर अभ्यास या मंडळात होतो. आजच्या नव्या विचारांनी कालचा मनस्ताप पुसता येतो, हे मला या अभ्यासाचं सामर्थ्य वाटतं.''

जीवनसाथमधे सातत्यानं गेली पाच वर्षं येणाऱ्या एक मध्यमवर्गीय पालक म्हणतात : ''लग्न ठरवताना पत्रिकेवर अनावश्यक भर असतो, पण मुलामुलींच्या गाठीभेटी, चर्चा जास्त आवश्यक असतात. दोन कुटुंबांच्या परिचयासाठी वेळ देणं आवश्यक असतं, ते होत नाही. जीवनसाथमधे येण्यापूर्वी माझी मतं पक्की नव्हती. 50-50 टक्के दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. पण आता मी योग्य शब्दांत माझा मुद्दा पटवून देऊ शकते. पालकांनाही या अभ्यासाची गरज आहे. लग्नात पालकांचा पुढाकार नसावा. मुला-मुलींनीच पुढे जबाबदारी पेलायची असते. त्यामुळे मुलांचा पुढाकार आणि पालक फक्त सल्लागार असं व्हायला हवं. पालकांनी योग्य गोष्टींना प्रोत्साहन द्यावं, अयोग्य गोष्टी स्पष्ट, योग्य शब्दांत त्यांच्यासमोर मांडाव्यात, निर्णय मात्र मुलांचाच असावा.

जीवनसाथमधे नकारात्मक गोष्टींचा विचारही करण्याचं तंत्र कळलं. म्हातारपण, आजारपण, मृत्यू यांबद्दलचे विचार पक्के झाले; अनेक अंधश्रद्धा गेल्या, साधी राहणी उच्च विचारसरणी म्हणजे काय हे कळलं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इथे मुलांबरोबर पालकांनाही आपल्या वैवाहिक आयुष्यातल्या समस्या सोडवता येतात, याचा दिलासा वाटला. आमचंही आयुष्य 'जीवनसाथ'नी समृद्ध केलं.''

स्वतः अनेक प्रकारची प्रशिक्षणं देणारं आमचं एक अत्यंत उत्साही, कृतिशील सभासद जोडपं म्हणालं, ''वैचारिक देवाणघेवाण फार कमी ठिकाणी होते. इथलं पद्धतशीर विश्लेषण आम्हाला खूप गोष्टी शिकवतं. अनिलदादांचे खास खेळ गमतीबरोबर महत्त्वाचे संदेश सहज देतात. तुम्ही दोघं आधी भेटला असतात तर आम्हाला अधिक चांगले नवरा-बायको होता आलं असतं आणि अधिक चांगले पालकही.'' लग्न आणि मुलांना वाढवणं हे प्रत्येकाच्या जीवनातले महत्वाचे प्रकल्प; पण लोक त्यांच्याकडे पुरेशा गांभीर्यानी पाहात नाहीत. आज झट लग्न पट घटस्फोट ही पद्धत होऊ पाहते आहे. अशा वेळी अशी मंडळं समाजात काही नवं घडवत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

तरुणपणी योग्य वयात जीवनसाथमधे नियमितपणे यायला सुरुवात केली तर फारच छान; पण समजा तसं नाही जमलं तर काय करायचं? ताण आधीच निर्माण झाले असले तर? मला वाटतं 'बेटर लेट दॅन नेव्हर.' मध्यमवयीन, वयस्कर असलं म्हणून काय झालं? दोघांची इच्छा असली तर ताण नक्की कमी करता येतील. घालवताही येतील कारण 'विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठच्याही अवस्थेत दुरुस्त करायचा प्रयत्न करता येतो.'

अनिल त्याच्या वैयक्तिक समुपदेशनाच्या कामातही खूप व्यस्त असतो. लोकांना केवढ्या प्रकारचे किती प्रश्न आहेत हे त्यामुळे कळतं. जेवढे करावेत तेवढे प्रयत्न कमीच पडतील इतकी आपल्या समाजाला समुपदेशनाची गरज आहे हे लक्षात येतं.

असं हे जीवनसाथचं काम, वातावरण आणि फलितं! यातला अभ्यास आणि पुढाकार अनिलचा. माझी इतर कामं सांभाळून मी साथीला असते एवढंच. लोक रविवारच्या या कृतिसत्रांची वाट पाहात असतात याचं फार समाधान वाटतं.

आमची मुलं लहान होती तेव्हा आम्ही दोघांनी पालक-शिक्षणाचा अभ्यास केला. बऱ्याच पालकांपर्यंत तो पोहोचवला. ती वाढत असताना मला बालभवनच्या निमित्तानी चांगलं काम करता आलं. ती लग्नाची झाल्यावर अनिलनी विवाह-

अभ्यास पुढं नेला. आता आम्हाला तीन छोटी नातवंडं आहेत. लहान मुलांची काळजी घेण्याची अधिक चांगली सोय समाजात व्हावी यासाठी खूप काही करायचं आहे. त्या त्या वेळी आपल्या समाजातले जे प्रश्न जाणवतात त्यासाठी काम करणं, हे आम्हाला आमचं कर्तव्य वाटतं. इतरांच्या कामाशीही त्यामुळं भरपूर संपर्क असतो. त्या नेटवर्कचा खूप फायदा होतो.

आम्ही दोघं गेली अनेक वर्षं पुण्यातच राहतो. पुण्याचे गुण, दुर्गुण आम्हाला आपोआपच चिकटलेले असणार. अनिलचं सगळं काम जास्तीतजास्त पुण्यातलंच आहे. बरेच संदर्भ महाराष्ट्र, पुणं, कर्वेनगर या भोवतालचे आहेत हे खरं आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही जगाच्या कुठच्याही भागात असलात तरी त्यामुळे जागेचे संदर्भ बदलतील. अभ्यासाचे विषय मात्र तेच राहतील.

उत्सवी प्रवृत्ती आणि लग्नसमारंभ याबद्दलची अनिलची भूमिका तीव्र विरोधी, तर माझी सौम्य विरोधी आहे. अनिलच्या अभ्यासाला विवेकनिष्ठतेची जोड असल्यामुळे अनिलची मतं तो ताकदीनी मांडतो. मी मुळातच सौम्य स्वभावाची असल्यामुळे मी माझ्या मर्यादेत त्या गोष्टी अमलात आणते. अनिलचं वैशिष्ट्य म्हणजे तो व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे मानतो. माझ्यावर त्याचा अजिबात दबाव नसतो.

– शोभा भागवत

अभ्यास मंडळात या विषयाबद्दल नेमकं काय चालतं

या कल्पनेची थोडक्यात ओळख

मी भाषणं करण्याच्या विरुद्ध आहे कारण त्याचा काही उपयोग होत नाही, अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मी फक्त कार्यशाळाच घेतो. आत्तापर्यंत 500च्या वर ज्या कार्यशाळा घेतल्या त्याविषयी हे लिखाण आहे. यातला प्रत्येक लेख किंवा लेखाचा भाग म्हणजे एक कार्यशाळा आहे असं समजूया. पण त्या विषयाच्या अनेक कार्यशाळांचा गोषवारा इथे आहे. प्रत्यक्षातल्या कार्यशाळा अनौपचारिक आणि प्रश्नोत्तरं पद्धतीच्याच असतात; पण तो मजकूर त्याप्रकारे नाटकातल्या संवादांसारखा लिहायचा म्हणजे तो खूप पानांचा होतो. म्हणून ते मुद्दे सलग पद्धतीनी मांडले आहेत.

कार्यशाळांचा मुख्य सूत्रधार बहुतेक वेळा मी असतो. सूत्रसंचालनासाठी आणखी काही लोक तयार करण्याचं काम चालू आहे. सूत्रधारांनी आधी त्या विषयाचा माझ्याबरोबर अभ्यास करून मुद्दे लिहून तयार ठेवलेले असतात.

अगदी प्रथम माझी या सबंध कामामागची, कार्यशाळेमागची, पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करतो. ही एक अनेक विषयांची कार्यशाळांची मोठी मालिका चालू आहे अशी कल्पना करून मी हा पुस्तकसंच लिहिलाय. आपण सगळे एका खोलीत गोलात किंवा समोरासमोर बसलो आहोत आणि प्रत्येक विषयासंबंधी निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मतं, शंका, गैरसमजुती आपण सगळे ऐकतो

आहोत अशी कल्पना केली आहे. जीवनसाथमधला आत्तापर्यंतचा अभ्यास त्याबद्दल काय म्हणतो हे मी सांगतोय, अशी कल्पना मनात धरलीय.

मला कळायला लागल्यापासून गेली 59 वर्षं मी जे आसपासचं जग बघतोय, परदेशात, भारतभरात, महाराष्ट्रात जे अनुभवलंय ते मला आवडलेलं नाही. थोडक्यात, ज्या दिशेनी सबंध जगाचा, भारताचा प्रवास चाललाय ती दिशा मला योग्य वाटलेली नाही. कुठच्यातरी निराळ्या पद्धतीनी विचार केल्याशिवाय, मार्ग शोधल्याशिवाय मला धडगत दिसत नाही. ज्याला सध्याची परिस्थिती पसंत नसेल त्यानी ती परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करावी, नाहीतर मुकाटपणी सहन करावं. मी मुकाटपणी सहन करणाऱ्यांपैकी नसल्यामुळे मी तशी धडपड केली, आयुष्यभर केली. त्या सगळ्या प्रयत्नांचा सारांश म्हणजे 'जीवनसाथ'. या अभ्यासाची सुरुवात विवाहाच्या अभ्यासानीच झाली. पुढे मात्र ती सबंध आयुष्याच्या अभ्यासाची संस्था बनली.

मी माझ्या आसपास बघितलं तर मला संतुलित लोकं सहज दिसतच नाहीत. उन्मत्त तरी दिसतात किंवा उदास लोक दिसतात. वागणारे मग्रूर तरी असतात किंवा केविलवाणे असतात. थोडक्यात अहंगंड किंवा न्यूनगंडाच्या प्रभावाखाली असतात.

प्रत्येक पर्वातल्या प्रत्येक काळात समाजाला विचार आणि भावना यांच्या समतोलाचीच गरज असते हे सगळ्यांना मान्य असतं. पण पुढे माझ्यासारख्या कोणी म्हटलं की, सध्याचा समाज भावनेच्या बाजूला पार झुकलेला आहे, त्यामुळे या समाजाला विचाराच्या दिशेनी समतोलापर्यंत खेचूया तर ते मात्र मान्य होत नाही.

समाज भावनेच्या बाजूला अतिरिक्त प्रमाणात कशामुळे झुकला हे बघायला गेलं तर दोन गोष्टी स्पष्ट दिसतात. एक म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःच्या भविष्याची चिंता या एका भावनेमुळे हवालदिल आहे. वरवर बघितलं तर तो गाताना, नाचताना, हसताना, मजा करताना दिसेल. पण ते दृश्य फसवं आहे. माणूस आतून घोर काळजीत आहे. त्या चिंतेच्या भावनेच्या ओझ्यामुळे तो फार झुकलेला आहे.

दुसरं म्हणजे प्रसारमाध्यमांनी सर्वसामान्य माणसाची बुद्धी किंवा विचार करण्याची क्षमता क्षीण केली आणि त्याच वेळेला अतिशयोक्त भावनांचं भडक

चित्रण करून त्याला भावनेच्या बाजूला आणखी ढकललं. ही दोन्ही कारणं जरी समजली तरी सत्य ते सत्यच आहे. समतोलापर्यंत त्याला पोहोचवण्यासाठी स्पष्ट विचारांचं बळ त्याला द्यायला हवं आहे. माझी त्याबद्दल खात्री झाली आहे. मला जर वाटलं असतं की, माणूस विचारांच्या दिशेनी जास्त झुकला आहे तर मी भावनांच्या दिशेनी त्याला खेचलं असतं कारण शेवटी समतोल हा उद्देश आहे.

या सगळ्या प्रयत्नात दोन मोठ्या अडचणी मात्र आहेत. विचाराच्या दिशेनी खेचणं म्हणजेच विवेकनिष्ठ विचारसरणीमधे खेचणाऱ्याला फार कष्ट आहेत कारण कोट्यवधी लोकांना खेचण्याचा तो लढा आहे. दुसरी अडचण म्हणजे विवेकनिष्ठ विचारांच्या पुरस्कर्त्याला लोक कोरडा किंवा भावनाहीन, असंवेदनशील समजतात. ते खरं नाही हे त्याला स्वतःला माहिती असतं. पण लोकांची तशी गैरसमजूत, उघड किंवा पाठीमागे टीका सहन करावी लागते. थोडक्यात, या कारणांमुळे हा मार्ग लोकप्रिय होऊ शकत नाही.

मी आता 72 वर्षांचा आहे. शोभा 69ची आहे. हे सगळं पुस्तकात उतरवणं शक्य आहे तोपर्यंत लिहिलेलं बरं असं वाटल्यामुळे मी इथे दोन गोष्टींवर भर देऊन लिहायचं ठरवलं.

1. समाजाचं वैवाहिक आयुष्य, त्याखेरीजचं रोजचं आयुष्य, त्यातले समाजाचे प्रश्न आणि त्यावर उपाय
2. शोभाच्या आणि माझ्या वैवाहिक सहजीवनाचं चरित्र. सहजीवनाचं चरित्र या शब्दाकडे मला लक्ष वेधायचं आहे कारण हे माझं किंवा शोभाचं व्यक्तिगत चरित्र नाही.

या पुस्तकाबद्दलचा एक निर्णय पक्का केलाय तो असा. व्यवस्थापनशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या माझ्या अभ्यासातल्या तीनही विषयांत मूळच्या अभ्यासातच असे अनेक शब्द आहेत की, त्यांचं ओढूनताणून मराठी भाषांतर करण्याच्या फंदात न पडणं चांगलं. काही भाषांतरित शब्द सोपे, काही आधीच प्रचलित असलेले आहेत ते वापरले. बाकीचे खुशाल देवनागरी लिपीत इंग्लिश शब्द वापरायचे असं ठरवलं, कारण हे पुस्तक लोकांनी वाचावं, त्यांना ते सोपं जावं, त्यातल्या गोष्टी त्यांनी अमलात आणाव्यात ही इच्छा आहे. मग समजायला

कठीण करून कसं चालेल? याबद्दलचे सोपे-कठीण वगैरेचे निर्णय मीच वाचकांबद्दलच्या माझ्या अंदाजानी घेतले आहेत. त्या माझ्या अंदाजात काही चूक आढळली तर नंतर ती जरूर दुरुस्त करीन.

आणखी एक निर्णय घेतला. हे पुस्तक वाचणाऱ्यांपैकी कॉम्प्युटर वाचणाऱ्यांचं प्रमाण जास्त असेल असं मला वाटतंय. त्यामुळे जीवनसाथच्या वेबसाईटवरून हे सबंध पुस्तक बघता येईल, छापता येईल अशी व्यवस्था करणार आहे. ज्यांना कागदावर छापलेली अक्षरंच सोयीची वाटतात त्यांच्यासाठी छापील पुस्तकाचीही सोय असणार आहे.

मी स्वतः अमेरिकेत व्यवस्थापनशास्त्र शिकलेलो असल्यामुळे आणि गेल्या अनेक वर्षांमधे तो विषय शिकवल्यामुळे विषयाचे छोटे भाग पाडण्याची मला सवय लागली आहे. वाचणाऱ्यांना ते सोयीचं जाईल याबद्दल माझी खात्री आहे.

एक प्रश्न सगळ्यांना पडेल त्याचं आधीच स्पष्टीकरण करतो. आपलं म्हणणं थोडक्यात मांडावं अशी शिफारस मी अनेक वेळा ठिकठिकाणी केली आहे, तर मग जीवनसाथ म्हणजेच जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हा विषय समजावून सांगताना एवढी थोरली 3000 पानं आणि बारा पुस्तकं कशासाठी लिहिली? याचं उत्तर असं आहे. 18 वर्षं एवढ्या निरनिराळ्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आलेली आहे. कुठच्या शब्दांत कुठच्या पद्धतीनी कुठच्या वेळेला कोणाला मुद्दा समजेल याला कुठचाही नियम नाही. तो संवाद साधण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे माहिती असलेले सगळे मार्ग वापरायचे, असं मी ठरवलं. त्यामुळे मजकूर वाढला.

किती बारकाव्यात शिरायचं, किती सविस्तर सांगायचं याबद्दल माझा विचार तळ्यात-मळ्यात होता. तो पक्का कशामुळे झाला तो प्रसंग सांगतो. सकाळी चार वाजता नियमितपणी रोज उठून मी हा पुस्तकसंच लिहिण्याचं काम करतोय. मधे व्यायाम, रोजचं आवरणं आणि समुपदेशनाच्या ठरलेल्या वेळा हे सांभाळून, किंचित टी.व्ही. बघून मी रोज रात्री 10 वाजता झोपतो. त्यातला व्यायाम मला रोज 3 ते 4 वेळा करावाच लागतो, नाहीतर माझी कंबर, खांदे, मान दुखायला लागतात आणि ही सगळी कामं, लिखाण शक्यच होत नाही. व्यायामाबद्दलच्या अनुभवामुळे माझा निर्णय झाला. कसा ते सांगतो. माझ्या डॉक्टरांनी मला जे व्यायाम सांगितले त्याबद्दल माझी जराही तक्रार नाही. ते सोपे

आणि उपयोगी व्यायाम आहेत. ते व्यायाम त्यांनी मला रोज 6 वेळा करायला सांगितले होते. माझी अडचण निराळीच होती. पहाटे व्यायाम नक्की जमायचा. माझं 'काउन्सेलिंग शेड्यूल' सुरू झालं की, त्यात मला मधे दिवसा व्यायाम शक्यच व्हायचा नाही. थोडक्यात, पहाटे आणि रात्री दोनदाच मला व्यायाम जमायचा. अर्थातच तेवढा व्यायाम पुरायचा नाही. शेवटी मान, खांदे, कंबर दुखायचीच. साधारण दोन महिने मी निरनिराळ्या युक्त्या करून बघितल्या. पण त्यांतली एकही युक्ती उपयोगी पडली नाही. त्रास तसाच्या तसाच.

दोन महिन्यांनंतर मी तोच व्यायाम पहाटे आणि रात्री लागोपाठ दोनदा करायला लागलो. म्हणजे त्याची बेरीज झाली चार वेळा व्यायाम. दोन वेळचा प्रश्न उरला. मग मी त्या व्यायामाचे छोटे भाग केले. दिवसभरातल्या वेळापत्रकात जमतील तसे, तेवढ्या मिनिटांत बसतील तसे तुकड्यातुकड्यात व्यायाम करत गेलो. या पद्धतीनी कधी पाच वेळा तर कधी सहा वेळा व्यायाम व्हायला लागला. माझा प्रश्न सुटला. मला त्यासरशी साक्षात्कार झाला की समुपदेशनार्थींचा प्रश्न, दिनचर्या, स्वभाव, कौटुंबिक प्रश्न, सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन उपायांचे पर्याय सविस्तरपणी मांडले तरच त्याला त्याचा खरा उपयोग होतो. माझे गेले तसे दोन महिने त्रास सोसत वाया जात नाहीत. त्यामुळे या कार्यशाळेत म्हणजेच या पुस्तकात एकदम बारकाव्यात सविस्तर सांगायचं हा निर्णय एकदम पक्का झाला.

ही कार्यशाळा घेताना, हा मजकूर लिहिताना मला अनेक भूमिकांच्यात शिरावं लागणार आहे. दोन मुख्य भूमिका म्हणजे समुपदेशक आणि ज्येष्ठ अभ्यासू मित्र. पुन्हा या दोन भूमिकांमधून बोललेल्या, लिहिलेल्या मजकुराची सरमिसळ होणार हेही निश्चित आहे. कधी मित्र म्हणून गमतीगमतीत एखादी गोष्ट सांगितलेली असेल, तर कधी माझा समुपदेशनातला गंभीर अभ्यास त्यात डोकावेल.

समुपदेशन या सबंध विषयाविषयी खूप गैरसमजुती आहेत. वेड लागलेल्या माणसाला वेड्यांच्या हॉस्पिटलमधे ठेवतात ही गोष्ट सगळ्या भारतीयांच्या मनावर थेट कोरलेली आहे. समुपदेशकाकडे देखील वेड लागलेली माणसंच जातात असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे समुपदेशकाकडे जायचा विषय निघाला की, 'वेड लागलंय का?' हा प्रश्न लोकांच्या मनात असतो. ज्याला समुपदेशन म्हणजे काय हे समजलं त्याचा बरोब्बर उलटा प्रश्न असतो, 'इतका त्रास होतोय तरी अजून तू समुपदेशकाकडे गेला नाहीस? असा वेडेपणा करू नकोस.'

समुपदेशन या विषयाच्या अंतरंगाच्या पसाऱ्याची आणि गुंतागुंतीची लोकांना कल्पना नसते. जीवनसाथमधे 60 विषयांची यादी आम्ही वापरतो. त्यांच्यापैकी विषय निवडण्याचं काम सभासदच करतात आणि दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक एक विषय गटचर्चेसाठी ठेवतात. लोकांना पडलेला प्रश्न असा असतो की, आयुष्यात एवढ्या साठ विषयांचा संबंध खरोखर येतो का? माझ्या दृष्टीनी नक्की येतो. माझ्या 72 वर्षांत माझा तर त्यातल्या प्रत्येक विषयाचा संबंध आला बाबा!

आणखी एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा असतो. प्रत्येकाचा प्रश्न स्वतंत्र आणि खासच असतो. घडणाऱ्या घटनाही निराळ्याच आणि खास असतात. चांगल्या घटना आणि वाईट घटना दोन्ही त्या त्या व्यक्तीलाच फक्त तपशीलातल्या बारकाव्यासकट माहीत असू शकतात. मग निराळीच कुठचीतरी त्रयस्थ व्यक्ती तो प्रश्न कसा सोडवू शकेल? याचं खरं उत्तर असं आहे की, जगाची लोकसंख्या कितीही असली तरी व्यक्तिमत्त्वाचे प्रकार मोजकेच असतात. चांगल्या आणि वाईट घटनांचेही मोजकेच प्रकार असतात. समस्यांचंही तसंच असतं. व्यक्तिमत्त्वाचे, घटनांचे आणि समस्यांचे या तीन गोष्टींच्या प्रकारांची सांगड कशी घालायची हे समुपदेशकाला माहिती असतं. तेवढी दिशा त्यांनी दाखवली की, प्रश्न सुटण्याच्या दिशेनी एक एक पाऊल पडायला लागतं. समुपदेशनार्थींनी अभ्यास मात्र मनापासून करावा लागतो. अगदी कॉलेजमधे असताना जसा विषय, त्यातले मुद्दे, त्यांचा क्रम, त्यांची प्रश्नोत्तरं, त्यांबद्दल चर्चा, पडताळणी, लिखाण असतं तसं सगळं करावं लागतं.

मी व्यवस्थापनशास्त्र अमेरिकेत शिकलो ते बांधकामापुरतं. त्या ज्ञानाचं भारतीयीकरण केल्याशिवाय त्याचा इथे उपयोग नाही, हे मला पदोपदी जाणवलं. तेवढं केल्यावर मात्र व्यवसायात त्याचा खूप फायदा झाला. माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यासाठी, कुटुंबासाठी उपयोगी असं त्यात फारसं नव्हतं. ते कसं शोधायचं याबद्दल माझ्या सुप्त मनात सतत विचार चालू होता. मी त्या माझ्या प्रयत्नांना 'रिलेशन्स मॅनेजमेंट' असं म्हणायचो. या नावाची काही लोक टिंगल करायचे. ते म्हणायचे, 'जी रिलेशन्स मॅनेज करावी लागतात त्यांच्यात अर्थच काय?' खरं असंय, मला शोभाशी बोलताना देखील कुठच्या शब्दांत, केव्हा, कसं याचा विचार करावा लागतो. ती 'मॅनेजमेंट'च आहे आणि त्यात

वाईट काहीच नाही. शोभालाही माझ्याशी बोलताना मॅनेजमेंटच वापरावी लागते.

पुढे अनेक वर्षांनी वैवाहिक समुपदेशन या विषयात पीएच.डी. करायची ठरवून मी मानसशास्त्राच्या मार्गानी गेलो. मानसशास्त्रामधे समोर आलेली 'थिअरी' प्रचंड होती. काही गोष्टींचा खोलवर अभ्यास आणि बाकीच्यांचा तुलनेनी वरवर अभ्यास असं ठरवावंच लागलं. मी पूर्वी शिकलेल्या व्यवस्थापनशास्त्रातल्या अनेक मुद्द्यांचा निराळा अर्थ मला दिसायला लागला. त्यामुळे पीएच.डी. 'थीसिस' लिहिताना मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या दोन्हींचा उपयोग विवाहानंतरच्या आयुष्याला कसा करता येईल याच्या मागे मी लागलो. त्यावेळेला सारखं मनात यायला लागलं की, सगळ्या शास्त्रांच्या, ज्ञानाच्या मुळाशी तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. 'थीसिस'मधे ते शक्य नव्हतं. कारण ठरलेल्या वेळेत आणि पृष्ठसंख्येत ते बसलं नसतं. त्या 'थीसिस'मधे मी माझ्या स्वतःच्या काही कल्पना मांडल्या. गंमत म्हणजे त्याच्यावर जो रिपोर्ट लिहून आला त्यात संशोधन करणाऱ्यानी मी स्वतःची कल्पना मांडली त्याबद्दल टीका केली होती. स्वतःचं डोकं चालवणं याला 'ॲकॅडमिशियन्स'च्या जगात वाईट समजतात हे मला त्यावेळी थप्पड खाल्ल्यासारखं कळलं. मी तर 'सेल्फ मेड' आणि 'अप्लाइड' प्रकारचा माणूस आहे. मी त्याला मान झुकवली नाही. माझ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत पूर्वीच्या थोर लेखकांनी, संशोधकांनी म्हटलं तेच मानत राहणं, बोलत, शिकवत राहणं, यापेक्षा स्वतःचा विचार मांडणं जास्त चांगलं आहे. त्यावर टीका झाली तरी चालेल.

त्यामुळे मी साधारण सहा-सात वर्षांपूर्वी 'विवाहाचं आणि रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान' या विषयाच्या मागे लागलो. मला हवं ते कुठे सापडेना. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांशी बोललो. 'वैवाहिक आयुष्याचं तत्त्वज्ञान' असा स्वतंत्र अभ्यास झालेला नाही असं कळलं. मग मीच त्या गोष्टी वाचून, माझ्या पद्धतीनी मांडायच्या ठरवल्या. मी 'हार्डकोअर फिलॉसॉफी शिकवणारा ॲकॅडेमिशियन' नसल्यामुळे मी जे या पुस्तकात मांडलंय ते तत्त्वज्ञानातल्या विद्वान, अनुभवी लोकांच्या दृष्टिकोनातून अर्धवट आणि निराळंच किंवा विक्षिप्त असू शकेल; पण आता मी थांबायला तयार नाही. मी मांडतो ते उपयोगी आहे याबद्दल मला शंका नाही, कारण मी ते अनेक वेळा बोलून, मांडून बघितलंय आणि तरी मी यामधे कुठच्याही दुरुस्तीला तयार आहे ना! मी स्वतः कुठे कमी पडतो याचा माझा शोध

अखंड चालूच आहे. तेव्हाच तर माझ्या वागणुकीत दुरुस्ती होईल. या पुस्तकात मी कसा कसा बदलत गेलो त्याचीच कहाणी आहे म्हटलं तरी चालेल.

स्वतःला स्वतःबद्दल नीट कळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण स्वतःच्या शोधाची प्रक्रिया समजली की, इतरांना समजणंही सोपं जातं. ते जमलं की बऱ्याच बाबतींतले छुपे/उघड संघर्ष संपतात, निदान कमी होतात आणि शेवटी माणूस मनःशांतीपर्यंत पोहोचण्याची शक्यता हळूहळू वाढत जाते.

प्रत्यक्ष अनुभवानंतर माझी खात्री झालीय की, लोकांना समजणं हाच काहीही समजावून सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. तीच सांगणाऱ्याची खरी परीक्षादेखील आहे. त्या दोन्हींच्या वापराचं म्हणजे थिअरी आणि प्रॅक्टिसविषयी बोलण्याचं माझ्या दृष्टीनी प्रमाण थिअरी एक वाक्य, तर प्रॅक्टिसविषयी 100 वाक्यं असं आहे.

मला वाटणारी अगदी मुळातली गोष्ट प्रथम सांगतो. शब्दशः काहीही म्हणजे अगदी काहीही कोणीही करत असलं, तरी त्याचा हेतू दोन शब्दांत वर्णन करता येतो. 'समाधान मिळवण्यासाठी'. इतरांच्या दृष्टीनी ते कृत्य चांगलं, वाईट, 'ग्रेट' कसंही असो, तो माणूस ती गोष्ट स्वतः समाधान मिळवण्यासाठीच करत असतो. लहानपणीचा स्वतःचा खेळ, अभ्यास, धांगडधिंगाही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतो आणि तरुणांचे वात्रट चाळे, प्रेमप्रकरणं, चांगल्या शिक्षणासाठी केलेली धडपड, करिअरसाठी केलेले प्रयत्नही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतात. आई-वडलांवर असलेलं प्रेम, आदर, भांडणंही त्यासाठीच आणि अधिक पुढच्या वयातला लग्नाबद्दलचा निर्णयही स्वतःच्या समाधानासाठीच असतो. लग्न न करण्याचा निर्णय असो, अमुक एका व्यक्तीशी लग्न करण्याची कृती असो, शेवटी हेतू एकच. स्वतःच्या मनाविरुद्ध आईवडलांचं मन सांभाळण्याचा निर्णयही शेवटी त्यांचं मन सांभाळण्यामुळे स्वतःला मिळणाऱ्या समाधानासाठीच असतो. समाजासाठी निरपेक्षपणी काहीतरी करू हाही निर्णय स्वतःच्या समाधानासाठीच असतो. इतरांचा फायदा हे त्याचं 'बाय प्रॉडक्ट' असतं.

थोडक्यात, हा सगळा माझा प्रयत्न समाजाच्या जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी म्हणजेच 'क्वालिटी लाईफ'साठी आहे. जीवनसाथचं सगळं काम 'प्रिव्हेंटिव्ह' काउन्सेलिंगवर भर देणारं आहे. पण आपल्या समाजात 'क्युरेटिव्ह' कामच जास्त लोकप्रिय आहे आणि मानसिक अस्वास्थ्याच्या बाबतीत काहीच न करता नुसतं

सोसणं त्याहून लोकप्रिय आहे. त्याच्याहीपेक्षा वरच्या नंबरवर लोकप्रियतेच्या शिखरावर जोडीदाराला किंवा मुलांना छळणं आहे. त्याबद्दलचं जीवनसाथ हे प्रबोधनाचं काम आहे.

लोकांचे अनेक प्रश्न असतात. त्या प्रश्नाचं मूळ शोधायला गेलं तर त्याची मुळं त्यांच्या लहानपणाच्या वाढीत सापडतात. लहानपणी त्यांची वाढ चुकीच्या पद्धतीनी झालेली असते. म्हणजेच पालकांची वागण्यात चूक झालेली असते. त्या पालकांच्या वागण्यातल्या चुकीची कारणं शोधली तर ती त्यांच्या सह-जीवनात सापडतात. अनेकांच्या बाबतीत असं आढळतं की खरा सहजीवनाचा अभ्यास राहून गेला. लग्नसमारंभातच कुटुंबाची सगळी शक्ती संपली. समाजाच्या उत्सवी प्रवृत्तीमुळे दबाव इतका वाढत गेला की आयुष्य जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी काहीच करता आलं नाही.

माझा दृष्टिकोन कायम विवेकनिष्ठ बुद्धिवाद्याचा आहे. बुद्धी शब्दावरून आमच्याकडे नेहमी गंमत चालते. मी कुठलाच धर्म मानत नाही, हे सगळ्या जीवनसाथींना माहिती आहे. माझ्या विवेकवादाला ते 'बुद्धिझम' म्हणतात. तो गमतीचा भाग तात्पुरता सोडला तरी एक गोष्ट नक्की. विवेकनिष्ठ विचारांनी सहजीवनाकडे बघता आलं तरच उपाय सापडेल. म्हणून सहजीवनाबद्दल काहीतरी करता येतं का बघूया. त्यासाठी या पुस्तकसंचाचा महाप्रपंच.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, माणसाला कुठचाही प्रश्न असो, त्यावरच्या उपायाला सुरुवात झाली किंवा केली तरी स्वस्थ वाटतं.

●

उत्सवी प्रवृत्ती

•

लग्नसमारंभ

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजेच जीवनसाथ

अनुक्रम

पुस्तक क्र. 7

●●●

1

आयुष्यातले आनंद

1) आयुष्यातल्या आनंदाबद्दलचं तत्त्वचिंतन

जीवनसाथमधे मी असं समजतो की, एखादा वैयक्तिक पातळीवरचा विषय असला तर आपण जास्त संवेदनशील असतो. पण तोच विषय गटचर्चेच्या पातळीवर नेला तर तुलनेनी भावना थोड्या कमी तीव्र जाणवतात. गेल्या अनेक वर्षांतलं माझं पक्कं बनलेलं मत असं आहे की, आपल्या समाजाला विचार आणि भावना या दोन महत्त्वाच्या गोष्टींपैकी विचारांचं प्रशिक्षण जास्त जरूरीचं आहे. अतिशयोक्त भावना व्यक्त करण्याचं प्रशिक्षण साहित्य, सिनेमा आणि टी. व्ही. सीरियल्स यांनी भरपूर दिलेलं आहे.

लहान मूल जसं आई-बाबा दोघांचा हात धरून चालतं, तसा आनंद विचार आणि भावना यांचा हात धरून चालतो. पण विचारांचं प्रशिक्षण गरज असूनही कुठे मिळत नाही.

सिनेमात, टी.व्ही. सीरियल्समधे प्रथम कोणीतरी बघितलं असेल की एखादा मुलगा अमुक एका पद्धतीनी आनंद नाचत व्यक्त करतो, तमुक मुलगी आनंद झाला की धावत येते. त्यांचं अनुकरण करत दुसरा मुलगा, आणखी एक मुलगी करत सगळी तरुण मुलं बघावी तर सगळ्या लोकांच्या देखत हायफाय, गळाभेट, मिठी असलं काहीतरी करताना दिसतात. येऽऽ म्हणत धावत येऊन आलिंगन बघितलं की प्रश्नच पडतो, की आपल्यात काहीतरी उणीव आहे की काय? आपण आनंदानी नाचत नाही, धावत नाही, आपण नक्की नॉर्मल आहोत ना?

हे नाचणं, धावणं, मिठ्या वगैरे मला तरी ओव्हररिॲक्शन वाटते. अशा अतिशयोक्त पद्धतीनी आनंद किंवा दुःख व्यक्त करणाऱ्या माणसाबद्दल बोलताना 'नाटकी', 'तमासगीर' किंवा 'नासमझ' असंच मनात येतं.

आजचा आयुष्यातले आनंद हा विषय खरं म्हणजे थेट तत्त्वज्ञानातला विषय आहे. त्यातली मुख्य गोष्ट अशी की, मनातून माणसाला स्वतःच्या आयुष्यात दुःखाचं प्रमाण जास्त आहे की सुखाचं प्रमाण जास्त आहे हे माहिती असतं. लोकांजवळ त्यानी कितीही तक्रारी केल्या तरी सुखाचं प्रमाण जास्त असल्यामुळेच माणसाला जगावंसं वाटतं. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, दुःख कमी करण्यासाठी दोन मार्ग असतात. एक मार्ग म्हणजे सध्याच्या दुःखाहून मोठं दुःख पदरी घेणं किंवा ते दुःख विसरण्याइतका मोठा आनंदाचा अनुभव घेणं.

माणसाच्या आयुष्यात सुखाचे, दुःखाचे, आनंदाचे क्षण रोज येत असतात. कधी त्याला ते क्षण कळतात आणि मग पकडता येतात. कित्येक वेळा ते निसटतात. आनंद आणि समाधान यांच्या अर्थात फरक आहे. आनंद क्षणिक, थोड्या काळापुरता असतो. थोड्याच वेळात आनंदाची तीव्रता ओसरते. समाधान आल्हाददायक असतं. त्यात तृप्ती असते. ते सौम्य असतं. पण बराच काळ, दिवसाचे 24 तास टिकणारं असतं.

गेली 10-15 वर्षं हास्य क्लब नावाची लाट खूप लोकप्रिय झाली आहे. मला किंवा शोभाला या कल्पनेचं कधी आकर्षण वाटलं नाही. खुद्द हसू येणं ही चांगलीच गोष्ट आहे पण हास्य क्लबमधे जाणारे बरेच लोक आमच्या ओळखीचे असल्यानी आम्ही नक्की सांगू शकतो की, सकाळी बागेत जाऊन हसून आल्यानी त्यांच्या एरवीच्या आयुष्यातला आनंदबिनंद काही वाढलेला नाही. मी आणि शोभा सकाळी चालायला जातो तेव्हा असे निरनिराळे हास्य क्लब आम्ही बघितले आहेत. आम्हाला अशी कृत्रिम हास्यक्रिया कधीच अर्थपूर्ण वाटली नाही. त्यामधे काही गोष्टी चांगल्या पण वाटल्या. लोक भेटतात, ओळखी वाढतात हा तर नक्की फायदा आहे. शिवाय एका प्रकारचा श्वसनाचा व्यायाम पण होतो आणि इतर काहीतरी भलतं करण्यापेक्षा किंवा घरात तरुण पिढीला त्रास देण्यापेक्षा हे चांगलंच आहे.

एक माहितीतला गट आहे. त्यांचं काम चांगलं आहे. ते सगळे एकमेकांना भेटले की आनंद व्यक्त करणारे शब्द वापरतात. मला स्वतःला असं ओढूनताणून कृत्रिम पद्धतीनी बोललेलं काहीच योग्य वाटत नाही. खरं म्हणजे कुठचाच

मोठेपणाचा, निराळेपणाचा आव, आग्रह मला कधीच योग्य वाटत नाही. भगवे कपडे, भादरलेली डोकी, विशिष्ट माळा, विशिष्ट पादत्राणं, विशिष्ट मंत्र, विशिष्ट प्रार्थना यातल्या कशाचीही अट, आग्रह मला तत्त्वतःच योग्य वाटत नाही. मला हे माहिती आहे की, अशा वलयाशिवाय लोकप्रिय होता येत नाही, पण मी स्वतः असं काहीही दिसलं की त्यापासून दूर राहतो.

सध्या आपण तत्त्वज्ञानानी सांगितलेल्या मूलभूत गोष्टी इथेच थांबवून प्रत्यक्ष समोर बसलेल्या गटाच्या आयुष्यातल्या आनंदाकडे वळूया. तुम्हाला सगळ्यांना मी एक प्रश्न विचारतो, तुमच्या आयुष्यातले आनंदाचे प्रसंग जरा सांगाल का? लोक ओळीनी सांगायला सुरुवात करतात. काहींनी एकदा सांगितलं, एस.एस.सी. पास झालो तेव्हा खूप आनंद झाला. काही म्हणाले, ग्रॅज्युएशन पूर्ण झालं तेव्हाचा आनंद. नोकरीतला पहिला पगार मिळाला तेव्हाचा आनंद असा काहींना आठवत होता. अगदी वाटलेले पेढे, मित्रमंडळींना दिलेली पार्टी वगैरे सगळ्यांसकट वर्णनं सांगून झाली. काही लोक म्हणाले, लग्न ठरलं तेव्हा खूप आनंद झाला होता. मग प्रत्यक्ष लग्न होण्याचा आनंद काहींनी वर्णन केला. हनिमूनचा उल्लेख केला. बायकोला जेव्हा प्रथम दिवस राहिले तेव्हा अत्यानंद झाल्याची वर्णनं केली. पहिलं मूल होणं, मुलाचं लग्न, नातू होणं अशा पाच-दहा प्रसंगांचा उल्लेख सगळा मिळून झाला.

मग मी म्हणालो, की या सगळ्या आनंदाच्या प्रसंगांबद्दल जराही शंका नाही, पण अशा घटना वाटतात तेवढ्या प्रत्यक्षात भव्य-दिव्य नसतात. त्यामुळे थोडा विरस होऊ शकतो. याखेरीज आत्तापर्यंतच्या आयुष्यात आनंदाचे प्रसंग फक्त एवढेच असले तर बाकी सगळं काय होतं मग? खरं म्हणजे कोणाची कुठलीच भावना दीर्घकाळ टिकत नाही. आनंद याला अपवाद नाही. काही आनंद जास्त वेळ टिकतात, काही कमी. यशानी होणारा आनंद जास्त काळ टिकतो.

तत्त्वज्ञानामधे असं सांगितलं आहे की, नुसतं स्वस्थ वाटणं हा रोजचा सर्वांत मोठा आनंद आहे आणि तो प्रत्येक क्षणी मिळाला पाहिजे. शरीराला किंवा मनाला त्रास झाला तर दुःख होणार हे आपल्याला समजतं. पण ती वेदना कमी झाली, संपली की त्यानंतर पुन्हा चालू होतो तो आनंदच. थोडक्यात काही त्रास नसण्याचा आनंद हा सर्वांत मोठा आनंद आणि आयुष्यभरासाठीचा आहे.

अगदी साध्या गोष्टी बघा ना! आपण चोवीस तास व्यवस्थित श्वास घेतो. दम्याचा झटका आल्यावर त्या दमेकरी माणसाची अवस्था बघितली की जाणवतं

आपण किती नशीबवान आहोत ते. संधिवात झालेल्या माणसांचं अंग सतत दुखत असतं. इतकं की सांधे पुढेपुढे वाकडे व्हायला लागतात, साधी हालचालही कठीण जाते.

काही लोकांच्या घरी नवरा-बायको, सासू-सून, बाप-मुलगा यांच्यात रोज बाचाबाचीचे प्रसंग असतात. काही घरांत अबोला, रुसवा असलं काहीतरी कौटुंबिक ताण निर्माण करणारं असतं. असा काही ताण नसण्याचा आनंद महत्त्वाचा आहे.

हे तत्त्व जर पटलं असलं तर मगाच्या पाच-दहा प्रसंगांव्यतिरिक्तचे छोटे आनंद आपण सगळे मिळून शोधायला लागूया. हा प्रश्न शिस्तशीर सोडवायचा आहे. तपशीलात शिरून रोजच्या घटनांकडे 'क्रिटिकली' बघायचं आहे असं ठरवून त्यांचे काही भाग पाडूया. ते भाग असे -

1) शरीराविषयी आनंद वाटणाऱ्या गोष्टी, 2) पैसे किंवा चरितार्थ यासंबंधीच्या आनंद वाटणाऱ्या गोष्टी. 3) स्त्री-पुरुष संबंधांविषयी वाटणारे आनंद, 4) आत्मसन्मानाविषयीचे आनंद, 5) सौंदर्य, कला, खेळ अशा गोष्टींमुळे वाटणारा आनंद. 7) कुटुंबासंबंधी वाटणारा आनंद. 8) दुष्टपणाचा, दुसऱ्याला त्रास देण्याचा आनंद.

विषयाबद्दल शिस्तशीर आणि एकाग्रतेनी विचार करता यावा म्हणून त्याचे एवढे केलेले भाग आहेत, प्रत्येकाचा याबाबतीतला कमी किंवा जास्त अनुभव असला तरी एवढे सगळे आनंदाचे अनुभव थोडे थोडे प्रयत्नपूर्वक वाढवायचे आहेत. म्हणजे चुकून मनात दुःख साठलेलं असलं तर त्याचा भाग आणि भार आपोआप कमी होईल. गटातल्या कोणीही कुठच्याही क्रमानी जे सुचेल ते जरुर सांगा. मगाशी सांगितली तीच गोष्ट पुन्हा एकदा सांगतो, या गोष्टीपासून तुम्हाला आनंद मिळतो असं तुम्ही स्वतःच म्हणता आहात त्यामुळे अशा प्रत्येक आनंदाच्या अनुभवावर दोन क्षण जास्त रेंगाळायचं. आता त्याची यादी बनवायला सुरुवात करूया.

●

2) शरीराविषयीचे आनंद

- मनाजोग्या चवीचा चहा मिळणं.
- तहान लागलेली असताना योग्य तापमानाचं प्यायचं पाणी मिळणं.
- खूप भूक लागलेली असताना योग्य तो पदार्थ खाऊन भूक भागणं.
- एखादा उत्तम चवीचा जमलेला पदार्थ खाण्याचा आनंद.

आपला एखादा खूप आवडता पदार्थ असतो. तो पदार्थ अनेक महिन्यांनी, कधी कधी काही वर्षांनी अकस्मात समोर येतो तेव्हा खूप आनंद होतो.

मला स्वतःला लहानपणापासून आमरस-पुरी फार आवडते. आंब्याच्या मोसमात मी दोनही महिने सकाळ-संध्याकाळ आमरस-पुरी किंवा पोळी खायचो. परदेशात गेल्यावर आंबे अगदीच दिसेनासे झाले. अनेक वर्षांनी कायम वास्तव्यासाठी भारतात आम्ही परत आलो. माझी आमरसाची आवड माहिती असलेले गमतीत म्हणायचे, आम्ही कशासाठी अमेरिकेतून भारतात परतलो, तर आंब्यांसाठी. परत आल्यावर त्यानंतर आलेल्या आंब्याच्या पहिल्या मोसमात मी पहिल्यांदा आमरस-पुरी खाल्ली तो आनंद अवर्णनीयच होता.

- मी प्रत्येक वेळी नाश्ता, जेवण करतो तेव्हा मला प्रत्येक वेळी आनंद होतो. मुळात मला अक्षरशः सगळे पदार्थ मनापासून आवडतात.
- मला जसा स्वयंपाक येत नाही तसा अनेक पुरुषांना येत नाही. स्त्रियांच्यावर स्वयंपाक करण्याची जबाबदारी पडलेलीच असते. मला स्वतःला हा नेहमीच स्त्रियांवरचा अन्याय वाटतो. क्वचित केव्हातरी बायकांच्या वाट्याला आयता केलेला आवडीचा स्वैपाक येतो. अशा वेळी बायकांना खूप आनंद होतो त्याची मी कल्पना करू शकतो.
- मी अबुधाबीजवळच्या बेटावर प्रॉजेक्ट मॅनेजर म्हणून काम करायचो तेव्हा खूप कामगार पाकिस्तानी होते. सगळ्यांशी मोकळेपणानी वागण्याच्या माझ्या स्वभावामुळे मी त्यांच्याबरोबर आनंदानी जेवायला बसायचो. दोन देशांचं शत्रुत्व असलं तरी त्याचा आमच्या संबंधांवर काहीच परिणाम व्हायचा नाही. त्यांचा स्वैपाक निराळा आणि छान असायचा. मला त्यांच्याबरोबर जेवताना खरोखर आनंद वाटायचा.

● काही सुवास, विशेषतः मंद सुवास फारच आल्हाददायक असतात. पारिजातक, बकुळ, बूच, जाई-जुई, मोगरा ही फुलं फक्त उष्ण प्रदेशामधे असतात. विलायतेमधली फुलं दिसायला छान असतात पण त्यात सुवासाची मजा नाही.

● फुलं विकत न घेता बिनपैशात झाडावरून तोडून घेता आली की फुकट फुलांचा विशेष आनंद होतो.

● कुठूनतरी आल्हाददायक सुवास आपल्यापर्यंत अकस्मात पोहोचणं, ही गोष्ट खूप आनंद देते.

या एका गोष्टीचं मला स्वतःला अजून नवल वाटतं की, काही गोष्टींची चव अनेक वर्षं आठवत राहील अशी मेंदूत घर करून बसते ती कशी? अनेक वर्षांपूर्वीचे काही सुगंध मला अजून आठवतात. एखादा अतिशय सुरेल संगीतातला स्वर अनेक वर्षं आठवतो. एखाद्याच्या बोलण्याचा आवाज आठवतो. हे एवढं डोक्यात कसं राहातं हे बोलल्यावर गटापैकी काही लोकं निराळ्या ट्रॅकवरती गेली आणि तरी तो आनंद आहे हे मान्यच करायला पाहिजे.

● काही शरीराचे आनंद तर रोज अनुभवायला मिळतात.
पोट साफ होण्याचा आनंद.
शू झाल्यावर हलकं वाटण्याचा आनंद.
मळमळीनंतर उलटी झाल्याचा आनंद.

● कधीकधी पाठीला खाज येते, खाजवण्यासाठी हात पोचत नाही. त्यासाठी योग्य वस्तू सापडत नाही. खूप खटपट करून, कपाटाचा कोपरा शोधून, शेवटी एकदाची खाज शमली की छान वाटतं. हेही खरंय् की हात मोकळे नसले की हमखास खाज सुटते. आपण मगाशी म्हटलं तसं, काय क्रमानी गोष्टी डोक्यात येतील याला काही नियम नसतो आणि सुचण्याच्या क्रमाबद्दल आपला आग्रह पण नाही.

● स्वतः जास्त उंच असल्याचा अभिमान आणि त्याचा आनंद.
स्वतः ताकदवान असल्याचा आनंद.
स्वतः चपळ असल्याचा आनंद.

● कधीकधी तळपायात, तळहातात अगदी बारीक कूस गेलेलं असतं. ते निघता निघत नाही. शेवटी जोडीदारासमोर पाय धरून बसून उकराउकरी करून ते कूस एकदाचं निघतं तेव्हा काय आनंद होतो!

निरनिराळ्या परिस्थितींमधे खूप गमतीशीर असे आनंदही असतात पण ते

आनंदच असतात यात काही शंका नाही. मला स्वतःला अनेक वेळा आठवतंय तसंच तुम्हालाही वाटतं का ते सांगा.

● आवाज बसला की काही काळ छान वाटतं. लहानपणी तर आजारी पडल्यावर छान वाटायचं.

● मी जेव्हा आखाती देशांच्या होतो त्यावेळेस रात्री झोपताना एकदम थंड ए.सी. करून जाड दुलईमधे गुरफटून झोपण्याचा आनंद वाटायचा.

● खूप काळ बाहेर हिंडत असलं की आपल्या घरात शिरताना होणारा आनंद.

● बराच वेळ घरात बसल्यावर बाहेर पडण्याचा आनंद.

● भर उन्हातून परतत असताना समोर कुल्फीची गाडी किंवा बर्फाच्या गोळ्याची गाडी आपल्या समोर येण्याचा खास आनंद असतो. त्यानंतर गोळा किंवा कुल्फी खाल्ली तर मग फारच छान.

● प्रवासाला निघताना प्रवास सुरू होताना...

● प्रवास संपवून शेवटी एकदाचं घरी पोहोचताना...

● प्लॅटफॉर्मवर बराच वेळ उभी असलेली रेल्वे स्टेशनबाहेर पडल्याचा आणि तीच रेल्वे बराच वेळ प्रवास करून स्टेशनमधे शिरल्याचा.

● प्रवासात कार बंद पडली तर मेकॅनिकनी ती दुरुस्त केल्यावर पुन्हा चालू झाल्याचा आवाज.

● मोठ्या आकाराची चांगली डिझाइन केलेली स्वच्छ टॉयलेट नुसती बघून होणारा आनंद.

● वेळ असेल तेव्हा बाथटबमधे टब भरून गरम पाणी साठल्याचा आनंद. वेळ असण्याला यात फार महत्त्व आहे. आपल्यालाच वेळ नसेल तेव्हाच्या खूप चांगल्या गोष्टीलाही काही किंमत नसते. भारतातल्या घरांच्यात बाथ टबची सोय कमी ठिकाणी असते. अनेक मध्यमवर्गीयांनी बाथ टब कधी बघितलेला नसतो. काहींनी बघितलेला असतो पण वापरलेला नसतो. कित्येक कष्टकऱ्यांनी हा शब्दही ऐकलेला नसतो. याउलट विलायतेत प्रत्येक घरात बाथटब असतो आणि शॉवरचीही सोय असते.

● टबमधल्या आंघोळीची मजा काही औरच असते. इंग्लंडमधे किंवा यू.एस.ए.मधे आम्ही पूर्वी राहायचो तेव्हापासून आपल्यासारखी साधी मोरी नसतेच. आंघोळीची सोय याचा अर्थ टबच असतो. पूर्वी तिथे नोकरीवर असताना आठवड्यातून एकदा टबबाथ अशीच सवय होती. त्यानंतर आम्ही रात्री आंघोळीची

सवय केली. म्हणजे सकाळी घाई व्हायला नको. पण तरी शनिवार, रविवार खेरीज एकूण आंघोळ लवकरच उरकायचो. नंतर जेव्हा भारतातून सुटीसाठी इंग्लंडमधे, अमेरिकेत गेलो, म्हणजे मुलांकडे किंवा मेव्हण्याकडे गेलो, तेव्हा कसलीच घाई नसायची. भरपूर गरम पाणी असायचं त्यामुळे रोज आरामात आंघोळ चालायची. पुस्तक वाचत टबमधे पडून राहून एक तास आंघोळ केल्याचंही मला आठवतंय.

त्याखेरीज काही ठिकाणी 'जॅकूझी' म्हणजे टबच्या तळातून पाण्याच्या फवाऱ्याचीही सोय होती. त्यानी पण छान वाटायचं. काही ठिकाणी 'सॉना बाथ'चीही सोय होती. गरम वाफेमधला शेक ही पण स्वतंत्र गंमत असते.

आमच्या भारतामधल्या घरी आम्ही टबबाथचा बराच प्रयत्न केला, पण टबभर पाणी, ते पुन्हा गरम करण्याची सोय वगैरे भानगडी नीट लक्षात आल्यामुळे टबचा नाद सोडून दिला, वेळेप्रमाणे शॉवर किंवा बादलीत पाणी याचाच वापर करतो.

- भरजरी कपडे आणि दागिने घातल्यावर आरशात बघून होणारा आनंद.
- सुती, मऊ, साधे कपडे घातल्याचा आनंद.
- डोळे बिघडून चष्मा लावायला लागल्याचा आनंद.
- डोळ्याचा नंबर जाऊन चष्म्याची कटकट थांबण्याचा आनंद.
- व्यायाम चालू करण्याचा आनंद.

अकस्मात काहीतरी कारणानी व्यायामशाळेला किंवा घरच्या व्यायामाला आज सुटी असं ठरतं तेव्हादेखील आनंद होतो.

- एखादं योगासन जमण्याचा आनंद.
- विशिष्ट शारीरिक अवस्था - अनेक दिवस जी जमत नव्हती ती साधल्याचा आनंद.
- स्वतःला सुदृढ, कणखर, चिवट असं वाटण्याचा आनंद.
- तब्येतीला काही होत नसताना पण खूप दमणूक झाल्यावर अंग दुखण्याचा आनंद.
- मी माझ्या तरुणपणी चक्क लाल मातीच्या आखाड्यात कुस्ती खेळायचो. कुस्ती खेळणं हा मनःशांतीचा उपाय मानतात. कुस्ती जिंकण्याचा आनंद असतोच, पण खेळण्याचाही आनंद असतो.
- खूप झोप आल्यावर योग्य वेळेत झोपायला मिळालं तर आनंद होतोच.

चांगली झोप झाल्यावरही छान वाटतं. एकाच गोष्टीचं वाईट वाटतं. झोपेइतक्या छान सुखद गोष्टीचा झोपेत अनुभव घेता येत नाही.

● आपण बंद जागेत, खोलीत किंवा गाडीत असताना एकच डास इकडून तिकडे उडत असतो, त्याला टाळीत पकडून चिरडायची खूप धडपड करतो, पण तो काही हाती लागत नाही. शेवटी जेव्हा एकदा तो टाळीत सापडून मरतो तेव्हा खूप आनंद होतो.

● याच प्रकारे घरात एखादं झुरळ आपल्याला हुलकावण्या देत ओट्याखालून फ्रीजखाली, तिथून कपाटामागे अशी आपली खूप धावपळ करत असतं. आपण चप्पल हातात घेऊन त्याच्यामागे धावत असतो. शेवटी एकदाचा एक फटका बसतो आणि झुरळ मरतं तेव्हा काय आनंद होतो!

● कुठचाही खेळ खेळताना होणारा आनंद.

● खेळात आपण स्वतः किंवा आपला गट जिंकल्याचा आनंद.

मी तरुणपणी भरपूर क्रिकेट खेळायचो. खूप घणाघाती बॅटिंग, फास्ट बोलिंग आणि स्पिन बोलिंग दोन्ही करायचो. मला आठवतंय्, सिक्सर आणि बाऊंड्री मारताना खूप आनंद वाटायचा. त्याचबरोबर विकेट मिळाली की खरोखर आनंद व्हायचा.

● एखाद्या खेळाच्या सामन्यात, स्पर्धेत मराठी माणूस जिंकला की त्याचा खास आनंद होतो.

● एखाद्या खेळात आपला देश जिंकला तर किती आनंद होतो!

एकदम आपल्याला काही मिनिटं देशाचं भवितव्य उज्ज्वल वाटायला लागतं. एखादा पक्ष निवडणूक जिंकला की काहींना खूप आनंद होताना मी बघितला आहे. त्यांच्या नजरेसमोर भारताचं उज्ज्वल भवितव्य येतं. पुढच्या दहा वर्षांत भारत महासत्ता बनेल वगैरे कल्पना त्यांना खऱ्या वाटतात त्यामुळे त्यांना खूप आनंद होतो. ते रस्त्यावर नाचतात, गुलाल उधळतात, काही पेढे वाटतात. हे बघून गंमत वाटते. मला स्वतःला कुठलाही पक्ष निवडणुकीत जिंकला तरी आनंद होत नाही. अनेक रोगांनी जर्जर अशा आपल्या देशाची तब्येत सुधारू शकेल असा डॉक्टर अस्तित्त्वात आहे, असं मला वाटत नाही.

● कधीकधी टी.व्ही.वर आपल्या दृष्टीनी काहीतरी महत्त्वाचं चालू असतं आणि तेव्हाच वीज जाते, केबल बंद होते, टी.व्ही. प्रक्षेपणामधे ‘व्यत्यय-क्षमस्व’ पाटी दिसायला लागते आणि आपण हवालदील होतो. ती अडचण दूर होऊन

पुन्हा टी.व्ही. चालू होतो तेव्हा काय आनंद होतो!

● त्याचप्रकारे खूप आवाज करणारा स्टोव्ह, ड्रिल मशीन, फटाके असं काहीतरी त्रासदायकपणे आवाज करणारं काहीही थांबलं की हायसं वाटतं.

● कधीकधी फोनमागून फोन येत असतात आणि ते सारखे धावून धावून घ्यावे लागतात. काही लोकांचं कामच फोनला उत्तर देण्याचं असतं. अशा माणसाची जेव्हा फोन घेण्यापासून सुटका होते तेव्हा तो एकदमच खूष होतो.

● या सगळ्या आनंदाबद्दल जराही शंका नाही आणि तरीही हे सगळं आत्तापर्यंतचं वर्णन तरुण माणसाचं आहे. इथे जमलेल्या मुलग्यांपैकी कोणीही बोलत नाहीय पण त्या यादीमधे वाढवण्याची गोष्ट म्हणजे हस्तमैथुनाचा आनंद. या बाबतीमधे भारतापुरतं बोलायचं तर स्त्रियांचं हस्तमैथुनाचं प्रमाण फार कमी आणि पुरुषांचं फार जास्त. विलायतेमधे याची सगळी प्रमाणं निराळी आहेत.

● वय वाढलं की निराळीच आनंदाची यादी बनायला लागते. आपण आपल्या खऱ्या वयापेक्षा लहान दिसतो असं दुसऱ्या कुणी म्हणणं. पन्नाशी आली, अजून आपल्याला मधुमेह आणि रक्तदाब यांनी धरलेलं नाही यामुळे माणसं खूष होतात. मधुमेह असला तर ग्लुकोमीटरवरचं रीडिंग नॉर्मल रेंजमधे आलं की त्या दिवशी ते खुशीत असतात. मधूनमधून ब्लडप्रेशर इन्स्ट्रुमेंटवर बीपी कमी-जास्त होत असताना बघणं हे तर नेहमीच चालू असतं, पण कुठचीतरी गोळी लागू पडली आणि रक्तदाब एकदम कंट्रोलमधे आला की माणूस खूष होतो. तुम्ही तुमच्या आई-वडलांना घरी जाऊन हेच प्रश्न विचारलेत तर तुम्हाला असं आढळेल की त्यांची सगळी यादीच निराळी आहे. आपलं एवढं वय होऊन देखील गळ्याला कॉलर, कंबरेला पट्टा, कानाला श्रवणयंत्र, हातात काठी यातलं काही न वापरावं लागणं याचा म्हाताऱ्या माणसाला आनंद वाटतो.

मगाचची यादी पुन्हा चालू करायला हरकत नाही.

● हिरवळीवर अनवाणी चालण्याची फार गंमत असते.

● कडक हिवाळ्यामधे उन्हात बसणं.

● खरं म्हणजे उन्हाळा संपून पावसाळा चालू झाला की छान वाटतं. हवेत बदल होतो. पावसाळा संपून हिवाळा सुरू झाला की छान वाटतं. ऋतूतला हा बदल नेहमीच आनंद देतो.

● लहानपणी वयापेक्षा मोठं दिसलं तर छान वाटतं.

●

3) पैसे आणि चरितार्थाविषयीचे आनंद

● घरात कधीकधी थोडीशीच वस्तू शिल्लक असते. कधी खाद्यपदार्थ, कधी प्रसाधन, औषध असतं आणि अगदी दोन तुकडे, दोन थेंब, बाटलीच्या तळाशी थोडासा पदार्थ उरलेला असतो. तो संपवून ती बाटली कचऱ्यात टाकून देताना चक्क आनंदच होतो. गरीब देशातल्या आपल्या सगळ्यांच्या बनलेल्या मानसिकतेमधे वस्तू पुरेपूर वापरल्याचं ते समाधान असतं.

कधी पेन्सिलचा छोटा तुकडा, खोडरबरचा तुकडा अगदी शेवटापर्यंत वापरण्याची इच्छा असते. मी स्वतः असे अनेक प्रयत्न करतो आणि ते यशस्वी झाले तर चक्क आनंद होतो. त्या आनंदात काही भाग स्वतःचे पैसे वाचवल्याचा तर काही राष्ट्रीय संपत्तीची बचत केल्याचाही असतो.

● कुटुंबानी जेवढं ठरवलं असेल तेवढं शिक्षण पूर्ण होण्याचा आनंद.

● नोकरी लागणं, ती चांगली असणं याचा आनंद.

मागे चर्चेच्या वेळी एकदा हा विषय घेतला होता, तेव्हा एका मुलीनी सांगितलेली गोष्ट तिच्याच शब्दांत सांगतो.

'मला माझ्या पहिल्या पगाराचा आनंद आठवतो. पहिला पगार मिळाल्याचा आनंद तर होताच. पण त्यातून मी आई-बाबांना आणि इतरांना छोट्या छोट्या गिफ्ट्स् दिल्या. त्या देण्यात मला खूप वेगळा आनंद मिळाला. तो मला अजून आठवतो.'

मी स्वतः विसाव्या वर्षी पैसे कमवायला लागलो. पण आई-वडलांची आर्थिक परिस्थिती माहिती असल्यामुळे 'गिफ्ट'च्या भानगडीत मी पडणं शक्यच नव्हतं. त्यांना रोख पैशांचाच उपयोग सर्वांत जास्त होता. मी मिळवलेल्या पैशानी त्यांचा पैशाचा भार हलका होतोय् याचा आनंद मात्र खूप होता.

● दुसरी एक मुलगी भाषेतलं अंग असणारी होती. ती म्हणाली, 'मला लिहिण्याची संधी मिळाली. 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धेसाठी मी 40 मिनिटांची एकांकिका लिहिली आणि तिची निवड झाली. त्यातून आपण लिहू शकतो हा आत्मविश्वास तर मिळालाच पण त्यातला क्रिएटिव्हिटीचा आनंद मोठा होता.'

स्वतः काहीतरी लिहिण्याचा खरोखरच निराळा असतो. आता मी हे जे

पुस्तक लिहितोय् त्याचंच उदाहरण बघा ना! हे पुस्तक किती पानी होईल, खूप मोठं पुस्तक झाल्यामुळे त्याची किंमत बरीच असेल, त्याचं काय होईल, कोण प्रकाशन करेल, हे प्रश्न नंतर येणार आहेत हे मला माहिती आहे, पण त्या सगळ्यांपेक्षा हे पुस्तक लिहिताना मला होणारा आनंद जास्त मोलाचा आहे. 1985 च्या आसपास मी 'घर पहावं बांधून' नावाचं पुस्तक लिहिलं होतं. ते चांगलं खपलं. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या, हे सगळं खरंच, पण मला त्याहीपेक्षा जास्त आनंद झाला तो चक्क 'घर पहावं बांधून' या पुस्तकाचं कौतुक करणारं पु. ल. देशपांडे यांचं पोस्टकार्ड वाचून.

● त्याच चर्चेत एक मुलगा सांगत होता की, तो मुलगा असून त्याला भाकऱ्या करता यायच्या. फार कमी पुरुषांना स्वैपाक येतो, त्यात भाकऱ्या आणखीन् कठीण त्यामुळे मलाही त्या मुलाचं कौतुक वाटलं. पुढे तो म्हणाला की, नात्यातल्या एका बाईंनी त्याला चॅलेंज दिलं. त्यानी खरोखरच भाकऱ्या करून दाखवल्या आणि त्या नातेवाईक बाईंची जिरवल्याचा त्याला आनंद झाला. दुसऱ्याचं आव्हान स्वीकारून काहीतरी करून दाखवण्याचा आनंद जास्त महत्त्वाचा आहे, पण मी जिरवल्याचा आनंद होतो हे समजू शकतो.

● काही लोकांची राहाण्याची आणि कामाची जागा अगदी जवळ असते. इतरांप्रमाणे प्रचंड प्रवास करायला न लागणं याचा निराळा आनंद असतो.

● काही ठिकाणी कामाची जागा जरा लांब असते पण कामाच्या जागेवर जेवणाची स्वस्त आणि उत्तम दर्जाची सोय असते. अशा ठिकाणी काम करणाऱ्याला आणि त्यामुळे घरच्यांना फार समाधान वाटतं.

● काही कामाच्या ठिकाणी मुलांना सांभाळण्यासाठी चांगलं पाळणाघर असतं. त्यामुळे कामावर जाताना मुलांना घेऊन जायचं, जाता-येताना कंपनीतर्फे वाहनाची सोय आणि मुलांची चिंता नाही अशा ठिकाणी काम करणारे स्वतःला खूप भाग्यवान समजतात.

● नोकरीत प्रमोशन मिळणं. त्याचा आनंद.

● छोटा काहीतरी उद्योग करून चरितार्थापुरते पैसे मिळवणं. त्याचा आनंद.

आपल्या आवडीचं काम करून चरितार्थाएवढे पैसे मिळवण्यानीही खूप समाधान मिळतं. दुसऱ्या कोणाची चाकरी न करता स्वतःच्या बळावर पैसे मिळवण्याचा आनंददेखील फार मोठा असतो.

● एखाद्या कामाचा भरघोस मोबदला मिळणार या कल्पनेचा आनंद.

(प्रत्यक्ष ते पैसे जेव्हा मिळतात तेव्हा तेवढाच आनंद होईल याची खात्री नाही.)

● साधारण 35-38 वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सिमेंटची प्रचंड टंचाई होती. सगळ्या बांधकाम क्षेत्रात या एका गोष्टीनी हाहाःकार झाला होता. अर्ज करून, मागे लागून जेव्हा सिमेंटचं परमिट हातात पडायचं तेव्हा खूप आनंद व्हायचा.

मी पूर्वी उल्लेख केला होता की, फिलाडेल्फिया, यू. एस. ए. मधे मी कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटचा कोर्स केला होता. त्यामधे मी अतिजलद बांधकामाचं तंत्र खास करून शिकलो होतो. इतर कोणीही करू शकत नाही असं काम अतिजलद वेगानी पुरं करण्याच्या कामात खूप कष्ट होते, खूप प्राप्ती होती, पण त्याहीपेक्षा जास्त आनंद होता. प्रत्यक्ष साइटवर काम चालू होण्यापूर्वी कागदावरच्या डीटेल्ड प्लॅनिंगमधेही मजा असते आणि साइटवर काम चालू झाल्यावरही खूप मजा येते.

● मी बांधकामाच्या धंद्यात रोज खूप गुंतलेला असायचो. खडी पोचली का, वाळू पोचली का, लेबर कुठे गायब झालं, सुपरवायझरनी केलेले घोळ, यात सबंध दिवस जायचा. मी जेव्हा बांधकामातून निवृत्ती घेतली तेव्हा या सगळ्या गोष्टी यापुढे कराव्या लागणार नाहीत याचा आनंद झाला.

● व्यवस्थापन हा माझ्या आवडीचा विषय आहे. निरनिराळ्या क्षेत्रांतल्या लोकांना व्यवस्थापनशास्त्र शिकवणं यानी मला फार आनंद मिळतो.

तरुणपणी स्वतःच्या आयुष्याबद्दल अशी कल्पना असते की, आपण सगळ्यांशी सरळपणी आणि चांगलं वागू म्हणजे आपण जगन्मित्र होऊ. प्रत्यक्षात दुसऱ्याच्या मनातल्या मत्सरावर आपलं काही नियंत्रण नसतं. त्याचा त्रास आपल्याला होतोच. एखाद्याला मात्र लोकांशी वागण्याची कला अवगत असते. तो पूर्णपणी नाही पण जवळजवळ अजातशत्रू असतो. अशा माणसाचे आनंदाचे क्षण दुःखाच्या क्षणांपेक्षा खूपच जास्त असतात.

अशा माणसांना मुख्य जी गोष्ट जमलेली असते ती म्हणजे नाराजी किंवा राग सोडून देणं. ज्या गोष्टीवर आपलं नियंत्रण नाही अशा गोष्टींचा मनस्ताप न करून घेणं. अशा गोष्टी बदलत बसण्याचा प्रयत्न आपल्या आनंदाच्या आड येतो. आपण कसं वागायचं हे आपण ठरवू शकतो. इतरांनी कसं वागावं हे आपण ठरवू शकत नाही. कित्येक वेळा सांगूही शकत नाही.

पैसे ही एक गोष्ट अशी आहे की, ती आनंद देते आणि हिरावतेही. गुंतवणूक, मालमत्ता असली की त्याला धोका निर्माण होतोच, म्हणजे ती सांभाळण्याची कटकट होणारच. पैसे राखून असलेल्या माणसाशी लोक तोंडावर

चांगले वागतात पण मनातून त्याचा मत्सर करतात. आपल्याजवळ चोरण्याजोगं काही असलं की चोरीचा धोका असतो. असा माणूस अजातशत्रू असणंच शक्य नाही. पैसा आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेची सगळी योग्य व्यवस्था केली तरच त्याचा आनंद मिळू शकतो.

● फार पूर्वीपासून माझा अल्पबचतीवर विश्वास होता. रोज अगदी थोडी रक्कम बँकेत साठवत जायची याची जादू मला पूर्ण पटलेली होती. मधे काही कारणांनी आमच्या हातून ती गोष्ट झाली नाही. पण मोठा खंड पडून पुन्हा आम्ही रोज काही रक्कम बाजूला टाकायला लागलो तेव्हा आनंद वाटला.

● आणखी हवं, अधिक हवं असा हव्यास माणसाला आनंदानी जगू देत नाही. वस्तूंच्या मालकीसाठीची स्पर्धा, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, शेजारी-पाजारी यांच्याशी स्पर्धा करण्याच्या ईर्षेला बळी पडणं हे आनंदाचे शत्रू आहेत. इंग्लिश भाषेमधे एक छान म्हण आहे. 'इन अ रॅट रेस, ईव्हन इफ यू विन, यू आर स्टिल अ रॅट'. मला आणि शोभाला वस्तूंचा हव्यास नाही याचा आम्हाला आनंद होतो.

● नोकरीच्या किंवा धंद्याच्या शेवटच्या दिवशी वाटणारा आनंद.

● धंद्यामधे सगळ्यांच्याशी जुळतंच असं नाही. कधीकधी तीव्र मतभेदही होतात. असं भांडण संपून सगळं सुरळीत झाल्याचा आनंद मोठा असतो.

● आपल्याला स्वतःची लायकी मनातून माहिती असते. त्यापेक्षा जास्त मोबदला मिळाल्याचा आनंद.

● बाजारातली एखादी वस्तू इतरांपेक्षा आपल्याला स्वस्त मिळाल्याचा आनंद.

● कोणी कोणाला न फसवता रास्त व्यवहार झाल्याचा आनंद.

● कधी कधी एखादं काम ठरण्याच्या बेतात असतं तेवढ्यात कुठेतरी माशी शिंकते, पुन्हा हो, पुन्हा नाही, यामधे खूप वेळ जातो. शेवटी करारावर जेव्हा प्रत्यक्ष सह्या होतात तेव्हा हायसं वाटतं.

● कामात प्रचंड बुडालेलं असल्याचा आनंद.

● काम उरकत आल्याचा आनंद आणि काम संपल्याचा आनंद.

कामाबद्दलच्या दोन प्रवृत्ती आपल्याला दिसतात. काही लोक रविवारी मिळणाऱ्या सुटीसाठी सोमवार ते शनिवार नाइलाजानी काम करतात. दुसऱ्या प्रकारचे लोक सोमवार ते शनिवार आपल्या कामाची कार्यक्षमता टिकवण्यासाठी रविवारी सुटी घेणं आवश्यक मानतात. मी स्वतः सरळसरळ दुसऱ्या प्रवृत्तीचा

आहे. फक्त बांधकाम सल्लामसलतीच्या व्यवसायातून निवृत्ती घेऊन वैवाहिक समुपदेशनात आल्यापासून अनियमितपणा वाढला आहे. लोकांना अडचण असते म्हणून तर ते येतात. त्यामुळे कुठच्याही वारी निरनिराळ्या वेळी समुपदेशन चालतं.

कामाबद्दलचा दृष्टिकोन उथळ असणारी बरीच माणसं माझ्या माहितीत आहेत. ती संपूर्ण आयुष्य करमणुकीसारखं घालवतात. अडचणीचा प्रश्न आला की तो ती नुसता पुढे ढकलतात. मग दुसरं कोणीतरी तो प्रश्न सोडवतं आणि अशी माणसं त्यातून सुटतात. या प्रकारच्या लोकांना या वागणुकीतून आनंद मिळत असेल असं मला तरी वाटत नाही.

● सकाळी उठून तुम्ही घाईघाईनी कामावर जाण्यासाठी आवरायला लागणार तेवढ्यात लक्षात येतं की आज सुट्टी आहे त्यामुळे अजून थोडा वेळ झोपण्यात काहीच अडचण नाही.

● कर्ज फेडण्याचा आनंद.

● स्वकष्टानी दर महिना थोडे थोडे करत रक्कम साठताना दिसत असते. जेव्हा ती रक्कम एक मोठा आकडा बनते तेव्हा खूप छान वाटतं.

● 1995 साली माझ्यावर साधारण 22 लाखांचं कर्ज होतं. माझ्या मानानी ती रक्कम फार प्रचंड होती. साधारण तीन वर्षांत जेव्हा मी शेवटचे कर्जाऊ पैसे परत केले तेव्हा आमच्या सबंध कुटुंबाला अतिशय आनंद झाला.

● पैसे साठवल्याचा आणि ते तक्त्यात लिहून प्रत्यक्ष बघितल्याचा आनंद.

● आपल्या गुंतवणुकीवरचं व्याज रोज वाढतंय, रविवार असो, सुटी असो, संप असो, बंद असो, मोर्चा असो, व्याज सुटी न घेता सतत वाढतंय् ही भावना आनंददायक असते. विशेषतः वय झालं की.

● एखादी वस्तू हरवलीय् असं आपण समजत असतो ती अचानक सापडण्याचा आनंद. माझं आणि शोभाचं मॅरेज सर्टिफिकेट बरीच वर्षं सापडत नव्हतं. मधे ते दुसरीच एक वस्तू शोधताना सापडलं. आम्ही खूष झालो.

● मनुष्य स्वभावाची ही मोठी गंमत आहे. त्याला पैसे खर्च झाले याचाही आनंद वाटू शकतो आणि पैसे खर्च न करता काटकसर केल्याचाही आनंद वाटतो. मागे खूप महागाई वाढली तेव्हा आमचा रोजचा खर्च मी माझ्या डायरीत रोज लिहायचो. एकदा खात्री झाली की, आपला दर महिन्याचा खर्च दर महिना मिळकतीत नक्की भागतो आहे. मग डायरीत खर्च लिहिणं थांबलं. आता रोज खर्च लिहावा लागत नाही याचा मला खूप आनंद होतो.

● मी 72 वर्षांचा आधीच्या पिढीचा माणूस आहे आणि माझ्यावर माझ्या आई-वडलांकडून झालेले काटकसरीचे संस्कार आहेत. एखादी वस्तू फेकण्यापेक्षा वापरून संपवण्यानी मला स्पष्टपणी आनंद होतो. घरातल्या अडगळीतली निरुपयोगी वस्तू वापरणारा कोणी भेटला आणि ती तो वापरण्यासाठी घेऊन गेला तरी मला आनंद होतो. कोणीही वापरणारं नाही भेटलं आणि ती फेकून द्यावी लागली तरी ती फेकल्यावरही मला छोटा आनंद होतो. मी जुने लेंगे कापून त्यांच्या जेव्हा चड्ड्या बनवल्या त्यामुळे मला तर बाबा चक्क छान वाटलं.

● आपल्याला पटलेल्या तत्त्वाप्रमाणे वागलं की छान वाटतं. मला स्वतःला हे फार पूर्वीपासून पटलेलं आहे की पाण्याची बचत करणं पर्यावरणासाठी महत्त्वाचं आहे. अंघोळी, धुणी-भांडी यांना वापरण्याच्या पाण्याची कशी बचत करता येईल ते मी बघत असतो, त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याचाही वापर जपूनच करतो. कोणी पाहुणे आले की मी त्यांना पाणी देतो, पण ते भांड्यात ओतून देत नाही. लोक भांड्यातलं थोडं पाणी पिऊन बाकीचं ठेवून देतात आणि ते उष्टं झाल्यामुळे फेकावं लागतं. यासाठी मी पाण्याची बाटली आणि रिकामं भांडं समोर ठेवतो. योग्य वागल्यामुळे मला स्वतःला चांगलं वाटतं.

● अनपेक्षितपणी भेटवस्तू कोणाकडून तरी मिळते आणि छान वाटतं. मी स्वतः भेटवस्तू देण्याघेण्याचं बंद केलेलं आहे, पण लोकांचा हा आनंद मी समजू शकतो.

महाराष्ट्रीय शहरी मध्यमवर्गीय समाज गिफ्ट देणं या गोष्टीत थेट पाश्चात्त्यांचं अनुकरण करण्यात तयार झालेला आहे. लोक सारखे एकमेकांना वस्तू देत असतात. त्यातली सरप्राइज गिफ्ट ही कल्पना मला जास्त चुकीची वाटते. त्या माणसाकडे ती वस्तू आधीच असली म्हणजे? ती वस्तू न वापरण्याचा त्या माणसानी निर्णय घेतला असला म्हणजे? वस्तू, त्याचे पैसे वाया जाण्याचा आणि संबंधित सगळ्यांना वाईट वाटण्याचा धोका सरप्राइज गिफ्टमधे असतो. ही कल्पना थेट फिल्मी आणि त्यामुळे बाद ठरवायला हवी. त्यातला आनंद मला समजतो, पण पटत नाही.

● अनपेक्षितपणे गिफ्ट कूपन्स मिळण्याचा आनंद असतो.

● कसली तरी तिकिटं खरेदी केलेली असतात, त्यात लकी ड्रॉ काढतात आणि थेट आपल्याला काहीतरी बक्षीस मिळून जातं त्याचा आनंद.

एकदा मी आणि शोभा पणजी-पुणे लक्झरी बसनी येत होतो. करमणुकीसाठी

हाउसी हा खेळ खेळणं चालू होतं. माझ्यासारखं इतर काही तिघा-चौघांचं फुलहाउस झालं होतं. त्यात पुन्हा लकी नंबर काढला आणि मला एक मनगटावरचं घड्याळ बक्षीस मिळालं. आनंद तर झालाच. ते घड्याळ बायकांचं असल्यामुळे शोभा पुढे काही वर्षं ते वापरत होती.

● कल्पना नसताना कोणीतरी मृत्यूपत्र करून आपल्याला पैसे ठेवल्यामुळे आपल्याला अकस्मात पैसे मिळाल्याचा आनंद.

● आम्ही साधारण आठ वर्षांपूर्वी शनिवार पेठेतला भागवतवाडा विकला आणि कर्वेनगरमधे राहायला आलो. शोनील आणि आभा केव्हाच पुणं सोडून परदेशात गेले होते आणि माझ्या पश्चात जुन्या वाड्याच्या दुरुस्त्या, तो सांभाळणं वगैरे त्यांना जमणार नाही हे त्यांनी स्पष्ट केलं होतं. शोभाचंही तसंच म्हणणं होतं. मला एकट्याला भागवत वाडा विकायचा या कल्पनेचं वाईट वाटत होतं. एक तर अगदी वाईट अवस्थेतल्या वाड्याला दुरुस्त्या, रचना करून, कल्पना लढवून मी चांगल्या स्वरूपात स्वतः आणलं होतं त्यामुळे मला त्याविषयी आपुलकी जास्त होती. थोडक्यात ते माझं अपत्य होतं आणि मी त्याच्यावर खूप मेहनत घेतली होती. इतर तिघांच्या तुलनेत मला जास्त वाईट वाटलं होतं. साधारण तीन वर्षांपूर्वी काहीतरी निमित्तानी मी पुन्हा त्या गल्लीत गेलो. गाडी पार्क करण्याची अडचण, एकूण गोंगाट, वाढलेली वस्ती बघून मला त्या वेळेला झालेलं दुःख एकदम पळून गेलं आणि भागवतवाडा विकण्याच्या त्या निर्णयाचा मला आनंद वाटला.

● आम्ही पुण्याच्या कर्वेनगर भागात सर्वांत वरच्या मजल्यावर साधारण सात वर्षांपूर्वी राहायला आलो. स्लॅब तापते त्यामुळे उन्हाळ्यात खूप उकडतं. आम्हाला पटत नसलं तरी ए.सी. लावावा लागला याचं मनातून वाईट वाटायचं. त्याच्या खर्चापेक्षाही पर्यावरणविरोधी कृत्य केल्याबद्दल दुःख वाटायचं. जेव्हा लक्षात आलं की आमच्या इमारतीत जवळजवळ सगळ्या मजल्यांवरच्या सगळ्या लोकांनी ए.सी. बसवलेत तेव्हा पाप करणारे आपण एकटेच नाही याचा आनंद झाला.

●

4) स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे आनंद

समाजशास्त्रामधे असलेल्या निरनिराळ्या विषयांत फक्त पुरुष असलेली ठिकाणं आणि फक्त स्त्रिया असलेली ठिकाणं यांचा अभ्यास असतो. जहाजावर, एखाद्या गिर्यारोहणाच्या मोहिमेवर किंवा काही मोठ्या बांधकामाच्या साइट्सवर फक्त पुरुष असतात. अशीच फक्त स्त्रिया असलेली कमी असली तरी ठिकाणं असतातच. अशा अनेक ठिकाणांच्या अभ्यासाचा थोडक्यात निष्कर्ष असा की, भिन्नलिंगी व्यक्ती या जगात आहेत म्हणून जगण्यात आनंद आहे, नाहीतर आयुष्य जगण्याजोगंच राहिलं नसतं. हे इतकं साधं, स्पष्ट सत्य समोर असताना प्रत्यक्षात मात्र अनेक स्त्रिया पुरुषांना नावं ठेवताना दिसतात आणि अनेक पुरुष 'बाई तिथे खाई' असं घोकत असतात याचं कारण उघड आहे. स्त्री-पुरुष संबंधांविषयी आनंदाचा अनुभव यायच्याऐवजी त्यांना कटू अनुभव आला असणार. अजूनतरी स्त्री-पुरुष आकर्षण हा बहुतेकांच्या आनंदाचा अनुभव असतो आणि ही यादी इतर आनंद देणाऱ्या सगळ्या गोष्टींपेक्षा निराळीच असायला पाहिजे. आता त्याची यादी करूया.

- स्वतः छान दिसतोय् असं वाटण्याचा आनंद.
- दुसऱ्याला आपण आवडलो हे कळण्याचा आनंद.
- तरुणपणीच काय, मध्यमवयीन पुरुषालादेखील एखादी तरुण मुलगी आपल्याकडे आकर्षित होऊन बघतेय् या कल्पनेचा आनंद होतो. वय वाढल्यावर असे प्रसंग फार कमी होतात, पण आनंद होतोच.

काही स्त्रिया इतक्या सुंदर असतात की, त्यांच्याकडे बघून आनंद होतो. त्याचबरोबर आपण स्वतः किती फालतू आहोत या जाणीवेनी न्यूनगंड यायला सुरुवात होते. इंग्लिशमधे अशा व्यक्तीचं वर्णन डिस्टर्बिंगली ब्युटिफूल असं करतात. स्त्रियांना पुरुषांविषयी अशीच भावना येऊ शकते.

- आपलं दुसऱ्यावर प्रेम असण्याचा आनंद.
- आपल्या मनात खास भावना असणाऱ्या मित्रानी किंवा मैत्रिणीनी आपल्यासाठी काही वस्तू किंवा खाद्यपदार्थ आणणं अतिशय आनंददायक असतं.
- मी आणि शोभा फिलाडेल्फियात असताना आमच्या एका मित्रानी

भारतात येऊन एका सुंदर मुलीची निवड केली आणि लग्न केलं. तिथे असताना आमची फार वेळा गाठ पडली नव्हती. पण ज्या आठवणी मनात घर करून अनेक वर्षं होत्या त्याप्रमाणे ती मुलगी खूप सुंदर आणि गुणी वाटली होती आणि 'आपल्यालाही अशी सुंदर बायको निवडणं शक्य होतं,' असा विचार मनात रुजला होता. अनेक वर्षांनंतर ते दोघंही नवरा-बायको पुन्हा भेटले. थोडाच वेळ भेटले, पण दोघंही पार हरवलेले, दिशाहीन आणि भांबावलेले वाटले. ती मुलगी तर माझ्या मनातून पारच उतरली आणि मी शोभाशी लग्न केल्याचा एका निराळ्या प्रकारे आनंद झाला.

● ज्या क्षणी कळतं की आपण अमुक व्यक्तीच्या प्रेमात पडलो आहोत, तेव्हा खूप आनंद होतो. गंमत म्हणजे प्रेमात असण्याचा काळ प्रेम सफल झाल्यानंतरच्या काळापेक्षाही जास्त आनंददायक असतो. क्वचित त्या व्यक्तीबरोबर एकाच छत्रीतून पावसात जाण्याची वेळ येते तेही किती खास असतं.

● दुसऱ्याचं आपल्यावर प्रेम असण्याचा आनंद इतर अनेक आनंदांपेक्षा मोठा असतो.

● लग्नासाठी जोडीदार सापडल्याचा आनंद.

● जोडीदार स्वतःला पसंत पडला तरी घरच्यांना पटेल याची खात्री नसते. घरी थोडी, मध्यम नाराजी असली तरी त्यातून वाट काढून घरच्यांना पटवण्याचा खास आनंद असतो.

● आपल्या लायकीपेक्षा सरस जोडीदार मिळाल्याचा आनंद.

● आवडत्या स्त्रियांच्या सहवासाचा पुरुषाला होणारा आनंद.

● आवडत्या पुरुषांच्या सहवासाचा स्त्रीला होणारा आनंद.

● आजचा दिवस छान गेला असं वाटण्याचा आनंद.

● नवराबायकोंची छोटी-छोटी खूप भांडणं नेहमीच होत असतात. मुख्य म्हणजे प्रत्येक भांडण संपलं की आनंद होतो. असं प्रत्येक भांडण संपलं की पुन्हा पुन्हा आनंद होतो. त्या आनंदासाठी तर म्हणतात की नवराबायकोंत भांडणं व्हावीत.

वैवाहिक जीवनातल्या आनंदाचं वर्णन हे आरोग्याच्या व्याख्येसारखं आहे. रोगाचा अभाव म्हणजे आरोग्य, तसंच अस्वास्थ्याचा अभाव म्हणजेच आनंद. तो रोज अनेक वेळा थोडा थोडा झिरपत असतो. थेंबाथेंबांनी.

साधं नवरा, बायको, मुलं रोज संध्याकाळी सुखरूप घरी आलेली बघणं,

सुरळीतपणे रागवारागवी न होता हसतमुखानी दिवस संपणं, रात्री नवरा-बायकोत सुरळीत शारीरिक संबंध घडणं, रोजची थोडी करमणूक, वाचन, अडचणीशिवाय पार पडणं, कोणाच्या तब्येतीला काही न होणं. रोज खात्री असणं की स्वयंपाक करण्यासाठी आवश्यक तेवढ्या सामानाची घरात सोय आहे. मध्यमवर्गीय आयुष्यात महिनाअखेरीला पैशाची चणचण नसणं हे सुख कळण्यासाठी कष्टकरी वर्गाकडे बघणं जरूर आहे. आपल्या कामवालीच्या घरी दोन खोल्यांच्यात आठ माणसं राहत असतात. त्यांच्या घरात संडास-बाथरूमची सोय नसते, जेवण साधं असतं, तरी कामवाले रोज हसतमुख असतात. या छोट्या झिरपणाऱ्या आनंदाच्या थेंबांकडे लक्ष देणं जास्त महत्त्वाचं आहे. धो धो वाहणाऱ्या आनंदापेक्षा तो ड्रिप इरिगेशनसारखा आनंद आपलं रोप जास्त टवटवीत ठेवतो.

- लैंगिक संबंधांपूर्वीच्या प्रणयानी मिळणारा आनंद.
- चांगल्या समाधानकारक लैंगिक संबंधानंतर होणारा आनंद.

मुख्य म्हणजे प्रणय हा जास्त वेळ चालणारा असतो आणि त्याचा आनंद प्रत्यक्ष लैंगिक संभोगापेक्षा जास्त असतो. वाईट गोष्ट अशी आहे की, ही महत्त्वाची गोष्ट बहुतेकांना माहीत नसते. हा प्रणयाचा काळ वाढवणं हे नवरा-बायको दोघांच्याच हातात असतं. या पुस्तकसंचामधे 'लैंगिक शिक्षण' या विषयावर सविस्तर लेख आहे, त्यामुळे इथे याहून जास्त सविस्तर लिहीत किंवा सांगत नाही.

- लैंगिक सहजीवनात तर आनंद देण्याच्या कृतीनी आनंद मिळतो हाच महत्त्वाचा नियम असतो. सहजीवन शब्दामधला 'सह' फार महत्त्वाचा भाग असतो. एकमेकांसाठी काहीतरी करण्यातच सहजीवनातला आनंद असतो. दिवसा कसंही वेडंवाकडं वागू आणि रात्री आनंद मिळवू अशी अजून बऱ्याच पुरुषांची कल्पना असते.

कितीही अभ्यास केला, जोडीदार शोधताना खूप वेळ घालवला, विचार केला, तपासण्या केल्या तरी अनिश्चिततेचा काही अंश शिल्लक राहतोच. या विवाह-अभ्यासाचा, या पुस्तकसंचाचा उद्देशदेखील जुगाराचा अंश कमी करणं एवढाच आहे. त्यामुळे पुढच्या यादीला निराळं महत्त्व आहे. आई-वडलांना सुद्धा आपल्या मुलांच्या लग्नाबद्दल ही काळजी असतेच.

- नवरा किंवा बायकोला लग्नानंतर काही वर्षांनी वाटणं की आपल्याला खरंच चांगला जोडीदार मिळाला याचा आनंद.

● आपल्या मुलाला किंवा मुलीला चांगला जोडीदार मिळाल्याचा पालकांना होणारा आनंद.

● चुकून नशिबानी आपल्या वाट्याला वाईट जोडीदार आला तर घटस्फोट घेणं आणि तोही मूल होण्यापूर्वी हाच योग्य मार्ग असतो. अशा प्रसंगी न पटणाऱ्या जोडीदारापासून घटस्फोट मिळणं ही खूप आनंदाची गोष्ट असते.

● नवरा-बायको एकमेकांवर खूष असले की गर्भ राहाण्याचा आनंद.

● मूल निर्विघ्नपणी जन्मण्याचा आनंद.

● पहिल्या 3-4 वर्षांनंतर मूल पूर्ण नॉर्मल आहे हे कळण्याचा आनंद. मूल वाढवतानाचा रोजचा आनंद. या आनंदाला तर काही सीमाच नसते. फक्त ते कळायला हवं. अनेक पालकांना हा आनंद हुकला हे मुलं मोठी झाल्यावर कळतं

● मूल शाळेत जायला लागलं की काही तास सुटकेचा आनंद.

● मूल शाळेतून घरी आलं की होणारा रोजचा आनंद.

● इथे माझे काही वैयक्तिक आनंदाचे अनुभव सांगायला हवेत. एखादा तात्पुरता निर्माण झालेला प्रश्न संपल्याचा मोठा आनंद असतो. साधारण तीस वर्षांपूर्वी शोभा एका कॉन्फरन्ससाठी पंधरा दिवस ब्राझीलला गेली होती. परत आली तेव्हा मुंबई विमानतळावर तिला बघितल्यावर 'जीव भांड्यात पडणं' म्हणजे काय ते कळलं. तशीच ती एकदा दिल्लीला गेली असताना तिचा पाय मोडला. प्लास्टर घातलं वगैरे फोनवर सगळं बोलणं झालं होतं. पण प्रत्यक्ष बघेपर्यंत अस्वस्थता होती.

मागे आभा सॅनफ्रान्सिस्कोला शिकत होती आणि श्रेयस जपानला होता. आभाला ई-मेलवर रोज धीर देण्यासाठी संपर्क असायचा. आमची आणि आभाची त्यानंतर पाच वर्षांनी प्रथम गाठ पडली तेव्हा पाच वर्षं श्वास रोखला होता तो घेतला असं वाटलं.

●

5) आत्मसन्मानासंबंधीचे आनंद

या जगात चांगलं वागूया म्हणजे दुसरा आपल्याला चांगलं वागवेल यावर विश्वास असणारी माणसं सर्वांत जास्त आहेत. त्यामुळे आपला आत्मसन्मान शाबूत राहून घडलेल्या प्रत्येक गोष्टीचा आपल्याला आनंद होतो. अशा छोट्या आनंदाच्या प्रसंगाची यादी खूप मोठी असते. इथे आपण बनवतो आहोत त्यापेक्षा खूप जास्त.

● कायम खरंच बोलण्याची इच्छा असते, त्याप्रमाणे जमेल तेव्हा प्रत्यक्षात खरं बोलल्याचा आनंद.

● आमच्या सोसायटीतली मुलं गणपती उत्सवाची वर्गणी मागायला येतात. मी वर्गणी देत नाही आणि त्यांना कारणं समजावून सांगतो. माफी मागतो, पण वर्गणीला नक्की आणि ठाम नकार देतो. हे करताना चक्क आनंदच होतो.

● खरं म्हणजे अशा शेकडो वेळा असतात की निरर्थक कर्मकांडात सामील न झाल्याचा आनंद होतो.

● एखादी गोष्ट नाइलाजानी खूप काळ इतरांना न सांगता लपवलेली असते. तो काळ संपून ती गोष्ट खरी सांगितल्यानी फार छान वाटतं.

● समोरचा माणूस आपल्याशी खरं बोलल्याचा.

● स्वतः ठरलेली वेळ पाळल्याचा.

● दुसऱ्यानी ठरलेली वेळ पाळल्याचा.

● भल्यामोठ्या रांगेत आपण पुढे असण्याचा.

● आयुष्यात लवकर रांगेला लागण्याचा.

● लहानपणी मला आठवतंय्, निरनिराळ्या वस्तू जमवण्याची फार मोठी मजा असायची. मी साधारण आठ-नऊ वर्षांचा असीन. पोस्टाचे स्टँप्स, नाणी, नोटा मी जमवायचोच, पण रिकामी सिगरेटची पाकिटंही जमवायचो. मोठ्या लोकांच्या स्वाक्षऱ्या आणि संदेश यांनी तर वह्या भरलेल्या असायच्या. एकूण खूप मजा यायची.

● आमची मुलगी आभा जेव्हा तिसरीत वगैरे होती तेव्हा शोभा काही काळ तिच्या शाळेत मदतीला जायची. शिक्षिका गैरहजर असल्यामुळे मुलींनी नुसत्या

उनाडक्या करण्यापेक्षा शोभानी त्या वर्गावर जायचं अशी पद्धत होती. शोभा मुलींशी गोष्टी, कविता, साहित्य अशा अनेक विषयांवर गप्पा मारायची. एकदा एका वर्गाला शोभानी स्वतःला काय आवडतं त्या गोष्टींची यादी करायला सांगितली. कोणी कोणी काय काय सुचवत होत्या आणि लिहीत होत्या. मी तिथे नव्हतो. पण मला ती कल्पना फारच छान वाटते. त्यावेळेला त्या मुलींचा तो खूप मोठा आनंदाचा अनुभव असेल असं मला नक्की वाटतं.

● शाळेच्या वर्गात क्लास-मॉनिटर होणं, शिक्षक दिनाच्या दिवशी फुलपँट-शर्ट आणि टाय लावून शाळेत जाणं, अशा गोष्टींनी कॉलर ताठ व्हायची एकदम. छानच वाटायचं. मी अभ्यासू विद्यार्थी नव्हतो त्यामुळे असा प्रसंग माझ्या वाट्याला फार कमी आला.

● खूप लहान वयात शिक्षण पूर्ण होण्याचा आनंद.

● मला अभ्यासाची कधीच गोडी न लागल्यामुळे शाळेत मी दरवर्षी पास झालो खरा, पण चांगल्या मार्कांनी कधीच पास झालो नाही. तरी दरवर्षी परीक्षेच्या निकालानंतर पेढे वाटत हिंडल्याचं तर मला आठवतंय. माझी मोठी बहीण नीला अभ्यासू आणि हुशार होती. तिच्या आणि माझ्या निकालासाठीचे पेढे एकदम वाटले असावेत. एवढ्या वर्षांनी मला वाटतं की, अनेक घरांच्यात जाऊन पेढे वाटत हिंडण्याचा कार्यक्रम पूर्ण कटाप करावा. एक तर तो आनंद अगदी खाजगी असतो. दुसऱ्याला आपल्याएवढा आनंद कधीच होणं शक्य नाही. शिवाय आनंद होईलच याची खरं म्हणजे खात्री नाही. एक गोष्ट नक्की. तेव्हा पेढे वाटताना खूप आनंद व्हायचा.

● जेव्हा लोकांना आनंद होतो तेव्हा त्याबद्दल स्वतःचं निरीक्षण असतं. आपण स्वतः लिहिलेलं किंवा स्वतःबद्दल काहीतरी वर्तमानपत्रात लिहून आलं की फोटोही येतो. छान वाटतं. कुठच्याही कारणानी वर्तमानपत्रात स्वतःचा फोटो बघून लोकांना कसा आनंद होत असेल ते नीट कळतं. नवरात्रीत विशिष्ट रंगाचा पोषाख वापरल्याबद्दल, कसलीतरी शपथ घेतल्यामुळे, जलअभियान, स्वच्छता अभियान, तनिष्का, काहीही. थोडं समाजकार्य केल्याचाही आनंद मिळतो.

● खूप तरुणपणी मान मिळण्याचा.

● खूप तरुणपणी भरपूर पैसे मिळण्याचा.

● लोकांच्यात आत्मविश्वासानी वावरल्याचा आनंद.

● चांगली भाषा बोलता येण्याचा आनंद, उदा. इंग्लिश भाषा नीट येणं.

इंग्लिश भाषेची गेली अनेक वर्षं मला खूप गोडी आहे. डिक्शनरीमधून शब्द बघताना, थेसॉरस वाचताना, एनसायक्लोपीडिया वाचताना मला खूपच आनंद होतो. त्याशिवाय इंग्रजी संभाषणाचे वर्ग मी घेतो त्यासाठी या गोष्टींचा मला उपयोगही होतो.

● साहित्यातले दुःखदायक प्रसंग वाचताना रडू येतं पण तरी आनंद होतो. आपल्या भावनांचा निचरा होण्यामधला हा आनंद असतो. लेखकाच्या प्रतिभेबद्दल आदर वाटल्याचाही तो आनंद असतो.

● मातृभाषेवर प्रभुत्व असण्याचा.

● दुसऱ्याला माहीत नसताना त्याचं बोलणं ऐकल्याचा.

● भलत्या प्रांतात आपली भाषा बोलणारं माणूस भेटल्याचा आनंद.

एकदा मिनिअपोलिस, यू.एस.ए.च्या एअरपोर्टवर मी आणि शोभा रेस्टॉरंटमधे बसलेलो असताना शेजारच्या अमेरिकन दिसणाऱ्या माणसानी आम्हाला इंग्लिशमधून आपणहून सांगितलं की, आम्ही बोलतोय् ती भाषा त्यांना येते. त्यांनी अत्यंत सभ्य हेतूनी आम्हाला हे सांगितलं होतं. आम्ही काहीतरी खाजगी गोष्ट मराठीत बोललो आणि मग वाईट वाटलं असं होऊ नये म्हणून. ते चक्क मूळचे सोलापूरचे अमेरिकन बायकोशी लग्न करून तिथेच स्थायिक झालेले, गोऱ्या वर्णाचे मराठी भाषिक गृहस्थ निघाले. आम्ही चाट पडलो. आनंदही खूप झाला.

मी दुबईत एके ठिकाणी काम करायचो. तिथे एक मुंबईत लहानपणापासून वाढलेला मुस्लिम मुलगा काम करायचा. आम्ही एकमेकांशी मराठीत बोलायचो तेव्हा फार छान वाटायचं. बाकी सगळे लोक मल्याळी असल्यामुळे मी त्यांच्याशी इंग्लिशमधूनच बोलायचो.

● तरुणपणी मी टाऊन प्लॅनिंग आणि लँडस्केप डिझाइनचा बडोद्याला जाऊन कोर्स केला होता. त्या कोर्समधे बरोबर गुजराथी मुली होत्या. त्यातली एक मुलगी मला फार आवडली होती. आमचं काही प्रकरण होण्याजोगंच नव्हतं हे माहीत होतं. तरी जेव्हा कळलं की, तिला बडोद्यात राहिल्यामुळे थोडं मराठी पण येतं तेव्हा खूप आनंद झाला होता.

● आमच्या बांधकामाच्या धंद्यात बरेच वॉचमन निरक्षर होते. त्यातल्या काही वॉचमनना एकत्र जमवून मी त्यांना लिहायला-वाचायला शिकवण्याचा अनुभव घेतला. शिकवताना त्यांच्यापेक्षा मला जास्त आनंद मिळायचा.

● एखाद्या खास दिवशी जन्मलेल्या लोकांचं त्या जन्मण्यामधे स्वतःचं

काहीच कर्तृत्व नसलं तरी त्यांना त्यामुळे खास वाटत असणार. उदाहरणार्थ 31 डिसेंबर, 1 जानेवारी, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 1 मे वगैरे.

● माझ्या एका मित्राच्या घरी 3 भाऊ एकाच दिवशी दोन दोन वर्षांच्या अंतरानी जन्मले. थोडक्यात एकाच दिवशी तीनही भावांचे वाढदिवस साजरे करताना त्यांना खूप मजा येत असेल.

● स्वतःच्या खास नावाचा आनंद. उदा. अनिल आणि शोभा यांच्यापासून शोनील आणि अभा ही नावं बनली.

● आपल्यामधे आई-वडलांचे सद्‌गुण नशिबानी असण्याचा आनंद.

● स्वतःला खूप मित्रमैत्रिणी असल्याचा आनंद.

● शोभाच्या स्वभावाचं एक वैशिष्ट्य आहे. दुसऱ्याला आनंद देण्याचा आनंद तिच्या दृष्टीनी फार महत्त्वाचा असतो. एका ओळखीच्या मैत्रिणीकडे ती ठराविक कामासाठी नियमित जाते. ते काम खरं म्हणजे संपलेलं आहे. पण तरी शोभा जाते कारण त्या मैत्रिणीला जो आनंद मिळतो तो तिला महत्त्वाचा वाटतो.

● कोणीतरी मला मोबाइलवर फोन केला की त्यांना मी थेट नावानी हाक मारून बोलायला सुरुवात करतो. त्यांचा नंबर माझ्या मोबाइलमधे 'सेव्हड्' आहे याचा त्यांना आनंद झालेला कळतो. मी कोणाला फोन करतो तेव्हा मलाही याच प्रकारचा आनंद मिळतो. काहींना वाटतं मी त्यांचा आवाज ओळखला. याची गंमत वाटते.

● शोभा 69 आणि मी 72 वर्षांचा म्हणजे आम्ही सरळसरळ म्हातारे आहोत. जीवनसाथमुळे आमची अनेक तरुण मुलामुलींशी मैत्री असते. कित्येकांना मी आणि शोभा त्यांच्या कुटुंबियांपेक्षा जवळचे असतो कारण आमच्याशी ते जगातला कुठचाही विषय मोकळेपणानी बोलू शकतात. आम्हाला या गोष्टीचा आनंद वाटतो.

● दोन चांगल्या माणसांची आपण गाठ घालून दिल्याचा आनंद.

● सामाजिक मान्यतेचा आनंद.

● एखाद्या गटाचा पुढारी असल्याचा.

● लोकांच्या उपयोगी पडण्याचा आनंद. यात किंचित अहंकार सुखावण्याचा भाग असतो हे मान्य करूनही शेवटी स्वार्थ बाजूला ठेवून लोकसेवा करणारा माणूस मनानी मोठाच असावा लागतो. मतिमंद मुलांच्यात, स्वमग्न मुलांच्यात काम करणारे बरेच लोक आमच्या ओळखीचे आहेत. त्यांनी जे काम केलं आहे,

ते करत आहेत त्या मानानी नॉर्मल लोकांच्यातलं माझं आणि शोभाचं काम काहीच नाही. आम्हाला आमच्या कामातून आनंद मिळतोच पण त्यांना अनेकपटीनी आनंद आणि समाधान मिळत असेल.

● बाबा आमट्यांचं आनंदवनातलं कुष्ठरोग्यांच्यातलं काम फार मोठं यात शंकाच नाही. आता ते सगळं डॉ. विकास आणि डॉ. भारती बघतात. एवढी मोठी संस्था चालवण्याच्या त्रासाची आम्हाला कल्पना आहे, पण त्यांना या कामापासून मिळणारा आनंदही खूप मोठा असेल.

या पुस्तकसंचात सर्वसामान्य माणसानी करण्याजोगं समाजकार्य यावर लेख आहे पण त्यातल्या सारांशाचा इथे उल्लेख करणं जरुरीचं वाटतं. आपल्या आसपासचे लोक आनंदी, समाधानी असतील तरच आपल्याला मिळालेला आनंद आपण उपभोगू शकतो. महालाकडे जाणारी वाट स्वच्छ असली तरच आनंद आहे. सजवलेल्या घराभोवती झोपडपट्टी असली तर त्या सुशोभित घरामधल्या आनंदात मिठाचा खडा पडलेलाच असतो. 'त्यांच्या प्रश्नांचा माझा काय संबंध?' ही वृत्ती चुकीची आहे.

● सबंध आयुष्यभर मी मध्यमवर्गीय आहे. सजगपणी आयुष्य जगल्यामुळे आणि बांधकामातल्या अनुभवामुळे समाजातल्या कष्टकरी वर्गाशी आणि श्रीमंत वर्गाशी संपर्क आला. शोभाचंही तिच्या अ‍ॅडल्ट एज्युकेशन मधल्या अनुभवामुळे असंच झालं. थोडक्यात आम्ही समाजातल्या श्रीमंत आणि गरीब अशा दोन वर्गांचे मध्यस्थ झालो. आम्हाला याचा खूप आनंद होतो.

सामाजिक जाणीव हा सहजीवनातल्या आनंदाचा पाया आहे. स्वतःपुरतं, स्वतःच्या कुटुंबापुरतं जगणाऱ्याला खरा आनंद कधीच मिळू शकत नाही. कष्टकऱ्यांना वाईट वागवणाऱ्या, फसवणाऱ्या माणसाला मनातून माहीत असतं की, केव्हा ना केव्हातरी आपल्याला याचा फटका बसणार आहे. मुलांना सांभाळायला ठेवलेल्या बाईंनी मुलाला पळवून खंडणी मागणं, घरगड्यांनी मालकांच्या केलेल्या खुनाच्या बातम्या ही सगळी उदाहरणं दुसरं काय सांगतात? पैशात लोळणारा, महालात राहाणारा, सोन्याच्या पलंगावर झोपणारा जुलमी राजा, जनतेला लुबाडून अतिश्रीमंत झालेला उद्योगपती किंवा पुढारी यांना खरा आनंद कधीच उपभोगता येत नाही. त्यांना सामान्य माणसाची, कष्टकऱ्यांची सतत भीती वाटत असते.

● छान पुस्तक वाचण्याचा आनंद इतका असतो की माणूस त्यात अगदी

तल्लीन होऊन जाऊ शकतो. आता पुढे काय होणार ही उत्कंठा इतकी असते की, त्यासाठी पुढचं पान, आणखी एक पान असं करत तो त्यात मनानी पार गुंतून जातो. मी स्वतः गेली अनेक वर्षं इंग्लिश कादंबऱ्या अतिशय आनंदानी वाचतो. त्या तुलनेत मराठी कमी वाचतो. पण वाचनाचं मला वेडच आहे.

● पुस्तकंच काय, मला नकाशेही वाचायला फार आवडतात. जेवढा मी कादंबरीत रमतो तसाच नकाशातही.

● दुसऱ्याला पुस्तक वाचायला देणं मात्र मला संकट वाटतं. लोक जबाबदारीनी वागत नाहीत. पुस्तक परत करण्याच्या तारखा पाळत नाहीत, हरवतात, खराब करतात, कसंही वागतात. काही लोकांना आपल्याला आवडलेलं पुस्तक दुसऱ्याला भेट देण्यात आनंद वाटतो. मला त्यात अडचण अशी वाटते की, ते पुस्तक दुसऱ्याकडे कदाचित आधीच असेल ही त्यांना शंका कशी येत नाही? इतर वस्तूंची गोष्ट निराळी, पुस्तकाची निराळी. खाण्याची, वापरण्याची वस्तू निदान काही प्रमाणात उपयोगी पडू शकते. पण पुस्तकं दोन असण्याचा काहीच फायदा नसतो.

● दुसऱ्याचा आपल्यावर विश्वास आहे हे कळल्याचा आनंद.

● लोक आपल्याला सज्जन, आदरणीय समजतात याचा आनंद.

● मी स्वतःचा व्यवसाय चालू करण्यापूर्वी मुंबईत, इंग्लंडमधे आणि अमेरिकेत नोकरीच करत होतो. मी अतिशय मेहनती, गुणवान, कुशल आणि निष्ठावान नोकर होतो. मुंबईतल्या माझ्या नोकरीत माझ्यावर बाकीच्या स्टाफला सूचना देण्याची जबाबदारी होती. ती मी उत्तम पार पाडली. कॉलर ताठ व्हायची.

● इंग्लंडमधे मी बॉसचा सेकंड इन कमांड होतो. त्यात कष्ट खूप असले तरी छान वाटायचं.

● अमेरिकेत जरा मोठं ऑफिस होतं. 20-25 लोक कामाला होते. तिथे मी काम सुरू केल्यावर काही महिन्यांतच माझ्या हाताखाली प्रथम एक असिस्टंट दिला. पुढच्या काही महिन्यांत एका विभागाचं मला इन-चार्ज केलं. पुढच्या काही महिन्यांत मला केबिनमधे बोलावून माझी गुपचुप पगारवाढ केली आणि इतरांना कळू न देण्याची विनंती केली. स्वतःच्या मेहनतीचं चीज झाल्याचा आनंद मिळाला.

● त्या माझ्या नोकरीमधल्या करिअरचा मला अभिमान वाटतो आणि आपली क्षमता समोरचा ओळखतो याचा आनंद वाटतो. त्या काळी माझ्या बरोबरीच्या सगळ्या मित्रांपेक्षा मला जास्त पगार होता.

● वयस्कर लोकांना दुसऱ्यानी नमस्कार केला, विशेषतः वाकून की होणारा आनंद. मला असा कोणी नमस्कार करायला लागलं तर मी नकार देतो हा भाग निराळा, पण तो आनंद मी समजू शकतो.

विवाह अभ्यासामधे संस्काराचा खरा अर्थ शोधण्याचा प्रयत्न सतत चालू असतो. हे 'वाकून नमस्कार' प्रकरण सगळ्या संस्कारांच्या यादीत क्र. एकवर आहे. या पुस्तकसंचात 'संस्कार म्हणजे नेमकं काय?' असा लेख आहे तो जरूर बघावा.

● योग्य व्यक्तीला योग्य वस्तू दान केल्याचा आनंद.

● दुसऱ्याला मदत केल्यावर होणारा आनंद.

● आपण समाजकार्यात असलो तर त्याची फळं दिसल्यावर होणारा आनंद.

● एखाद्या कामासाठी आपण केलेल्या त्यागाचा आनंद.

● घरातली माणसं खरी म्हणजे रोज भेटत असतात. पण शहरातली असुरक्षितता सतत आपल्याला कुटुंबियांबद्दल काळजीत टाकते. त्यामुळे घरच्या माणसांना रोज संध्याकाळी घरी आल्यावर बघून आनंद होतो.

● आपल्या आधी घरी कोणीतरी आलेलं असलं आणि आपल्याला आपल्या खिशातल्या किल्लीनी दार उघडावं लागलं नाही तर होणारा आनंद.

● आपली मुलं चांगली निघाली की ते आपलं नशीबच म्हणायचं. त्यांना बिघडवू शकणारे कितीतरी बाह्य घटक असतात. शाळा, मित्र, नातेवाईक. त्यात आपण पालक म्हणून त्यांना रागावू नये, मारू नये, त्यांचा अपमान करू नये एवढं तरी करू शकतो. आम्हाला आमची दोन्ही मुलं चांगली आहेत याचा आनंद होतो.

● मी आणि शोभानी स्वतःच्या कारनी केलेला आठ महिन्यांचा प्रवास अंगात धाडस होतं म्हणून शक्य झाला. तो आमच्यातला धाडस हा गुण आमच्या मुलांच्यातही उतरलेला आहे हे पाहून आम्हाला आनंद झाला.

● शोनील त्याच्या बावीसाव्या वर्षी एकटा अमेरिकेत एका कॉन्फरन्समधे पेपर वाचून आला. आभानी सॅनफ्रान्सिस्कोला एकटीनी राहून मास्टर ऑफ फाइन आर्ट्स् ही पदवी मिळवली. शोनीलनी ऱ्होडस् स्कॉलरशिप मिळवली आणि तो चोविसाव्या वर्षी ऑक्स्फर्डला गेला. आम्हाला दोन्ही मुलांबद्दल अभिमान, आनंद, समाधान सगळंच वाटतं.

- एखादं महत्त्वाचं कठीण काम उरकल्याचा आनंद.
- लग्नसमारंभ निर्विघ्नपणी पार पडल्याचा.
- घराची आर.सी.सी. स्लॅब ओतणं म्हणजे लग्नघाईच असते. ती पूर्ण झाल्याचा आनंद.
- नवा फ्लॅट बुक केल्याचा आनंद.
- फ्लॅटचा ताबा मिळाल्याचा.
- नव्या फ्लॅटमधे राहायला गेल्याचा.
- स्वतः पर्यावरणपूरक शैलीत शक्य तेवढ्या प्रमाणात जगण्याचा आनंद होतो.
- अंघोळीचं पाणी एका बादलीत साठवणं अगदी सोपं असतं. खाली बादली ठेवली की झालं. मग ते साठवलेलं पाणी टॉयलेट फ्लशच्याऐवजी वापरलं की पर्यावरणीय पुण्य केल्याचा आनंद मिळतो.

●

आपल्या आसपासचे लोक आनंदी, समाधानी असतील तरच आपल्याला मिळालेला आनंद आपण उपभोगू शकतो. महालाकडे जाणारी वाट स्वच्छ असली तरच आनंद आहे. सजवलेल्या घराभोवती झोपडपट्टी असली तर त्या सुशोभित घरामधल्या आनंदात मिठाचा खडा पडलेलाच असतो.

6) सौंदर्य, कला, खेळ यातून मिळणारा आनंद

अगदी सुरुवातीला सांगितलेली एक गोष्ट निराळ्या शब्दांत पुन्हा सांगतो. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात छोट्या आनंदाचे प्रसंग रोज आहेत. अर्थात वाईट वाटणारेही आहेत, पण आनंदाच्या प्रसंगांचा वेळ वाढवला तर आयुष्याचा सुख-दुःखाचा तोल राखणं सोपं जातं. सौंदर्य, कला, खेळ यातून मिळणाऱ्या आनंदाची यादी खूप मोठी असते. यादीतली प्रत्येक गोष्ट ठरवून एक मिनिट लांबवली तर तो वेळ वाढेल. साहजिकच बिनआनंदाचा वेळ कमी होईल. या दृष्टीनी या यादीकडे बघूया.

● काहीतरी नवीन शिकण्याचा आनंद.

● नवीन ठिकाण बघण्याचा आनंद.

● एखाद्या व्यक्तीला भेटण्याची उत्सुकता खूप असते अशा व्यक्तीला भेटल्याचा आनंद.

● इतके दिवस न कळलेली एखादी गोष्ट कळण्याचा आनंद.

● एखाद्या गोष्टीचं अनेक वर्षं कोडं पडलेलं असतं. कुठल्यातरी गोष्टीमुळे अकस्मात डोक्यात प्रकाश पडतो तेव्हा फारच छान वाटतं.

● नवी कल्पना सुचण्याचा आनंद.

● एखादा विचार असतो. जरा गुंतागुंतीचा असल्यामुळे लिहिताना किंवा बोलताना, वाक्यरचना नीट जुळवणं कठीण जातं. ते मनाजोगं जमलं की मस्त वाटतं.

● चांगलं संगीत ऐकण्याचा आनंद.

● अनेक वर्षांनंतर आवडतं जुनं गाणं ऐकणं खूप आनंदाचं असतं.

● गाण्याचा नियमित सराव असलेल्या लोकांकडून मी ‘आज छान रियाझ झाला’, असं अनेक वेळा ऐकलेलं आहे. मी ते समजू शकतो.

● स्वतः गाणं म्हणण्याचा आनंद काही निराळाच असतो. आपण व्यावसायिक गाणारे नसलो तरी आपल्या आवाजाच्या मर्यादांच्यात बसणारं गाणं असलं तर ते म्हणताना आपल्याला कळतं की हे चांगलं जमतंय् आणि खरंच छान वाटतं. शिवाय पेटी-तबल्याची साथ असली तर फारच मजा येते.

माझ्या अंगात असलेल्या एका कलेबद्दल मला नेहमी वाईट वाटतं. मला संगीताची आवडही आहे, समजही आहे आणि सुगम संगीत स्वतः गाण्याइतपत माझी तयारीदेखील चांगली होती. मी अनेक वर्षांत गाणं म्हटलेलं नाही, पण जरा सूरपेटी, मेट्रोनोम, करावके अशी कुठच्यातरी प्रकारानी सूर-तालाची सोय करून मी पुन्हा गाणी म्हणीन. निदान अशी माझी इच्छा आहे. एका गोष्टीशी मात्र कधी जुळलं नाही, ती म्हणजे गाण्यांच्या भेंड्या. फक्त ध्रुपद कुठच्यातरी पट्टीत, आवाजात म्हणायचं ही गोष्ट मला आवडत नाही. त्या मानानी मी जास्त गंभीरपणी मनापासून गाणारा आहे आणि तरी आसपासच्या सगळ्यांना भेंड्या खेळण्यात मजा येत असेल तर ते मला समजू शकतं, माझी त्याला काही हरकत नसते.

● चांगलं वाद्य वाजवण्याचा आनंद.

● चांगलं नृत्य करण्याचा.

● अनेक कला अवगत असल्याचा आनंद.

● चित्र काढतानाचा आनंद. मी शाळेच्या वयात उत्तम चित्रं काढायचो. खरं तर मी चित्रकारच व्हायचो. ठाण्याला 'ठाणे चित्रकार मंडळ' होतं. त्यांनी मला 'मानद सभासद' करून घेऊन माझा जाहीर सन्मान केला होता. खूप छान वाटलं होतं.

● सुंदर स्त्री किंवा सुंदर पुरुष बघण्याचा आनंद.

● सुंदर दृश्य बघण्याचा.

● सूर्योदय आणि सूर्यास्त ही दोन्ही खास आनंद देणारी दृश्यं असतात. शहरी आयुष्यात क्षितिज बघणंच क्वचित होत असल्यामुळे हा निसर्गातला रोजचा आनंदाचा क्षण आपल्या हातून निसटलेला असतो.

● सुंदर वस्तू बघण्याचा.

● सुंदर हस्ताक्षर वाचण्याचा, लिहिण्याचा आनंद. लिखाणाच्या मजकुराची रचना, छापील मजकूर असला तर चांगला टाइप बघून मनाला प्रसन्न वाटतं.

● एखाद्या पुस्तकातली चित्रं, मुखपृष्ठ आपल्याला प्रभावित करतं त्याचा आनंद.

● उत्तम नाटक किंवा चित्रपट बघण्याचा.

● उत्तम नाटक किंवा चित्रपट स्वतः बनवल्याचा.

● स्वतः नाटक-सिनेमात चांगला अभिनय करण्याचा.

● एखाद्याच्या गोड किंवा दमदार आवाजानी खूष होण्याचा. उदाहरणार्थ, अमिताभ बच्चनचा आवाज, ओम पुरीचा आवाज, गाण्यातला माणिक वर्मांचा आवाज.

टी.व्ही.वरच्या अनेक कार्यक्रमांपैकी मला गाण्याच्या स्पर्धांचे कार्यक्रम सर्वांत आवडायचे. मी ते आठवणीनी बघायला लागलो. मग काही टी.व्ही. सीरियल्सदेखील मी नि शोभा नियमितपणे बघायला लागलो. काही काळानी असं लक्षात आलं की रोज अडीच ते तीन तास आपण टी.व्ही.स्क्रीन बघतो. आमचे डोळे आणि बुद्धी, दोन्हींसाठी हे हानिकारक तर नक्की होतं. मग ठरवून आम्ही त्याचे तास कमी करायच्या मागे लागलो. आम्ही ठरवून जास्तीत जास्त एक तास रोज एवढा टी.व्ही. बघतो. ते एक व्यसनच आहे. फार स्वस्त आणि सोपं असल्यामुळे धोकादायक आहे. आमच्या पालक-शिक्षणाच्या कार्यक्रमात हा विषय नेहमी निघतो. वेळेची मर्यादा ही एकच खरी युक्ती आहे असं आम्ही मुलांसाठी आणि आजी-आजोबांसाठी बंधन सुचवतो. इतर जास्त उपयोगी गोष्टी शोधून काढून त्यांत वेळ घालवलेला केव्हाही चांगला. काय बघायचं हे ज्यानी त्यानी ठरवावं. क्रिकेट मॅचेस, फुटबॉल, टेनिस सगळेच खेळ चांगले असतात. पण ते वेळेच्या मर्यादेत बसवण्यासाठी डोकं लढवावं लागतं.

● काही लोकांना रामायण, महाभारत, टी.व्ही.वर बघून खूप पुण्य मिळाल्याचा आनंद वाटतो. 1972 मधे भारतात टी.व्ही. आला तो मुंबईत. काळा-पांढरा आणि आकारानी छोटा असा टी.व्ही. होता. तो बघण्यासाठी शेजाऱ्यापाजाऱ्यांची गर्दी व्हायची. टी.व्ही.वर हे कार्यक्रम चालू. ते दृश्य बघून मजा वाटायची. कारण मला आणि शोभाला आमच्या परदेशातल्या वास्तव्यामुळे टी.व्ही. नवीन नव्हता.

● 1968 साली मी इंग्लंडला गेलो तेव्हा भारतात टी.व्ही. नव्हते. इंग्लंडला प्रथम टी.व्ही. कसा असतो ते कौतुकानी बघितलं. तेव्हा इंग्लंडमधेदेखील काळा-पांढराच टी.व्ही. असायचा आणि रंगीत टी.व्ही. नुकतेच बनवायला सुरुवात झाल्याच्या बातम्या होत्या.

● घर आवरून टीपटाप ठेवण्याचा आनंद.

● पांढऱ्या स्वच्छ चादरीचा, उशीचा आनंद.

● स्वैपाकाचा ओटा स्वच्छ केल्याचा.

● डायनिंग टेबल स्वच्छ केल्याचा.

● कपाटातली पुस्तकं, सी.डी.ज् नीट लावण्याचा.

● बिलांच्या फाइल्स नीट लावण्याचा.

● मागे प्रथम कन्याकुमारीला गेलो तेव्हा प्रथमच डावीकडे, समोर आणि उजवीकडे मोठा समुद्र बघितला. फार मस्त दृश्य होतं ते.

● शोभानी आणि मी स्वतः गाडी चालवत अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, युरोप या देशांचा आठ महिन्यांचा मोठा प्रवास केल्याचं मी आधी सांगितलं आहे. खूप कष्ट होते, पण आम्हाला रोज भरपूर आनंद मिळाला हेही खरं.

● अतिशय सुंदर निसर्गात हजर असण्याचा आनंद.

● बर्फ भुरभुरत पडताना बघण्याचा.

● फुलांनी, फळांनी लगडलेलं झाड बघण्याचा.

● काजवे बसलेलं झुडूप रात्री बघण्याचा.

● डोंगरमाथ्यावरून खालच्या गावाचे दिवे रात्री बघतानाचा आनंद.

● घाटातून जाताना अनपेक्षितपणे होणारं धबधब्याचं दर्शन.

● प्राणी बघितल्याचा, पक्षी बघितल्याचा आनंद.

● पक्षी नावासकट ओळखल्याचा.

● वनस्पती नावासकट ओळखल्याचा.

● स्वतः लावलेली रोपं वाढल्याचा.

● वाऱ्यामुळे हलणारी झाडं, गवत निरखण्याचा आनंद.

● लहान मुलांचा निरागसपणा न्याहाळताना.

● लहान मुलांशी खेळतानाचा आनंद. लहान मुलांच्याबरोबर वावरणं, असणं ही एक थेरपी असते असंच मानलेलं आहे.

● लहान मुलांचे किस्से ऐकताना.

● चांगला विनोद ऐकल्यावरचा.

● चांगला विनोदी चुटका सांगण्याचा आनंद.

विनोदबुद्धी असणं हा स्वतःला आनंदी ठेवण्याचा आणि इतरांना आनंद देण्याचा उत्तम गुण आहे.

● मधे मी एका बँकेतल्या टॉयलेटमधे गेलो होतो. बँकेत यंत्रं बिघडलेली, खूप वेळ लागतोय् वगैरे सगळ्या नेहमीच्या अडचणी होत्याच. त्या काळात पाणीटंचाई पण होती आणि बहुधा बँकेतल्या यूरिनलच्या नळाला शॉक बसत असणार. त्यामुळे तिथे हातानी लिहिलेला कागद भिंतीवर चिकटवलेला होता.

त्यावर लिहिलेलं होतं, ‘नळाला हात लावू नये, पाणी जपून वापरावे’. त्याच्याखाली कोणीतरी लिहिलं होतं, ‘नळाला हात न लावता?’

- मोठ्या सुट्टीपूर्वी कामं संपवल्याचा आनंद.
- स्वतः शिस्तीत काम केल्याचा आनंद.
- इतरांनी शिस्तीत काम पुरं केल्याचा आनंद.
- एखादा धार्मिक विधी पूर्ण केल्याचा.
- रीतीभाती पाळल्याचा.
- जनरीत मोडून नवीन काहीतरी केल्याचा आनंद.
- नवं आधुनिक यंत्र हाताळण्याचा आनंद, उदा. फोन, मोबाइल, फ्रीज, वॉशिंग-मशीन, कूकिंग गॅस, हीटर, लिफ्ट, मायक्रोवेव्ह, ए.सी.
- आमच्या एका मित्राकडे साधा आमच्यासारखा मोबाइल होता. तो सांगायचा त्याप्रमाणे जणू काही त्याचं आयुष्यच नवीन चांगला मोबाइल घेण्यावाचून थांबलं होतं. त्यानी पैसे साठवले नि महागाचा नवीन मोबाइल घेतला तेव्हा तो स्वस्थ झाला. नवीन मोबाइल टचस्क्रीन होता, त्यात व्हॉटस् ॲपची सोय होती, अर्थात इंटरनेट होतं, फोटो काढता येत होता. कोणाला मोबाइल ही इतकी महत्त्वाची, आनंद देणारी गोष्ट असेल याची मलाच कल्पना नव्हती.
- स्वतः दोनचाकी, चारचाकी वाहन चालवण्याचा आनंद.
- अशा आनंदावर विरजण घालणारे काही लोक असतात, त्यांचा उल्लेख मला करायला लागणार. लहानपणी शाळांच्या सहली जायच्या. दोन-तीन बस भरून मुलं-मुली सहलीला जायची. त्यातल्या एका बसनी दुसऱ्या बसला जाताना ओव्हरटेक केलं की काय आनंद व्हायचा! खूप आरडाओरडा चालायचा. मागे राहणाऱ्यांना काय वाटत असेल?
- मी स्वतः अगदी सुरक्षित आणि जबाबदार ड्रायव्हर आहे. मी रहदारीचे सगळेच्या सगळे नियम आणि संकेत पाळतो. रस्त्यावर आसपास दिसणाऱ्या वाहनांचे ड्रायव्हर्स फार बेजबाबदारपणी गाड्या चालवतात. माझ्या सुरक्षित, शांत डोक्यानी केलेल्या ड्रायव्हिंगचा अभिमान आणि अर्थात त्यामुळे आनंद वाटतो. आसपासच्या चारचाकी गाड्यांचे ड्रायव्हर्स बेजबाबदारपणी वागतातच, पण स्कूटर्स आणि मोटरसायकल्स तर अक्षम्य पद्धतीनी कशाही, कुठेही घुसत असतात. पूर्वी मी त्यांना दोन शब्द शांतपणी सांगण्याचा प्रयत्न करायचो, पण आता त्या भानगडीत मी पडत नाही. त्यांना काय करायचं ते करू दे. मी

पद्धतशीरपणीच चालवणार या निर्धाराचा मला आनंद होतो.

● मी आणि शोभा फिलाडेल्फियात असताना मित्रमंडळींपैकी सगळ्यांची एकूण मनःस्थिती 'साजरं' करण्याची असायची, सगळे शनिवार-रविवार, सगळे भारतीय सण आणि सगळे पाश्चात्त्य सण साजरे व्हायचे. त्या काळात कोणालाच स्वतंत्र व्यवसाय करणं जमणारं नसल्यामुळे सगळे नोकऱ्या करायचे. त्यामुळे वेळ मिळण्याची अडचण नसायची, पैसे असायचे. रात्री बऱ्याच उशिरापर्यंत गप्पा, बैठे खेळ, क्वचित हालचालींचे खेळ चालायचे. हे एवढं 'साजरं' करणं योग्य का अयोग्य याबद्दल थोडी शंका होती, पण एकूण खूप मजा यायची.

● भारतात येऊन पुण्याला स्थायिक झाल्यावर मी आणि शोभानी 'सुसंवाद' गट स्थापन केला होता. पिढ्यांच्यातल्या फरकाचा अभ्यास हीच कल्पना असल्यामुळे अगदी कुमारवयापासून म्हाताऱ्यांपर्यंत निरनिराळ्या अवस्थांमधले स्त्री-पुरुष त्या गटात होते. मला आणि शोभाला 31 डिसेंबरचा आधीचा अनुभव असल्यामुळे आम्ही पुढाकार घेऊन कार्यक्रमाचं नियोजन करावं अशी आमच्याकडून अपेक्षा असायची. अशा कार्यक्रमात रात्रभर जागून अनेक गमतीचे खेळ आम्ही सगळे खेळायचो. खरोखर मजा यायची.

● नीट विचार करून वाटतं की, लवकरच आपण काहीतरी 'साजरं' करणार, म्हणजेच मजा करणार या अपेक्षेचा आनंदच जास्त असतो. त्या आनंदाची बहुतेकांना चक्क नशाच चढते. अशी दिवाळीची नशा, नवरात्रीची नशा, 31 डिसेंबरची नशा लोकांना चढलेली प्रत्यक्ष दिसते आपल्याला.

● स्वतः शौर्य गाजवल्याचा आनंद.
● जुनी वस्तू दुरुस्त करून वापरल्याचा आनंद.
● पासपोर्ट मिळाल्याचा आनंद.
● परदेशाचा व्हीसा मिळाल्याचा.
● विमानाच्या पहिल्या प्रवासाचा आनंद.
● परदेशात विमानतळावरून बाहेर पडून गावात शिरण्याचा.
● समानधर्मी, समविचारी माणूस भेटल्याचा आनंद.
● थोर, प्रसिद्ध व्यक्तीला जवळून बघितल्याचा आनंद.
● प्रसिद्ध माणसाबरोबरच्या फोटोचा.
● निवडणुकीत योग्य माणूस निवडून येण्याचा आनंद.
● एखाद्या अन्यायाविरुद्धच्या लढ्यात समाजाचा विजय होण्याचा.

● बुद्धी आणि शरीर शाबूत असणाऱ्या वृद्ध माणसाशी बोलून होणारा आनंद.

● मी आणि शोभानी बऱ्याच वर्षांपूर्वी आमचं मृत्यूपत्र केलं होतं. काही वर्षांपूर्वी खटपटीनी माहिती काढून आम्ही इच्छामरणपत्र ऊर्फ लिव्हिंग विल केलं. आपल्या पश्चात मुलांना, नातेवाइकांना त्रास किंवा गैरसोय होणार नाही आपल्या परीनी आपण पूर्ण व्यवस्था केली अशी भावना झाली. त्यामुळे आम्हाला दोघांना खूप आनंद झाला.

● मरणयातना भोगणाऱ्या माणसाचा मृत्यू झाल्यामुळे सगळ्यांची सुटका झाल्याचं समाधान.

●

7) मित्र आणि कुटुंबियांसंबधीचे आनंद

स्वतःची मुलं, नातवंडं यांच्याबद्दल जे कौतुक, आपुलकी, काळजी वाटत असते त्याला तोड नाही. भावंडं, इतर भाचेपुतणे यांच्याविषयीही आपुलकी असते. तरी मुलं, नातवंडं यांचं स्थानच निराळं असतं.

शोभाला मी न्यूयॉर्क विमानतळावर प्रथम बघितलं तेव्हा ती माझ्या कल्पनेपेक्षा सावळी असल्याचा धक्का मला बसला होता. मी त्यातून सावरलो. शोभाला जेव्हा दिवस राहिले तेव्हा आमचं होणारं मूल कुठच्याही रंगाचं असू शकतं ह्याची मला कल्पना होती. शोभाचे पूर्वज काळे होते आणि माझे पूर्वज गोरे, निमगोरे होते. त्यांचेही गुण मुलात येऊ शकतात हे मी वाचलेलं होतं.

मुलगा शोनील जन्मला तेव्हा त्याचा रंग सावळा का निमगोरा का गोरा हे कळतच नव्हतं. पुढे मुलगी आभा जन्मली तेव्हाही असंच झालं. काही वर्षांनी म्हणजेच तीन-चार वर्षांनी त्यांचा खरा रंग कळला. दोघंही निमगोरे निघाले. पुढे बहुतेक वेळा होतं तसा आभाचा रंग शोनीलपेक्षा उजळला. पण दोघंही सावळे झाले नाहीत याचा शोभाला आणि मला आनंद झाला. प्रत्यक्षात सावळे आणि सुंदर असे खूप लोक आमच्या दोघांच्याही ओळखीचे आहेत. पण आमच्या दोघांच्या संसारात आम्हाला झालेल्या त्रासामुळे एक टिकाऊ पूर्वग्रह तयार झाला त्यामुळे हे किंचित नकारात्मक विधान मी करतोय्.

● जवळच्या नात्याच्या लोकांसाठी कितीही कष्ट पडले तरी त्या कष्टात आनंदच असतो. कष्ट ही गोष्टच अशी आहे की त्या कष्टांचा त्रास वाटतो की आनंद होतो ते त्या कष्टांमागचा आपला उद्देश काय, पुढे साध्य काय होणार याबद्दलच्या स्वतःच्या कल्पनेवर अवलंबून असतं.

● आणखी एका गोष्टीला सगळ्या आनंददायक गोष्टींच्यात खूप वरचं, महत्त्वाचं स्थान प्रत्येकाच्या आयुष्यात असतं, ती म्हणजे जुने फोटो. आमच्या पिढीत लहानपणचे फोटो संख्येनी कमी असायचे, पण असायचे. अर्थात काळे-पांढरे. मी 1968 साली इंग्लंडमधे गेलो तेव्हा प्रथम रंगीत फोटो काढायला लागलो. आमचे लहानपणचे, इंग्लंड-अमेरिकेतले, आठ महिन्यांच्या प्रवासातले, मुलांच्या लहानपणचे, तरुणपणाचे बरेच फोटो आहेत. शोनील आभाच्या मित्र-

मैत्रिणींचेही आहेत. ते फोटो काढून बसलं तर ते बघण्यात तीन-चार तास जुन्या आठवणींच्यात आनंदात जातात.

● आपल्या मुलीला किंवा सुनेला दिवस राहिल्याचा आनंद.

● नातवंडांचा जन्म - त्याचा आनंद.

● बाळ, बाळंतीण - सगळ्यांच्या तब्येती उत्तम असल्याचा आनंद.

● कुटुंबियांपैकी कोणाला एखादा चिवट रोग झालेला असला की तो महिनोन्महिने छळतो. कावीळ, मलेरिया, ब्रॉंकायटिस, प्लूरसी यांचा आमच्या कुटुंबाला अनुभव आहे. जेव्हा त्यातून सुटका होते तेव्हा फार छान वाटतं.

● नातवंडं चालायला-बोलायला लागल्याचा आनंद.

● नातवंड आपल्या मांडीवर, खांद्यावर, कुशीत विश्वासानी झोपी गेलं की काय छान वाटतं! खरं म्हणजे कुठचंही लहान मूल.

● कधीकधी ते जागेपणी हट्टानी आपल्या कडेवर बसतं, हातावर बसतं. तेव्हा त्याची पापी घेतली तरी चालते. एरवी मुलं पापीला माझ्या दाढीमुळे नकार देतात. तो पापी घेण्याचा आनंद खास असतो.

● नातवंडं आजारी असली तर बरी झाल्याचा.

● नातवंडं हुशार निघाल्याचा.

● मुलगा, सून, मुलगी, जावई यांची करिअर चांगली चालल्याचा आनंद.

● गेल्या वर्षी ऑक्सफर्डला शोनीलचं घर बघून आम्ही भलतेच खूष झालो. सोयीचं, दर्जेदार आणि सुबक पण साधं. आमच्या सुनेला म्हणजे ॲनास्तेसियाला बांधकाम रचनेचं खास अंग आहे असं वाटलं. शोनीलपेक्षा तिनीच घरावर खूप मेहनत घेतली होती. मला स्वतःला वास्तुरचना, बांधकाम तंत्रं, ती पण भारतातली आणि इंग्लंडमधली दोन्ही माहिती असल्यामुळे त्यांतल्या अनेक बारकाव्यांचं मला फारच कौतुक वाटलं.

● मुलांनी नवं घर घेतल्याचा आनंद.

● मुलं परदेशी जाण्याचा.

● मुलं परदेशातून भारतात येण्याचा.

● नातवंडांच्या शाळेत जाणं, तिथली प्रगती याचा आनंद.

● नातवंडांची स्नेहसंमेलनं.

● नातवंडांचं कलांच्यात, खेळातलं, अभ्यासातलं प्रावीण्य बघण्याचा आनंद.

● अगदी रोजच्या आयुष्यातदेखील नातवंडांमुळे मिळणारा आनंद याची

जातकुळीच निराळी आहे. एकदा माझा धाकटा नातू मला मुलीबरोबर घराबाहेर अकस्मात भेटला आणि मला बघून नाचायला लागला. तेव्हा मला झालेला आनंद माझ्या कायम आठवणीत राहील.

● पाळीव प्राण्याला कुरवाळण्याचा आनंद.

● पाळीव प्राण्याचं आपल्यावरचं प्रेम बघण्याचा.

● प्राण्यांना आपण घाबरत नसल्याचा.

● वयस्कर माणसाला वेळ घालवण्यासाठी उद्योग सापडल्याचा होणारा आनंद.

● घरातल्या ज्येष्ठांच्या तब्येती चांगल्या असण्याचा आनंद.

● घरात काही ताण असले तर ते ताण संपण्याचा आनंद.

● जवळचे नातेवाईक एकत्र जमले की होणारा आनंद.

● जवळचे, मध्यम जवळचे, ओळखीचे लोक एकत्र जमण्याचं बहुतेक वेळा कारण असतं ते म्हणजे कुठचा तरी सण, उत्सव, वाढदिवस, मुंज, लग्नसमारंभ वगैरे. लोकांना अशा प्रसंगी खूप आनंद होतो हे मला माहिती आहे, पण मला मात्र सण, समारंभ, उत्सव यांच्यामुळे मनस्ताप होतो.

● वीज गेल्यामुळे सगळेजण दाटीवाटीनी एका मेणबत्तीच्या प्रकाशात बराच वेळ बसलेले असणं, त्यात खूप वेळ बसल्यावर दिवे आले की सगळ्यांना खूप आनंद होतो.

● एखाद्या दिवशी एखाद्या माणसाची खूप आठवण यावी आणि ती व्यक्ती दत्त म्हणून पुढे उभी ठाकावी त्याचा आनंद.

● अनपेक्षितपणी आपल्या आवडत्या माणसाचा फोन येणं / पत्र येणं याचा आनंद.

● आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीनी आपल्याला 'अहो' च्या ऐवजी 'ए' म्हटलं की आनंद होतो. माझ्यासारख्या 72 वर्षांच्या म्हाताऱ्या माणसालाही आजोबांऐवजी काका, काकाऐवजी दादा हे संबोधन जास्त चांगलं वाटतं. वय जास्त असण्याचे इतर फायदेही पाहिजे असतात. पण 'अनिलदादा' हे सर्वांत जास्त आवडतं.

●

8) अभिमान न वाटण्याजोगे आनंद

आपण सर्वसामान्य माणसं दुष्ट नसतो. तरीही आपल्याला काही विकार असतात. दोन संघांपैकी आपला संघ जिंकण्याचा आनंद याचाच अर्थ प्रतिस्पर्धी संघ हरण्याचा आनंद आपल्याला होतो. शीर्षकात म्हटल्याप्रमाणे अनेक वाईट गोष्टींचाही आपल्याला आनंद होतो. त्याचा अभिमान वाटण्याचं कारण नाही. उलट अशा विकारांवर मात करता आली तर चांगलं होईल. त्याचीही यादी करूया.

● कुणी पडलं की आपण हसतो हे काय असतं? आपली पहिली प्रतिक्रिया पडलेल्याला उठायला मदत करण्याची असते. त्याला फारसं लागलेलं नाही हे कळलं की हसणं सुरू होतं. पडलेल्या माणसाच्या जागी आपण नाही याचा हा आनंद असतो बहुतेक. पण दुसऱ्याची फजिती बघण्यात मजा येतेच. नाहीतर 'ताकेशीज कॅसल'सारखे टी.व्ही. शोज् एवढे लोकप्रिय झाले नसते.

● शेजाऱ्याचं नुकसान झाल्याचा आनंद.
● दुसऱ्याला व्यवहारात फसवल्याचा.
● कामावर दांडी मारण्याचा.
● कामावर उशिरा जाऊनही कोणी न बोलल्याचा आनंद.
● आपण खोटं बोललो हे उघडकीला न आल्याचा.
● जुगारात यशस्वी झाल्याचा.
● फटाके वाजवण्याचा आनंद.
● खेळात फुगे फोडण्याचा.
● रंगपंचमीत दुसऱ्याला भिजवण्याचा.
● दारू पिऊन न चढण्याचा आनंद.
● दारुची किंचित झिंग येण्याचा.

● दारू न पिणाऱ्याला आग्रह करून थोडी दारू पाजण्याचा आनंद असतो. असा माणूस तरीही त्याच्या नकारावर ठाम राहिला तर त्याला फसवून दारू पाजण्याची निराळीच गंमत असते. मी स्वतः पूर्वी दारू प्यायचो. जवळजवळ सर्व प्रकारची पिऊन बघितली. मला दुसऱ्याला दारुचा आग्रह करणं किंवा

फसवून दारू पाजणं दोन्ही आवडत नाही. मी तसं करत नाही.

● टी.एम्.एस्.एच्. म्हणजे 'तरी मी सांगत होतो'. मी आणि शोभा हे वाक्य कधीही उच्चारत नाही, पण लोकांना हे वाक्य बोलताना किती आनंद होतो ते मी बघितलंय्.

● पहिली सिगारेट पिण्याचा आनंद.

माझं असं निरीक्षण आहे की फसवून दारू जशी पाजता येते तसं सिगारेटचं होत नाही. त्यामुळे लोकांना दुसऱ्यानी सिगारेट प्यायल्याचा तेवढा आनंद होत नाही.

●

9) आनंदाचे अनुभव - लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

मगाशी आपण म्हणालो तसा हा तत्त्वज्ञानामधला विषय आहे. मी वर्णन केलेल्या यादीपेक्षा तुमची स्वतःची आणखी चांगली मोठी यादीही असेल कदाचित. या यादीतल्या काही गोष्टी ऐकून तुम्हाला, 'अरेच्चा, खरंच आपल्याला याचा आनंद झाला होता, पण आपलं तिकडे लक्ष गेलं नव्हतं.' असं होईल. मुख्य म्हणजे मुद्दा असा की, ते क्षण लांबवता आले तर प्रयत्न करून बघा. ते कल्पनेत अनुभवून बघा. जरा जास्त चवीनी चघळा. चघळण्याचे दोन मार्ग आहेतच- त्याविषयी कोणाशी तरी बोलणं किंवा त्याविषयी लिहिणं.

आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद आणि दुःख दोन्ही असतातच. आपण जर दुःखाच्या अनुभवाचं गाठोडंच कवटाळून बसलो तर आनंदाचे क्षण विसरले जातात. करकटकानी बाकावर कोरल्यामुळे नाव जसं पक्कं होतं तसं परत काढलेल्या आठवणींचं होतं. त्या टिकाऊ आठवणी आनंदाच्या का दुःखाच्या हे आपणच ठरवायचं असतं.

आनंदाच्या अनुभवाच्या सोप्या तत्त्वज्ञानाविषयी बोलताना काही प्रश्न निर्माण होतातच. दारु पिऊन रस्त्यात आडव्या पडलेल्या माणसाविषयी आपण चेष्टेत किंवा व्याजोक्तीनी 'हा माणूस खरा सुखी! काही फिकीर आहे का बघा त्याला!' असं म्हणतो. कोमात गेलेला माणूसही चिंतामुक्त असतो. अमली पदार्थांच्या नशेतला माणूस हसत सुटतो. समाधी लावलेला साधू खरोखर सुखी असतो का? आपल्याला त्याचं उत्तर माहिती आहे. सर्वसामान्य माणूस, लग्न करून, मुलं-बाळं असलेल्या घरात स्वस्थपणी, शांतपणानी, समाधानानी संसार करणारा माणूस सर्वांत सुखी असतो. म्हणून तर आपण लग्न करून मुलं जन्माला घालून सुख शोधण्याचा प्रयत्न करतो.

आपण त्या सुखासाठी, आनंदाच्या रोजच्या अनुभवांसाठी लग्न करतो, तर मग नवरा-बायको एकमेकांना समजू शकतात का? एकमेकांना किती सांगू शकतात? मुलं आणि आईवडील मनानी किती जवळचे असतात? भावंडं किती जवळची असतात? खरे आनंदाचे अनुभव तर अशा रोजच्या संसारातच असतात आणि भरपूर असतात.

तत्त्वज्ञानात आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितलेली आहे, ती अशी– ध्येयपूर्तीपेक्षा धेयापर्यंत पोचण्याच्या प्रक्रियेचा आनंद जास्त असतो. याचाच दुसरा अर्थ असा की, माणसाच्या समोर सतत काहीतरी ध्येय हवं. त्याची प्रक्रिया सतत चालू राहाणार. याचाच अर्थ सतत आनंद मिळणार. ज्यांच्यासमोर काहीच ध्येय नसतं त्यांची खूप पंचाईत असते. काही ध्येय नाही म्हणजेच काही प्रश्न नाहीत हीच समस्या बनते. श्रीमंत वर्गातल्या तरुणांच्यात या समस्येमुळे अमली पदार्थांच्या आहारी जाण्याचं प्रमाण खूप आहे.

भविष्यात काहीतरी महत्त्वाचं घडणार असलं की त्याचा आनंद आत्ताच व्हायला लागतो. आमचा मुलगा शोनील आमच्याकडे येणार असतो किंवा आम्ही त्याच्याकडे जाणार असतो, ती तारीख ठरली की त्याच्या आधीचे एक-दोन महिने आनंद व्हायला सुरुवात होते. तो येऊन गेल्यावर किंवा त्याच्याकडे जाऊन आल्यावरही तो आनंद एखादा महिना सुखावतो. पूर्वी आभा अमेरिकेत होती तेव्हा असंच व्हायचं.

आपण किती स्वावलंबी? किती आत्मकेंद्री आहोत? आपल्या आयुष्यात आनंदाचे क्षण किती आणि दुःखाचे किती? आपलं नशीब खूप चांगलं, खूप वाईट का मध्यम आहे? तुमच्या ओळखीत सगळ्यांत सुदैवी कोण आहे? सगळ्यांत दुर्दैवी कोण आहे?

आपल्या कुटुंबजीवनात खरं म्हणजे आनंदाच्या अनुभवांचा ठेवा आहे. नवरा-बायको, आजी-आजोबा, मुलं, नातवंडं यांचे संबंध प्रेमाचे असणं आणि त्यांच्याबरोबर घरी शांतपणी वेळ मिळणं, या आनंदाची इतर कशाशी तुलनाही होऊ शकत नाही इतका तो आनंद मोठा आहे.

आपल्याला सणात, समारंभात, उत्सवात, पार्ट्यांमधे खरोखर आनंद मिळतो का? याचा शोध प्रत्येकानी घ्यावा म्हणून आता आपण पुढे प्रयत्न करूया.

मी आणि शोभा स्वतः ज्येष्ठ नागरिक आहोत, जीवनसाथच्या अनेक विषयांच्या यादीत 'ज्येष्ठ नागरिकांशी संवाद' हा विषय असतो आणि या पुस्तकसंचातदेखील त्यावर लिखाण आहे. त्या निमित्तानी आम्ही अनेक ज्येष्ठ नागरिकांना भेटतो. बरेचसे तक्रारखोर असतात. तरुण पिढीविषयी त्यांच्या भरपूर तक्रारी असतात. स्वतःच्या तब्येतीच्याही तक्रारी असतात. पण काही ज्येष्ठ नागरिक कायम समाधानी असतात. स्वतःच्या तब्येतीच्या अडचणी ते अजिबात

सांगत नाहीत. त्यामागचा मुख्य विचार म्हणजे ते मरणाला घाबरत नाहीत. ते केव्हाही मरायला तयार असतात.

मानसशास्त्रात सांगितलेली एक गोष्ट पुन्हा सांगतो. प्रत्येकात काही सद्‌गुण असतात आणि काही दुर्गुण असतात. आपल्या दुर्गुणांवर आपल्याच सद्‌गुणांच्या साहाय्यानी आपणच मात करायची असते. त्याचप्रकारे आपल्याच आनंदाच्या क्षणांच्या जोरावर जाणीवपूर्वक जगून दुःखाच्या क्षणांवर मात करायची असते.

आपल्यापैकी अनेकांना आनंद कुठे शोधायचा हे माहिती नसतं. आपण चुकीच्या ठिकाणी आनंद शोधल्यामुळे विरस होतो. बाहेरच्या जगात आनंद आहे असं वाटल्यामुळे आपण रडगाणं गात राहतो. प्रत्यक्षात आनंद स्वतःमधेच असतो. अनेक लोक एक मोठी चूक करतात. जोडीदार आपल्या आयुष्यात आनंद निर्माण करेल याची ते वाट बघत बसतात. तो दिवस कधी येतच नाही. हे त्यांना केव्हा कळणार हाच प्रश्न आहे.

मानसशास्त्र आणि विशेषतः व्यवस्थापनशास्त्रात एखादी गोष्ट शेवटी जमो ना जमो, पुरेसे प्रयत्न करण्याचा आनंद खूप मोठा असतो हे खूप सविस्तर सांगितलेलं आहे. 'क्रिटिकल ॲनालिसिस' पद्धतीमधेही सगळ्या सकारात्मक-नकारात्मक गोष्टींच्या स्पष्ट विचारानंतर मनाला 'होप ड्राइव्ह'वर न्यायचं असतं कारण 'होप' ऊर्फ काहीतरी चांगलं घडेल ही आशा हे तर आपल्या मनाचं 'पेट्रोल' असतं.

कार्यशाळेला आलेल्या सगळ्यांना एक विनंती आहे. आनंदाच्या अनुभवाचे हे सगळे माझे संदर्भ आहेत. त्यातले काही तुमच्या आयुष्यात आले असतील, काही नसतील. तुमचे स्वतःचे संदर्भ त्यात टाकून हे सगळं लिखाण स्वतःसाठी तयार करा आणि पुन्हा पुन्हा वाचा.

एक गोष्ट स्पष्ट करतो, सबंध आयुष्य म्हणजे ज्यांना करमणूक, मजा वाटते त्यांनी आनंद म्हणजे काय हे समजून घ्यायचा प्रयत्न करा. आनंद हा मंद सुगंधासारखा आहे. भणभणणाऱ्या सेंटमधे नि त्यात फरक आहे. तो स्मितहास्यासारखा आहे, खो खो हसण्यासारखा नाही. तो सौम्य, ठायी तालातल्या सुरावटीसारखा आहे, डिस्को संगीताच्या म्युझिक वॉलसारखा नाही. टेबलाभोवती गप्पा मारत मजेत केलेल्या कौटुंबिक जेवणासारखा आहे, कार्यालयातल्या धावपळीतल्या पंगतीसारखा नाही.

मला एका गोष्टीचं सर्वांत वाईट वाटतं. लोकांना आनंद म्हणजे ओरडणं,

आनंद म्हणजे मोठा आवाज, आनंद म्हणजे नाचणं, आनंद म्हणजे फटाके एवढंच समजतं.

माझ्या दृष्टीनी त्यांना आनंद समजलेलाच नसतो. त्या बाबतीत सगळा आनंदीआनंदच असतो.

आयुष्यातल्या आनंदाबद्दल एवढं सविस्तर बोलल्यानंतर खरं काय स्पष्ट व्हायला हवं की, पूर्ण कोसळण्याइतका कुठच्याच दुःखाचा परिणाम होत नाही आणि नाचत धावण्याइतका कशाचा आनंदही होत नाही. स्वतःशी प्रामाणिक राहू शकला तर या वर्णनाचा रास्तवादी, वास्तवाचं भान ठेवणारा विवेकवादी सत्यशोधक माणूस कायम शांत आणि समाधानी राहू शकतो.

●●●

आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद आणि दुःख दोन्ही असतातच. आपण जर दुःखाच्या अनुभवाचं गाठोडंच कवटाळून बसलो तर आनंदाचे क्षण विसरले जातात. करकटकानी बाकावर कोरल्यामुळे नाव जसं पक्कं होतं तसं परत काढलेल्या आठवणींचं होतं. त्या टिकाऊ आठवणी आनंदाच्या का दुःखाच्या हे आपणच ठरवायचं असतं.

2

उत्सवी वृत्ती

1) मुळातली मानसिक बैठक

निरनिराळ्या काळात तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडण्याचे प्रयत्न झाले. तत्त्वज्ञानातून मानसशास्त्र उदयाला आलं. काही लोक मनाच्या अभ्यासाच्या वाटेनी गेले, काही भक्तीच्या मार्गानी गेले. लोकांच्या भल्यासाठी संतांनीही काही तत्त्वं सांगितली, मानसशास्त्रज्ञांनीही सांगितली. त्यांपैकी काही परस्परविरोधी होती. त्यामुळे निर्णयाचा गोंधळ होणारच होता. मानसशास्त्र सांगतं, ‘सर्व काही स्वतःच्या समाधानासाठी, आनंदासाठी आपण करत असतो’. याचाच अर्थ दुसऱ्यांना, परक्यांना त्याच कृतीचा आपल्याइतका आनंद होत नाही. आपल्या मनातल्या भावना आपल्याइतक्या कोणालाच कळू शकत नाहीत. संतांना वाटलं की माणूस आत्मकेंद्री बनू नये त्यामुळे त्यांनी सांगितलं, ‘आपण स्वतः महत्त्वाचे नाही. आसपासच्या सगळ्या जनतेचा विचार करावा.’ पुढे त्यांनी सांगितलं, ‘आपला आनंद दुसऱ्याला द्यावा, आनंद वाटल्यानी तो वाढतो.’ दुःखाबद्दलही ते म्हणाले, ‘दुसऱ्याच्या दुःखात आपण सहभागी झालं पाहिजे.’

परस्परविरोधी तत्त्वांपैकी काय निवडायचं ते व्यक्तीच्या, अनेक व्यक्तींनी मिळून बनलेल्या गटाच्या म्हणजेच समाजाच्या हातात असतं. हजारो वर्षांच्या परिणामांमुळे सर्व परंपरा मदतीला होत्याच, त्यामुळे भारतीय समाजानी मार्ग निवडला. आनंद वाटायचा, खूप गाजावाजा करून वाटायचा. मोठा समारंभ करायचा, उत्सव साजरे करायचे. दुःखाचंही प्रदर्शन करायचं. माणूस वारलं की अंत्ययात्रा, अंत्यविधी, दहावा, बारावा, जेवणावळी, श्राद्ध, पितरं जेवू घालणं

वगैरे. थोडक्यात सगळ्यांनी मिळून आनंदाची किंवा दुःखाची खरी भावना शंभर पटींनी अतिशयोक्त स्वरूपात व्यक्त करण्याचा निर्णय घेतला आणि त्याची परंपरा बनवली. त्याला कर्मकांडांचं स्वरूप देऊन टाकलं.

पूर्वी भारत देश खरोखरच शेतकीप्रधान होता. गेल्या काही वर्षांतल्या राजकारणींच्या नासमज स्वार्थी धोरणांमुळे इतक्या झपाट्यानी शहरीकरण झालं की भारत हा शहरप्रधान देश बनला. लोकसंख्या वाढली, खाणारी तोंडं वाढली पण शेतमालाचं उत्पादन काही बाबतींत घटलं. जे उत्पादन पुरेसं झालं त्याच्या वितरणाचा प्रश्न आला. शहरीकरणामुळे पाण्याचा भयानक प्रश्न निर्माण झाला. शेती परवडेनाशी झाली. शेतमजूर शहरातल्या झोपडपट्टीत राहून गुजराण करायला लागले. माझा या विषयातला स्वतंत्र अभ्यास नाही, पण मला एवढं कळलं की, भारत आता शेतकीप्रधान देश नाही. भारतातल्या शहरात काय, छोट्या गावात काय, जे परंपरेनी आखून दिलेले सण, समारंभ, उत्सव आहेत ते सगळे शेतीशी संबंधित आहेत. निदान भारत शेतकीप्रधान असतानाच्या काळातले आहेत.

शहर किती मोठं झालं तरी समाजाच्या मानसिक बदलाचा वेग तोच आहे. मोजण्याजोगा, एखादा बदल लक्षात येण्याजोगा असतो त्याला 20-25 वर्षं लागतात. शहरीकरण, बकालीकरण त्यापेक्षा फार झपाट्यानी वाढलं. त्यामुळे शहरी, नागरी आणि ग्रामीण समाज कालबाह्य कल्पना कवटाळून बसला आहे. बदल हवा आहे, पण सोसत नाही अशी समाजाची अवस्था आहे. परंपरेमधली एखादी गोष्ट खटकली तरी तो बदल करण्याचं धारिष्ट्य त्याच्याजवळ नाही. एखाद्या सणाचा अर्थसुद्धा लक्षात न घेता नवीन पिढी सगळ्या गोष्टी कर्तव्य म्हणून, आनंद शोधण्याची धडपड म्हणून सगळ्या गोष्टी करते आहे.

मधे संध्याकाळी सहा-साडेसहाला गाडीनी नदीकाठच्या रस्त्यानी घरी परत येत होतो. नदीकाठच्या रस्त्यानी येताना खूप गर्दी दिसली. नदीकडे बघणारी अनेक लोकं काहीतरी बघत थांबली होती. ड्रायव्हरला विचारलं, काही माहिती आहे का, तो नाही म्हणाला. मी अंदाजे माणसं मोजली. साधारण 500 असतील. एवढ्या लोकांना संध्याकाळी असं थांबून काहीतरी बघत बसायला वेळ कसा असतो हे कोडं अजूनही मला सुटलं नाहीय्. त्या दिवशी गर्दी कशाची होती हे कोडं मात्र सुटलं. त्रिपुरी पौर्णिमेची. खूप रोषणाई, फटाके असं बघायला लोक जमले होते.

नवरात्रीची परिस्थितीही तशीच. रोजच्या आयुष्यात साध्या दिनक्रमात

स्वस्थपणे जगण्याचा आनंद नाहीसा झाला की उत्सवी वातावरण तयार होतं आणि त्याच्यातच मन रमायला लागतं. नवरात्र, त्यानंतर घटस्थापना हे सगळं माझ्या पिढीला लहानपणापासून माहिती आहे. पण सध्याचं त्याचं स्वरूप मात्र अजबच नाही तर गजब आहे. बायका-मुली तर नऊ निराळ्या दिवशी नऊ निराळे रंग अंगावर नेसण्यात अत्यानंद मानतात. घरात असलेला त्या रंगाचा कपडा, साडी, ड्रेस नेसला तरी ठीक आहे पण त्या कल्पनेची झिंग इतकी असते की त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खरेद्या होतात. कष्टकरी लोकही या अनुकरणाच्या सापळ्यात सापडतात. परवडत नसताना खरेद्या करतात.

गेली 35-40 वर्षं मी लोकांना पुण्यात धुळवड आणि रंगपंचमी खेळताना बघतोय्. मला दिसतंय् ते रंगपंचमीचं आणि धुळवडीचं स्वरूप हिडिस आहे. अनोळखी माणसाच्या अंगावर लांबून कुठूनतरी रंगाच्या पाण्यानी भरलेले फुगे टाकायचे, मुलींना-स्त्रियांना हात लावण्यासाठी मुलग्यांनी रंगपंचमीची संधी शोधायची. स्त्रियांना ओलं करून त्या अवस्थेत बघण्याचा पुरुषांचा विकृत हेतू अर्थातच साध्य होतो. रंगांमधे अनेक प्रकार बाजारात मिळायला लागले. ऑईलपेंटचा वापरही मी होताना बघतोय्. हा सगळा आनंद काय प्रकारचा आहे हे आपल्याला अगदी पक्कं कळतंय्. ह्या सगळ्या आनंदानंतर सोसायट्यांच्यातल्या सामाईक जागा, पार्किंग, रस्ते रंगांनी माखवून खराब होतात ते मात्र इतर कामगारांनी साफ करावेत अशी कल्पना असते. 'स्वतः केलेली घाण स्वतः साफ करायची असते', हे तर मूलतत्त्व आहे. ते विसरलं जातं.

लोकांना समजत नाही ती गोष्ट म्हणजे तीन गोष्टींमधला फरक. अमुक गोष्ट घेण्याची माझी इच्छा आहे, मला गरज आहे आणि ती मी घेणार यातला फरकच त्यांना समजत नाही. वस्तूंच्या बाबतीत 'गरज, सोय आणि चैन' यांतला फरक लहानपणापासून मुलांच्या मनावर बिंबवणं आवश्यक आहे. नाहीतर समाज असाच आणखी भरकटत जाणार. सगळ्यांनी मिळून मजा करावी ही इच्छा मनात निर्माण झाली इथपर्यंत ठीक आहे, पण पुढचं सगळं विकृत आहे.

आधीची पिढी दिशाहीन, हतबुद्ध आहे. त्याच्या आधीची म्हणजे ज्येष्ठ नागरिकांची पिढी आपल्या परीनी त्या सणांचा, कर्मकांडांचा अर्थ सांगून त्याला 'संस्कार' असं नाव देते आहे. संस्कार म्हणजे पारंपरिक संस्कार असं सगळे मिळून प्रामाणिकपणे समजतायत. या पुस्तकसंचात 'संस्कार म्हणजे नेमकं काय' असा लेख आहे. त्यामधे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आधुनिक

संस्काराचा मला समजलेला खरा अर्थही त्यात सांगितला आहे.

मी लहानपणापासून अनेक सण बघितलेले आहेत, अनुभवलेले आहेत. मला माहिती नाहीत असे नवीन सणही एकदम लोकप्रिय झाले, काहींचं पद्धतशीर मार्केटिंग केलं गेलं कारण हा उत्तम धंदा आहे हे अनेकांच्या लक्षात आलं. प्रत्येक सणाच्या निमित्तानी प्रचंड पैशाचा टर्नओव्हर होतो हे कळल्यावर समाजाचा होता तो सगळा विवेक हरवला. जे लोकप्रिय ते आपण करायचं हा प्रत्येकाचा निर्णय झाला. विवेकवाद जवळजवळ नाहीसा झाला.

हा मुद्दा समजावण्यासाठी आमच्या बांधकाम व्यवस्थापनक्षेत्रातलं उदाहरण देतो. मी माझ्या भागीदारांबरोबर बरीच वर्षं बिल्डरच्या धंद्यात होतो, त्या वेळची गोष्ट प्रथम सांगतो. आमच्या स्कीम्सचं बुकिंग व्हावं म्हणून आम्हाला निरनिराळ्या वर्तमानपत्रांत जाहिराती द्याव्या लागायच्या. जाहिराती बघितल्या की ओळखीच्यांना वाटायचं यांचा धंदा जोरात चाललाय्. खरी परिस्थिती बरोब्बर उलट होती. काही काळानी आम्हाला जाहिरातींशिवाय बुकिंग्ज् मिळायला लागली. समजा, आज पुण्यातले बिल्डर्स बघितले आणि सर्वांत कोणाचा धंदा मोठा आहे असा शोध घेतला तर असं आढळतं की ज्यांच्या वर्तमानपत्रांत सारख्या जाहिराती दिसतात ते मध्यम बिल्डर असतात. खऱ्या जायंटस्ना जाहिरातीची जरूरच पडत नाही.

आपण टी.व्ही.वर ज्या उत्पादनांची दर पाच मिनिटांनी जाहिरात बघतो त्यांना जाहिरातीची जरूर असते. शहाण्या माणसानी त्या उत्पादनांच्या मागे लागायचं नसतं. पण सगळी अडचण विवेक हीच असल्यामुळे उल्लू बनायला जनता तयार असते. गुढीपाडव्याला मिठाईच्या दुकानासमोरच्या श्रीखंड विकत घेण्यासाठीच्या रांगा बघितल्या की विवेकवादी माणूस विचार करतोच ना! एवढ्या प्रचंड संख्येला श्रीखंडाचा पुरवठा करायचा म्हणजे किती चक्का, किती दही, दूध याचं उत्पादन करून ठेवायला हवं? अगदी डीप फ्रीझचा वापर करून हे पदार्थ टिकवण्यासाठी सगळे प्रयत्न केले असले तरी शेवटी ते श्रीखंड शिळंच ना? शहरी माणूस एरवीही प्रत्येक गोष्ट शिळीच खातो, पण सणाच्या दिवशी 'खास शिळं आणि खास महाग' असंच असणार. शहाण्यानी गुढीपाडव्याच्या दिवशी श्रीखंड आणू नये, होळीच्या दिवशी पुरणपोळीच्या भानगडीत पडू नये, गणपतीत मोदकांच्या वाट्याला जाऊ नये हेच योग्य. पण एवढा विचार करायला कोण तयार आहे?

प्रत्येक सणाला जनता हा बकरा आहे आणि गल्ला जमवत कसाई

बसलेलाच असतो. या बकऱ्याच्या कहाणीला एकही सण अपवाद नाही. लोकांना टी.व्ही.वर दिसेल तेच सत्य आणि अनुकरण करण्याजोगं चांगलं असं वाटतं त्याला कोण काय करणार? वर्तमानपत्र वाचलं आणि टी.व्ही. बघितला की खुर्चीवरून न हलता सबंध जगाचं ज्ञान होतं आणि तेही फार स्वस्तात त्यामुळे कुठची कल्पना लोकप्रिय होणार याचा निर्णय झालेलाच असतो.

मगाशी आपण म्हणालो तसं या परिस्थितीला एकही सण अपवाद नाही. हे कदाचित तुम्हाला पटणार नाही. आठवून बघा ना! गणपती उत्सव – त्यामुळे 'पुणे बंद'ची परिस्थिती, जबरदस्तीच्या वर्गण्या, देशी-विदेशी दारुचा प्रचंड खप, दिवाळी – त्यातले फटाके, मिठायांचा-खाद्यपदार्थांचा महापूर, संक्रांत, होळी, रंगपंचमी – सगळीकडे झालेला रंगांचा हिडिस राडा, गुढीपाडवा, वटपौर्णिमा, नागपंचमी, दसरा, नवरात्र प्रत्येक गोष्ट आठवून बघा. हे सगळं म्हणजे संस्कार असं कोणाला वाटत असेल? प्रश्नच आहे.

अनेक व्रतवैकल्यं आहेत– सोळा सोमवार, मंगळागौरी, शिवामूठ, वाण, हळदीकुंकवं, निरनिराळ्या वारी धार्मिक उपास करून निवडून निवडून प्रकृतीला अपायकारक वातूळ पदार्थ खाणं, हे म्हणजे संस्कार आहेत का?

अनेक प्रकारची कर्मकांडं आहेत– सकाळ-संध्याकाळ संध्या, देवपूजा, जानवं घालणं, मंगळसूत्र चोवीस तास गळ्यामधे ठेवणं, बांगड्या, गर्भसंस्कार, डोहाळजेवणं, स्तोत्रपठण, पत्राच्या डोक्यावर श्री लिहिण्याचा आग्रह, मृत्यूसंबंधीची कर्मकांडं, हार, खांदा देणं, कलश, अंत्यदर्शन, मंत्राग्नी – हे खरोखर संस्कार आहेत?

जिथे देखावे मांडावे लागतात, आरास करावी लागते, पण स्वरूप धार्मिक असतं अशाही बऱ्याच गोष्टी आहेत. बारशी, मुंजी, सत्यनारायण, भूमिपूजनं, वास्तुशांती, शिवाय साठीशांती, पंचाहत्तरी, सहस्त्रचंद्रदर्शन हे आहेच. लग्नसमारंभही या यादीतच येतात पण त्याविषयी आपण स्वतंत्रपणी बोलूया.

समारंभ, व्रतवैकल्यं, धार्मिक विधी, लग्नसमारंभ अशा गोष्टी न करण्याचं, अशा कार्यक्रमांना हजर न राहण्याचं माझं धोरण गेल्या अनेक वर्षांमधे अनेक नातेवाईकांना, मित्रमंडळींना माहिती आहे. ते मला फोनवर बोलावणं करताना 'धार्मिक विधी नसल्यामुळे तुला यायला हरकत नाही', असं सांगतात. मी हट्टी नसल्यामुळे अशा काही कार्यक्रमांना मी गेलोदेखील. कधी एखाद्या वयस्कर जोडप्याचा लग्नाचा वाढदिवस होता, कधी 'उगाचच सगळ्यांची भेट व्हावी

म्हणून बोलावलं', असं सांगितलं होतं. खुद्द कार्यक्रमात लग्न समारंभासारखीच जेवणाची सोय, नाच किंवा गाण्याचा कार्यक्रम, जमलेल्यांची कौतुक-आभार यांची छोटी भाषणं, सगळ्यांसमोर स्टेजवर येण्याची संधी, असाच प्रकार होता.

माझ्या स्वतःच्या आयुष्यातून निरर्थक गोष्टी वेचून वेचून काढून टाकण्याच्या मोहिमेच्या चष्म्यातून या अशा कार्यक्रमाकडे बघितलं तेव्हा मला तो निरर्थकच, शिवाय समाजाला अपायकारक दिसायला लागला. त्यामुळे पर्यावरणीय आणि सांस्कृतिक हानी होते याबद्दल माझी खात्री पटली. मग माझा निर्णय झाला. त्यापुढच्या अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या बोलावण्यालाही मी नकार द्यायला सुरवात केली.

अशा उत्सवात म्हणे प्रेम व्यक्त होतं. वस्तूची किंमत तिच्या उपलब्धतेवरून ठरते हा मूळ तर्कसंगत विचार लक्षात घेऊन जरा अधिक स्पष्टपणी प्रेम व्यक्त करण्याकडे बघूया. प्रेम व्यक्त करण्याचे मार्ग म्हणजे त्या माणसासाठी वेळ देणं, बुद्धी खर्च करणं, श्रम करणं. यातलं काहीच शक्य नसलं तर फक्त पैसे खर्चायची तयारी दाखवणं. यातली सर्वांत कठीण ती जास्त किमती गोष्ट आणि सर्वांत सोपी ती कमी किमतीची असा क्रम लावून बघूया. असं दिसतं की, सर्वांत मूल्यवान वेळ, त्या खालोखाल श्रम, त्या खालोखाल बुद्धी वापरणं (कारण ती लांबूनही वापरता येते) आणि सर्वांत शेवटचा क्रम म्हणजे पैसे खर्च करणं. या मोजपट्टीवर तपासलं तर पैसे खर्चून वस्तू प्रेझेंट देण्याची कृती सर्वांत खालच्या दर्जाची आहे. ही गोष्ट खूप कमी लोकांना समजू शकते. प्रत्यक्षातलं समाजातलं सरासरी मध्यमवर्गीय कुटुंब तर 'प्रेझेंटेशन आर्टिकल्स - ग्रीटिंग कार्ड्स' च्या वाटेनी फार पुढे पोचलं आहे. मग नातेसंबंध सुधारतील कसे?

या उत्सवी वातावरणात कष्टकऱ्यांकडे, गरजूंकडे बघणं शक्यच नाही. ते आपल्या आसपास आहेत म्हणून आपल्याला कामाला माणसं मिळतायत्. मध्यमवर्गीय माणूस चंगळवादाच्या वाटेनी खूप पुढे गेला आहे. त्याला स्वावलंबनापर्यंतचा उलटा प्रवास शक्य नाही. तो 'वन वे' वर जोरात पुढे चालला आहे. त्याला खरं योग्य काय या विचाराला वेळच नाही.

आता विवेकवादी लोकांना या सगळ्याबद्दल काय वाटतं ते सांगतो. विधी - लग्नविधी, मुंजविधी, भूमिपूजन, वास्तुशांत, मृत्युनंतरचे अग्नी देण्याचे विधी अशा सर्व गोष्टींच्या पलीकडे गेलेल्या आमच्या विचारपद्धतीला दुसऱ्या कोणीतरी न कळणाऱ्या संस्कृत भाषेत मंत्र म्हणून स्वतःवर काही परिणाम होतो असं वाटत

नाही. सोप्या मराठीमधे त्या मंत्राच्यात काय म्हटलंय हे जर कोणीतरी समजावून सांगितलं तर ते तुलनेनी जास्त परिणामकारक होईल. स्वतः त्या गोष्टी समजून घ्यायच्या असतील तर ते त्या लग्नसमारंभाच्या लग्नघाईत शक्यच नाही. वैवाहिक आयुष्य म्हणजे काय आणि त्यात येणाऱ्या प्रश्नांच्या बाबतीत आपण स्वतः कसं वागू हे खरोखर ठरवायचं, बोलायचं असलं तर ते कसल्याही समारंभाचा ताण नसतानाच्या वेळेलाच शक्य आहे.

खरं तर विवाह अभ्यास मंडळ या कल्पनेचा जन्म जेव्हा आमच्या घरात 1997 साली झाला तेव्हा आम्हाला याची पूर्ण कल्पना आली होती. मुंजविधीत तर आम्हाला काहीच तथ्य दिसत नाही. मुंज मुलग्यांचीच आणि ब्राह्मणांच्यातच होते याचाच अर्थ मानवी नात्यांचा अनादरच होतो. खुद्द माझी मुंज मी दहा-अकरा वर्षांचा असताना माझ्या आईवडलांनी केली होती, पण मधल्या काळात माझा सगळ्या हिंदू धार्मिक विधींवरचा विश्वास उडाला. आमच्या मुलाची मुंज आम्ही केली नाही.

मधे एकदा एरवी संपूर्ण आधुनिक म्हणवून घेणारे एक गृहस्थ मला त्यांची मुंजीला हजर राहण्यामागची भूमिका सांगत होते. मुंजमुलाचा बाप त्यांच्या जवळच्या नात्यातला होता. त्यांचं म्हणणं होतं की, त्या नात्याचा आदर करण्यासाठी ते मुंजीला गेले. पुढे असंही म्हणत होते की, मुंज या कल्पनेत काही तथ्य नाही असं त्यांनाही वाटतं. हे गृहस्थ बऱ्यापैकी सामाजिक कामात वगैरे होते. मी त्यांना म्हणालो की, त्यांच्या सामाजिक कामात तो मुंजमुलाचा बाप कधी भाग घेतो का? ते जरा बुचकळ्यात पडले. पुढे मी म्हणालो की, नात्याचा आदर करायचा तर दोघांनी करायला हवा. साहजिकच ते पुढे काही बोलले नाहीत.

पुढे असंही कळलं की, त्या मुंजमुलाचे तब्येतीचे काही प्रश्न होते. 'त्याची मुंज करून टाका म्हणजे तब्येतीचा प्रश्न मिटेल', असं घरच्यांनी सांगितलं होतं. या प्रकारे मुंज करून मुलांचे प्रश्न सुटत असते तर समाजाचं चित्र निराळंच नसतं का दिसलं?

मोठ्यांच्या छोट्यांनी केलेल्या अनुकरणांपैकी सर्वांत वाईट अनुकरण म्हणजे समारंभप्रियता. यशस्वी, श्रीमंत, प्रसिद्ध लोकांना समारंभ उर्फ देखावे खूप पसंत असतात. लग्नसमारंभ नावाचा प्रकार तर पैशाच्या उधळपट्टीचा कळस असतो. धंद्यातले स्वार्थ, मैत्रीतले स्वार्थ, नात्याची बंधनं या अनेक कारणांमुळे शेवटी लग्नसमारंभ म्हणजे देखावा. भारतीय संस्कृतीतला हा सर्वांत हानीकारक

प्रकार असतो. ‘हम आपके है कौन’ यासारखे सिनेमे या सगळ्या समारंभ, देखावे अनुकरणाला खूपच लोकप्रिय बनवून टाकतात. श्रीमंत लोकांना निदान हे सगळं परवडतं तरी. पण त्याचं अनुकरण करणाऱ्या मध्यमवर्गीय माणसाचे हाल काही विचारू नका.

जीवनसाथ अभ्यास मंडळाच्या खेळात छोटा लग्नसमारंभ करणाऱ्यांची एक कॅटॅगरी असते आणि मोठा समारंभ करणाऱ्यांची विरुद्ध बाजू असते. छोटा समारंभ म्हणजे काय आणि मोठा समारंभ म्हणजे काय यांची व्याख्या स्पष्ट आम्हाला करावी लागते कारण छोटा समारंभ म्हणजे जेवायला माणसं किती बोलावणार विचारलं तर उत्तर दोनशे असं मिळू शकतं. जीवनसाथची ती व्याख्या अशी– साधारण मुलाच्या घरी राहणारे पाच-सात लोक आणि मुलीच्या घरी राहणारे पाच-सात लोक एकत्र जेवले तरच मध्यमवर्गीयांच्या घरामधल्या एखाद्या मोठ्या खोलीत एकत्र जेवणं शक्य आहे.

त्यात काके, मामे, भटजी, मित्र वाढवले की संख्या पंचवीस ते तीस व्हायला लागते आणि हॉल भाड्यानी घ्यावाच लागतो. त्यामुळे आम्ही असं सांगतो की, लग्नाच्या वेळी किंवा रिसेप्शनला हॉल, कार्यालय भाड्यानी घेतलेलं असलं की तो समारंभ मोठा समजावा. काही काही मुलं-मुली असाही युक्तिवाद करतात की, लग्नसमारंभ छोटा आणि रिसेप्शनला मोठा हॉल भाड्यानी घेऊन पाचशे लोक बोलावले की तो छोटाच समारंभ झाला. ती मात्र स्वतःची फसवणूक ठरते.

त्यासाठी आणखी एक व्याख्या सांगावी लागते. कोणालाही बाहेरगावाहून बोलावलेलं असता कामा नये. पत्रिका छापील, वाटलेल्या, पाठवलेल्या असता कामा नयेत तरच तो छोटा समारंभ होतो.

खुद्द आम्ही दोघं लग्नसमारंभाचे कट्टर विरोधी आहोत. खुद्द आमच्या लग्नाला कोणालाही बोलावलेलं नव्हतं. त्यासाठी खास जेवण नव्हतं. खरं तर लग्न करण्याच्या वेळी अगदी सहजपणी कागदपत्रांवर सह्या करण्याव्यतिरिक्त काहीही नव्हतं. अंगठी नाही, माळ नाही, तोंडात पेढा नाही, फोटो नाही, शपथ नाही, काही नाही. बुद्धिप्रामाण्यवादी ऊर्फ रॅशनल या विचारसरणीचे असल्यानी एका गोष्टीवर आमचा पूर्ण विश्वास होता की, समाधानी वैवाहिक आयुष्य घडवायचं असेल तर ते आम्ही घडवायचं आहे. या कर्मकांडांचा आणि रूढींचा वैवाहिक समाधानाशी काही संबंध नाही. आमचीच मुलं असल्यामुळे मुलगी-

जावई याच प्रकारचे आहेत आणि मुलगा-सूनही याच पद्धतीनी विचार करणारे आहेत.

समारंभ, सेलिब्रेशन, देखावे या बाबतींतही बुद्धिप्रामाण्यवाद्यांची भूमिका अशी असते. ती जरा सविस्तर बारकाईनी सांगतो. आजारी माणसाच्या सान्निध्यात आपण जाऊन जोरजोरात हसणं असभ्य समजतो. रडणाऱ्या, दुःखात असणाऱ्या माणसाच्या समोर आनंदानी गाणी म्हणत नाचणं आपल्याला पटत नाही ना? उपाशी माणसं समोर बसलेली असताना त्यांना न देता मिटक्या मारत जेवताना आपल्याला लाज वाटते. ह्या भावना जर आपल्याला जाणवत असतील तर आसपास एवढी जनता दुःखात, उपाशी, आजारी असताना आपण आनंदोत्सव साजरे करणं आपल्याला शोभतं का? ही जनता आपल्या डोळ्यासमोर नसेल, कारण आपण आपल्या सुरक्षित, सजवलेल्या आरामशीर घरात आहोत. पण त्या भिंतींपलीकडे हे लोक आहेत हे आपल्याला माहिती आहे ना?

हा विचार सतत जाणवल्यामुळे खरोखरच आम्हाला खूप अतिरेकी आनंद कधीच होऊ शकत नाही. काही प्रमाणात चांगलं वाटणं, वाईट वाटणं, दुःख वाटणं हे सगळं एका मर्यादेत समजण्याजोगं आहे, पण वर्थ सेलिब्रेटिंग असं काहीही नसतं. त्याचबरोबर छाती पिटून रडण्याजोगंही काही नसतं. हे दोन्ही प्रकारचे भावनातिरेक आम्हाला चूक वाटतात. वाढदिवस हा तर पाश्चात्त्य पगड्याखालच्या खोट्या आधुनिकीकरणाचा उत्तम नमुना आहे. आम्ही वाढदिवस साजरा करत नाही.

उत्सवीपणाच्या बाबतीतला एक महत्त्वाचा विचार सांगतो, शेतीप्रधान ठिकाणी गावभर चांगला पाऊस पडला की सबंध गावाला एकाच वेळी आनंद किंवा दुष्काळ पडला की एकाच वेळी दुःख होत असेल हे समजण्याजोगं आहे. अन्नधान्य, पाणी, ऊर्जा या सगळ्या बाबतींत साठवणीच्या बळावर आयुष्य जगणाऱ्या सगळ्या शहरवासियांना एकाच वेळी आनंद किंवा दुःख होणारा एकच विशिष्ट काळ, दिवस असूच शकत नाही.

दिवाळी हा आनंदाचा उत्सव काहींसाठी असेल. काहींसाठी नसेल. फटाक्यांचा त्रास होणारे खूप जण असतात. फराळाचे पदार्थ त्रासदायक व्हायला लागतात. गणपती, नवरात्रोत्सव यांसारखे उत्सव जनतेला हैराण करतात. बुद्धिप्रामाण्यवाद्यांवर तर अशा उत्सवांच्यात सरळ सरळ बलात्कारच होतो. रेकॉर्डस्, रस्त्यावर मांडव, रहदारी बंद, वर्गणी मागणारे, दारुडे, जागोजागचे वासूनाके यांचा अतिरेक होतो. त्यामुळे सर्वच उत्सवांच्या बाबतींतला मूळ उद्देश

बाजूला पडतो नि तिरस्कार करण्यायोग्यच गोष्टी उरतात.

मूळ मुद्दा असा आहे की, हे उत्सव, सण, समारंभ यांचं कोणालाच न परवडणारं अनुकरण चालू असतं. विवाह अभ्यासाच्या संदर्भातला मुख्य प्रश्न असतो की, तुम्ही या दोन प्रमुख गटांपैकी कुठल्या बाजूचे आहात. हे तपासणं अतिशय महत्त्वाचं आहे. काहीजण तात्पुरतं आईवडलांची मनं दुखावू नये म्हणून या गोष्टी करताना दिसतात. तेही तेवढंच अपायकारक आहे. आमच्या मते आईवडलांना या सगळ्यामधली निरर्थकता पटवून देणं शक्य आहे. तुम्हाला विनंती एवढीच की, या सगळ्या विषयांवर तुमच्या ग्रुपमधे सविस्तर चर्चा होऊ द्या. तुम्ही यातले कोण हे तुम्हाला तरी स्पष्ट होऊ द्या. मी आणि शोभा जवळपासच्या टप्प्यावर असल्यामुळे आमचं पटतं. नाहीतर फार कठीण होतं.

मृत्यूभोवतीची कर्मकांडं आणि त्यांची परिस्थिती कशी आहे ते बघूया. लग्नसमारंभाभोवती जशी, जेवढी कर्मकांडं या समाजानी रचलेली आहेत तशीच भरपूर कर्मकांडं, रूढी, परंपरा मृत्यूभोवतालीही रचलेली आहेत. सत्यशोधकांच्यात याही रूढींचा पूर्ण अभाव असतो. मृत्यूनंतरच्या अंत्यदर्शन या कल्पनेवर आमचा विश्वास नाही. काय भेटायचं ते जिवंतपणी अवश्य भेटावं. आमच्यात प्रेताला फुलं, माळा नसतात, प्रेतयात्रा नसतात. स्मशानात भटजींना बोलावून करण्याचे विधी नसतात कारण त्या विधींचा पुनर्जन्म या कल्पनेशी संबंध आहे. ज्या घरी कोणी व्यक्ती वारली असेल तिथे खरोखर जवळच्या पाच-सात लोकांनी येऊन काही मदत करण्यापलीकडची गर्दी आमच्या कल्पनेत बसत नाही.

कोणी वारलं की एकमेकांना कळवण्याची चढाओढ लागलेली आम्ही बघतो, पण आम्ही त्यात भाग घेत नाही. वारलेल्या माणसाच्या घरी जमलेल्या माणसांचं आदरातिथ्य, चहापाणी, जेवणाची व्यवस्था करण्यात घरच्या माणसांची झालेली ओढाताण आम्ही बघितलेली आहे. त्या मृत्यूनंतर लोक घराबाहेर पडत नाहीत हेही कर्मकांडच आहे. दुसरा दिवस, तिसरा दिवस, दहावा, बारावा, चौदावा दिवस यांचं खास महत्त्व मानून लोक कामावरून रजा घेताना आम्ही बघतो. वाईट वाटतं. श्राद्ध, त्यानिमित्त काहीतरी कार्यक्रम असंही आमच्याकडे नसतं. आम्हाला ते पटत नाही.

या सगळ्या सत्यशोधक वागणुकीच्या प्रकारावर टीका करणाऱ्यांना असं वाटतं की, आम्हाला भावनांचं काही महत्त्व नाही. खरी गोष्ट अशी आहे की, आम्हाला रास्त भावनांचं रास्त महत्त्व आहे, पण भावनांचं प्रदर्शन, अतिरेक पसंत

नाही. भावना अतिशयोक्त पद्धतीनी दाखवणं, विशेषतः आनंद, दुःख यांचं अवाजवी प्रदर्शन हे आम्हाला योग्य वाटत नाही. स्मशानात भेटून गप्पा मारणारे, पाचकळ विनोद करणारे, सिगरेटी ओढणारे लोक आम्ही खूप बघितले आहेत.

मरणाऱ्याच्या अगदी जवळच्या माणसांना होणाऱ्या दुःखाबद्दल आम्हाला अविश्वास नाही, पण जमलेल्या काहीशे लोकांना तेवढं दुःख होऊ शकतं हे आम्हाला पटू शकत नाही. या अशा अतिशयोक्त प्रदर्शनाला आमचा सामाजिक विरोध असल्यामुळे आमचं धोरण असतं की निदान आम्ही अशा कुठल्याही गोष्टीत भाग घेणार नाही. इतरांवर याचा किती परिणाम होतो हे ठरवणं कठीण असतं. याची चेष्टा करणारे काही असतात. मागे बोलणारे जास्त असतात. असे कोण असतील याची आम्हाला कल्पना असते, पण स्वतःच्या धोरणाबद्दल आमची खात्री असल्यामुळे त्याचा आमच्यावर परिणाम होत नाही.

या सगळ्या परंपरांविषयी एक गोष्ट मुद्दाम स्पष्ट करतो. पूर्ण परंपरावादी असा कोणी नसतो. त्याचबरोबर पूर्ण आधुनिक कोणी नसतो कारण त्याच्यापेक्षा प्रोग्रेसिव्ह किंवा मॉडर्न कोणीतरी असतोच. या सगळ्यामधे माणसाचा कल कुठल्या दिशेनी एवढाच प्रश्न असतो. तो कल कळला नाही तर किंवा पटला नाही तर संपूर्ण वैवाहिक आयुष्य कुचंबणेत किंवा संघर्षात जाऊ शकतं ह्याची जाणीव ठेवली तर फार बरं होईल.

मला माझ्या कामाच्या निमित्तानी अनेक लोक भेटतात. समारंभांतली, सण, उत्सवांतली निरर्थकता अनेकांच्या लक्षात आलेली आहे. बऱ्याच लोकांना ती पटलेली देखील आहे. पण कोडं अजून सुटलेलं नाही– लोक असे सण, उत्सव, समारंभ का करत राहतात?

मला त्याबद्दल काही शक्यता जाणवतात. लोकांना जेवू घालण्याचं पुण्य त्यांच्या डोक्यात काही प्रमाणात असतं. अमुक व्यक्तीला जेवण दिल्याची सामाजिक नोंद होते त्याचं महत्त्व काहींना वाटतं. त्या लोकांसाठी पैसे खर्च केले याचं समाधान वाटतं. एरवीच्या आयुष्यात स्वतःची प्रसिद्धी करणं शोभत नाही. पण या समारंभामुळे आपण प्रसिद्ध होतो, आपला जनसंपर्क वाढतो असं त्यांना प्रामाणिकपणे वाटतं.

आणि त्याही खेरीज सर्वांत महत्त्वाचं खरं कारण असतंच. त्याच्यात प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचं धारिष्ट्य नसतं.

●

2) वाढदिवस

विवेकनिष्ठ पद्धतीनी वाढदिवस या गोष्टीचाही विचार करायला पाहिजे. याबद्दलचा शब्दात स्पष्ट मांडण्याजोगा विचार मी 13 ते 15 वयाचा असताना करायला लागलो. माझ्या लहानपणी आमच्या घरी आम्हा तीन भावंडांचे वाढदिवस साजरे केले जायचे. त्या त्या अपत्याच्या आवडीचा काहीतरी खाद्यपदार्थ जेवणात असायचा. संध्याकाळी आई त्या मुलाला ओवाळायची. बाहेरच्या कोणाला निमंत्रण दिल्याचं मला कधी आठवत नाही. आई-वडलांच्या जन्मतारखा आम्हा तीनही मुलांना माहिती होत्या. पण त्यांचे वाढदिवस, त्यांच्या लग्नाचा वाढदिवस हा विषयही घरात कधी निघायचा नाही.

मधे काही वर्षं मी परदेशात होतो तेव्हा माझा वाढदिवसाला असलेला नकार शोभाला समजावून सांगायला मला काहीच अडचण आली नाही. आमच्या फिलाडेल्फियाच्या मित्रमंडळींच्यात एखाद-दुसऱ्या वेळी असं झालं होतं की जेवणाचं निमंत्रण होतं आणि तिथे गेल्यावर त्यांच्या लग्नाचा वाढदिवस असल्याचं कळलं. मला वाढदिवस ही कल्पना पटत नाही हे त्यांना माहीत होतं. त्यांच्याकडे काहीच वादावादीचं बोलणं झालं नाही, पण काही काळानी मला ती फसवणूकच वाटायला लागली. एकमेकांकडे जेवायला जाणं नेहमी चालायचं. पण त्यानंतर मी निमंत्रणामागचं कारण वाढदिवस नाही ना याची खात्री करून घ्यायला लागलो.

प्रत्यक्षात नीट विचार केला की दोन गोष्टी मला खटकायच्या. एक म्हणजे वाढदिवसाच्या पार्ट्यांमधल्या निरर्थक उथळ गप्पा आणि दुसरं म्हणजे माझ्या वाढदिवस या कल्पनेला असलेल्या नकाराला सगळे नुसतंच ‘अनिलचा विक्षिप्तपणा’ म्हणून सोडून द्यायचे. विवेकनिष्ठ विचारपद्धतीत वाढदिवस का बसत नाही हे गंभीरपणे मला विचारावं असंही कोणाला कधी वाटलं नाही. ते न विचारणं मला जास्त खटकायचं. तेव्हा माझ्या फिलाडेल्फियातल्या मित्रमंडळींनी जसा विवेकनिष्ठ विचार समजून घ्यायची तयारी दाखवली नाही तशीच परिस्थिती अजूनही 45 वर्षांनंतर भारतात आहे. तुम्ही कोणी मला हा प्रश्न विचारलेला नसला तरी मी त्याचं उत्तर इथे देणार आहे. ओळीनी काही मुद्दे सांगतो.

1) अमूक इतक्या वर्षांपूर्वी या विशिष्ट दिवशी माझ्या आईच्या पोटी माझा जन्म

झाला यात माझं कर्तृत्व शून्य आहे, त्यामुळे त्याबद्दल माझं कौतुक करणं, मला शुभेच्छा देणं, माझं अभिनंदन करणं या कशातच अर्थ नाही.

2) माझा जन्म झाल्याचा प्रसंग मला स्वतःला आठवणं शक्य नाही त्यामुळे तो प्रसंग, तो दिवस याचा आनंद मला नैसर्गिकपणी होणं शक्य नाही. अमुक दिवशी माझा जन्म झाला त्यामुळे त्याचा मला आनंद झाला पाहिजे हे इतरांनी पक्कं मनात भरवलं आहे म्हणूनच मला त्याचा काही प्रमाणात आनंद होत असावा.

3) माझ्या आईवडलांना माझा जन्म झाल्यामुळे आनंद झाला असेल याबद्दल मला शंका नाही. पण दुसऱ्याला आनंद झाल्यामुळे स्वतःला किती आनंद होऊ शकतो याच्या काही मर्यादा आहेत आणि तेही त्या व्यक्तीच्या स्वभावावर अवलंबून आहे.

4) माझ्या जन्माच्या वेळेला आईवडलांना जेवढा आनंद झाला असेल तो माझं वय वाढेल, माझी वागणूक जशी बदलेल त्याप्रमाणे कमी किंवा जास्त होईल ही शक्यता असतेच.

5) मी लहानपणी पार बिघडलेला, जवळजवळ वाया गेलेला मुलगा होतो. त्यामुळे माझ्याबद्दलच्या काळजीमुळे आईवडील व्याकूळच असायचे. दुसरा काही उपाय माहिती नसल्यामुळे मला दोघंही भरपूर मारायचे आणि देवासमोर 'पुन्हा असा वेडेपणा करणार नाही', असं आई रोज म्हणायला लावायची. त्या काही वर्षांचा विचार केला तर माझा जन्म झाला ही दुर्दैवी घटना घडली, असंच त्यांना काही काळ तरी वाटत असणार.

6) मोठेपणी मी सुधारलो, पण त्यांच्यामुळे नाही. त्यामुळे मला सुधारल्याचा आनंदही त्यांना मिळाला नसणार. मी जीवनसाथच्या निमित्तानी स्वतःच्या वागणुकीचा जास्त अभ्यास करून आणखी सुधारलो तेव्हा वडील हयात नव्हते आणि आईदेखील बरीच म्हातारी झाली होती.

7) माझ्या दोन बहिणींना माझ्या जन्माचा प्रसंग, तो दिवस आठवण्याची काहीच शक्यता नाही. मोठी बहीण माझ्या जन्माच्या वेळेला दोन वर्षांची होती आणि धाकट्या बहिणीचा प्रश्नच नाही. मोठेपणी आमचे तिघांचे संबंध सर्वसाधारण मध्यम जवळिकीचे राहिले. अगदी गूळपीठ नाही आणि दुराव्याचेही नाहीत. सांगण्याचा उद्देश असा की, माझी जन्मतारीख त्यांच्या कदाचित लक्षात असेल, पण नैसर्गिकपणी माझ्या जन्माचा आनंद त्यांना

होण्याची काहीच शक्यता नाही. समाजाची रीत म्हणून त्यांना 'आज माझा वाढदिवस' असं क्षणभर वाटण्यापलीकडे जास्त आनंद मला शक्य वाटत नाही. माझ्या गेल्या काही वर्षांच्या अभ्यासात तर मला भावंडांच्यातली मत्सरभावना, असूया, स्वतःवरच्या अन्यायाची भावना बऱ्याच प्रमाणात दिसलेली आहे. त्या परिस्थितीत वाढदिवसाच्या शुभेच्छा, समारंभ हा निरर्थक उपचारच बनलेला दिसतो.

8) शोभा, आमची दोघं मुलं शोनील आणि आभा यांना आमच्या जवळच्या नात्यामुळे जेवढं प्रेम, कर्तव्य, काळजी, कृतज्ञता वाटत असेल ती वर्षाचे 365 दिवस 24 तास तशीच वाटत असणार. एका विशिष्ट दिवशी त्या कुठच्याही भावनेत काही बदल शक्य नाही.

9) सून, जावई, नातवंडं यांना माझ्या जन्मतारखेचं महत्त्व शोभा आणि शोनील, आभापेक्षाही कमी असणार हे उघड आहे. त्यांच्याही माझ्याबद्दलच्या भावना विचार 365 दिवस 24 तास अगदी तशाच असणार.

10)हा जो 365×24 हा उल्लेख मी सारखा करतोय तोच तर मुख्य मुद्दा आहे. एखाद्या व्यक्तीविषयी आपली भावना कुठच्याही विशिष्ट दिवशी बदलेल कशी? जी असेल ती भावना 365×24 तशीच राहाणार. बाकी सगळे सामाजिक रीतिरिवाजांचे परिणामच असणार.

11)खरं म्हणजे माझ्या दृष्टीनी कुटुंब, वंश, आसपासचा परिसर, गाव, राज्य, देश, पृथ्वी यांबद्दलच्या कुठल्याच भावनांच्यात कुठच्याही विशिष्ट दिवशी खास फरक पडत नाही. माझ्याबद्दल तरी मी हे नक्की सांगू शकतो.

12)सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासासाठी मी इतरही अनेक बाबतींत अनेकांशी बोलतो. जीवनसाथच्या सदस्यांशी बोलतो आणि समुपदेशनार्थींशीही बोलतो. त्यामुळे जनमानसाच्या माझ्या निरीक्षणांवर अवलंबून राहायला काही हरकत नाही. कुठच्याही व्यक्तीच्या जन्मदिवसाला दिलेलं अवास्तव महत्त्व, त्याबद्दलची माझी विरोधी मतं याबद्दल मी अनेकांशी आपणहून बोललो. व्यक्तिगत पातळीवर वाढदिवस ही निरर्थक गोष्ट आहे हे नव्व्याण्णव टक्के लोकांना पटतं. पण सामाजिक रुढीला चिकटून राहण्यात त्यांना जास्त सुरक्षित वाटतं हे जवळजवळ सगळे मान्य करतात.

13)एखाद्या माणसानी खरोखर काही कर्तृत्व गाजवलं तर त्या माणसाच्या दृष्टीनी आणि त्याच्या हितचिंतकांच्या दृष्टीनी एकत्र जमून आनंद व्यक्त करण्यामधे

काहीतरी तथ्य आहे. पण त्या विशिष्ट दिवसाला अमुक इतकी वर्षं झाली म्हणून तो दिवस मधल्या काळानंतर साजरा करण्याजोगा असतो का नाही याचं उत्तर पुन्हा नकाराकडेच झुकायला लागतं. मानसशास्त्राच्या अभ्यासात एक गोष्ट अगदी स्पष्ट झालीय्. चांगली, वाईट कसलीही भावना असो त्याची लगेच असणारी तीव्रता काही काळानी कमीच होते. त्या भावनेबद्दलचा विचार 365×24 कायम टिकतो. पण त्यात साजरं करण्याजोगं काहीच नसतं.

14) मला पटलेल्या विवेकनिष्ठ विचारसरणीमधे आयुष्यातल्या निरर्थक गोष्टी काढून टाकायला हव्यात. दुसऱ्या बाजूनी स्वतःचा आणि परिवाराचा विकास होईल अशा अर्थपूर्ण गोष्टी अमलात आणण्याचा सतत प्रयत्न करायला हवा.

या तर्कसंगतीप्रमाणे निरर्थक गोष्टी सोडण्याच्या माझ्या यादीत इतर अनेक गोष्टींबरोबर वाढदिवसही जाऊन बसला. त्यामुळे मी वाढदिवस हा विषय डोक्यातून पूर्णच काढला. अनेक लोकांशी बोलताना वैयक्तिक पातळीवर वाढदिवस या कल्पनेतली निरर्थकता त्यांना पटते. तरी देखील सगळ्यांचा एक प्रश्न शिल्लक असतो, तो म्हणजे हे सगळं लहान मुलांना कसं पटवायचं?

आत्ता या कार्यशाळेच्या आणि लेखाच्या निमित्तानी आपण वाढदिवस प्रकरण आणि लहान मुलं या विषयावर सविस्तर बोलणार आहोत. त्या विषयाची सुरुवात पालकांच्या डोक्यात काय काय भरलंय् या विषयापासून होते. तरुण पालकांच्यात पारंपरिकतेच्या कल्पनांनी भारावलेल्यांचा एक छोटा गट असतो. दुसरा खूप मोठा गट आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्त्यीकरणाच्या नशेत असलेल्यांचा असतो. खऱ्या आधुनिकतेचा शोध फारच कमी लोकांना घ्यायचा असतो.

लोकांना नेमकं काय करायचं हे माहिती नसतं. खर्चायला पैसे असतात, ‘सगळी माहिती’ आहे असं म्हणणारा कोणीही वयस्कर माणूस सल्लागार म्हणून त्यांना चालतो. वाढदिवस या कल्पनेचा मोठा उत्सव बनतो. या सगळ्या वातावरणात प्रेम व्यक्त करण्यासाठी सर्वांत सोपी गोष्ट म्हणजे गिफ्ट. आनंद होतो, शुभेच्छा द्याव्याशा वाटतात, प्रेम व्यक्त करावंसं वाटतं इथपर्यंत ठीक आहे, पण त्याचा नीट विचार केला तर त्यात खूप घोटाळे जाणवतात. मुख्य घोटाळा नातेसंबंधांचा होतो. नातेसंबंध सुधारण्याऐवजी भेटवस्तू सापळे तयार होतात.

प्रेमभावना व्यक्त करण्याची फक्त भेटवस्तू ही भाषा समजते अशा सापळ्यात सापडलेल्यांची संख्या प्रचंड आहे. भारतीय परंपरेनी डोकं भरलेलं

असलं तर कोणी पणती, चांदीची वस्तू, भरतकाम केलेली साडी, सलवार-कमीजचं कापड अशी भेटवस्तू देतील. पाश्चात्त्यीकरणानी डोकं भरलं असलं तर केक आणतील, तयार फुलांचा 'बुके' आणतील, युरोपमधल्या निसर्गदृश्याची फोटोफ्रेम देतील. दोन्हींपैकी पद्धत कुठलीही असली तरी तो असतो भेटवस्तूचा सापळाच. आईवडील या सापळ्यात अडकलेले असले तर मुलं त्यात सापडणार हे नक्कीच आहे.

त्याखेरीज शहरातली कुठचीही शाळा असो, शाळेमधल्या एका वर्गापुरता तरी वाढदिवस साजरा करण्याचा कुठचातरी प्रकार त्यात असतोच. काही शाळांनी वाढदिवस प्रकरणाची जरा सुधारित आवृत्ती शोधल्याचं मला माझ्या नातवंडांच्यामुळे नक्की माहिती आहे. सुधारित म्हणजे काय, तर त्या विशिष्ट महिन्यातल्या कुठच्याही तारखेचा कुठच्याही मुलाचा वाढदिवस एका दिवशी एकत्र साजरा करणं. खेड्यातल्या शाळांची मला माहिती नाही.

एक अगदी मुळातला मुद्दा सांगतो नि मग पुन्हा मुलांच्या वाढदिवसाकडे वळतो. इतर सण, समारंभ, धार्मिक उत्सव आणि वाढदिवस यांना माझा सारखाच विरोध आहे. त्याच्या निरर्थकपणामुळे विरोध आहे. वाढदिवस आणि इतर उत्सव यांतला मुख्य फरक म्हणजे वाढदिवसाची तारीख व्यक्तीप्रमाणे निराळी असते. धार्मिक सण, उत्सव मात्र सगळ्या दुनियेचा एकाच दिवशी असतो. इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशांसारख्या कुठल्याही देशात भारतीय माणूस असला तरी त्याच दिवशी गुढीपाडवा असतो. एकाच विशिष्ट दिवशी भाऊबीज असते, एकाच दिवशी गणेश चतुर्थी असते, नवरात्र पूजा, दसरा असतो.

इतर सण निदान शेतीशी, निसर्गातल्या हवामानातल्या बदलांशी जोडलेले होते. ग्रामीण आयुष्यात अजूनही काही ठिकाणी काही सण आजही अर्थपूर्ण ठरतील. वाढदिवसाचा संबंध मात्र फक्त व्यक्तिगत अहंकाराशी आहे. आपल्या शहरी आयुष्यात धार्मिक सण आणि वाढदिवस दोन्ही सारख्याच प्रमाणात निरर्थक आहेत. आत्ताच मी म्हटल्याप्रमाणे धार्मिक सण मला मान्य नसले तरी त्यांच्यावर माझा जेवढा आक्षेप आहे त्यापेक्षा वाढदिवसांवर जास्त आक्षेप आहे. मुलांचे घरी किंवा शाळेमधे साजरे केलेले वाढदिवस यावर त्याहूनही जास्त आक्षेप आहे. त्याची कारणं अर्थातच मला मागच्याच पद्धतीनी क्रमवार सांगायला हवीत.

1) लहान मुलांना मगाशी सांगितलेली बाकीची वाढदिवसाबद्दलची 14 सामाजिक

दुष्परिणामांची कारणं कळणं शक्य नसल्यामुळे ती नुसतीच 'आई-बाबा नाही म्हणाले', यावरून नाराज होतात. हट्ट करतात, उगाच बोलणी खातात, शेवटी रुसून बसतात.

2) त्या लहानांच्या मित्रमंडळींनाही ती साधारण त्याच वयाची असल्यामुळे तिथपतच समज असते.
3) तहान, भूक, शी, शू या गोष्टी प्रत्येकाला निसर्गनियमानी लागतातच. त्यांचा शरीरातच गजर लावलेला असतो. तशी वाढदिवसाची आठवण निसर्गनियमानी त्या मुलालाच काय कोणालाच होत नाही. ज्याचा शरीरात गजर लावलेला नाही ती गोष्ट कोणीही विसरू शकतो. अगदी पालकही इतर काही ताण असले तर स्वतःच्या मुलाचा वाढदिवस विसरू शकतात. शाळादेखील याच निसर्गनियमानुसार वाढदिवस विसरू शकते. यामुळे मुलं पालकांवर किंवा शाळेवर रुसतात.
4) संपूर्ण शाळा, शिक्षण या संकल्पना त्या व्यक्तीनी निरनिराळ्या काल्पनिक बंधनांच्यातून मुक्त होण्यासाठी आहेत. कुठल्यातरी एका किंवा अनेक विषयांची गोडी लागावी आणि विद्यार्थ्यांची शिकण्याची भूक वाढावी यासाठी आहेत. या मूळ कल्पनेला वाढदिवस साजरा करणं ही गोष्ट कुठल्याही प्रकारे मदत करत नाही. बहुतेक वेळा अडथळाच निर्माण करते.
5) एखाद्या मुलाचा वाढदिवस यापायी त्या मुलाच्या पालकांनी वर्गातल्या इतर मुलांसाठी काहीतरी खाऊ शाळेत नेणं हाच मुख्य कार्यक्रम असतो. असा खाऊ सगळ्यांसाठी करणं, विकत घेणं ही गोष्ट कष्टाची, खर्चाची असल्यामुळे सधन पालक आणि त्यांची सधन मुलं यांचा एक अप्रत्यक्ष गट तयार होतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा मुलांचा आणि पालकांचा निराळा गट होतो. थोडक्यात आधीच धर्म, जात, रंग अशा कारणांनी शकलं झालेल्या आपल्या समाजात सधनता आणि निर्धनता अशी आणखी एक दरी निर्माण होते.
6) शाळा इंग्लिश मीडियम किंवा त्याहून भारी म्हणजे इंटरनॅशनल स्कूल वगैरे असली तर वाढदिवस प्रकरण त्याहून हानिकारक असतं. गिफ्ट काय हे पण शाळांनी ठरवून दिल्याची उदाहरणं आहेत. गिफ्ट मिळालं की रिटर्न गिफ्ट याचा सापळा तयार होतो. या सगळ्या गोष्टी श्रीमंत लोकांना निदान पैशानी परवडतात. पण ज्या मध्यमवर्गीयांनी खूप महत्त्वाकांक्षेपोटी आपल्या दोन-तीन मुलांना इंग्लिश मीडियम शाळेत घातलेलं असतं त्यांचं मात्र कंबरडं मोडतं.

मुळात जे आईवडील मगाशी वर्णन केलेल्या सापळ्यात आधीच सापडलेले असतात त्यांच्या वैवाहिक आयुष्यातही हा प्रश्न निर्माण होतो. विवाहित आयुष्य म्हणजे काय हे ज्यांना समजलं त्यांच्यासाठी रोज आनंद वाटण्याजोगे अनेक प्रसंग असतात. पण ज्या विवाहिताला ते मर्म समजलं नाही त्या व्यक्तीसाठी जोडीदारानी स्वतःचा वाढदिवस लक्षात ठेवणं ही खूप महत्त्वाची गोष्ट असते. लग्नाच्या वाढदिवसालाही असंच अवास्तव महत्त्व दिलं जातं. या पुस्तकसंचातल्या 'आयुष्यातले आनंदाचे अनुभव' या लेखामुळे या विषयाच्या प्रगल्भतेत नक्की फरक पडेल.

एव्हाना तुम्ही ओळखलंच असेल की, मी नि शोभा आमच्या लग्नाचा वाढदिवस त्या विशिष्ट तारखेला साजरा करत नाही. आमच्या रोजच्या कामाची निवड आम्ही अशी केलीय् की रोजच आमचा दिवस समाधानाचा, आनंदाचा आणि साजरा केल्यासारखा असतो.

लग्नाच्या वाढदिवसाच्या बाबतीत लोक खूप गमती करतात. त्यात स्वतःला आधुनिक समजून काही प्रयोग करतात. एक पाऊल आधुनिकतेकडे टाकण्याच्या प्रयोगात लग्नाचे वाढदिवस लोक निराळ्या पद्धतीनी साजरे करतात. हॉल भाड्यानी घेतात, जेवायला शेकडो लोक बोलावतात, त्यात गाण्याचा कार्यक्रम ठेवतात. थोडीशी आधुनिकतेची धडपड करतात. त्यातला धार्मिक होम, हवन, पूजा असा कार्यक्रम घरी स्वतंत्रपणी करतात.

मी अशा कार्यक्रमांना जाऊन बघितलंय्. माझ्या विचारात ते कार्यक्रमदेखील बसत नाहीत असा माझा निर्णय झाला आहे. भारतीय परंपरेमधे कुठल्याही व्यक्तीला साठ वर्षं पुरी झाली की साठी नावाचा धार्मिक सोहळा असायचा. भटजी यायचे, मंत्र म्हणायचे, काही कर्मकांडं असायची. मला स्वतःला कुठच्याच धार्मिक कर्मकांडात काही स्वारस्य नसल्यामुळे मी असे सगळे कार्यक्रम टाळले.

माझ्या आईवडलांच्या लग्नाला 50 वर्षं पूर्ण झाल्याबद्दल वडलांच्या भावंडांनी आणि भाचरांनी त्याबद्दल त्यांच्या सत्काराचा एक जाहीर कार्यक्रम केला होता. माझ्या विक्षिप्तपणाबद्दल कल्पना असल्यामुळे मला आणि शोभाला त्यांनी फक्त निमंत्रण दिलं. माझे आईवडील एरवी मुंबईला राहायचे, ते पुण्यात आले की आमच्याच घरी राहायचे. त्या कार्यक्रमाबद्दलच्या चर्चादेखील माझ्या आत्या,

त्यांची मुलं यांच्याबरोबर आमच्या देखत झाल्या. सारासार विचार करून त्या कार्यक्रमाचं निमंत्रण आम्ही स्वीकारलं, त्या समारंभाला गेलो. माझ्या आईवडलांच्या लग्नाला 50 वर्षं पुरी झाल्याचा तो कार्यक्रम साधारण 20-25 वर्षांपूर्वी झाला होता. तेव्हा जीवनसाथ अभ्यास मंडळ सुरू झालेलं नव्हतं. आता विचार करून दोन गोष्टी वाटतात. तेव्हा माझा पुरेसा अभ्यास असता, तर मी निदान त्या कार्यक्रमाचं स्वरूप बदललं असतं.

आईवडलांच्या लग्नाच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या वेळी कोणीतरी विचारलं होतं की, त्यांची साठी केली होती का? माझ्या आईवडलांचं एकमेकांशी साठीबद्दल काही बोलणं झालं असेल असं मला वाटत नाही. आम्हा तीन मुलांशी बोलताना तरी हा विषय नक्की निघाला नाही. अर्थातच साठी नावाचा कसलाही धार्मिक समारंभ आमच्या घरी झालेला नव्हता.

माझं आणि शोभाचं लग्न 1970 साली फिलाडेल्फिया यू.एस.ए. इथे झालं. याचा अर्थ 2020 साली आमच्या लग्नाला 50 वर्षं पूर्ण होतील. आमचा दोघांचा तेव्हा अशा प्रकारच्या समारंभाला नक्की विरोध असेल. हा विरोध करण्याचाही प्रसंग येणार नाही असं मात्र मला वाटतं कारण तोपर्यंत आम्ही जगू असं मला वाटत नाही.

आणखी एक धार्मिक वाढदिवस सोहळा परंपरावाद्यांमधे असतो. तो म्हणजे सहस्रचंद्रदर्शन. सरळ गणिताप्रमाणे एक हजार वेळा चंद्र बघणं असा अर्थ घेतला तर तिसऱ्या वर्षीच सहस्रवेळा चंद्रदर्शन होऊन जातं. पण दर्शन याचा अर्थ पौर्णिमेचा पूर्ण चंद्र असा असल्यामुळे वयाची 82 वर्षं होऊन गेल्याशिवाय एक हजार पौर्णिमांचा आकडा पूर्णच होत नाही. आमच्या कुटुंबात कोणाचाच धार्मिक सोहळ्यांवर विश्वास नसल्यामुळे हा विषयदेखील निघाला नाही. वडील 79 वर्षं जगले, पण आई 84 वर्षांची असताना वारली.

साठीच्या वेळी किंवा सहस्रचंद्रदर्शनाच्या वेळी भटजी संस्कृतमधे मंत्र म्हणतात, त्यांत काय असतं हे मला माहिती नाही, पण काय असायला पाहिजे याबद्दल माझं मत स्पष्ट आणि पक्कं आहे. माझ्या दृष्टिकोनातून साठी म्हणजे 'यापुढे मोह टाळा, अपेक्षा करू नका, मृत्युपत्र केलं नसलं तर ते ताबडतोब करा. इच्छामरण पत्राचा कच्चा मजकूर लगेच लिहायला घ्या. पैशाच्या गुंतवणुकी, मालमत्ता, महत्त्वाच्या मोठ्या वस्तू यांची न्याय्य वाटणी होऊ शकेल अशा पद्धतीनी मुलांची नावं वाढवा. कोणा व्यक्तीची माफी मागायची राहिली असेल

तर त्या व्यक्तीशी बोलून माफी मागा. काही कौटुंबिक सामाजिक भांडणं असतील ती मिटवण्याच्या मागे लागा.'

सहस्त्रचंद्रदर्शनाच्या वेळच्या मंत्रात मुख्य संदेश एकच हवा. 'इच्छामरण -पत्रात लिहिलेल्या मजकुराप्रमाणे खरोखर मृत्यू येईल याची व्यवस्था करा. स्वतःच्या मृत्यूमुळे इतरांना कमीतकमी त्रास होईल अशा योजना आखा आणि त्या जवळच्या लोकांशी बोलून मग या पृथ्वीचा भार हलका करा.'

मी सतत आधुनिकतेची कास धरून प्रत्येक गोष्ट करण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे आमच्या घरात काय काय घडलं ते सांगतो.

माझ्या वडलांना 75 वर्षं झाली तेव्हा आम्हा तीन भावंडांनी आणि आमच्या मुलांनी काहीतरी अर्थपूर्ण करूया असं ठरवलं. सगळ्यांचं त्यात एकमत झालं. आम्ही माझ्या वडलांची त्यांच्या संपूर्ण आयुष्याविषयी मुलाखत घेतली. आईनी पण त्यात भाग घेतला.

माझ्या आईला 75 वर्षं पुरी झाली तेव्हा मी तिला सांगितलं की, मी जीवनसाथची मुंबई शाखा चालू करीन. सांगितल्यापासून महिन्याभरात मी जीवनसाथ (मुंबई) खरोखरच चालू केली. आई जीवनसाथचं काम हौसेनी करायची. कागदपत्रं जपून ठेवायची. मुलं-मुली आजी आजी म्हणून तिच्याशी प्रेमानी बोलायची. तिला या सगळ्यातून खूप आनंद मिळाला. आई असेपर्यंत आणि त्यानंतरही तीन-चार वर्षं मुंबई जीवनसाथ चालू होतं. साधारण 10 वर्षानंतर ते बंद पडलं.

एकदा विवेकनिष्ठ विचार स्पष्टपणी मांडायचा ठरवला की त्याचा पुढचा भाग मला सांगणं भाग आहे. एखाद्या साध्या माणसाची जयंती काय, थोर पुरुषाची असली काय, जयंती म्हणजे जन्मदिवस साजरा करणंच असतं. पुण्यतिथीही त्याच गटात मोडते. मी माझ्यापुरता विचार करून या सगळ्यांमधून बाहेर पडायचा निर्णय घेतला. त्यामागची मुख्य कल्पना आधी मांडलेली असली तरी पुन्हा बोलून दाखवतो.

कुठच्याही प्रेमाच्या, आदराच्या व्यक्तीसाठी जे काही करावंसं वाटेल ते जरूर करावं, पण त्या व्यक्तीच्या हयातीत करावं, मृत्यूनंतर नाही. आत्ता मी जो माझ्या वडलांच्या पंचहत्तराव्या वाढदिवसाचा मुलाखतीच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला त्याबद्दलचा पुढचा विचार सांगतो. जीवनसाथतर्फे मुलाखतीचा पद्धतशीर साचा तयार केला आहे. आत्तापर्यंत अनेकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. एखाद्या

जोडप्याची, व्यक्तीची मुलाखत घेऊन वाढदिवस साजरा करण्याची कल्पना समजा कोणाला पटली तर जीवनसाथतर्फे मुलाखतीची सगळी व्यवस्था आम्ही करू. अशा व्यक्तीला 50 वर्षं झालेली असोत 60 असोत किंवा 75 असोत. सांगण्याजोगं त्या प्रत्येकाला खूप असतं. पुण्यात असा कार्यक्रम असला तर जास्त सोपं असेल, बाहेरगावी असला तरी ती गोष्ट अशक्य नाही. त्याबद्दल विचार, चर्चा करून तेही जमेल. काहीतरी मार्ग काढता येईल.

व्यक्तीचा, जोडप्याचा तसाच संस्थेचाही जन्मदिवस असतो. गरजू, अनाथ, इतर पीडित यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थांसाठी देणग्या गोळा करण्यासाठी संस्थेचा वाढदिवस सर्वांत योग्य दिवस असू शकतो. अशा वेळी संस्थेचा वाढदिवस या कल्पनेत कधी कधी तथ्य असू शकतं. मगाशी उल्लेख केला तसे सामूहिक वाढदिवस साजरे करण्याचेही शाळेत प्रयोग होतायत्. म्हणजे त्या महिन्यातल्या मुलांचे वाढदिवस एकत्र साजरे करायचे. खऱ्या आधुनिक संस्कारांचा शोध घेण्याच्या प्रवासातलं एक पाऊल पुढे म्हणून ते ठीक आहे. काही शाळा गरजू मुलांना मुद्दाम बोलावून त्यांच्याबरोबर शाळेत वाढदिवस साजरे करतात. पण वाढदिवस प्रकरणाला पूर्ण फाटा देणं ही एकच पद्धत मला योग्य वाटते. गरजूंसाठी काय करायचं ते इतर पद्धतींनी जरूर करावं.

काही खूप मोठ्या संस्था आहेत. त्या संबंधित, ओळखीच्या आहेत त्यामुळे दरवर्षी बोलावणं येतं. इतर ओळखीच्या अनेकांना अशी आमंत्रणं येतात. ओळखी वाढतात म्हणून लोक ही निमंत्रणं स्वीकारून जातात असं कळलं. एकदा मी आणि शोभा गेलो. तिथलं दृश्य बघून हबकलोच. तो कार्यक्रम म्हणजे खेचाखेच गर्दी होती. त्या गर्दीतून वाट काढत पलीकडच्या टोकाला उभ्या असलेल्या ओळखीच्या व्यक्तीला भेटावं असा विचार करून तिथे पोचायला 10 ते 15 मिनिटं लागत होती. अशा गर्दीची आम्हा दोघांना थेट ॲलर्जी म्हणजे तीव्र नावड आहे. त्या गर्दीतून बाहेर पडून रस्त्यावर पोचायला पुढची 15 मिनिटं लागली. त्यानंतर आम्ही दोघंही पुन्हा कधी त्या कार्यक्रमाला गेलो नाही.

वाईट गोष्ट अशी आहे की, विवेकनिष्ठ विचारसरणीच्या प्रवासाला निघालेल्या लोकांमधे सुद्धा प्रवासाचे अनेक थांबे आहेत. अजून काहींना वाटतं की, 'लोकशाही उत्सव' साजरा केला की लोकांना लोकशाही कळेल. काहींना स्वातंत्र्यदिन साजरा करणं अजून महत्त्वाचं वाटतं. प्रत्यक्षात काही स्वातंत्र्यगीतं लोकांना ऐकायला मिळतात यापलीकडे काही साध्य होत नाही. आठ मार्चला

स्त्रीमुक्ती दिन साजरा करणं आणि त्यामुळे स्त्री-पुरुष समानता लोकांना कळेल अशी इच्छा करणं हा इनोसंट विचार आहे. प्रत्यक्षात त्यामुळे काहीही होणार नाही. हे कार्यक्रम करणारे लोक सुशिक्षित, सुसंस्कृत, सामाजिक कामं करणारे असतात. चार चांगले विचार मोजक्या लोकांच्या कानावर पडतात हे मात्र होतं.

खरं कारण असं आहे की, जनता विचार करायला अजिबात तयार नाही. त्यांना सण-समारंभ, उत्सव यांतून डोकं वर काढायला उसंत नाही. ते विचार न करण्यात मग्न आहेत. माझ्या मते, व्यक्तिगत वादात काही साध्य होत नाही. त्यानी लोकांचा अपमान होतो. खऱ्याच्या फार जवळ गेलं की ते अस्वस्थ होतात. व्यक्तिशः या तमाम गोष्टींना नकार देणं एवढंच आपल्याला शक्य आहे. मी स्वतः अशा तमाम गोष्टींना नम्रपणी नकार देतो. आसपासच्या सगळ्या जनतेचा मला राग येत नाही, पण वाईट वाटतं. वाढदिवसाला खरा आधुनिक योग्य मार्ग शोधत राहणं हेच आपल्या हातात आहे. सगळ्यांशी सरळ वागणं, कोणाचाही अपमान न करणं, पैशाचा प्रत्येक व्यवहार चोख करणं म्हणजे तो दिवस साजरा करणंच झालं. कारण त्यामुळे प्रत्येक दिवस छान जाणार. या पद्धतीनी रोज वाढदिवस साजरा करावा अशी शिफारस आहे.

●●●

साठी म्हणजे 'यापुढे मोह टाळा, अपेक्षा करू नका, मृत्युपत्र केलं नसलं तर ते ताबडतोब करा. इच्छामरण पत्राचा कच्चा मजकूर लगेच लिहायला घ्या. पैशाच्या गुंतवणुकी, मालमत्ता, महत्त्वाच्या मोठ्या वस्तू यांची न्याय्य वाटणी होऊ शकेल अशा पद्धतीनी मुलांची नावं वाढवा. कोणा व्यक्तीची माफी मागायची राहिली असेल तर त्या व्यक्तीशी बोलून माफी मागा. काही कौटुंबिक सामाजिक भांडणं असतील ती मिटवण्याच्या मागे लागा.' सहस्रचंद्रदर्शनाच्या वेळच्या मंत्रात मुख्य संदेश एकच हवा. 'इच्छामरण -पत्रात लिहिलेल्या मजकुराप्रमाणे खरोखर मृत्यू येईल याची व्यवस्था करा. स्वतःच्या मृत्यूमुळे इतरांना कमीतकमी त्रास होईल अशा योजना आखा आणि त्या जवळच्या लोकांशी बोलून मग या पृथ्वीचा भार हलका करा.'

3

लग्नसमारंभ

1) लेखामागची मूळ कल्पना

समारंभाच्या बाबतीतलं माझं वैयक्तिक मत माझ्या अनेक चर्चा, प्रश्नोत्तरं, सत्रांमधून, लिखाणातून एव्हाना पुष्कळांना माहीत असेल. वैवाहिक आयुष्य सुखाचं होण्यासाठी, समृद्धपणी आनंदात जगण्यासाठी आर्थिक मध्यमवर्गीय स्तर पुरेसा असतो. अशी मध्यम आर्थिक स्थिती आहे असं धरून चालून मी म्हणतो की, वैवाहिक सुखी आयुष्याचा आणि मोठ्या खर्चिक लग्न-समारंभाचा काही संबंध नसतो. किती माणसं जेवायला बोलावली याचा संबंध नसतो, कार्यालयाचा, भटजींनी म्हटलेल्या मंत्राचा, सनई-ताशाचा, मिरवणुकीच्या खर्चाच्या आकड्याचा नि आयुष्यातल्या सुखाचा काही संबंध नसतो. माझं वैयक्तिक मत पक्कं आहे की, नोंदणी-लग्न करावं आणि त्याच्या आसपास कसलाही समारंभसदृश कार्यक्रम ठरवू नये. अजिबात खर्च करू नये, एकही माणूस जेवायला बोलवू नये. अर्थातच कार्यालय, पत्रिका-छपाई, मानपान, खरेद्या या सगळ्यांना चाट ओघानीच आली. कसलाही धार्मिक, पारंपरिक कर्मकांड उरकण्याचा कार्यक्रम करू नये.

ही सगळी विधानं टोकाची वाटतील याची मला कल्पना आहे. पण माझ्या मते हे टोक नाही. यापेक्षा तीव्र म्हणजे काय ते जरा वेळानी सांगतो. वाचणाऱ्यांना अनेक शंका असतील, नवनवीन अडचणी सुचतील. आत्तापर्यंत इतर अनेक लग्न-समारंभांना आपण गेलेलो असल्यानी हा विचार पटला, तरी बहुतेकांना अंमलबजावणी अडचणीची वाटेल, कोणाला व्यावसायिक संबंध राखण्यासाठी,

वाढवण्यासाठी जेवणावळी आणि भपकेबाज समारंभ आवश्यक वाटेल.

माझी भूमिका स्पष्ट करण्यासाठी आनंद व्यक्त करण्याविषयी आपल्याच समाजातल्या पद्धतींचा गेल्या पंधरा-वीस वर्षांचा आढावा घेऊया. आनंदाचे घरातले प्रसंग म्हणजे वाढदिवस, मुंज, लग्न, बारसं अशांसारखे अनेक. त्याबद्दल विवेकवादानी विचार केला तर त्या प्रसंगांचा त्या कुटुंबाला आनंद होईल ह्याबद्दल आपल्याला शंका नाही. पण सगळ्या नातेवाईकांना आनंद होईलच ह्यावर माझा विश्वास नाही. खरं सांगायचं म्हणजे एखाद्या व्यक्तीचं काहीतरी चांगलं झालं तर अगदी जवळच्या निवडक लोकांना आनंद होईल हे खरं असेल, पण त्या वर्तुळापलीकडच्या लोकांना कदाचित त्या प्रसंगाबद्दल दुःखही होईल. मत्सर किंवा असूया वाटेल. हेवा वाटू शकेल.

अशा माणसांच्या दृष्टिकोनातून तो आनंदाचा प्रसंग रीत म्हणून साजरा करण्यात सहभागी व्हायचं आणि घरी येऊन त्या व्यक्तीच्या किंवा त्या कुटुंबाच्या कुचाळक्या करायच्या. विवेकवादी दृष्टिकोनाला असं निरर्थक, कृत्रिम आणि खोटं वागणं पसंत नाही. प्रत्यक्षात, गेल्या वीस वर्षांत असं खोटं वागण्याचं प्रमाण प्रचंड वाढलेलं आहे असंच दिसतं. आनंद व्यक्त करण्याची मूळ कल्पना आणि साजरा केलेला चंगळवादी समारंभ ह्याला काहीही धरबंध राहिलेला नाही.

तत्त्वज्ञान आणि वागणुकीचे उपचार याबद्दल जरा बोलूया. मूळ मुद्दा समजायला उपयोग होईल. भारतीय माणसं आणि पाश्चात्त्य माणसं यांच्यात मला काही फरक जाणवतात, त्यांपैकी एक म्हणजे भावना व्यक्त करण्यासाठी भारतीय माणसं योग्य शब्द वापरायला तयार नसतात. ते माफी मागू शकत नाहीत. आभार मानू शकत नाहीत. या उलट पाश्चात्त्य जाता-येता 'सॉरी-थँक्यू-प्लीज'चा वापर करतात. भारतीय माणसाच्या दृष्टिकोनातून आपुलकी दाखवण्याच्याही पद्धती निराळ्या असतात. ते आग्रहानी खाऊ घालतात. काही लोक पाश्चात्त्यांकडून शब्द वापरणं शिकले. शुभेच्छांचे उपचार शिकले. 'हॅपी होली, हॅपी दसरा, हॅपी दिवाळी' म्हणायला शिकले. एकमेकांना भेटवस्तू द्यायला शिकले. प्रत्यक्षात हवी असते ती आपुलकीची वागणूक. ती कशी ते लोकांना समजेनासं झालंय्. जीवनसाथमधे 'दुसऱ्यासाठी करणं' म्हणजे काय यावर बरीच चर्चा होते. दुसऱ्यासाठी बुद्धी, कष्ट, वेळ, पैसे हे सगळं खर्च करण्याची तयारी म्हणजेच दुसऱ्यासाठी करणं हे समजावून सांगावं लागतं. त्यांना फक्त भेटवस्तू समजते ही अडचण असते.

तत्त्वज्ञान आणि आनंद व्यक्त करणं यांचा संबंधही बघूया. स्वतःच्या आयुष्यात काहीतरी आनंदाचा प्रसंग आला की त्याबद्दलचा सर्वसाधारण विचार असा की, आनंद दुसऱ्यांबरोबर वाटला तर तो वाढतो. त्याचं प्रतीक म्हणून आपल्याकडे काही चांगलं झालं की पेढे वाटण्याची रीत बनली. तो पेढा आपल्यादेखत खाण्याची पुढे अट बनली. ती रीत आणि ती अट ह्याच्यात अहंभाव गुंतल्यामुळे 'मला मधुमेह आहे, मी पेढा खाऊ शकत नाही,' असं कोणी म्हटलं तर अपमान व्हायला लागला. मग मान राखण्यासाठी पेढ्याचा तुकडा तरी तोंडात टाकावा अशी रीत तयार झाली.

देवाचा म्हणून असलेल्या प्रसादाबद्दल अशाच टोकाची आग्रही रीत बनली. म्हणजे अगदी इतकं की, कुठच्याही कारणामुळे प्रसादाला कधी नाही म्हणायचं नाही, अशी कडक पद्धत बनली. एखाद्याला रव्याचा शिरा आवडत नसला तरी सत्यनारायणाचा प्रसाद खाल्लाच पाहिजे अशी कुटुंबातून आणि कुटुंबाबाहेरून जबरदस्ती व्हायला लागली. कुठल्याही रीतीबद्दलच्या कारणात शिरणाऱ्या माणसाची विक्षिप्त, नास्तिक, पाखंडी अशी हेटाळणी लोक करायला लागले. थोडक्यात विवेकवादी माणसाच्या विवेकाला मारून टाकण्याचा उद्योग चालू झाला.

आपुलकीच्या भावनेचं प्रतीक म्हणून प्रसंग साजरे करण्याची म्हणजेच समारंभ करण्याची रीत बनली. त्यामधे तत्त्वज्ञानातल्या मूळ कल्पनांचं विडंबनच जास्त झालं. खुद्द ग्रीसमधे म्हणजे जिथे या विषयाचा जन्म झाला, जिथे प्रतीक या कल्पनेचा जन्म झाला तिथे अशा गोष्टींना विरोध करणारेही खूप होते. प्रतीकाची अतिशयोक्ती होऊन त्याचं अवडंबर झालं, मोठमोठे दिखाऊ कार्यक्रम योजले गेले, त्याला विरोध करणारी मंडळी तेव्हाही होती.

तेव्हा त्याला विवेकनिष्ठ विचारसरणी असं नाव नसलं तरी मुद्दा तोच होता. अगदी ऑलिंपिक मशाल घेऊन ती लांबपर्यंत धावत घेऊन जाणं यालाही काहींचा विरोध होता. अजूनही, एवढ्या हजारो वर्षांमधे पद्धती पाळत बसण्यात कर्मठ लोकांचाच भरणा जास्त होता. अगदी सध्याच्या काळात दिखाऊ समारंभाच्याच बाजूचे बहुतांश लोक असतात, यात काही आश्चर्य नाही. मला स्वतःला असे कुठचेही दिखाऊ समारंभ पसंत नाहीत. पण 'मी त्यात सामील नाही' म्हणण्यापलीकडे खरंच मी काही करू शकत नाही.

काही लोकांचा आयुष्यातला सबंध दृष्टिकोन समाजप्रबोधनाचा असतो.

योग्य म्हणजे काय, त्यात लग्नसमारंभाच्या बाबतीत योग्य, अयोग्य ही गोष्ट लोकांना शिकवण्याजोगी आहे यात शंकाच नाही. प्रत्येक जण स्वतःला जे योग्य वाटेल ते इतरांना सांगण्याचा प्रयत्न करणार. मी स्वतःही आत्ता तेच करतोय की! लग्नसमारंभ कसा असावा, कसा नसावा हे सांगण्यासाठी काही वृत्तपत्रं, मासिकं, टी.व्ही., सिनेमा यांपैकी काहीतरी वापरतात. प्रत्येक प्रबोधकावर स्वतः तसं वागण्याची जबाबदारी असते आणि तिथेही योग्य-अयोग्य हा प्रश्न येतोच. योग्य प्रकार म्हणजे काय हे लोकांना दाखवण्यासाठी खूप लोकांना एकत्र बोलावून त्याला समारंभ किंवा उत्सवाचं स्वरूप दिलं तर लोकांना काय संदेश पोचेल? 'समारंभ करावा, पण तो या निराळ्या पद्धतीनी करावा.' मी स्वतः जे योग्य समजतो आणि ज्याचं प्रबोधन करतो त्यातला संदेश 'समारंभच करू नये' असा असल्यामुळे ह्या प्रबोधनाच्याच दोन निराळ्या वाटा समजायला हव्यात.

समारंभात सामील होऊन लोकांना समारंभ टाळावेत हे सांगणं म्हणजे मला दारुबाजांच्या बैठकीत दारूचे घोट घेत बसून दारू कशी वाईट असते हे त्यांना समजावून सांगण्याजोगं वाटतं. मला त्यातली मुख्य अडचण त्याचा परिणाम होण्याबद्दल वाटते. मला या प्रकारची अनेक उदाहरणं माहीत आहेत. स्वतःच्या वैवाहिक आयुष्यात अस्वस्थ असलेल्या व्यक्तींनी वैवाहिक समुपदेशकाचं काम करायला हरकत नाही, पण एक तर ते त्या अवस्थेतून बाहेर आल्यावर किंवा त्या अवस्थेत 'मी ही चूक केली, तुम्ही करू नका', सांगण्यासाठी. स्त्री-पुरुष समानतेची चळवळ चालवणाऱ्यांनी केवळ स्त्रियांचा हळदीकुंकू समारंभ केला तर परिणाम होणार नाही हा मुख्य मुद्दा आहे. मी स्वतः सरळसरळ 'ओव्हरवेट' आहे. मी वजन कमी करून दाखवलं आणि मग 'वजन कसं घटवावं' यावर प्रबोधन केलं तरच त्याचा परिणाम होईल. सध्याच्या परिस्थितीत मी वजन कमी करण्याविषयी प्रबोधन केलं तर उलट्या परिणामाचीच शक्यता जास्त आहे.

हे सगळं सांगतानाचा एक मुख्य गोष्ट जाणवते. विवेकवादी लोकांची एकजूट नसते हा तर जगापुढचा अनंत काळापासूनचा प्रश्न आहे.

●

2) जोडीदाराच्या शोधासाठी, हौसेसाठी

'लग्नात लग्नं जमतात' हे मी अनेक वर्षांपासून ऐकलेलं आहे. काही अंशी ते खरं आहे. या कल्पनेमुळे मुली नटून लग्नसमारंभात अवश्य हजेरी लावतात आणि मिरवतात. काही मुलगे चक्क मुली बघायला येतात. लग्नसमारंभात लग्नं जमतात असा त्यांना विश्वास वाटतो. काही तरुण मुलगे नटलेल्या मुली बघण्याच्या दृष्टीसुखासाठी येतात.

दागिन्यांतला फोलपणा हा एक स्वतंत्र वादाचा विषय आहे. जी ती व्यक्ती नशिबानी चांगला-मध्यम-वाईट चेहरा, रंग आणि शरीरयष्टी घेऊन जन्मलेली असते. कितीही दागिने घातले तरी त्या रूपात खरं म्हणजे काही फरक पडत नाही. माणसानी नीटनेटकं आणि स्वच्छ जरूर राहावं, पण दागिने ही कल्पना परंपरेनी धनसंचयासाठी शोधली आणि पुढे ती त्याचा धंदा करणाऱ्यांनी लोकांवर लादली. शिवाय चोरीच्या भीतीनी ते दागिने निश्चिंतपणे अंगावर घालताही येत नाहीत. बँकेचा लॉकर आतल्या बाजूनी त्या दागिन्यांमुळे सुशोभित होतो हे मात्र मान्य.

दागिने, विशेषतः सोन्याचे दागिने हे एक स्वतंत्र गंभीर प्रकरण आहे. गेली अनेक वर्षं गळ्यातली साखळी हिसकावून चोरून नेण्याचे प्रकार खूप वाढलेत आणि तरी सोन्याच्या दागिन्यांचा सोस काही कमी होत नाही. मंगळसूत्र या गोष्टीला असलेलं परंपरेचं महत्त्व आपल्याला माहीत आहे. पण इतर दागिन्यांचं काय? यातलं साधं तत्त्व असं आहे, 'जास्त किमतीची कमी आकार-वजनाची वस्तू अंगावर घातली की त्या शरीराच्या अवयवाला चोरांपासून धोका आहे.' कानात डूल असले तर कानाला धोका, बोटात अंगठी असेल तर बोटाला धोका आहे. हे कसं समजत नाही? हिऱ्याची किंमत जास्त आणि आकार कमी म्हणजे सर्वांत जास्त धोका.

सोन्याच्या वापराच्या बाबतीतलं तत्त्व आणखीनच निराळं आहे. 'भारत देश श्रीमंत आहे आणि त्यात गरीब लोक राहतात.' हे प्रसिद्ध वाक्य तुम्हाला महिती असेल. देशाच्या सोन्याच्या साठ्यावर जागतिक बाजारात रुपयाची किंमत अवलंबून आहे हे कदाचित बऱ्याच लोकांना माहिती नसेल. त्यामुळे त्यातलं साधं

तत्त्व असं आहे, 'वैयक्तिक वापरासाठी सोन्याचा उपयोग करणं हा राष्ट्रद्रोह आहे.'

असं आहे तर मग अडलंय कुठे? त्यात एकच अडचण आहे, भारतीय जनतेचा खऱ्या अस्सल विचारालाच विरोध आहे. विवाह-अभ्यास, आयुष्य-अभ्यास यांची परिस्थिती निराळी कशी असेल?

●

'जास्त किमतीची कमी आकार-वजनाची वस्तू अंगावर घातली की त्या शरीराच्या अवयवाला चोरांपासून धोका आहे.' कानात डूल असले तर कानाला धोका, बोटात अंगठी असेल तर बोटाला धोका आहे.

3) लग्नसमारंभाच्या आधीची तयारी

माझ्यासारख्या विवेकनिष्ठ विचारसरणीच्या माणसाला लग्नसमारंभापूर्वीची तयारी म्हटल्यासरशी मनात येतं ते विवाहपूर्व समुपदेशन. त्यामधे लग्नाचा अर्थ समजणं, लग्न झाल्यासरशी सुरू होणाऱ्या कायदेशीर बंधनांचा अर्थ समजणं, लैंगिक संबंधांविषयी नीट माहिती असणं हे असतं. वैद्यकीय तपासणीचं महत्त्व पटवणं असतं. प्रत्यक्षात लोक तयारी म्हणजे निराळंच काय काय करतात. कार्यालय, जेवणाची व्यवस्था, पाहुणे, निमंत्रण पत्रिका, पैशाची व्यवस्था म्हणजे लोकांच्या दृष्टीनी तयारी असते.

लग्न ठरलं की केळवणं सुरू होतात. त्यात खूप वेळ जातो. आग्रहाची जेवणं झाली, पोटं बिघडली की आणखी वेळ वाया जातो. खरं म्हणजे केळवणांच्यात वेळ घालवण्यापेक्षा एकमेकांच्या स्वभावांचा अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. पण कोणीच भानावर नसतं. लग्नसमारंभाची नशाच इतकी जबरदस्त असते.

जीवनसाथमधे फक्त मुलींच्याबरोबरही कधीकधी बैठक ठरते. त्यांच्या समोर लग्न ठरणं, समारंभाविषयीचे निर्णय याबद्दल सविस्तर चर्चा होतात. या मुली अगदी सध्याचे प्रश्न मांडतायत् ते सांगतो. मुख्य म्हणजे लग्नाचा सगळा खर्च मुलीकडच्यांनी करायचा या विचारातून अजून समाज बाहेर आलेला नाही. ह्या सगळ्या गोष्टी ज्या बैठकीत ठरतात त्यात लग्नाची मुलगी आणि मुलगा यांना प्रवेशच नसतो. मध्यस्थ असतात, ते मुलीकडच्यांना जास्तीजास्त खर्चात कसं पाडायचं यातले तज्ञ असतात. खरं म्हणजे शिकलेल्या आधुनिक मुलींनी याला विरोध करायला हवा. पहिली गोष्ट अशी सांगायची की, काय ठरवायचं ते मुलगा-मुलगी यांच्या देखत ठरवा. ज्या अर्थी त्यांना मोठी माणसं टाळतात त्या अर्थी त्यांच्यापासून लपवण्याजोगं आणि लाज वाटण्याजोगं काहीतरी बोलणं होत असणार. मुलाकडच्यांना आणि मध्यस्थाला मनातून माहिती असतं की, हे सगळं नैतिकतेत बसत नाही. दुसरं काय?

मी आणि शोभा गेली पंचवीस वर्षं लैंगिक शिक्षण देण्याच्या क्षेत्रात आहोत. या विषयातलं अज्ञान आपल्याला थक्क करणारं असतं. या पुस्तकसंचात

‘लैंगिक शिक्षण’ हे स्वतंत्र प्रकरणच असल्यामुळे इथे आणखी फार काही सांगत नाही, पण एक नक्की. लग्न करणाऱ्या मुलाला-मुलीला वागणुकीविषयी चार गोष्टी सांगायला लग्नानंतरही अवधी असतो. लैंगिक संबंधांविषयी माहिती आणि वैद्यकीय तपासणी या गोष्टींना मात्र पर्यायच नसतो. त्याविषयी लग्नाआधीच बोलावं लागतं.

●

4) लग्नसमारंभामागची व्यावहारिक कारणं

माझ्या अभ्यासातलं माझं निरीक्षण सांगतं की, लग्नसमारंभातले यजमान आणि पाहुणे या दोघांच्याही डोक्यात चक्क व्यवहारच असतो. म्हणजे मला काय म्हणायचं आहे ते समजावून सांगतो. तरुणपणी लग्नाच्या वयात बरेच मित्र आणि मैत्रिणी असतात. काही नेहमी भेटणारे, काही मधून मधून भेटणारे. काही लांब असल्यामुळे क्वचित भेटणारे. लग्नाच्या निमित्तानी ते पुन्हा भेटू शकतात. याचा परिणाम म्हणजे बोलावण्याच्या मित्रमंडळींची खूप मोठी यादी तयार होते. घरातला प्रत्येकच माणूस आपापली यादी तयार करतो. सगळी मिळून खूप मोठी यादी बनते. त्या सगळ्यांना बोलावण्यात आपुलकी, मैत्री याखेरीज बरेच मतलब असतात.

लग्नसमारंभाच्या बाजूनी बोलणारे म्हणतात की, त्या निमित्तानी लोकांच्या भेटी-गाठी होतात. एरवी मुद्दामून एकमेकांना भेटणं होत नाही. इच्छा असते पण वेळेमुळे जमत नाही. या मुद्द्यात थोडंसं तथ्य आहे, पण थोडंसंच. कारण अशा कार्यक्रमात लोकांचं होतं ते नुसतं दर्शन, भेट नाही. मला स्वतःला असं वाटतं की, एवढ्या मोठ्या संख्येची गाठभेट होत राहावी अशी आपली गरजच नसते. असतात ती थोडीशी निवडक नाती आपल्याला सांभाळता येत नाहीत तर एवढ्या लोकांच्या भेटीगाठींचा काय उपयोग?

जे खरे जवळचे मित्र आहेत त्यांना लग्नसमारंभासाठी जेवायला बोलावलं काय नि बोलावलं नाही काय, काही फरकच पडत नाही. जे लोक जवळचे मित्र नाहीत ते या जेवणाच्या बोलावण्यामुळे मित्र वगैरे काही होणार नाहीत. लोक या एका गोष्टीला उगीच घाबरतात असं मला वाटतं.

मग लोक पुढे म्हणतात की जनसंपर्क हवा, त्यांच्याशी संपर्क ठेवणं, वाढवणं हे प्रत्येकाचं कर्तव्यच आहे, कारण ती कुटुंबाची गरज आहे. याचं खरं उत्तर म्हणजे लोकसंपर्कासाठी सामाजिक काम करावं. या पुस्तकसंचात 'समाजकार्याच्या दिशा' या लेखात सर्वसामान्यांना सुद्धा करता येतील अशी बरीच कामं सुचवली आहेत ती जरूर वाचावीत.

अमेरिकेतून कायम वास्तव्यासाठी मी भारतात परत आलो आणि व्यवसाय करायला लागलो तेव्हा काही मित्र, नातेवाईक यांना मी माझे विचार बोलून

दाखवले. निरीश्वरवादी, कर्मकांडविरोधी, समारंभविरोधी विचार, 'बोले तैसा चाले'चा माझा आग्रह आणि व्यवसाय यांचं एकत्र कसं जमणार असं काहींनी काळजीनी विचारलं. त्यांची शंका बरोबर होती. ही सगळी तत्त्वं सांभाळून व्यवसाय करणं मला कठीण गेलंच. पण माझ्या मेहनती स्वभावामुळे मी कामं मिळवू शकलो. खरं वागून, बोलूनही माणसं जोडू शकलो. शेवटी मध्यमवर्गीय आयुष्य खुषीनी मान्य असल्यामुळे तर मी आणि शोभानी भारतात यायचं ठरवलं होतं ना! माझ्या धंद्यात चढउतार आले पण शोभाची नोकरी नियमित होती.

वैयक्तिक वाद घालायचा नसल्यामुळे चर्चेच्या पातळीवर एवढं समारंभपूर्वक लग्न का करावंसं वाटतं, याची चौकशी करत असताना एक महत्त्वाचं कारण समोर येतं. अनेकांची ऋणं फेडायची असतात. धंद्यातल्या लोकांना आपली जाहिरात करण्याची संधी साधायची असते. शिवाय धंद्यातल्या लोकांचे संबंध राखायचे असतात. त्यांच्या पार्ट्यांना पूर्वी गेल्यामुळे त्यांना बोलावण्याचं बंधन असतं. हजर राहाणारे लोकही अनेक उद्देशांनी येतात. वाईट दिसतं म्हणून, बोलावणाऱ्याचं मन दुखवायला नको म्हणून. काही लोक फुकटच्या करमणुकीसाठी देखील येतात.

लग्नात भरपूर खर्च केला हे लोकांना दिसलं पाहिजे ही यजमानाची गरज असते. 'मी यशस्वी आहे, माझ्याकडे सुबत्ता आली, मला एवढा खर्च करता येतो, परवडतो.' हे लोकांना जाहीर करण्याचा हा मार्ग आहे. ही गोष्ट तोंडानी बोलणं आत्मप्रौढीचं वाटतं, वाईट दिसतं पण या पद्धतीनी ती व्यक्त करून लोक स्वतः खूष होतात. अगदी जेमतेम परिस्थिती असलेला एकजण एकदा मुलीच्या लग्नसमारंभाची निमंत्रणपत्रिका घेऊन आला. मी लग्नसमारंभांना जात नाही हे त्याला पूर्वीपासून माहिती होतं. मग तो का आला असावा, हा विचार करताना मला एकच शक्यता दिसली. 'एवढा खर्च करण्याची आता माझी आर्थिक परिस्थिती आहे.' हे त्याला माझ्यापर्यंत पोचवायचं होतं.

लग्नसमारंभ दणक्यात करून लोकांना बोलावणाऱ्यांचा आणि त्याला हौसेनी हजर राहाणाऱ्यांचा उद्देश काही असला तरी शेवटी अवास्तव खर्च तर होतोच ना! खूप काळा पैसा ज्यांच्याकडे असतो त्यांना मात्र हा खर्च झाल्याचा खूप आनंद होतो. मात्र मध्यममध्यमवर्गीय कुटुंबाला असं लग्न जड जाऊ शकतं. अंदाज केल्यापेक्षा खर्च ताकदीपलीकडे जातो आणि सगळं प्रकरण झेपेनासं होतं.

●

5) भेटवस्तू प्रकरण

'आहेर' नावाचं एक भूत लग्नसमारंभाचा आनंद ढवळून काढतं. आहेर देणाऱ्याच्या दृष्टीनी तो तोट्याचा व्यवहार असतो. जाण्यायेण्याचा खर्च, दगदग, आणि वर पाकिटात घालून रोख नोटा द्यायच्या. याला पर्याय म्हणजे हिंडून दुकानातून काहीतरी योग्य वस्तू शोधणं. त्या पर्यायापेक्षा पैसे गेलेले बरे. एक आयतं जेवण ही फक्त कमाई. एकूण होणारा खर्च जास्त आणि कमाई कमी असा घाट्याचा व्यवहार असतो तो. 'अशा गोष्टींमधे पैशाच्या विचाराला स्थान नसतं,' असं काही लोक सांगतात. पण खरोखर होणाऱ्या पैशाच्या खर्चाला काही महत्त्व नाही अशी जवळची लोकं सबंध आयुष्यात हाताच्या बोटावर मोजण्याजोगीच भेटतात. कनिष्ठ मध्यमवर्ग, आणि मध्यम मध्यमवर्ग आहेर आणि लग्नाच्या सीझनमधे त्यापायी होणारा खर्च याला चक्क घाबरतो.

आहेर प्रकरणाची एकूण परिस्थिती अशी असते की, देणाऱ्याच्या स्वतःच्या आनंदासाठी त्याला काहीतरी वस्तू द्यायची असते. घेणाऱ्याला ती सोयीची नसली तरी घ्यावीच लागते.

मी स्वतःच्या वस्तू स्वतः खरीदण्याचं तत्त्व पाळतो. मी कोणाकडून काही भेटवस्तू स्वीकारत नाही. सुखवस्तू लोकांनी दुसऱ्या सुखवस्तू कुटुंबातल्या माणसाला काहीतरी भेटवस्तू देणं हे मला पटत नाही. आहेर, प्रेझेंट, गिफ्ट, रिटर्नगिफ्ट हे सगळे रीतिरिवाज मला निरर्थक वाटतात. भेट दिलेली वस्तू दुसऱ्याला पसंत न पडण्याची शक्यता असते.

वस्तू देण्याघेण्यामागचं आणखी एक महत्त्वाचं मला पटलेलं तत्त्व सांगतो. जे आपल्याकडे मुबलक आणि दुसऱ्याला देण्याइतकं पिकतं ते द्यावं. मी आणि शोभा मध्यमवर्गीय असल्यामुळे आमच्याकडे मुबलक पैसे नाहीत तर ते देण्याच्या आम्ही भानगडीत पडू नये. फळबागांचा मालक असेल तर त्यानी स्वतःच्या बागेतली फळं देण्यातच औचित्य आहे. आमच्याकडे ज्ञान आहे त्यामुळे आम्ही पालक विद्यापीठ आणि जीवनसाथमधून ज्ञान देतो. माझ्या मते ज्ञानदान हे सर्वांत मौल्यवान आहे.

एखाद्याला भेटवस्तू मिळाली तर त्याच्याकडे घरात ती ठेवायला धड

जागाही कधीकधी नसते. 'वस्तू महत्त्वाची नाही, त्यामागची भावना महत्त्वाची असते', हा प्रतिवादाचा मुद्दा मला समजतो, पण मग मी ती वस्तू काही महिन्यांतच धूळ खात पडल्याची उदाहरणंही दाखवू शकतो. ती वस्तू तिसऱ्याच कोणाला तरी देऊन टाकून त्यापासून सुटका करून घेतल्याचीही उदाहरणं खूप आहेत. हे सगळं बघितल्यावर माझा निर्णय पक्का होत गेला, कारण यामधे फायदा फक्त दुकानदारांचाच होतो. आता यामधे मी अपवाद कुठल्या बाबतीत करतो ते सांगतो. लहान मुलांनी हातानी बनवलेली वस्तू मला चालते आणि आधुनिक काळातली 'उष्टी बोरं' म्हणजे अगदी गरीब माणसांनी स्वतः पिकवलेली फळं, भाजी यांचा मी अपवाद म्हणून स्वीकार करतो.

त्या तर्ककृतीचं पुढचं टोक म्हणजे कोणाकडून काही भेट न घेणं नि कोणाला काही भेट न देणं. याविषयी आपण पुढे सविस्तर बोलणार आहोत. त्यामुळे आत्ता एवढंच सांगतो की, हे ज्याला जमेल त्याला खरं समाधान मिळेल. आमच्या ओळखीत दोघी-तिघी श्रीमंत बायका आहेत. त्या सारख्या इतरांना भारी भारी वस्तू देत असतात. त्यांतले काही लोक परिस्थितीनी बेताचे असतात. अशांना त्या तोलाच्या वस्तू घेण्याचं फार ओझं वाटतं. आमच्या ओळखीच्या आणखी एक श्रीमंत बाई आहेत. त्या शोभाला सारखी काहीतरी खायची वस्तू देत असतात आणि शोभा संकोची असल्यामुळे त्या वस्तू घेत असते. मग शोभा पण त्यांना काहीतरी देते. त्यांच्या आपुलकीबद्दल प्रश्नच नाही, पण मला ही दोन सुखवस्तू लोकांची देवाणघेवाण थांबवणं फार कठीण दिसतं बाबा!

सुखवस्तू घरातल्या आणखी दोन बायकांची एक गंमत सांगतो, एकीनी दुसरीला साडी द्यायची. अर्थात किमतीचं लेबल काढून टाकून. मग दुसरीनी खूप परिश्रम करून रिक्षावर खर्च करून, वेळ घालवून तिची किंमत शोधून काढायची. त्या किमतीपेक्षा थोड्या जास्त किमतीची साडी पहिलीला द्यायची. त्यावर पहिलीनी याच पद्धतीनी दुसरीला साडी द्यायची. असं अखंड चालू असायचं. शेवटी एकदा एक नवरा म्हणाला, 'साड्या देण्यापेक्षा तुम्ही नुसते आकडे कळवा. त्याला आमची काहीच हरकत नाही.'

लग्नसमारंभात आहेर घेणारा निराळ्याच विनोदी परिस्थितीत सापडतो. पत्रिकेवर 'कृपया आहेर आणू नये' किंवा 'तुमच्या शुभेच्छा हाच आहेर' असं जवळजवळ सगळ्या लग्नपत्रिकांवर छापतात पण त्याकडे लग्नाला येणारा पाहुणाही दुर्लक्ष करतो आणि यजमानाला 'अपवाद' म्हणत म्हणत सगळे आहेर

स्वीकारावे लागतात. आहेर प्रकरण टाळायचं असेल तर लग्नसमारंभ टाळणं हा एकच इलाज आहे.

लग्नसमारंभातल्या 'आहेर' प्रकरणात आणखी एक मोठं प्रकरण गुंतलेलं असतं. एरवी लाच देताना-घेताना माणसाला खूप काळजी घ्यावी लागते. पण लग्नसमारंभात शेकडो लोकांच्या देखत लाचेचं पाकीट राजरोसपणे देता येतं.

मगाशी मी म्हणालो की मला भेटवस्तू देणं-घेणं निरर्थक वाटतं, त्यात थोडी दुरुस्ती करायची आहे. अधिक विचार करून मला ते निरर्थकच नाही तर अन्यायकारक, हानिकारक वाटतं. समाजातल्या 'नाही रे' विषयी काही संवेदना नसल्याचं लक्षण वाटतं.

●

जे आपल्याकडे मुबलक आणि दुसऱ्याला देण्याइतकं पिकतं ते द्यावं. मी आणि शोभा मध्यमवर्गीय असल्यामुळे आमच्याकडे मुबलक पैसे नाहीत तर ते देण्याच्या आम्ही भानगडीत पडू नये. फळबागांचा मालक असेल तर त्यानी स्वतःच्या बागेतली फळं देण्यातच औचित्य आहे. आमच्याकडे ज्ञान आहे त्यामुळे आम्ही पालक विद्यापीठ आणि जीवनसाथमधून ज्ञान देतो. माझ्या मते ज्ञानदान हे सर्वांत मौल्यवान आहे.

6) परंपरांचा पगडा - मुहूर्त, विधी वगैरे

एरवी बऱ्यापैकी आधुनिक वाटणारा माणूस घरात 'लग्न' हा विषय निघाला की कुठचं रूप दाखवेल काही सांगता येत नाही. माझ्या दृष्टीनी लग्नसमारंभाच्या नशेचा तो अंमल असतो. असा माणूस नॉर्मल राहातच नाही.

बहुतेक घरांमधले ज्येष्ठ परंपरांचा आग्रह धरणारे असतात. वडीलधाऱ्यांच्या आग्रहामुळे आणि त्यांना न दुखावण्याच्या कल्पनेमुळे मोठा समारंभ करावासा वाटतो किंवा करावा लागतो. वडीलधाऱ्यांना दुखवून चालत नाही त्याचा सगळ्यांना सर्वांत जास्त ताण असतो. असा ताण येतो याचा अर्थ वडीलधाऱ्यांच्या वागणुकीत काहीतरी चूक असणार असाच होतो.

प्रत्यक्षात या सगळ्याबद्दल चर्चा लग्नाआधी व्हायला हव्यात. बऱ्याच आधीपासून कुटुंबचर्चा व्हायला हव्यात. अनेक वेळा अनेक ठिकाणी हा विषय निघतो, पण शांतपणी, मुद्देसूदपणी आपलं म्हणणं कुटुंबातल्या लोकांशी बोलण्याची कला अंगी नसल्यामुळे लोक कुटुंबचर्चा टाळतात. 'वेळ कुठे असतो आम्हाला?' असं म्हणून वेळ मारून नेतात आणि पळ काढतात.

मगाशी आपण म्हणालो त्याप्रमाणे एरवीच्या वागण्यात आधुनिक म्हणून वावरणारं जोडपं आणि लग्नाचे मुलगा-मुलगी लग्नसमारंभ घरात ठरल्यावर एकदम दोन पिढ्यांपूर्वीचा विचार करायला लागतात. काल डिस्कोथेकला जाऊन आलेली मुलं, त्यांचे आईवडील अकस्मात 'हुंडा, मानपान, देणंघेणं, जेवणावळी, रुखवत, वरात, कारल्याचा वेल, चांदीच्या लवंगा' असला विचार करायला लागतात. हा नशेचा अंमल नाहीतर काय आहे?

माझ्या दृष्टिकोनातून हे सगळं बदलायला हवं, पण प्रवाहाविरुद्ध काहीही करायला विचाराची बैठक आणि अंमलबजावणीचं धाडस लागतं. वडीलधाऱ्यांचं मन दुखावण्याचा तात्पुरता धोका मान्य करून त्यानंतरच्या आयुष्यभराच्या संतुलित वागणुकीनी मन जिंकण्याचा निर्धार तरुणांनी करावा, तरच समारंभातला निरर्थकपणा त्यांना कळेल आणि पचेल. सध्याच्या तरुण मुलामुलींपैकी निम्म्याहून अधिक लोकांना कळत असतं की पारंपरिक लग्नविधी संस्कृत काय आणि मराठीत म्हटले काय, त्यात वैवाहिक सहजीवनाविषयी काही सांगितलेलं नसतं.

शेवटी नव्व्याण्णव टक्के लग्नसमारंभ साधारण याच 'विधी-मानपान-जेवणावळी' पद्धतींनी होतात. काही निम-आधुनिक पद्धतीही शोधलेल्या असतात. संस्कृत मंत्रांची मराठी भाषांतरं सांगणं हे न समजणाऱ्या मंत्रघोषापेक्षा खूप चांगलंच; पण मुळात आधुनिक वास्तव कल्पनेत मंत्रच बसत नाहीत. ''बायकोशी अमूक पद्धतीनी वागेन,'' अशी शपथ घेऊन आणि हे म्हणताना विस्तवात तूप सोडल्यानी किंवा फुलं वाहून किंवा पाणी शिंपडून, हाताला हात लावून, लोकांना आयुष्यभर त्याचं बंधन वाटत असतं तर सध्याचे सत्त्याण्णव टक्के नीरस किंवा तणावपूर्ण संसार दिसलेच नसते. कसलाही, कुठल्याही भाषेतला मंत्र म्हणवून घेतलेला असला तरी प्रत्यक्ष आयुष्यात त्याची जराही आठवण होत नाही आणि तो आचरणात येत नाही. न्यायालयात गीतेवर हात ठेवून शपथ घेतल्यानी माणसं खरं बोलत असती, तर आणखी काय पाहिजे होतं? गंमत म्हणजे, या अशा अनेक गोष्टींच्यातला निरर्थकपणा कळूनही लोकांना ह्या गोष्टी सोडायचा धीर होत नाही.

विवाह-विधींबद्दल, नीट विचार केला तर काही गोष्टी लक्षात येतात. गेली अनेक वर्षं काहीतरी मंत्र म्हणून आणि शपथा घेऊन लग्नविधी होतात. मग प्रत्यक्षात नीरस संसारांचं प्रमाण एवढं कसं, याला काही उत्तर नाही. शपथ घेतल्याचं बंधन पूर्वी एकेकाळच्या मानवाला वाटत असेल म्हणून तशी पद्धत पडली. आता या युक्तीचा उपयोग होत नाही म्हटल्यावर नवीन पद्धत शोधायला हवी. ती नवीन पद्धत म्हणजे विवाह-अभ्यास आहे.

विवाहाच्या अभ्यासात प्रत्येकाला स्वतः मेहनत करावी लागते ही मुख्य अडचण आहे. स्वतः स्वस्थ बसावं आणि आपल्या भल्यासाठी प्रयत्न इतरांनी करावेत ही पूर्वीची पद्धत झाली. विधी म्हटले की दुसरी कुठलीतरी दैवी, किंवा बाह्य शक्ती आपलं भलं करणार अशी त्यात श्रद्धा असते. त्यामुळे स्वतः काही करायचं असतं हे ध्यानातच येत नाही.

धार्मिक विधी समजून घ्यायचा प्रयत्न केला तेव्हा कळलं की त्यात मुलीला काही अधिकारच नसतो. ती एक वस्तू समजून तिचं कन्यादान केलं जातं. धार्मिक विधींवर विश्वास ही एक अडचणच आहे. त्याचा खरंच संबंध असता तर भारतातले एवढे विवाह समाधानी झाले नसते का? प्रत्यक्षात विवाहसंस्थेची वाट लागलेली रोज बघतोय् की आपण! स्पष्ट विचार करू शकतात त्यांना हा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. लग्नविधी, समारंभ या सगळ्यांपेक्षा सहजीवन जास्त

महत्त्वाचं आहे आणि त्यातला ‘सह’ शब्द सर्वांत महत्त्वाचा आहे. तो नुसत्या दोन व्यक्तींना उद्देशून नाहीय् तर दोन कुटुंबांना डोळ्यासमोर ठेवून समजून घ्यायचा आहे.

बहुतेक वेळा मुलाच्या आईकडून असं वाक्य येतं, ‘धार्मिक विधी झाल्याशिवाय सून घरात आल्यासारखं वाटणार नाही.’ एखाद्याची भावना धार्मिक विधींमधे गुंतली तर काही करता येत नाही हे मला समजतं, पण अशा प्रकारची भावना त्याबद्दलच्या वैचारिक प्रगल्भतेवरच अवलंबून असते. या व्यक्तीची विचारांची ताकद कमी पडलेली असते असंच मला वाटतं.

‘लग्नाचा सीझन’ नावाचा प्रकार मला पूर्वी माहिती नव्हता. पुण्यात व्यवसाय करायला लागल्यावर त्याचा हिसका कळला. रस्त्यांवर गर्दी, गोंगाट याखेरीज ऑफिस स्टाफच्या त्यापायी जास्तीच्या रजा, बांधकामावर मजुरांची आणि बायांची टंचाई हे सगळं बघून मी थक्क झालो. त्याशिवाय सगळ्या रेल्वे, एस.टी. यांचं बुकिंग झालेलं, सल्लामसलतीसाठी बाहेरगावी जायचं तर तिकिटं मिळण्याची मारामार, रस्त्यावर रिक्षांची टंचाई, काही विचारू नका. केवळ माहितीसाठी सांगतो, विलायतेत मुहूर्त म्हणजे शुभ काळ आणि पितृपंधरवडा म्हणजे अशुभ काळ अशी भानगड नसल्यामुळे वेडिंग सीझन नावाचं काही नसतं. तसा सीझन असताच कामा नये असं मला वाटतं. वेडिंग सीझन असायला वेडिंग म्हणजे काय एखादं फळ आहे?

याबद्दल याच पुस्तकसंचात संस्कार, आधुनिक संस्कार, धार्मिक, पारंपरिक संस्कार, शुभ-अशुभ, मुहूर्त अशा विषयांवर सविस्तर लिखाण आहे ते जरूर बघावं.

●

7) लग्नसमारंभातली स्त्री-पुरुष असमानता

अनेक वर्षांपूर्वी मी लग्नसमारंभांना जायचो हे आपण बोललोच आहोत. लग्नसमारंभात स्त्री-पुरुष असमानता दिसत नाही असा सलग एक तासही जात नाही असं माझं निरीक्षण आहे. या एका मोठ्या कारणासाठी अनेक मुलींचा मनातून लग्नसमारंभाला विरोध असतो हेही मला माहीत आहे. पुढे मात्र घरातले इतर लोक त्यांच्यावर थेट अत्याचार करतात.

आणखीन एका वाईट प्रथेनी लग्नसमारंभ कडवट होतो, ती पद्धत म्हणजे 'मानपान'. मानपान म्हणजे शेवटी मुलीच्या घराकडून मुलाच्या घराकडे जाणारी निराळ्या स्वरूपातली संपत्ती. खरं म्हणजे हुंडाच तो पण अकाऊंट हेड निराळं. चक्क अडवणूकच चालते. मुलामुलीचं याआधी एकमेकांवर प्रेम असलं आणि या टप्प्यावर मुलानी आई-वडलांच्या आडून मागण्या करायला सुरुवात केली असली तर मुलगी आणि मुलीचे आईवडील असहाय्य अवस्थेत असतात. सर्व मागण्या मान्य करतात आणि पुढे मुलीबद्दल आयुष्यभर काळजी करतात. असा मुलग्याच्या घराला मेहनत न करता मिळणारा पैसा (दागिने, भांडी, वस्तू कुठल्याही स्वरूपात असला तरी) आणि चोरी, भ्रष्टाचार, पिळवणूक वगैरेमधे फारच कमी फरक असतो. फरक फक्त राजीखुशीनी का जबरदस्तीनी या स्वरूपाचा असतो.

लग्न या शब्दासरशी अनेकांच्या डोळ्यासमोर येतो तो खर्च. कितीही हुंडाबंदी असली तरी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीनी हुंडा घ्यायचा किंवा द्यायचा आकडा मनात येतोच. खरोखर स्त्री-पुरुष समानता मानणारे लोक आहेत, पण फार कमी आहेत. 'आम्हाला काही नको, पण लग्नसमारंभाचा खर्च मुलीकडच्यांनी करावा,' या समानतेच्या सरासरी अवस्थेत समाज आहे. सोनं खरेदी, हनिमूनचा खर्च, जागा खरेदी करायला मदत, वाहन खरेदी, देण्याचे आणि घेण्याचे आहेर, कार्यालयाचा खर्च, जेवणावळी, पाहुणे, त्यांच्या राहाण्याच्या व्यवस्थेचा खर्च, घराची रंगरंगोटी, नवीन फर्निचर, टी.व्ही., फ्रीज अशा अनेक कल्पना वापरल्या जातात पण शेवटी तो खर्चच.

शोभाच्या आई-वडलांनी शोभाच्या लग्नाची म्हणून सगळी केलेली तयारी

वाया गेली कारण काही न घेण्याबद्दल मी आग्रही होतो. आभाच्या लग्नाची फारशी तयारी आम्ही केलीच नव्हती, पण थोडी होती ती वाया गेली कारण श्रेयसनी काही नको असं आग्रहानी स्पष्ट सांगितलं. आमच्या सुनेच्या घरून आम्ही काही न घेतल्यामुळे आमच्या कुटुंबात हा प्रश्न आला नाही, पण 'जीवनसाथ'मुळे समाजात काय चालू आहे याची आम्हाला चांगली कल्पना आहे. स्त्री-पुरुष असमानता लग्नसमारंभात जागोजागी दिसते असं मगाशी मी म्हणालो ती जराही अतिशयोक्ती नाही. सिक्युरिटीसाठी जसा मेटल डिटेक्टर असतो तसा माझ्या डोक्यात स्त्री-पुरुष असमानता डिटेक्टर लावलेला असल्यामुळे लग्नसमारंभात मी हजर असलो तर भोंगा वाजायचा अजिबात थांबतच नाही.

●

8) लग्नसमारंभातली सामाजिक अनैतिकता

प्रत्येक सुखवस्तू माणूस जेव्हा जेव्हा अत्यावश्यक गरजेपेक्षा जास्तीचा काही खर्च करतो, चैन करतो, चंगळ करतो तेव्हा तो ८०% भारतीय गरीब जनतेवर अन्यायच करत असतो. वैवाहिक आयुष्य समाधानानी जगता येण्याचा लग्नसमारंभाच्या खर्चाचा आणि जेवणावळीचा काही संबंध नसतो. मोठा समारंभ करण्याची कारणं अनेक, पण शेवटी तो सामाजिक अन्यायच आहे आणि तरी हा त्या व्यक्तीचा, त्या कुटुंबाचा प्रश्न आहे हे अभ्यास मंडळाला पूर्ण मान्य आहे. कारण त्यात रूढीचा प्रश्न आहे, त्याचबरोबर आचार स्वातंत्र्याचाही आहे.

बहुतेक जण असं म्हणताना आढळतात, 'एकदाच लग्न करायचं तर ते चांगलं का करू नये?'

मला अर्थातच हे चुकीचं वाटतं. इतकी गरीब, शोषित जनता आसपास असताना समारंभ, संपत्तीची उधळपट्टी, देखावा हा नैतिक गुन्हा आहे हे प्रत्येकाला समजलं पाहिजे. त्यामुळे मी म्हणतो एकदाच लग्न करायचं तर नैतिक गुन्हा कशाला करायचा?

चंगळवादी, उपभोगवादी लोकांच्या बाबतीत एक प्रश्न नेहमी पडतो. आसपास एवढी गरीब, गरजू, अडचणीत सापडलेली माणसं दिसत असताना केवळ स्वतःला परवडतं म्हणून संपत्तीची उधळपट्टी करवते कशी? लग्नसमारंभातल्या जेवणावळी कशा असतात ते आपण बघतो. एक केवळ नशिबानी सुखवस्तू घरात जन्मलेला माणूस तशाच दुसऱ्या सधन माणसाला आग्रह करकरून जेवायला घालत असतो आणि त्याच ठिकाणी कामाला ठेवलेल्या माणसांना धड जेवायला मिळालं का नाही याची चौकशीदेखील करत नाही. मी तर लग्नसमारंभांना हजर राहाणं 20-25 वर्षांपासून सोडलंय. स्वतःच्या घरच्या लग्नसमारंभाचा खूप आनंद झाल्यामुळे गरीबांना बोलावून त्यांना पंगत मांडून जेवू घालताना कोणी बघितलंय? आसपास भुकेलेली माणसं आशाळभूतपणी आपल्याकडे बघत असताना जेवण कसं जातं?

मध्यमवर्गीय सुखवस्तू आयुष्यात जेवढ्या वस्तू, सुखसोयी आपण सहजपणी वापरतो तेवढ्या आसपासच्या कनिष्ठ वर्गाला मिळत नाहीत याबद्दल आपल्याला

नेमकं काय वाटतं हा मूळ प्रश्न आहे हा मुद्दा सगळे मान्य करतात. समजा, मधे नुसता पडदा टाकला, भिंत उभी केली पण पलीकडे भुकेलेला माणूस बसलेला तुम्हाला माहिती आहे तर तुम्ही मजेत जेवू शकाल का? समजा, अशी अनेक माणसं चार भिंतींपलीकडे जरा जास्त अंतरावर असली तर काही फरक पडेल का?

एखाद्या सुखवस्तू कुटुंबातल्या लग्नसमारंभातल्या जेवणाच्या पंगतीला खऱ्या गरजू, गरीब, भिकारी, अशा बऱ्याच लोकांना प्रथम जेवायला बसवून, त्यांना तृप्त करून मग तेवढ्याच संख्येनी सुखवस्तू लोकांची पंगत बसली तर असा लग्नसमारंभ, जेवणावळ जरा कमी अनैतिक असण्याचा मुद्दा आपण विचारात घ्यायला हरकत नाही. असं कधी बघितलंय् का कोणी? अशा प्रकारचा कायदा सरकारनी केला तरच कदाचित समाज सुधारेल. एरवी नाही.

जेवण हा विषय सोडून इतर वस्तूंचा विचार केला तरी तेच. आपण वस्तू, सुखसोयी, सौंदर्य या सगळ्यांचा उपयोग करण्यात काही चूक नाही, पण त्या भिंतीपलीकडच्यांचा विचार आपण करू शकलो तर वस्तूंचा हव्यास आपोआपच कमी होईल. वस्तू, चांगल्या वस्तू, आधुनिक वस्तू, नव्या वस्तू जर कार्यक्षमतेसाठी असतील तर त्या मान्य नाहीतर अमान्य हा विचार मध्यमवर्गीयांना करता येत नाही तेव्हा ते चंगळवादाचे बळीच ठरतात. मुख्य म्हणजे वस्तूंचा हव्यास या रस्त्यानी गेल्यावर पुढे समाधान नाहीय्. असमाधान आहे हे कळणं महत्त्वाचं. या प्रयत्नांमुळे समाजातला उत्सवीपणा, समारंभप्रियता हळूहळू कमी होत जावी ही अपेक्षा.

बाहेरच्या जेवणावर हजार रुपये खर्च करून आल्यावर अशा चंगळवादी घरातली मालकीण घरी काम करणाऱ्या मोलकरणीला चहा द्यायला खळखळ करते हे आपण बघतो आणि प्रश्न पडतो, हेच का ते भारतीयांवरचे अभिमान बाळगावेत असे थोर संस्कार? खरी गोष्ट अशी आहे 'आसपासचे सगळे जण सुखात असले तरच स्वतः सुखी होता येतं.'

लग्नाच्या ज्या काही रूढी, चालीरीती श्रीमंत, उच्चमध्यमवर्गीय आणि मध्यमवर्गीय माणूस पाळेल त्यांचा परिणाम कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि कष्टकरी वर्गावर होणार कारण ते त्यांचं अनुकरण करणारच. प्रत्येक कष्टकरी माणूस केव्हा ना केव्हातरी आपला आर्थिक स्तर सुधारेल या आशेवर असतो. एखाद्या कुटुंबात जसं मोठं भावंड चुकीचं वागलं तर धाकट्यावर परिणाम होतो तशी

समाजातल्या या आर्थिक स्तरांची परिस्थिती आहे. आपल्या स्वतःच्या चंगळवादी वागणुकीनी गरिबांवर वाईट परिणाम होतोय् हे बऱ्याच लोकांना कळत नाही.

लग्नसमारंभातला खर्च ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे ज्यानी त्यानी करावा, कर्ज काढून लग्न करू नये इतपत विधान करणारे श्रीमंत लोक आढळतात, पण त्या विधानाचा काही उपयोग होत नाही. खरी आहे त्यापेक्षा आपली ऐपत जास्त दिसली तर बहुतेक लोकांना हवंच असतं. कष्टकरी गरीब वर्गाला तर कोणाच्या तरी लग्नसमारंभाची किंचित नशा करण्याचीं संधी सोडायची नसते. चांदीच्या पट्ट्या (पैंजण), जोडवी, बांगड्या, गळ्यातली चेन, ब्युटीपार्लरमधे जाऊन भुवया कोरणं अशा गोष्टी कष्टकरी वर्ग हौसेनी करताना दिसतो.

लग्नसमारंभाचा, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हुंड्याचा खर्च (बहुतेक मुलीच्या अंगावरच्या दागिन्यांच्या स्वरूपात) हे समाजमान्य खर्च असल्यामुळे त्यासाठी कामावरच्या मालकीणबाईंकडून हक्कानी बिनव्याजी उसने पैसे मागता येतात. असं कर्ज नाही मिळालं तर सावकाराकडून खुशाल कर्ज काढतात हे लोक. कामवाल्या बायांना एकापाठोपाठ मुलींची लग्नं म्हणजे एकापाठोपाठ कर्जं. पहिलं फिटलं की दुसरं करत जवळजवळ आयुष्यभर कर्जं फेडणारे मी बघितले आहेत.

●

प्रत्येक सुखवस्तू माणूस जेव्हा जेव्हा अत्यावश्यक गरजेपेक्षा जास्तीचा काही खर्च करतो, चैन करतो, चंगळ करतो तेव्हा तो 80% भारतीय गरीब जनतेवर अन्यायच करत असतो. आसपास एवढी गरीब, गरजू, अडचणीत सापडलेली माणसं दिसत असताना केवळ स्वतःला परवडतं म्हणून संपत्तीची उधळपट्टी करवते कशी?

9) लग्नसमारंभ आणि पर्यावरणाची हानी

मी पर्यावरण तज्ज्ञ नाही, पर्यावरण अभ्यासकही नाही, पण पर्यावरण समर्थक नक्की आहे. दिलीप आणि पौर्णिमा कुलकर्णी आमचे कुटुंबमित्र आहेत, त्यांचा दृष्टिकोन लग्नसमारंभाच्या विरोधातच पण पर्यावरणहानीच्या कारणासाठी आहे. माझा विरोध त्याशिवाय निराळ्या कारणांसाठी आहे. लग्नसमारंभाचं सध्याचं सरासरी शहरी मध्यमवर्गीय स्वरूप निरर्थक, कालबाह्य आणि तत्त्वतः चुकीचं आहे असं माझं म्हणणं आहे. आम्ही सगळे शेवटी एकच गोष्ट म्हणतो आहोत. त्या दोघांनी चालवलेल्या 'गतिमान संतुलन' या मासिकातला त्यांचा एक लेख 'अ-मंगल कार्य'हा मी त्यांच्या परवानगीनी जवळजवळ सगळाच्या सगळा इथे देतोय. माझ्या सांगण्यामुळे तुमच्यावर समजा काही परिणाम होणार नसला तर पर्यावरणीय हानी हे आणखी एक कारण तुम्हाला समजावं हाच हेतू आहे. लेख पौर्णिमाताईंनी लिहिलेला आहे. लेखाचं शीर्षक आहे 'अ-मंगल कार्य'.

सध्याच्या समारंभ-शैलीचे निसर्गावर कसे दुष्परिणाम होत आहेत, हे बघूया. प्रथम आपण विचार करणार आहोत समारंभांमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा. सध्या कचऱ्याची समस्या सार्वत्रिक बनलेली आहे. असंख्य प्रकारचा कचरा आपण मोठ्या प्रमाणावर निर्माण करतो. त्यात भर पडली आहे ती समारंभांमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची. किती डोकी चालवून आपण कचरा निर्माण करण्याची व्यवस्था केली आहे!

सजावट : समारंभ हा एक आनंदाचा प्रसंग असल्यानं त्या निमित्तानं घर, परिसर किंवा मंगलकार्याचं स्थान (मांडव, सभागृह इ.) सजवावं असं वाटणं स्वाभाविक आहे. त्या सजावटीनं वातावरण प्रसन्न बनतं. पण, आता ही सजावट पूर्वीसारखी पानाफुलांची, छोटेखानी अशी राहिलेली नाही. ती भव्य असते आणि बहुधा अनैसर्गिक, अ-विघटनक्षम अशा पदार्थांचीच असते.

ह्या सजावटीला प्रारंभ होतो तो घरापासून. बारसं, वाढदिवस असा छोटा समारंभ घरीच असेल, तर त्या खोलीत फुगे, प्लॅस्टिकच्या वा जिलेटिनच्या कागदाच्या झिरमिळ्या, पताका, पानाफुलांचे हार अशा वस्तू वापरून सजावट केली जाते. त्यांच्यामुळे समारंभापुरती शोभा येते हे खरं; पण, लवकरच त्यांचं

रूपांतर कचऱ्यातच होतं. ज्याचं बारसं, वाढदिवस किंवा लग्न, त्यांच्या नावाचा थर्माकोलचा मोठा कट-आऊट बनवून तो समारंभस्थानी लावला जातो. खरं म्हणजे त्या दिवशी काय नि नंतर काय, त्याचा काहीच उपयोग नसतो. असेच कट-आऊट गाडी किंवा वऱ्हाडाच्या एस.टी.वरही चिकटवले जातात. त्यांचे तुकडे जागोजागी पडत राहून कचरा निर्माण होत राहातो.

अनेकदा भिंतींना किंवा गाड्यांना गुलाबाची फुलं सेलोटेपनं चिकटवली जातात. दुसऱ्या दिवशी फुलांचा विघटनक्षम आणि चिकटपट्ट्यांचा अ-विघटनक्षम असा सर्व कचरा एकत्रपणे कुठेतरी फेकून दिला जातो. सभागृहांतही दारं, भिंती, व्यासपीठ अशा सर्व ठिकाणी नैसर्गिक फुलांचा वा प्लॅस्टिक-थर्माकोलचा मुक्तपणे वापर होतो. मोठ्या प्रमाणावर फुलं वापरून व्यासपीठामागच्या भिंतीवर/पडद्यावर त्यांच्या माळांची सजावट केली जाते. काही तासांसाठीच्या सुशोभनासाठी एवढी फुलं वापरली जातात. दुसऱ्या दिवशी ती सारी कचराकुंडीतच जातात. विघटनक्षम असला, तरी त्या कचऱ्याचा भार निसर्गावर पडतोच.

रांगोळ्या : समारंभाच्या निमित्तानं रांगोळ्या काढण्याची परंपरा खूप प्राचीन आहे. पण पूर्वी ह्या रांगोळ्या छोट्या असायच्या. दोन बोटांच्या चिमटीतून रांगोळी सोडली जायची. हल्ली मात्र मुठीतून सोडून रांगोळी काढली जाते. ती पाच-दहा फूट व्यासाची असते. शिवाय तिच्यात रंग भरले जातात. ही सर्व रांगोळी व रंग झाडून टाकले जातात. ते त्या परिसरात किंवा कचराकुंडीत टाकले गेले तर दुसरीकडची कुठली तरी जमीन प्रदूषित-विषारी बनवतात. रांगोळ्या काढणाऱ्यांना फक्त त्या कलाकुसरीत रस असतो. पर्यावरणाच्या विषीभवनाचा विचारही त्यांच्या मनात येत नाही.

फटाके : समारंभात फटाके उडवलेच पाहिजेत असा सध्या जणू एक अलिखित नियमच आहे. विशेषतः लग्नात त्यांचा वापर अधिक होतो. वधूवरांना किंवा मानाच्या मंडळींना घेऊन येणाऱ्या गाड्या कार्यालयाच्या दाराशी आल्या की फटाके उडवून त्यांचं स्वागत केलं जातं. लग्न लागल्यावर तर त्यांच्या माळा पेटवणं अत्यावश्यकच. वरातीतही वाजंत्रीबरोबर फटाके आवश्यक असतात. ह्या सर्व दारुकामामुळे हवेत विषारी धूर किती पसरतो; किती ध्वनिप्रदूषण होतं, कागदाच्या कपट्यांचा किती कचरा रस्त्यावर पसरतो ह्याचं भान कोणालाच नसतं.

हल्ली आणखी एक गमतीशीर प्रकार पाहायला मिळू लागला आहे. लग्न लागल्यावर वधूवरांच्या शेजारीच एक फटाका फोडतात. त्यातून अंगावर थर्माकोलचे

मणी, रंगीत कागदाचे कपटे वगैरेंची उधळण केली जाते. गुलाबपाणी, फुलं अशा सुगंधी द्रव्यांचा वर्षाव करण्याऐवजी वधूवरांवर कचऱ्याचा वर्षाव करण्याची ही कल्पना कोणाच्या सुपीक डोक्यातून निघाली असेल? हा प्रकार मजेचा नसून खेदजनक आहे, लाजिरवाणा आहे.

अन्य कचरा : समारंभामधे अन्यही अनेक प्रकारांनी कमी-अधिक प्रमाणात कचरा तयार होत असतो. पाणी पिण्यासाठीच्या प्लॅस्टिकच्या कपांचाही प्रश्न आहे. केवळ एकदाच वापरून फेकून देण्याच्या ह्या पेल्यांचा कचऱ्याच्या अंगानंही विचार होणं गरजेचं आहे. पेढ्यांसाठीचं आवेष्टन म्हणून प्लॅस्टिकच्याच छोट्या पिशव्या वापरल्या जातात. पानांचे विडेही अशाच छोट्या पिशव्यांतून दिले जातात. पेढे/पान खाऊन सर्वजण ह्या पिशव्या सभागृहातच फेकून देतात. हा सगळा प्लॅस्टिकचा कचरा पुढे कुठे जातो? त्यापैकी किती प्लॅस्टिकचं पुनर्घटन होतं? भेटवस्तूंची आवेष्टनंही प्लॅस्टिकचीच असतात. त्यांचाही कचरा नंतर घरोघरच्या केराच्या डब्यांत पडत राहतो.

पुष्पगुच्छांचा कचरा ही अशीच एक मोठी समस्या आहे. त्यात फुलांसारखी विघटनक्षम आणि प्लॅस्टिक, थर्माकोलचे मणी ह्यांसारख्या अ-विघटनक्षम गोष्टी एकत्र असतात; पण, त्यांचे ढीग कचराकुंडीत एकत्रच फेकले जातात.

समारंभाच्या निमंत्रणपत्रिका - विशेषतः लग्नांच्या : हा काही काळानं कागदाचा कचराच बनतो. त्यांच्या रंगीत कागदांचा उपयोग मुलं शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी करू शकतात; पण, त्यालाही मर्यादा आहे. हा सारा उत्तम दर्जाचा कागद कचराकुंडीत जावा ह्यासारखं दुर्दैव नाही. तो रद्दीत गेला, तर त्या कागदाचं कदाचित पुनर्घटन होईल, पण मूळ कागदाचा सुयोग्य आणि पूर्ण वापर न होताच तो रद्दीत जावा ही काही चांगली गोष्ट नाही. पत्रिकांवरील देवांच्या चित्रांमुळे अनेकांना त्या रद्दीत घालणंही उचित वाटत नाही. अशा वेळी त्यांची विल्हेवाट ही एक समस्याच होऊन बसते.

उरलेला स्वयंपाक आणि पानांत टाकलेलं अन्न ह्यांना ऊर्जा आणि संसाधनांप्रमाणेच कचऱ्याचंही परिमाण आहे. समारंभ जितका मोठा, तितका हा कचरा अधिक. तो तयारच होऊ नये म्हणून छोटे समारंभ, मोजकेच पदार्थ, पानात काहीही न टाकण्याचा संस्कार असे मूलभूत बदलच आवश्यक आहेत.

खेड्यांमधली लग्नं ही शहरांच्या मानानं साधी, आटोपशीर असतात. त्यामुळे तिथे ह्या समस्या खूपच कमी असतात. पण खेड्यांतही आता 'वापरा

व फेका' संस्कृतीची लागण मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. पत्रावळी किंवा केळीच्या पानांऐवजी आता स्टायरोफोमच्या किंवा ॲल्युमिनियमच्या कागदाचा थर असलेल्या थाळ्या वापरल्या जातात. चहा/पाण्यासाठी सर्रास प्लॅस्टिकचे पेले वापरले जातात. ते नंतर कुठेतरी फेकून दिले जातात. तो कचरा पुनर्घटनासाठी पाठवण्याची कोणतीच सोय नसल्यानं ही समस्या अधिकाधिक गंभीर बनत चालली आहे. विघटनक्षम कचरा ही मात्र खेड्यांत समस्या नसते. एक तर तो थेट जमिनीवर पडल्यानं कुजून खतात रूपांतरित होतो किंवा त्याआधीच गुरांनी खाल्ल्यामुळे ते 'अन्न'च बनून जातं. ह्या साऱ्या विवेचनावरून समारंभांमधला कचरा कमी करण्याची काही सूत्रं आपल्यासमोर येतात, ती अशी :

1) समारंभ छोटे, साधे असले तर कचरा मुळातच कमी होतो. 2) सजावट माफक असावी. ती करण्यासाठी प्लॅस्टिक, थर्माकोल वापरू नये. 3) रांगोळ्या छोट्या असाव्यात. विषारी रंगांचा वापर टाळावा. 4) कोणत्याही कारणासाठी फटाके उडवू नयेत. 5) अन्नपदार्थांची संख्या मर्यादित असावी. आग्रह करू नये. पानात अन्न टाकू नये. 6) 'वापरा व फेका' प्रकारच्या वस्तूंचा वापर टाळावा. त्याऐवजी धातूच्या वस्तू वापराव्यात. त्या धुऊन पुनःपुन्हा वापरता येतात. समारंभ-शैलीत अशी परिवर्तनं करण्यासाठी निर्धाराची आवश्यकता आहे. अमंगल बनलेली कार्यं पुन्हा मंगल व्हायला हवी असतील, तर अशा परिवर्तनांचा स्वीकार अत्यावश्यक आहे, हे मात्र निश्चित.

उधळण अक्षतांची

लग्नाच्या वेळी वधूवरांच्या डोक्यावर अक्षता उधळण्याची प्रथा आहे. 'तांदूळ असे का वाया घालवायचे' असा त्यावर हल्ली अनेक जण आक्षेप घेतात. एका स्नेह्यांनी ह्या परंपरेचं एक वेगळंच स्पष्टीकरण दिलं : तांदूळ हे कुजण्याच्या क्रियेचा वेग वाढवतात. पूर्वी लग्नातला सर्व कचरा सेंद्रिय असायचा. तो लवकर कुजावा ह्यासाठी त्यात थोडे तांदूळ मिसळले, तर बरं. लग्नानंतर मांडव झाडला की, केरात भरपूर अक्षता असायच्या. त्या अन्य कचऱ्यात मिसळल्या जायच्या नि तो आपोआपच लवकर कुजायचा. अक्षता उधळण्यामागे अशी एक 'पार्यावरणिक शहाणीव' आहे असं म्हणता येईल.

कोणत्याही समारंभाची तयारी सुरू होते ती निमंत्रणपत्रिकांपासून. आजकाल ह्या पत्रिकांची जाडी आणि आकार किती वाढत चालला आहे! निमंत्रितांची

संख्याही भरमसाठ असल्यामुळे पत्रिकांची संख्याही वाढत जाते. त्यासाठी जो कागद लागतो त्यासाठी किती झाडं तुटतात ह्याची जाणीव तरी आपण ठेवतो का? त्यांसाठी वापरले जाणारे रंग हे कृत्रिम रसायनांपासून तयार केले जातात. ते पर्यावरणाला घातक आणि प्रदूषणकारी असतात.

निमंत्रणपत्रिकांनंतर लगबग सुरू होते खरेदीची! समारंभ म्हटला की, कपडे, दागिने ह्यांची खरेदी तर होतेच; पण घरासाठी म्हणून इतरही अनेक गोष्टींची खरेदी होते. मग त्यात पडदे, बेडशीट, पिलोकव्हर, गॅसची शेगडी, फूडप्रोसेसर, मायक्रोवेव्ह अशा घरगुती वापराच्या गोष्टींपासून फर्निचर, गाडी इथपर्यंत अनंत वस्तूंची खरेदी होते. कित्येक वस्तू तर अशा असतात की, फक्त त्या दिवसापुरताच वापर करण्यासाठी घेतल्या जातात. एका घरात मी पाहिलं की, लग्नाच्या दिवशी वापरण्याच्या प्रत्येकाच्या वस्तू (उदा. बायकांचे दागिने, सेफ्टीपिना, सौंदर्य प्रसाधनं इत्यादी; तर पुरुषांच्या टायच्या पिना, नेहरूशर्टांच्या गुंड्या, सौंदर्यप्रसाधनं, सेंटच्या बाटल्या, इ.) वेगवेगळ्या ठेवण्यासाठी अनेक कप्पे असणाऱ्या डझनभर प्लॅस्टिकच्या पेट्यांची खरेदी झाली होती!

अनेक घरांमधे मंगलकार्याच्या निमित्तानं घराला नवीन रंग दिला जातो – पहिला रंग खराब झालेला नसला तरी. भेटी आणि प्रतिभेटी ह्यांसाठी केली जाणारी (बऱ्याचदा निरुपयोगी) वस्तूंची खरेदी हा तर फारच क्लेशकारक विषय आहे. खरं तर खरेदी हा विषयच न संपणारा आहे; सांगायचा मुद्दा हा आहे की, वस्तूंची अशी बेसुमार खरेदी करताना त्यांची खरंच आवश्यकता आहे का, त्यांचा पुरेपूर वापर होणार आहे का, हा विचार करायला नको का? केवळ एका दिवसाच्या वापरासाठी वस्तूंची खरेदी करून किती संसाधनं आपण उगीचच वाया घालवत असतो, हा विचार गंभीरपणे करणं आवश्यक आहे. संसाधनांचा हा सर्व वापर निसर्गावर अत्याचार करणारा ठरतो.

आता प्रत्यक्ष मंगलकार्याच्या ठिकाणी काय होतं ते पाहू. समारंभाच्या निमित्तानं सजावट करावीशी वाटणं हे स्वाभाविक आहे; पण, हल्ली आपल्याला साधीशी सजावट पुरेशी वाटतच नाही. तीही भव्य-दिव्य, झगमगाटी, डोळे दिपवणारी अशी हवी असते. त्यासाठी 'होऊ दे खर्च' अशी आपली मनोवृत्ती असते. पण प्रश्न फक्त पैसे खर्च होण्याचा नाही. नैसर्गिक आणि कृत्रिम अशी दोन्ही प्रकारची संसाधनं सजावटीसारख्या केवळ दिखाऊ गोष्टीसाठी किती 'खर्च' होतात ह्याचा विचार कोण करणार? बर्फाच्या मूर्तीसाठी पाण्यासारखं जीवनावश्यक

संसाधन किती बिनदिक्कतपणे खर्च करतो आपण! बर्फासाठी किती वीज खर्ची पडते! याचा विचारच कोणाच्या डोक्यात येत नाही.

कोणत्याही समारंभाचा सगळ्यात महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग म्हणजे जेवण. जेवणाबाबत दोन भागांत विचार करावा लागेल. जेवणासाठी लागणारी भांडी इ. वस्तू आणि दुसरा म्हणजे अन्नपदार्थ. निमंत्रितांची संख्या मोठी असली की, शिजवण्यासाठी भांडी, गॅस इ. गोष्टीही मोठ्या प्रमाणात लागतात.

प्रत्यक्ष जेवणासाठी किंवा नाश्त्यासाठीही आजकाल प्लॅस्टिक वा स्टायरोफोमच्या डिस्पोजेबल थाळ्यांचा वापर वाढलेला दिसतो. नाश्त्यासाठी पेपरडिश असेल तर तिला लॅमिनेशन किंवा ॲल्युमिनियम फॉईलचं आवरण असतं. चहासाठी प्लॅस्टिक, थर्माकोल किंवा जाड कागदाचे कप असतात. पाणी किंवा सरबत पिण्यासाठी प्लॅस्टिकचे ग्लास असतात. हे ग्लास इतके पातळ, तकलादू असतात की, त्यानं वरून पाणी पिताच येत नाही. तोंड लावूनच प्यावं लागतं. त्यामुळे पर्यावरणाची दुहेरी हानी होते. एक तर आपण प्लॅस्टिकसारखं अ-विघटनक्षम, पर्यावरणाला हानीकारक असं संसाधन वापरतो आणि प्रत्येक वेळी नव्या ग्लासातलं पाणी उष्टं करून मोठ्या प्रमाणात पाणी वाया घालवतो.

जेवणासाठी कधी स्टीलची ताटं असतात, तर कधी मेलॅमाइनच्या डिश. त्या पुनःपुन्हा धुऊन वापरल्या जातात; पण स्टायरोफोमच्या थाळ्या मात्र एकदाच वापरून फेकून दिल्या जातात. जेवणाच्या ताटाबरोबर प्रत्येकाला एक कागदी हातरुमाल दिला जातो. खरं तर प्रत्येक ठिकाणी हात धुण्यासाठी नळ असतात, मग हे कागदी हातरुमाल कशासाठी? एवढा कागद आणि पर्यायानं झाडं आपण वायाच घालवत नाही का? कागदाचं उत्पादन, वाहतूक ह्यांसाठी किती वीज, डीझेल वापरलं जातं?

ह्या जेवणावळींचा दुसरा भाग म्हणजे अन्नपदार्थ. हल्ली जेवणासाठी इतके भरमसाठ प्रकार असतात की, कोणता किती खपेल ह्याचा अंदाज न आल्यानी सगळेच पदार्थ खूप बनवावे लागतात. त्यामुळे अन्न उरण्याचं आणि वाया जाण्याचं प्रमाण खूप असतं. तसंच, पदार्थांची संख्या खूप असल्यानं प्रत्येक पदार्थ चवीपुरता घेता घेता पान इतकं भरतं की, ते संपवणं अशक्य होऊन बसतं. ह्यातून पानात अन्न टाकण्याचं प्रमाणही खूप वाढतं. थोराघरच्या एका समारंभात वापरलं जाणारं अन्नधान्य हे एखाद्या गरीब कुटुंबाला वर्षभर पुरेल इतकं असतं! ते अवघ्या अर्ध्या दिवसात फस्त केलं जातं किंवा वाया घालवलं जातं.

निमंत्रितांची संख्या जेवढी मोठी, तेवढा मोठा हॉल किंवा लॉन्स गरजेच्या ठरतात. मोठ्या हॉलच्या बांधकामासाठी संसाधनंही जास्त लागतात. मोठमोठ्या लॉन्ससाठी जमीन आणि पाणी ही दोन जीवनावश्यक संसाधनं मोठ्या प्रमाणात वापरली जातात. त्यांचा कोणताही उत्पादक उपयोग न होता, केवळ देखावा आणि भपका ह्यांसाठी ती वापरली जातात. एवढ्या लोकांच्या गाड्यांच्या केवळ पार्किंगसाठी केवढी मोठी जागा लागते! खरा म्हणजे हाही जमिनीचा अनुत्पादक उपयोगच आहे.

उपाय

पर्यावरणाच्या आणि आपल्याच हितकारक भविष्यकाळाच्या रक्षणासाठी समारंभांमधे काही थोडे बदल केले, तर ही संसाधनांची नासाडी आपल्यालाही थांबवता येईल. उदा. 1) निमंत्रितांची संख्या मर्यादित ठेवली, तर हातानंच पोस्टकार्डं लिहूनही निमंत्रण देता येईल किंवा आंतर्देशीय पत्रावर छापलेले साधेसे निमंत्रण द्यायला काय हरकत आहे? 2) खरेदी करताना प्रत्येक वस्तूच्या दीर्घकालीन आवश्यकतेबाबत शंभर वेळा विचार करावा. नेहमी वापरल्या जातील आणि खरंच गरजेच्या असतील तरच त्या खरेदी कराव्यात. 3) सजावट करताना पानाफुलांची आणि ती सुद्धा अल्पशी अशी करावी. 4) आपल्याकडील समारंभांत 'वापरा-फेका' स्वरूपातल्या कोणत्याही वस्तू न वापरण्याबाबत हॉलमालक किंवा केटररकडे आग्रह धरावा. अक्षता, पेढे प्लॅस्टिक पिशवीत पॅक करून न वाटता सुटे वाटावेत. 5) जेवणाचा बेत साधासा ठेवून अन्न उरण्याचं प्रमाण कमी करता येईल. उरलेलं अन्न डब्यांतून घरी आणता येईल. आजूबाजूच्या गरजू लोकांना किंवा एखाद्या गरीब मुलांच्या वसतीगृहात किंवा अनाथाश्रमात नेऊन ते वाटता येईल.

असे अनेक साधे, सोपे पण निर्धारपूर्वक करावे लागणारे बदल आपण करत गेलो, तर आज निसर्गासाठी अ-मंगल बनलेली कार्यं ही खरोखरच्या मंगलकार्यांत रूपांतरित व्हायला वेळ लागणार नाही.

1993 साली पुणं सोडल्यानंतर पहिली चार वर्षं आम्ही पंचनदी या छोट्या गावात राहात होतो. त्या काळात आणि नंतरही तिथल्या अनेक मंगलकार्यांना उपस्थित राहण्याचा योग आला. संसाधनांचा आणि ऊर्जांचा माफक आणि जागरूक वापर तिथे अनुभवायला मिळाला.

गावातल्या आणि जवळपासच्या लोकांना प्रत्यक्ष जाऊन तोंडीच आमंत्रण दिलं जायचं. फक्त बाहेरगावच्या लोकांनाच पोस्टकार्डाद्वारे वा पोस्टानं पत्रिका पाठवून आमंत्रण. बहुतेकांच्या घराला मोठं अंगण असतंच. नसेल, तर शेजाऱ्याच्या अंगणातही मांडव घालून लग्न किंवा मुंज लागते. हा मांडवही मंडपवाल्याकडून भाड्यानं आणलेला नव्हे, तर नारळाच्या झावळ्यांपासून घरीच विणलेल्या सुबक झापांचा. मांडवाच्या प्रवेशद्वारापाशी दोन पसवलेल्या (ज्यांना घड लागला आहे अशा) केळींची कमान. बास. संपली सजावट. स्वयंपाक, जेवणंखाणं ह्यांसाठी लागणारी भांडीकुंडी देवळाची म्हणजे सार्वजनिक वापरली जायची. ह्यात भातासाठी मोठाली तांब्याची तपेली, इतर स्वयंपाकासाठी कल्हई लावलेली पितळी पातेली, तर तळणासाठी लोखंडी कढया अशी भांडी वापरली जायची. जेवणासाठी केळीच्या पानांचा वापर व्हायचा. जेवणं झाल्यावर ही पानं घरोघरच्या गुरांपुढे टाकली जायची.

स्वयंपाकासाठी आचारी बोलावला जायचा. स्वयंपाकात मदत करण्याचं काम गावातल्या महिलांचं, तर वाढपाचं काम पुरुषांचं. ह्यामुळे अन्नपदार्थांचा योग्य दर्जा आणि स्वच्छता यांकडे लक्ष दिलं जायचं. अतिरेकी आग्रह टाळला जायचा. अन्नपदार्थ पानात उगाच टाकून दिले जाणार नाहीत हेही पाहिलं जायचं. सगळ्यांची जेवणं झाल्यावर उरलेलं अन्न घरोघर वाटलं जायचं. लोक आपापल्या घरचे रिकामे डबे आणून अन्न घरी न्यायचे. अन्न हे पूर्णब्रह्म आहे, ते वाया जाऊ नये ही सद्भावना त्यामागे असल्यामुळे; तसंच शेतीतल्या कष्टांची जाणीव असल्यामुळे ना नेणाऱ्यांना त्यात कमीपणा वाटायचा, ना देणाऱ्यांना संकोच!

शहरातल्या बेगडी, झगमगाटी अमंगलकार्यांच्या पार्श्वभूमीवर, आरोग्य आणि पर्यावरण ह्या दोन्हींची जपणूक करणारं पंचनदीतल्या ह्या मंगलकार्यांचं वेगळेपण आम्हाला फारच भावतं.

●

10) अपरिपक्व विचार

जीवनसाथमधली नेहमीची गंमत सांगतो. जीवनसाथ अभ्यास मंडळाबद्दल आधी कळलं असतं तर आधी आलो असतो, आता उशीर झालाय, लग्नाची तारीख जवळ आलीय्. थोडेच दिवस उरले आहेत त्यामुळे अगदी थोडक्यात आम्हाला जरा काही गोष्टी सांगा ना, असं विचारत येणारी जोडपी बरीच आहेत. त्यांना सांगावं लागतं की, एकमेकांच्या स्वभावांचा अभ्यास या परिस्थितीत लग्नानंतर करूया असंच ठरवावं लागेल पण जेवढे दिवस उरलेयत् त्यांत जीवनसाथमधे एकदाच येणं शक्य आहे, असं वाटलं तर लैंगिक संबंधांविषयी एका निवडक गटात सामील व्हा आणि आणखी एकदा भेटणं शक्य वाटलं तर एम.एम.आय. टेस्ट द्या. म्हणजे 'मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर' टेस्ट. कारण विवाह म्हटलं की संपूर्ण कुटुंब समारंभाच्या तयारीत गुंततं पण या दोन गोष्टी राहून जातात. लग्नाआधी लग्नाचा अभ्यास करावा आणि करू नये असे चक्क दोन विचारगट असतात. त्यात निदान तुम्ही उशिरा का होईना पण 'अभ्यास करावा गटात' आला आहात. तुमचं स्वागत आहे.

विवाहित स्त्री-पुरुष, अविवाहित मुलगे-मुली सगळे जीवनसाथच्या बैठकीला हजर असताना सध्याच्या प्रश्नांना उत्तर काय, हा विषय चालतो. एकमतानी ठरतं की जेव्हा डोक्यात स्त्री-पुरुष संबंध हा विषय चालू होतो तेव्हापासून अभ्यास मंडळात जायला हवं. मग पुढे सगळे मिळून त्यांनी अभ्यास मंडळात जायला सुरुवात करण्याचं योग्य वय ठरवूया असा विषय निघतो. आत्तापर्यंत बघितलेल्या लग्नसमारंभांवरून काय चांगलं वाटलं, काय नाही आवडलं असा विचार केव्हा चालू होतो? दहाव्या वर्षी.

हे कितीही आदर्श वाटलं तरी शक्य नाही हे सगळ्यांना माहिती असतं. जीवनसाथच्या आत्तापर्यंतच्या रेकॉर्डमधे कमीतकमी वयाची व्यक्ती बैठकीला हजर झाली ते वय म्हणजे सोळा वर्षांची मुलगी. शेवटी सगळा विचार करून रीझनेबल अपेक्षा वीस वर्षं वय असं ठरलं. विशीच्या मुली मात्र बैठकीला हजर राहाण्याचं प्रमाण जरा तरी आहे. मुलगे मात्र आत्तापर्यंत कमीतकमी 22 वर्षं. अशी वयानी छोटी मुलं बैठकीला हजर होण्याच्या बाबतीत अनियमित असतात

कारण त्यांना आणि त्यांच्या आईवडलांना ‘काय घाई आहे?’ असं वाटत असतं.

लग्न एकदाच करायचं तर चांगलं का नाही असा प्रश्न असतो. त्याचं खरं उत्तर असतं ते ऐकून घ्यायची तयारी नसते. स्वतःच्या वैवाहिक आयुष्याचा अभ्यास करायची तयारी नसली तर ‘एकदाच लग्न’ हे खोटं ठरण्याची शक्यता आहे आणि जर अभ्यास केला तर ‘एकदाच लग्न करू, साधं करू, खर्च टाळू, समारंभ टाळू आणि सहजीवनाकडे अभ्यासपूर्वक लक्ष देऊ,’ असं होईल. चांगलं म्हणजे खर्चिक ही व्याख्या कोणी केली?

बहुतेकांना हे विचारही रुचणार नसतील, नुसतंच ‘असं करायचं असतं,’ म्हणून ते समारंभ करत असतील. कित्येकांना आयुष्यात स्टेजवर भाव मारण्याची, स्वतः उत्सवमूर्ती बनण्याची ही एकमेव संधी वाटते, म्हणून समारंभ आवडत असेल. आणखी एक गोष्ट प्रकर्षानी जाणवते. एरवी काही खास गुण किंवा कर्तृत्व माणसात नसेल तर उत्सवमूर्ती बनून कौतुकं करून घेण्याची इच्छा अपुरी राहिलेली असते त्यामुळे समारंभ ठरतात. कौतुकं करून घेण्याची ही एकमेव संधी वाटते. फोटो, नटणं वगैरे हक्कानी, शिवाय दुसऱ्याच्या खर्चानी करता येतं. व्हिडिओफिल्म निघते. जणू सिनेमात काम केल्यासारखं वाटतं. या नटण्यात स्त्री-पुरुष दोघंही असतात पण एकूण स्त्रिया जास्त पुढे असतात.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट तरुण मुली बोलतात. त्या म्हणतात, ‘एवढी शेकडो लोकं लग्नसमारंभात आशीर्वाद देऊन जातात. जेवून जातात, भेटवस्तू, शुभेच्छा देऊन जातात, पण नवराबायकोचं पुढे भांडण झालं, सासरच्यांनी वाईट वागवलं तर त्यांच्यापैकी येतं का कोणी मदतीला? सुनेला छळलं, जाळलं, तरी कोणी मदतीसाठी हजर नसतं. ‘नवराबायकोतला प्रश्न त्यांनी सोडवावा,’ म्हणतात. ह्या चर्चा होत असताना मुलगेही हजर असतात. ते मान डोलवतात, सगळं बरोबर आहे म्हणतात, पण घरी जाऊन आईवडलांना हा मुद्दा पटवून द्यायचा प्रयत्नसुद्धा करत नाहीत. बरेच मुलगे तर आईवडलांना घाबरतात.

अभ्यास मंडळात एक गमतीचा प्रश्न सगळ्यांना विचारण्याचा खेळ असतो. ‘जोडीदार निवडण्याचा निर्णय हा एक महत्त्वाचा टप्पा मानला. लग्नसमारंभ, त्यातले विधी, भेटवस्तू, जेवणावळी, रुसवेफुगवे आणि ‘हनिमून’ पर्यंत दुसरा टप्पा मानला आणि प्रत्यक्ष वैवाहिक आयुष्य, सुखदुःखासकटचा संसार हा तिसरा टप्पा मानला. या तीन टप्प्यांतला सर्वांत महत्त्वाचा, त्याच्या खालोखाल महत्त्वाचा आणि अगदी कमी महत्त्वाचा असे तीन टप्पे क्रमानी सांगा.’ गंमत

अशी की, काहीजण जोडीदार निवडण्याला प्रथम प्राधान्य देतात तर काही जण लग्नानंतरचा संसार सर्वांत महत्त्वाचा म्हणतात. एवढ्या वर्षांच्या अनुभवात लग्नसमारंभाचा टप्पा सर्वांत महत्त्वाचा असं उत्तर एकानीही दिलेलं नाही. प्रत्यक्षात मात्र लग्नसमारंभ हीच सर्वांत महत्त्वाची एकमेव गोष्ट असल्यासारखे सगळे वागतात.

एखादी धंद्यातली भागीदारी चालू झाली तर ती चालू होण्याच्या दिवशी साजरं करण्याजोगं काय असतं? दहा-पंधरा वर्षांनी कदाचित चांगल्या पद्धतीनी धंदा केला तर साजरं करण्याजोगं काहीतरी असू शकेल. तसंच खरं मला लग्न समारंभाच्यावेळी वाटतं. विवाह समुपदेशक म्हणून गेल्या 18 वर्षांच्या अनुभवामुळे असेल पण मला लग्न करणाऱ्या मुलगा-मुलगीकडे बघितलं की वाटतं, हे एकमेकांना आनंद देणार का छळणार हेही माहिती नसताना आज साजरं करण्याजोगं काय आहे? हा तर 'ओपनिंग सेरेमनी' आहे, खरी परीक्षा पुढेच आहे. हा आजचा समारंभ म्हणजे आरंभशूरपणा झाला.

त्याखेरीज दोन निराळ्या कुटुंबांतल्या निराळ्या पार्श्वभूमीच्या दोघांनी सुवर्णमध्य गाठणं महत्त्वाचं आहे. मध्य म्हणजे काय हे लग्न होणाऱ्या दोन व्यक्तींनी शोधायचंय्, पण तो मध्यच हवा. त्या मध्य शोधण्याच्या प्रक्रियेलाच तर विवाह अभ्यास म्हणायचं असतं.

मी लग्नसमारंभांना जाणं सोडून दिलं असलं तरी शोभाला अनेक ठिकाणी लग्नसमारंभांना, कृत्रिम निरर्थक कर्मकांडांना नाइलाजानी जावं लागतं. तिच्याकडून या बाबतीत समाज कुठे पोचला आहे हे मला कळतं. शिवाय समुपदेशनात लोकांचे प्रश्न सोडवताना अनेक गोष्टी कळतात. निरनिराळ्या सजावटींच्या, भारतातल्या राज्यांतल्या अनेक रूढींच्या कल्पना लोकांना टी.व्ही. सीरियल्स आणि सिनेमांमधून कळतात.

त्या सर्व कल्पना योग्य का अयोग्य हा विचार लोक करत नाहीत, त्यात कोण काय सजावट करतं हे मित्रमैत्रिणी सांगतातच, शिवाय 'इव्हेंट मॅनेजर' जास्त खर्चाच्या अनेक कल्पना सुचवतात. एकानी सुचवलेली कल्पना मान्य करून प्रत्यक्षात अमलात आणायची ठरली तर दुसऱ्यानी सुचवलेली कल्पनाही अमलात आणू असा सोपा विचार पैसेवाले लोक करतात. निरनिराळ्या लोकांकडून कळलेल्या सगळ्याच कल्पनांना हो म्हणून ते प्रश्न संपवून टाकतात. 'हम आपके है कौन' सिनेमानंतर नवरदेवाचे बूट लपवणं हा कार्यक्रम आता

कर्मकांडाचाच भाग बनला. राहत्या घराच्या इमारतीवर दिव्यांच्या माळा लावलेल्या दिसल्या की इतरांना कळतं की, इथे काहीतरी खास आहे. कोणीतरी एकानी ती प्रथा पाडली की दुसरा काय मागे राहणार आहे? लग्न असो, मुंज असो, मंगळागौर असो, वाढदिवस असो, इमारतीवर माळा यापुढे अत्यावश्यक रीतभात बनणार यात मला शंका नाही.

भारतीय संस्कृतीत 'अतिथी देवो भव' म्हटल्याचं मला माहिती आहे. घरी आलेला पाहुणा असो किंवा कार्यालयात आलेला पाहुणा असो, तो अतिथीच की! प्रत्यक्षात दृश्य मात्र निराळंच असतं. यजमान दांपत्य तर शेकडो माणसांना नमस्कार करून, हसून, भांबावलेलं असतं. प्रत्यक्ष एवढ्या संख्येनी लोक हजर झाले की त्याची एक प्रकारची जबाबदारी, त्यामुळे दबाव आणि कृत्रिम चांगलं वागण्याची नशा चढलेली असते. त्या झिंग आलेल्या अवस्थेत कोणाचंही आतिथ्य नीट करता येत नाही अशी अपराधी भावना असते. खरंच एवढ्या लोकांचं आतिथ्य करण्याच्या कल्पनेला काही अर्थ उरत नाही. 'सगळं घेतलं का?' असं सगळ्यांना टेप रेकॉर्ड लावल्यासारखं विचारत सुटणं ही एकच गोष्ट त्यांच्या हातात असते. उत्तरासाठी थांबायलाही उसंत नसते. काही पाहुण्यांची गैरसोय झाली, होतेय् असं कळलं तरी यजमान काही करू शकत नाही इतका तो हतबल असतो. काही लोकांना जेवायला बोलावणं हे यादीत असतं. लग्नसमारंभात असे लोक येऊन गेले की रकाना भरला जातो. तेवढंच त्यांना महत्त्व असतं.

काही लोक असा मुद्दा मांडताना मी बघितले आहेत की, लग्नसमारंभांमुळे अनेक गरजूंना काम मिळतं. अर्थव्यवस्थेला चालना मिळते. डेकोरेटर्स, मंडप कॉंट्रॅक्टर्स, केटरर्स, स्वैपाकी, वाढपी, सनई-बँडवाले यांना काम मिळतं त्यावर अनेक कुटुंबं चालतात. पौरोहित्य करणाऱ्या अनेक ब्राह्मणांचे संसार त्यावर चालतात.

यावर काही लोक म्हणतात की, समाजाला मदत करण्यासाठी इतर अनेक मार्ग आहेत की! मला स्वतःला त्यात निराळाच मूलभूत मुद्दा दिसतो. जी गोष्ट समाजहिताची आहे ती करताना जसे अनेकांचे संसार चालतात, तसेच समाजाच्या अहिताची गोष्ट करतानाही अनेकांचे संसार चालतात. मग काय त्या व्यवसायांची बाजू घेऊन मुद्दे मांडायचे का? मला स्वतःला लग्नसमारंभ, कुठचाही खर्चिक कार्यक्रम मुळात समाजाच्या अहिताचाच वाटतो.

लोकांना काम मिळण्याचाच फक्त विचार केला तर भ्रष्टाचाराच्या 'लाएझनिंग'वर भारतात कोट्यवधी संसार चालतात. अमली पदार्थांच्या धंद्यात खूप मोठ्या आर्थिक उलाढाली चालतात. अनेकांना रोजगार मिळतो. चोरीच्या धंद्यामुळे लाखो कुटुंबांचा संसार भागतो. 'स्मगलिंग' हा सुद्धा खूप मोठा धंदा आहे. कोणाचा कारखाना असला, कोणी शाळा, कॉलेज चालवत असलं, कोणी रुग्णालय काढलं तर हा मुद्दा पटण्याजोगा आहे, पण लग्नकार्यालय चालवणं ही समाजसेवा आहे असं कोणी म्हणायला लागलं तर ते मला पटत नाही, माफ करा.

साजरं करणं किंवा 'सेलिब्रेशन' यातली एक कल्पना मान्य करण्याजोगी असते ती म्हणजे 'प्रायव्हेट सेलिब्रेशन'. काहीशे लोकांना बोलावून जे साजरं करणं असतं त्याबद्दल मला नक्की असं वाटतं की जमलेल्यांपैकी काही लोकांना खरा आनंद होतही नसेल. काही लोकांना मनातून मत्सर वाटत असेल. शिवाय त्यांपैकी काहींना आपल्या आनंदाच्या प्रसंगात रस नसेल, काहींना वेळ नसेल हे शक्य आहे. माझ्या मते, ज्या लोकांना आपल्या आनंदाच्या प्रसंगामुळे खरोखर मनापासून आनंद झालेला असेल, ज्यांनी आपल्यासाठी तेवढा वेळ काढलेला असेल अशी संख्येनी फार माणसं असूच शकत नाहीत. फार फार तर दहा-पंधरा. बस्स. बाकीचं सगळं गावजेवण माझ्या मते व्यर्थ आहे.

लग्नानंतर नवराबायको स्वतंत्र राहणार असं ठरलेलं पाहिजे असं माझं मत आहे. सगळ्या रास्त, वास्तववादी, पुरोगामी, आधुनिक, विवेकनिष्ठ, सत्यशोधक विचारसरणीत विभक्त कुटुंबच बसतं. तसं असेल तर मधुचंद्र आणि त्यासाठी कामातून काढलेली रजा, सुटी याची गरजच नसते. मधुचंद्र ही गोष्ट लग्नसमारंभानंतरची असल्यामुळे त्याचा लग्नसमारंभाविषयी बोलताना उल्लेख कशाला, असा प्रश्न काहींना पडेल. प्रत्यक्षात कुठच्या तरी लांबच्या गावचं तिकीट, हॉटेल आरक्षण आधीच करावं लागतं. ते तसं समारंभाआधी केलं असेल तर मोठ्या लग्नसमारंभाचाच तो एक भाग मानायला हवा.

या निकषात बसणारं लग्न असेल किंवा नसेल. समारंभ मोठा, मध्यम किंवा छोटा असला तरी लोकांना काहीतरी संदेश देऊ पाहाणाऱ्या प्रत्येकाचं आपल्याला कौतुक आहे. त्यात तो संदेश कृतीनी दिलेला असला तर जास्त कौतुक आहे. भारतीय जनतेचं विचारप्रबोधन ही जवळजवळ अशक्य अशी मोहीम आहे. त्यात आधुनिकतेच्या प्रवासाला निघालेल्या निम-आधुनिक प्रवाशांचंही स्वागत आहे. शिवाय निराळं काहीतरी कोणी करून बघत असलं तर त्याचंही

मला आणि जीवनसाथ अभ्यास मंडळाला कौतुक आहे. त्याखेरीज त्या स्वतः प्रयोग करणाऱ्यालाही निराळं काहीतरी करून बघितल्यामुळे समाधान वाटेलच. लग्नविधीच्या ज्या अनेक पद्धती आहेत त्यात एक स्वतंत्र 'सत्यशोधक' प्रकारचीही पद्धत असते. मी स्वतः वृत्तीनी सत्यशोधक आहे. मला आत्तापर्यंत कळलेलं सत्य असं आहे की, लग्नबंधनासाठी कुठल्याही विशिष्ट विधींची गरज नाही.

इथे जरा समाजप्रबोधनाचं मूळ तत्त्व सांगतो. लोकांपर्यंत आपला विचार कृतीतून, किंवा शब्दातून पोचवायचा असला, तरी तो आपण स्वतः निमंत्रण देऊन बोलावलेल्या माणसाला पोचेलच असं नाही. निमंत्रणांमुळे आलेल्या नव्वद टक्के लोकांवर अप्रत्यक्षपणी कौतुक करण्याचं बंधन येतंच. नऊ टक्के लोक काहीच बोलणार नाहीत आणि शंभरातला एक माणूस कदाचित काय आवडलं, काय नाही आवडलं ते सांगेल. त्यामुळे प्रबोधनाची योग्य पद्धत सुरुवातीला एकमार्गीच हवी. वर्तमानपत्रातली बातमी, लेख, जाहिरात, लोकांच्यात वाटलेलं पत्रक, टी.व्ही.वरचं आवाहन काहीही चालेल पण समोरासमोर नाही. 'वनवे अपील' या साच्यात ते बसलं पाहिजे. ज्याला ते वाचून बघून संपर्क साधावासा वाटेल तो फोन करेल, ई-मेल करेल, पत्र पाठवेल, प्रत्यक्ष येईल, चौकशी करेल. त्यानंतर जी माणसं प्रत्यक्ष भेटतील तेवढी खरी. अशा प्रकारानी जेव्हा दुतर्फी संवाद प्रस्थापित होईल तेव्हा प्रबोधनाची सुरुवात होईल.

दुसऱ्या कोणीतरी म्हटलेल्या संस्कृत मंत्रांऐवजी मराठी मंत्र बरे. दुसऱ्या कोणीतरी म्हणजे भटजींनी किंवा पँटशर्ट घातलेल्या आधुनिक पुरुषानी यापेक्षा स्त्रीनी म्हटलेले बरे आणि दुसऱ्या कोणी स्त्रीनी किंवा पुरुषानी शपथेचा मजकूर म्हणण्यापेक्षा स्वतः बोललेला त्याहून बरा. असे अनेक प्रयोग लोकांनी आत्तापर्यंत केले आहेत. त्या सगळ्यांचं कौतुक आहे. त्यांनी एक पायरी का होईना, सत्याच्या दिशेनी पाऊल टाकलं.

लग्नसमारंभाचे सगळे फायदे - तोटे आपण बघितले. फायदे फारच कमी आणि तोटे खूप असं असलं तरी कुटुंबाचा, समाजाचा दबाव फार असतो. चुकीच्या गोष्टींना नकार देण्यात आपण किती ठाम राहतो याच्यावर सगळं अवलंबून असतं. मगाशी मी अगदी सुरुवातीला तुम्हाला म्हणालो होतो की, तुम्हाला वाटतंय तसं हे टोकाचं विधान, टोकाची वागणूक नाही, हा फक्त तीव्र अभ्यासपूर्ण विरोध आहे. पूर्वी तरुणपणी मी जेव्हा वैयक्तिक स्वरूपाचा वाद घालण्याची चूक करायचो त्या काळी लग्नसमारंभाच्या बाजूनी आणि लग्नसमारंभाच्या

विरोधात वाद-विवाद व्हायचे.

टोकाची विधानं तेव्हा केली जायची. काही म्हणायचे, लग्नमंडपाच्या दारात आम्ही उभे राहू आणि आलेल्यांना आत जाऊ नका सांगू. समारंभ विरोधकांची आणखी एक कल्पना म्हणजे कार्यालयात असलेले सगळे संडास मुद्दामून बोळे घालून तुंबवून ठेवायचे. आणखी एक कल्पना म्हणजे कार्यालयात जेवणाच्या हॉलमधे बंद पिशवीतून आणून दोन-चार बिनविषारी साप सोडायचे. ते साप लोकांच्या देखत इकडून तिकडे गेले पाहिजेत. आणखी एक कल्पना म्हणजे कार्यालयभर अतिशय घाण वासाच्या कॅप्सूल्स कोपऱ्याकोपऱ्यांत टाकून ठेवणं. असं कोणी प्रत्यक्षात केलं तर त्याला म्हणायचं टोकाचं वागणं.

मी स्वतः खरं म्हणजे गेल्या वीस वर्षांत अशा समारंभांना गेलेलोच नाही. बुद्धीला न पटणारी कृत्रिम आणि चंगळवादी अशी कुठचीही गोष्ट मी तत्त्व म्हणून टाळतो. माझी बायको शोभा तिच्या स्वभावामुळे आणि गरवारे बालभवनच्या संचालक पदावर असल्यामुळे नाइलाजानी अशा अनेक ठिकाणी जाते. घरी आल्यावर मला सांगते, ''तुझ्यासारखं मला करता आलं असतं तर किती छान झालं असतं.'' त्या समारंभाचं वर्णन मला सांगते, पुढच्या वेळेला न जाण्याची इच्छा व्यक्त करते आणि पुढच्या कुठल्यातरी समारंभात पुन्हा नाइलाजानी हजर असते. समारंभांची एक एक वर्णनं माझ्या कानावर येतात. घरातली ज्येष्ठ मंडळी त्यांच्या रीतीच्या कल्पनेप्रमाणे समारंभाचा आग्रह करतात.

अनेकजण मध्यमवयीन आयुष्याच्या मध्यावर असल्यामुळे 'पहिलंच कार्य, शेवटचं कार्य' अशी स्वतःची समजूत घालत खर्चाच्या सकट सगळे अत्याचार बिचारे सोसतात. तरुण पिढीला सिनेमे आणि टेलिव्हिजन दोघं मिळून खर्च करण्याच्या नवीन नवीन रीतीरिवाजांची माहिती देतात आणि थोडक्यात प्रत्येक समारंभामधे जगभराच्या तमाम कल्पना राबवून चंगळवादाचं टोक गाठलं जातं.

पृथ्वीचा एवढ्या प्रमाणात ऱ्हास, पैशाचा अपव्यय, वेळेचा अपव्यय ह्या सर्व दृष्टिकोनातून तत्त्वज्ञानाला ह्या सर्वच्या सर्व गोष्टी अमान्य आहेत आणि तरी कुणीच काही बोलत नाही, कारण ज्यांचं अनुकरण करायचं असे लोक म्हणजे पुढारी, श्रीमंत उद्योजक, नट-नट्या, खेळाडू अशा लोकांना आपली जबाबदारी समजत नाही. ते जर उधळपट्टी करत राहिले तर त्यांचं अनुकरण करणारे जास्त जास्त उधळपट्टी करत राहतीलच आणि त्या मध्यमवर्गीयांचं अनुकरण करणारे गरीब लोक स्वतःहून त्या सापळ्यात अडकतील. तत्त्वचिंतनाच्या दृष्टिकोनातून ही

सगळी वाट बरबादीची आहे.

मी मगाशी म्हणालो होतो की, मी गेल्या 20-25 वर्षांत कुठल्याही लग्नसमारंभाला गेलेलो नाही. तरी देखील आत्तापर्यंत चार अपवाद घडलेले आहेत. एकदा शोभाच्या अमेरिकेतल्या मोठ्या भावाच्या मुलीच्या लग्नाला आम्ही तिथेच असल्यामुळे मी गेलो होतो. बाकी सगळे तिकडे लग्नघरी जाणार होते आणि मी एकट्यानी घरी राहाणं योग्य झालं नसतं. दुसरा प्रसंग अमेरिकेतला आमचा नातेवाईक भारतात अगदीच थोड्या दिवसांसाठी आला होता. त्याची आणि दुसऱ्या एकाची गाठ घालून द्यायची होती. प्रत्यक्ष कार्यालयात भेट घेण्याखेरीज मार्गच नव्हता म्हणून. तिसरा प्रसंग– आमच्याकडे एक अमेरिकन पाहुणा बारा-पंधरा दिवस राहायला आला होता. त्याला भारतीय लग्नसमारंभ बघायचा होता. तो दाखवायला मी माझ्या ओळखीच्यांच्या लग्नसमारंभात त्याला घेऊन गेलो होतो. चौथा प्रसंग– आभाचं आमच्याच घरातलं छोटेखानी लग्न. शोनीलचं लग्न छोटंच होतं, पण इंग्लंडमधे होतं. त्यानी दुसऱ्या दिवशी आम्हाला फोनवर कळवलं.

आणखी एक प्रसंगात निराळ्या प्रकारचा अपवाद मला करावा लागला. माझ्या व्यवसायातल्या एक चांगल्या ओळखीचे गृहस्थ बायकोसकट मुलाच्या लग्नाचं निमंत्रण करायला आले. अनेक वर्षांपूर्वीची असली तरी माझी त्यांच्या सगळ्या कुटुंबाशी चांगली ओळख होती. ते मूळचे महाराष्ट्रियन नव्हते, पण पुण्यात एवढी वर्षं काढल्यामुळे व्यवस्थित मराठी बोलायचे. त्यांचे सांस्कृतिक रीतिरिवाज मात्र निराळ्या राज्यातले आणि पूर्ण निराळेच होते. अनेक वर्षांनी गाठ पडली. गप्पा, चहा-बिस्किटं चालू असताना माझ्या डोक्यात या जोडप्याला मी लग्नसमारंभाला का येऊ शकत नाही, त्याची कारणं सांगायची का नाही याबद्दल विचार चालू होते. मी समाजपरिवर्तनाचा वसा घेतला असला तरी तो शहरी, मराठी भाषिक आणि मध्यमवर्गीयांच्या प्रबोधनाचा आहे. हे लोक या तीनही वर्णनांच्यात बसत होते, पण सांस्कृतिक अर्थानी भिन्न होते. मी त्यांच्याशी काहीच बोलायचं नाही असं ठरवलं. प्रत्यक्षात लग्नसमारंभाला मी जाणार नव्हतो आणि गेलो नाहीच. मी याला अपवाद म्हणतोय् तो स्पष्ट कारणासकट दिलेल्या नकाराबद्दलच्या अपवादाबद्दल. एरवी मी स्पष्टपणी खरं कारण सांगूनच नकार देतो. तेव्हा माझ्या मते मी खोटं वागलो.

●

11) रास्त पद्धतीचे विवेकनिष्ठ प्रयत्न

विषयाचं महत्त्व लक्षात घेऊन पुन्हा एकदा या मुद्द्यांचा सारांश इथे देतो. फक्त 18 मुद्दे आहेत.

1) लग्नात सहजीवनाकडे दुर्लक्ष होतं त्यासाठी अभ्यास गटात जायला लागावं.
2) लग्नासाठी कर्ज काढू नये.
3) न परवडणारा डामडौल नको. पैशानी, श्रमानी आणि वेळेनी काही गोष्टी परवडण्याजोग्या नसतात.
4) चुकीच्या प्रथांचा त्रास शेवटी गरिबांना होतो.
5) लग्न करताना एकूण समाजाचा विसर पडायला नको.
6) लग्नसमारंभात इतका खर्च करण्यापेक्षा ते पैसे मुलीच्या नावावर ठेवावेत. तिला ते लागण्याची खूप शक्यता असते.
7) लग्न कसं करावं यात नवरा-नवरीचं मत विचारावं. घरातल्या दोन पिढ्यांच्या मतात फरक असू शकतो.
8) नवरा-नवरी जाणते असतात. त्यांनीच निर्णय घ्यावेत.
9) लैंगिक शिक्षण लग्नाआधी घ्यायचं असतं हे लक्षात ठेवावं.
10) न कळणारे मंत्र म्हणून संस्कार होत नाहीत.
11) ज्यांना जेवायला मिळत नाही त्यांना आधी जेवण द्यावं.
12) मानपान म्हणजे दुसऱ्याची अडवणूक आहे, ही माणुसकी नव्हे.
13) हुंडा म्हणजे मेहनत न करता मिळवलेला पैसा. याला चोरी, भ्रष्टाचार, पिळवणूक म्हणता येईल.
14) लग्नसमारंभाची सध्याची पद्धत पर्यावरणासाठी हानिकारक आहे.
15) साधेपणानी लग्न करणारे काही लोक असतात, त्यांच्याशी बोलून तरी बघावं, चर्चा करावी.
16) लग्नाला बोलावलं, लग्नाला गेलं म्हणजे प्रेम सिद्ध होत नाही. अडचणीच्या वेळी पाठीशी उभं राहणं म्हणजे प्रेम.
17) आपलं काम सोडून किती लग्नांना जायचं? आपल्या कुटुंबाच्या वेळेचं फॅमिली बजेट ठरवावं.

18)या वर सांगितलेल्या 17 गोष्टी पाळणं म्हणजे टोक नाही, मध्य आहे.

एवढ्या निरनिराळ्या गोष्टी सांगितल्यावर माझ्याबद्दल आणि शोभाबद्दल सांगणं गरजेचं आहे. मी आणि शोभानी अशा प्रकारे लग्न केलं आणि असं वैवाहिक आयुष्य जगलं आहे. आमचं लग्न अर्ध्या मिनिटांत नोंदणी पद्धतीनी सह्या करून उरकलं, त्यासाठी कामावरून रजासुद्धा आम्ही काढली नव्हती कारण जेवणवेळेत सह्या उरकल्या. हुंडा नाही, खरेदी नाही, दागिने नाहीत, मंगळसूत्र नाही, अंगठी नाही, सोनं-चांदी, मोती, हिरे यांच्या दगिन्यांचा संबंधही नाही, खास पोषाख नाही, जेवणंच काय, चहापानही नाही. साहजिकच पाहुणे नाहीत, भेटवस्तू नाहीत, मानपान नाहीत, रुसवा-फुगवा नाही, काहीच नाही. विधी नाही, अग्नी नाही, मंत्र नाही, प्रदक्षिणा नाही, फुलं, हार, मंगलाष्टकं काहीच नाही.

यामुळे आमचं आयुष्यात काहीही बिघडलं नाही, याची जरूर कधीही भासली नाही, कारण उघड आहे. समृद्ध वैवाहिक आयुष्य आणि ही अशी विवाहसमारंभविषयक कर्मकांडं, रूढी, चालीरिती, परंपरा यांचा काही संबंधच नाही. आम्ही दोघांनी पुढे बऱ्याच प्रमाणात संतुलित संसार केल्यामुळे त्यावेळेला काही नातेवाइकांची मनं थोडी दुखावून सुद्धा आमचे आमच्या दोघांच्या सासरच्यांशी संबंध चांगलेच राहिले.

एवढ्या सगळ्या गोष्टी ऐकल्यावर मला काही लोकं विचारतात, 'कोणाचं लग्न झालं तर तुम्हाला आनंद होत नाही का?' या प्रश्नाचं खरं उत्तर 'नाही' असंच आहे. एक तर मी वैवाहिक आणि एकूण जीवनाचा अभ्यासक आहे. आकडेवारी मला सांगतेय की, संपूर्ण भारताच्या आकडेवारीत समाधानकारक आयुष्य जगणारे फक्त तीन टक्के लोक आहेत. फक्त मध्यमवर्गीयांचा विचार केला तरी निम्म्याच्या आसपास विवाह फसलेले आहेत. ही घटस्फोटांची आकडेवारी नाहीय्. विसंवादी लग्नांची आहे. एवढी माहिती असल्यामुळे आत्ता लग्न करणारी दोघंजण एकमेकांचं भलं करतायत् का बुरं हेच मला माहिती नसेल तर आनंद कशाचा होईल?

माझ्या मते सण, समारंभ, उत्सव त्यात लग्नसमारंभ ही एक नशा आहे आणि या नशेचा अंमल असताना माणसाला सारखे झटके येण्याचा रोग जडतो. अर्धांगाचा झटका आणि हा झटका यात फार फरक नाही. दारूची, अफूची,

कोकेनची नशा आणि ही नशा यातही फार फरक नाही. कारण स्वतःच्या वागणुकीवर ताबा नसणं म्हणजेच नशा.

माझ्या मानसशास्त्राच्या अभ्यासात किती लोक एकत्र जमले की बोलणाऱ्या, वागणाऱ्या व्यक्तीवर काय परिणाम होतो याचा 'ग्रुप डायनॅमिक्स' शीर्षकाखाली सविस्तर उल्लेख केलेला आढळला. 15 लोकांच्या वर संख्या जमली की कोण काय बोलतंय याकडे लक्ष देणं कठीण जातं त्यामुळे बोलणारा माणूस 'जनतेशी' संवाद साधायला लागतो. त्याहून जास्त म्हणजे 30 पेक्षा जास्त लोक जमले की तो 'जनसमुदाय' या व्याख्येत जातो आणि खरं वागणं, खरं बोलणं बंद होतं. तो थेट जाहीर समारंभ किंवा उत्सवच बनतो. हे सगळं लग्नसमारंभ या विषयाच्या संदर्भात बघितलं तर असं आढळतं की, लग्नसमारंभ छोटा का मोठा ठरवण्याचे काही सोपे निकष आहेत, ते तपासावेत म्हणजे आपण स्वतः काय करतोय ते कळतं.

1) घराबाहेर कार्यालयात, शेतावर बाहेरच्या जागेत लग्नसमारंभ केला की तो मोठा समारंभच समजायचा. किती माणसं बोलावली, आली या आकड्याला फार काही महत्त्व नाही. ती संख्या घरात मावण्याजोगी नव्हती म्हणजे समजलं सगळं.
2) लोक बोलावण्यासाठी पत्रिका छापखान्यातून छापवून घेतल्या याचाच अर्थ हातानी लिहिण्याजोगा मजकूर नव्हता. संख्या जास्त होती.
3) लग्नसमारंभासाठी बाहेरगावाहून मुद्दामून प्रवास करून मित्र, नातेवाईक आले तर ते यजमानाच्या खर्चानी किंवा स्वतःच्या खर्चानी, पण कुठेतरी राहणार आणि एकूण योग्य नसलेला कोणाचा तरी खर्च होणारच. 'साजरं करणं' योग्य का नाही हाच वादाचा विषय असल्यानी तो खर्चही अयोग्यच. दर महिना खर्चाच्या दहा टक्के जास्तीचा खर्च नैमित्तिक आणि कौटुंबिक आणिबाणीसाठी सारासार विचारात बसतो, पण त्यापेक्षा जास्त खर्च होत असला तर तो मोठा समारंभ याच विचारगटात जातो.

ज्यांचा पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कल्पनेवर विश्वास आहे, त्यांच्यासाठी खास सांगतो, मोठा, खर्चिक लग्नसमारंभ साजरा करणं म्हणजे पाप करून नरकात जाण्याचा मार्ग आहे.

●●●

4

विवाहाच्या लेखी कराराची कल्पना

एक समुपदेशक म्हणून, पुरोगामित्वाच्या वाटेवरची एक आघाडीवरची व्यक्ती म्हणून, गेली पंचावन्न वर्षं अनेकांचे तोंडी, लेखी व्यवहार बघून, बहात्तर वर्षांचा एक अनुभवी माणूस म्हणून, विवाह अभ्यास मंडळ या कल्पनेचा आणि चळवळीचा जनक म्हणून, जनमानस प्रतिष्ठान या संस्थेचा ट्रस्टी म्हणून आणि शेवटी 'जीवनसाथ'चा प्रमुख म्हणून मी असं स्पष्टपणी म्हणतोय् की कुठच्याही 'तोंडी' गोष्टीवर माझा विश्वास राहिलेला नाही. तोंडी बोललेली गोष्ट मनापासून आणि खरी असेल तर ती लिहून काढा आणि करा सही.

विवाहाचा लेखी करार कशासाठी असा अजूनही अनेकांना प्रश्न पडलेला असणार. त्याची उत्तरं देण्याचा प्रयत्न करतो.

1) मानसशास्त्रामधल्या संशोधनात असं आढळलेलं आहे की एखादा विचार नुसता ऐकायचा असला तर त्यासाठी आपल्या मेंदूत अगदी थोडीशी हालचाल होते. त्याच विषयातल्या त्याच मुद्द्याबद्दल आपल्याला जे समजलंय् ते आपल्या शब्दात बोलायचं असलं तर दहा पट हालचाल मेंदूत होते. जे तुम्ही आता बोललात ते रेकॉर्ड करून ठेवूया ठरवलं की माणूस आणखी दहा पट स्पष्ट आणि विचार करून नीट मुद्देसूद बोलतो आणि हेच सगळं रेकॉर्ड केलेलं स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून काढून त्यावर सह्या करा म्हटलं की, आणखी दहा पट जबाबदारीनी मजकूर लिहितो. थोडक्यात नेहमीच्या अघळपघळ नुसत्या ऐकण्यापेक्षा हजार पट अचूक आणि जबाबदारीनी माणूस विचार करतो.
2) प्रत्येक माणसाची पार्श्वभूमी निराळी, संस्कार निराळे मग सगळ्यांना लागू

असा करार कसा तयार करता येईल हा एक पडलेला प्रश्न असतो. त्याचं उत्तर असं आहे की, जगात एवढे कोट्यवधी लोक आहेत तरी मानसशास्त्रज्ञांनी त्यांच्या स्वभावाचे मोजण्याजोगे प्रकार शोधून काढलेच की! ८5% अचूकतेनी माणसाचा स्वभाव या चाचण्यांद्वारे कळू शकतो. प्रत्येक माणूस वेगळा असतो हे मान्य असल्यामुळे तर हे उरलेले 15% सोडले आहेत.

3) आणखी एक असा प्रश्न असतो की, शपथ जशी एकदा घेऊन संपली की विसरायची मोकळीक असते, मंत्र एकदा म्हणून झाले की त्यांची काही नोंद नसते, बंधन वाटत नाही, तसं या कराराचं कशावरून होणार नाही? त्याचं उत्तर असं की, एक तर हा करार 'छापील करारामधल्या नावांच्या जागी तुमचं नुसतं नाव लिहा' प्रकारचा नाही. थोडक्यात गाळलेल्या जागा भरा या प्रकारचा हा करार नसल्यामुळे कितीही सविस्तर, तपशीलवार, कितीही पानी असू शकतो.

4) या करारावर नवरा-बायकोच्या 2 सह्या ही अत्यावश्यक गरज मानू. पण निर्णयामधे मुलामुलीचे आई-वडील, भाऊ-बहीण, कोण जे जबाबदार आणि हजर असतील त्या सगळ्या लोकांच्या खाली सह्या असतील. त्या प्रत्येकाकडे याची एक प्रत राहील.

5) ह्या कराराचा मसुदा नवरा-बायकोनी वेळ घेऊन सावकाश महिना-पंधरा दिवसांत करायचा आहे. एकदम सगळ्या गोष्टी सुचणारही नाहीत.

सध्याच्या परिस्थितीत लेखी स्वरूपात प्रश्नावली भरून पाठवायलाही लोक टाळाटाळ करतात. कुठचंच आश्वासन नको म्हणजे पुढे पाहिजे तसं वागता येईल असं अनेकांना मनातून वाटत असतं. तोंडी आश्वासनाची जिथे तयारी नसते तिथे लेखी तर फार दूरची गोष्ट. प्रत्यक्षात प्रश्नावलीची लेखी देवाण-घेवाण ही विवाहाच्या कराराची पूर्वतयारी मानायला हरकत नाही.

बांधकाम क्षेत्रामधे चांगल्या कामांसाठी एका खूप महत्त्वाच्या गोष्टीचा आग्रह असतो. इमारत प्रत्यक्ष बांधण्यापूर्वी त्याच्या कागदावरच्या आराखड्यात कितीही बदल केले तर जास्तीतजास्त नुकसान होईल ते म्हणजे थोडा वेळ जाईल, किंचित पैसे खर्च होतील. पण प्रत्यक्ष बांधकाम चालू झाल्यावर त्यात थोडा बदलदेखील संबंधित सगळ्यांसाठी खूप अडचणींचा, खर्चाचा आणि मनस्तापाचा ठरतो. तसंच लग्नाचं आहे. कायद्यानी नोंदणीवर सह्या करण्यापूर्वी

कितीही चर्चा केल्या तरी त्यापासून होणारं नुकसान कमी आहे. विवाहाची इमारत बांधायला सुरुवात झाली की मग बदल फार कठीण आहे.

एक मानसशास्त्रातला महत्त्वाचा नियम सांगतो. ज्या ठिकाणी पर्यायी वाट शिल्लक आहे अशी खात्री आहे तिथे जायला माणूस कमी घाबरतो. बहुतेक वेळा अजिबातच घाबरत नाही, तो स्वस्थ असतो. याउलट जिथे एकदा गेलं की तिथून बाहेर पडता येणार नाही अशी तंबी असेल तर तिथे जायला तो कचरेल. त्यामुळे या करारातून मोकळीक हवी असली तर त्याच्याही अटी मान्य करुन लिहिलेल्या हव्यात.

या विषयावरच्या प्रत्यक्ष चर्चेत कळलं की, असेही नवरे अस्तित्वात आहेत की जे कुठच्याच तोंडी, लेखी कराराला मानत नाहीत. त्याबद्दल मात्र अशा प्रकारचा सरकारी कायदाच त्यांना वठणीवर आणू शकेल असं वाटतं.

नमुन्यासाठी दोन 'विवाहाचे करार' पुढे दिले आहेत. त्यावर सह्या करताना मुलगा-मुलगी दहादा तरी विचार करतील. विचार करतील ना? मग माझं काम झालं. विचार हाच तर मुख्य उद्देश आहे. हे दोन्ही करार प्रत्यक्षात झाले नव्हते. कराराची कल्पना स्पष्ट करण्यासाठी हे करार लग्नानंतर अनेक वर्षांनी मुद्दामून लिहून काढले आहेत.

विवाहाचा लेखी करार- नमुना क्र. 1

या खाली दिलेल्या करारात लग्न करणारी मुलगी शोभा अनंत कोडोलीकर (जन्म तारीख 29 ऑगस्ट 1947, या आधीचा पत्ता– द्वा. अनंत हरी कोडोलीकर, स्वातंत्र्य सदन, जांभळी नाका, ठाणे) आहे. तिचा उल्लेख या करारात शोभा असा केलेला आहे.

या करारात लग्न करणारा मुलगा अनिल रामचंद्र भागवत (जन्मतारीख 30 सप्टेंबर 1944, या आधीचा पत्ता 4/13 शहा बिल्डिंग, भगत गल्ली, कटारिया मार्ग, माहीम, मुंबई 16) आहे, त्याचा उल्लेख या करारात अनिल असा केलेला आहे.

पार्श्वभूमी

मे 1968 मधे शोभा आणि अनिल यांची पत्ररूपानी ओळख झाली. शोभाचा भाऊ सुरेश अनंत कोडोलीकर आणि अनिल वॉटफर्ड, इंग्लंड इथे

एकत्र राहात होते. अनिल आणि सुरेश यांची 1958 सालापासून ओळख होती. त्या काळी अनिल, कृष्ण सदन, नौपाडा, ठाणे इथे राहात असे. त्याच मजल्यावर श्री बा. गं. चितळे हे मो. ह. विद्यालय, ठाणे इथे शिकवणारे शिक्षक राहात असत. त्यांच्याकडे सुरेश काही विषय शिकण्यासाठी नियमितपणे यायचा. तिथे अनिल आणि सुरेश यांची प्रथम ओळख झाली. त्यानंतर अनिल आणि सुरेश जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, बोरीबंदर, मुंबई इथे 5 वर्ष एका वर्गात शिकले. 1960 ते 1965 या पाच वर्षांत अनिल एकदा सुरेशच्या घरी कुठच्यातरी निमित्तानी आला होता तेव्हा अनिल आणि शोभा यांची ओझरती एका मिनिटाची ओळख झाली होती. पण मे 1968 मधे पत्रव्यवहार चालू होईपर्यंत त्यांची पुन्हा कधी प्रत्यक्ष गाठ पडली नव्हती. जुलै 1969 मधे अनिल इंग्लंडमधून नोकरी करण्यासाठी फिलाडेल्फिया यू.एस.ए. इथे गेला आणि सुरेश इंग्लंडमधेच राहिला.

जुलै 1969 पासून ठिकाण बदललं तरी अनिल आणि शोभा यांचा पत्रव्यवहार चालूच राहिला. अनिलवर लहानपणापासून आधुनिकतेचे, पुरोगामित्वाचे संस्कार होते आणि वृत्तीमधे सामाजिक प्रथा मोडण्याची बंडखोरी होती. सुरेशला या गोष्टीची कल्पना होती. शोभावर पारंपरिकतेचा पगडा होता आणि तरी अनिलचे विचार शोभाला चांगले वाटत होते. निरनिराळ्या अनिष्ट सामाजिक प्रथा बदलण्याबद्दल कल्पना अनिलच्या पत्रात मांडलेल्या असायच्या आणि शोभाच्या पत्रात तिच्या कुटुंबाबद्दल माहिती आणि स्वतःच्या आवडीनिवडी लिहिलेल्या असायच्या.

साधारण जानेवारी 1970 मधे शोभानी पत्रातून अनिलशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. अनिलला शोभा चांगली वाटत होती पण त्याच्या दृष्टीनी असा निर्णय घाईनी घेऊ नये असं होतं. प्रत्यक्ष भेटल्याशिवाय आणि अनेक तपशीलांवर पुन्हा चर्चा केल्याशिवाय असा निर्णय कसा घेता येणार, असा अनिलचा प्रश्न होता. ‘प्रत्यक्ष भेटीसाठी भारतात विमानानी येण्याजाण्याइतके पैसे खरचणं इतक्यात तरी शक्य नाही. त्यामुळे तत्वतः कल्पना मान्य असली तरी ती प्रत्यक्षात आणायला अजून एक-दोन वर्षं लागतील.’ असं अनिलनी कळवलं. शोभाला हे स्वतःला मान्य नव्हतं, तिच्या कुटुंबालाही चाललं नसतं, आणि गैरसोयीचं झालं असतं. शोभाची एप्रिल 1970 मधे एम. ए. ची फायनल परीक्षा होती. ती संपल्यावर प्रत्यक्ष भेटीसाठी सुरेशकडे इंग्लंडला म्हणजे मधल्या

अंतरावर शोभा येऊ शकली असती. पण असा महत्त्वाचा निर्णय अधांतरी ठेवायला शोभा आणि कोडोलीकर कुटुंब अजिबात तयार नव्हतं.

त्याखेरीज कोडोलीकर कुटुंबासमोर आणखी एक अडचण होती. सुरेशच्या मते, अनिल आणि शोभा यांचं अजिबात जुळलं नसतं त्यामुळे शोभानी अनिलच्या भानगडीत पडू नये. शोभा मात्र तिच्या इच्छेवर ठाम होती.

फिलाडेल्फियात अनिलचा एक जवळचा मित्र यशवंत कानिटकर होता. ते एकाच फ्लॅटमधे आणि नंतर शेजारी राहात असल्यामुळे अडचणीच्या प्रसंगी अनिल यशवंतच्या सल्ल्यावर अवलंबून होता. तो वयानी 10-12 वर्षांनी मोठा, विवाहित आणि 2 मुलांचा बाप असल्यामुळे अनुभवी होता. त्यानी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या, त्या खाली इथे नमूद केल्या आहेत. त्या गोष्टींमुळेच अनिलनी शोभाच्या लग्नाच्या प्रस्तावाला होकार दिला.

1. खरोखर संपूर्णपणे मनाजोगा असा जोडीदार नसतोच.
2. आपल्या जोडीदाराला आपण आवडणं आपल्या दृष्टीनी महत्त्वाचं आहे.
3. दोन निराळ्या कुटुंबांमधून आलेल्या मुलगा-मुलगी यांच्यावरचे संस्कार निराळेच असणार. प्रत्यक्ष रोजच्या आयुष्यात मध्यच काढावा लागतो.
4. वैवाहिक आयुष्यातलं सुख उत्तम लैंगिक संबंधावर अवलंबून असतं आणि ती एक गोष्ट भारतीयांना लग्नाआधी तपासता येत नाही.
5. सुरेश आणि यशवंतही एकमेकांना ओळखायचे. सुरेश हुशार आहे तशीच त्याची बहीणही हुशार असेल असं धरून चालायला हरकत नाही. तिच्या पत्रांवरूनही तसं वाटतंय्.

कोडोलीकर कुटुंबानी त्यांच्या परीनी भागवत कुटुंबाची चौकशी केली आणि भागवत कुटुंब मध्यमवर्गीय सरळमार्गी असल्याची खात्री करून घेतली. शोभाच्या आईची निर्णयाची सगळी मदार नवऱ्यावर होती. शोभाच्या वडलांच्या दृष्टीनी अनिलच्या आईला आणि वडलांना बरीच भावंडं होती हे महत्त्वाचं होतं. संपूर्ण कोडोलीकर कुटुंब आणि भागवत कुटुंब एकमेकांकडे जाऊन आले आणि दोन्ही कुटुंबांनी समाधानानी होकार दिला. अनिलचा साखरपुड्याला विरोध माहिती असल्यामुळे दोन्ही कुटुंबांनी अनिलला न कळवता दोघांचा साखरपुडा-समारंभ करून टाकला. कोडोलीकर कुटुंबाला मात्र स्वस्थ वाटण्यासाठी साखरपुडा

महत्त्वाचा होता.

अशा तऱ्हेनी एप्रिल 1970 मधे परीक्षा संपल्याबरोबर शोभा आणि अनिल यांनी एकमेकांशी लग्न करायचं ठरलं. शोभा प्रवास करून आधी सुरेशकडे इंग्लंडमधे 2-4 दिवस राहणार आणि मग फिलाडेल्फियात येऊन अनिलकडे राहून, नोंदणी पद्धतीनी लग्न करणार असं ठरलं. या पार्श्वभूमीवर-

आज 29 मे 1970 रोजी शोभा अनंत कोडोलीकर आणि अनिल रामचंद्र भागवत एकमेकांशी लग्न करत आहेत. फिलाडेल्फिया यू.एस.ए. इथल्या विवाह नोंदणीच्या पद्धतीप्रमाणे 'मॅरेज सर्टिफिकेट' बनेलच पण त्यावर सह्या करण्यापूर्वी शोभा आणि अनिल या करारपत्रावर सह्या करत आहेत. एकमेकांनी वैवाहिक आयुष्यातली विचारसरणी आणि वागणूक याबद्दल काही पद्धत पक्की केली आहे. त्यातले मुद्दे असे–

या लग्नाप्रीत्यर्थ कसलाही समारंभ, जेवणावळी, आनंदोत्सव, पार्टी असं काहीही नसेल. यापुढेही संसारात समारंभ नावाची गोष्ट नसेल. अनेक वर्षांपासून अनिल निरीश्वरवादी, निधर्मी, जातपात या कल्पनांचा विरोधक, कर्मकांडविरोधी, समारंभविरोधी आहे आणि शोभाला ते पसंत आहे. तरीदेखील रोजच्या प्रत्यक्ष वागणुकीच्या तपशीलांबद्दल दोघांना स्वातंत्र्य असेल.

1. शोभानी लग्नानंतर आडनाव बदलायचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे ती स्वतःचं नाव शोभा अनिल भागवत असं लावेल.
2. संपूर्ण आयुष्य स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वांनी जगायचं हे अनिल आणि शोभा दोघांनाही मान्य आहे.
3. शोभानी लग्नानंतर स्वतःची करिअर शोधावी आणि त्यात समाधान मिळवावं ही गोष्ट अनिल आणि शोभा दोघांनाही मान्य आहे.
4. अनिलला जमेल तेव्हा स्वतःचा व्यवसाय चालू करायचा आहे. तो अमेरिकेत शक्य नसल्यामुळे जेवढ्या लवकर जमेल तेव्हा कायम वास्तव्यासाठी भारतात परत जायचं हा निर्णय दोघांना मान्य आहे. त्याआधी पुरेसे पैसे जमणं मात्र आवश्यक आहे. पुरेसे म्हणजे 2 लाख रुपये.
5. शोभाची तब्येतीची कसलीही तक्रार नाही. अनिलला गेल्या 12-13 वर्षांपासून अर्धशिशीचा त्रास आहे. महिन्यातून एक -दोन दिवस अनिलला डोकेदुखीचा, उलट्या वगैरेंचा त्रास होतो. पण इतर कोणी त्याच्यासाठी सेवा

करण्याची जरूर पडत नाही.

6. भारतात परत गेल्यावर अनिल आणि शोभा अनिलच्या आईवडलांबरोबर न राहता विभक्त कुटुंबात राहतील.

7. परदेशातल्या वास्तव्यात मूल होऊ नये यावर अनिल-शोभा यांचं एकमत असल्यामुळे गर्भप्रतिबंधक साधनांचा वापर शोभानी करायचा असा निर्णय झालेला आहे. ठाण्याच्या ओळखीच्या डॉक्टरच्या सल्ल्यानी शोभा आधीपासूनच गर्भप्रतिबंधक साधनांचा वापर करते. यापुढे ती साधनं संपल्यावर फिलाडेल्फियामधल्या डॉक्टरच्या सल्ल्यानी पुढे गर्भप्रतिबंध करावा लागेल हे दोघांना मान्य आहे.

8. कुटुंबनियोजन किंवा गर्भप्रतिबंधक साधनांचा वापर थांबल्यावर तब्येतीचा काही प्रश्न नसेल असं धरून चालून अनिल आणि शोभा यांची इच्छा अशी आहे की दोन मुलांना जन्म द्यावा. मुलगा किंवा मुलगी याबद्दल दोघांचं काही म्हणणं नसेल.

9. हवी तेवढी मुलं झाल्यावर लवकरात लवकर नसबंदीची शस्त्रक्रिया अनिल करून घेईल.

10. मुलांचा चांगल्या पद्धतीनी सांभाळ करता यावा म्हणून अनिल स्वतःच्या व्यवसायाच्या वेळा शोभाच्या करिअरमधल्या सोयीनी ठरवेल. दोघांच्या पार्टटाईम करिअरमधून मध्यमवर्गीय स्वस्थ आयुष्य जगण्याजोगी प्राप्ती नक्की होईल.

11. कोडोलीकर कुटुंबाची जांभळी नाक्याजवळ ठाण्यात दोन घरं आहेत. एक जुन्या भाड्याची जागा आहे आणि दुसरी चार खोल्यांची नवीन बांधलेली जागा आहे. शोभाचे आईवडील, 2 भाऊ ठाण्यात आणि 1 भाऊ इंग्लंडमधे, एवढं कुटुंब आहे.

12. स्वावलंबनाच्या तत्वनिष्ठेमुळे अनिल या कोडोलीकरांच्या जागेवर तर कधी हक्क सांगणार नाहीच, याशिवाय अनिलचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष हुंड्याला सक्त विरोध असल्यामुळे कोडोलीकर कुटुंबाकडून काहीही न घेण्याचा अनिलचा आग्रह आहे. बऱ्याच वादविवादानंतर कोडोलीकर कुटुंबानी तो मान्य केलेला आहे. कुठचीही वस्तू, कपडे, दागिने अनिल स्वीकारणार नाही आणि भागवत कुटुंबियांनीदेखील कोडोलीकर कुटुंबियांना कुठचीही वस्तू, कपडे, दागिने द्यायचे नाहीत हे दोन्ही कुटुंबांनी मान्य केलेलं आहे.

13. अनिलला आई-वडील आणि दोन बहिणी आहेत. शहा बिल्डिंग, माहीम इथला फ्लॅट भाड्याचा आहे आणि त्याच्या एक तृतीयांश हिश्शाची मालकी आईवडलांच्या पश्चात अनिलकडे असेल. याबद्दल अनिलचं आईवडलांशी बोलणं झालेलं आहे, लेखी करार झालेला नाही. शनिवार पेठ, पुणे इथे भागवतवाडा आहे, तो चांगल्या अवस्थेत नाही. तिथे अनिलच्या वडलांचे वडील एकटे राहतात. त्यांना भाऊ-बहीण नाही, अनिलच्या वडलांना भाऊ नाही. योग्य वाटलं तर शनिवार पेठेतल्या वाड्यात अनिल शोभा रहायला जाऊ शकतील. अनिल एकटा पुरुष वारस असल्यामुळे योग्य त्या कायदेशीर तरतुदी करून तो वाडा अनिलच्या एकट्याच्या मालकीचा होऊ शकेल.

14. अनिल आणि शोभा एकमेकांच्या अडचणीच्या काळात परस्परांना श्रमाची, पैशाची, भावनिक आधाराची साथ देतील, थोडक्यात संपूर्ण 50%-50% भागीदारी हा अर्थ दोघांनाही समजलेला आहे आणि मान्य आहे.

15. अनिल आणि शोभा दोघंही आयुष्यभर लैंगिक संबंधांबाबत एकमेकांशी एकनिष्ठ राहतील. ही वैवाहिक आयुष्यातली महत्त्वाची बाब दोघांना समजली आहे आणि मान्य आहे.

16. छोटे छोटे वैवाहिक विसंवाद सगळ्याच जोडप्यांमधे होतात. त्यात अनिल आणि शोभानी तर आधुनिक, पुरोगामी, प्रयोगशील वाट निवडलेली आहे. त्यात कदाचित विसंवादाची कारणं जास्त संख्येनी असतील. अशा सर्व प्रसंगांत अनिल आणि शोभा एकमेकांचा निराळा संस्कार, निराळे अनुभव समजून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करतील.

17. अनिल पुरुष असल्यामुळे त्याच्यामधे शारीरिक ताकद निसर्गतःच जास्त आहे. त्या ताकदीचा त्यानी कधीही गैरवापर करायचा नाही. ताकदीनी कमी असलेल्या कुठच्याही व्यक्तीवर, शोभावर, भविष्यात होणारी मुलं यांच्यावर हात उगारायचा नाही. ही गोष्ट अनिलला पूर्णपणे मान्य आहे.

18. शोभा आणि अनिल एकमेकांशी लग्न करत आहेत, एकमेकांच्या कुटुंबाशी नाही. अनिलचे कोडोलीकर कुटुंबियांशी चांगले संबंध असले, मैत्री झाली तर ठीक आहे, पण निदान त्यानी त्यांच्याशी कधी वाईट वागू नये. सगळी कर्तव्यं पार पाडावीत, त्याचबरोबर शोभानी तिच्या सासूसासऱ्यांशी, भागवत कुटुंबियांशी मैत्री केलीच पाहिजे असं तिच्यावर बंधन नाही. तिनी कर्तव्यं

पार पाडावीत आणि त्यांच्याशी कधी वाईट वागू नये. ही गोष्ट अनिल आणि शोभा दोघांना समजलेली आहे आणि मान्य आहे.

करारातल्या मुद्यांच्यात बदल करण्याची पध्दत :

वर अनिल आणि शोभा यांनी मान्य केलेल्या मुद्द्यांच्यात बदल करण्याजोगी परिस्थिती येऊ शकते हे तत्वतः दोघांनाही मान्य आहे. त्या परिस्थितीत काय करायचं याची पध्दत ठरलेली आहे. ज्या क्रमानी मार्ग काढण्याचे प्रयत्न करायचे तो क्रमही ठरलेला आहे. तो असा–

1. अठरा मुद्द्यांपैकी कशातही बदल करायला परवानगी असेल, पण बदललेला मुद्दा दोघांना पटलेला हवा आणि नवीन कागदावर दोघांच्या सह्या हव्यात.
2. दोघांपैकी एकालाच मान्य आणि दुसऱ्याला अमान्य असलेला मुद्दा पटवण्यासाठी शांतपणी चर्चा करण्याचा प्रयत्न करायचा. असा प्रयत्न एकदा नाही जमला तर पुन्हा एकदा मधे आठवड्याचा काळ ठेवून करावा.
3. चर्चेतून काही निष्पन्न होत नाही असं आढळलं तर दोघांनी एकमेकांना सविस्तर पत्रं लिहून घरातल्या घरात पत्राद्वारे चर्चा चालू ठेवावी, लिहिण्यानी विचारात स्पष्टता येते.
4. करार करतानाच्या साक्षीदारांपैकी एखाद्याशी चर्चा करावी.
5. समुपदेशकाकडे जाऊन मतभेदासाठी मदत घ्यावी. समुपदेशकाकडे दोघांनी जाणं बंधनकारक असेल.
6. त्यानी प्रश्न सुटला नाही तर दुसऱ्या समुपदेशकाकडे जावं. अर्थात दोघांनी.
7. त्यानी प्रश्न सुटला नाही तर वकिलाकडे दोघांनी जाऊन कायद्यातल्या तरतुदी समजून घ्याव्यात.
8. घटस्फोट घ्यायचाच ठरला तर एकमेकांची सुटका हा मुख्य उद्देश आहे हे मान्य करून 'म्युच्युअल कन्सेन्ट' एकमेकांना घायचा हे दोघांनाही मान्य आहे. पैशांच्या किंवा मालमत्तेच्या मागण्या करायच्या नाहीत.
9. कायद्यात बदल होत राहातात. मुलं लहान असली तर मुलांना नवरा-बायको दोघांनी मिळून परिस्थिती समजावून सांगावी.
10. मुलं सज्ञान असली तर कदाचित मुलंही समुपदेशक बनू शकतील.

शोभा आणि मी यांच्यात असा लेखी करार प्रत्यक्षात केला नव्हता, कारण

ही कल्पनाच नवीन सुचलेली आहे. ती देखील विवाह-अभ्यास मंडळाला सुरुवात केल्यावर. शिवाय आमची सगळीच परिस्थिती सर्वसाधारण कुटुंबातल्या सर्वसाधारण मुलामुलींपेक्षा निराळी होती. ती इतरांना नेमकी लागू पडणार नाही, त्यामुळे विवाहाचा लेखी करार या कल्पनेचं महत्त्व पटणं कठीण होईल. त्यामुळे सर्वसाधारण परिस्थितीशी जुळणाऱ्या एखाद्या जोडीमधला करार यापुढे इथे द्यायचा जीवनसाथच्या चर्चेत निर्णय झाला.

मुद्दामहून सरकारी विवाह-नोंदणी अर्ज आणून तपासला. नाव, वय, पत्ता, वगैरेंखेरीज काहीच मजकूर त्यात नसतो. या नवीन प्रकारचा विवाहाचा लेखी करार सर्वसामान्य माणसाला पटून ती रूढी बनायला तुमच्या अंदाजानी किती वर्षं लागतील, असा करार कायद्यानी सक्तीचा व्हायला किती वर्षं लागतील असा प्रश्न गटचर्चेच्या वेळी विचारला होता. एकाला वाटलं 50 वर्षं, काहींना वाटलं 200वर्षं , काहींना 1000 वर्षं, शेवटी मला आणि शोभाला काय वाटतं सांगतो. ही गोष्ट या देशात कधीही शक्य नाही. या निमित्तानी होणाऱ्या चर्चा मात्र महत्त्वाच्या ठरतील.

सही
(शोभा कोडोलीकर)

सही
(अनिल भागवत)

विवाहाचा लेखी करार - नमुना क्र. 2

या करारात लग्न करणारी मुलगी स्मिता सुधीर पाटील (जन्मतारीख 10 एप्रिल1977, पत्ता 197, दक्षिण कसबा, सोलापूर-4) आहे.

लग्न करणारा मुलगा अनिल नारायण वळसंगकर (जन्मतारीख 4 मे 1972, पत्ता आळंदकर बंगला, एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर) आहे.

पार्श्वभूमी

सन 1998-99 मधे स्मिता सोलापुरातल्या दैनिक विश्वसमाचार येथे पत्रकार म्हणून काम करत होती. याच दरम्यान गाण्याचे कार्यक्रम, निवेदन, नाटकाचे प्रयोग, काव्यवाचन, संस्कार भारतीचं काम असंही तिचं सुरू होतं. अनिल तेव्हा बी.एस.एन.एल. मधे काम करत होता. संस्कारभारतीमधे अनिलची

धाकटी बहीण अश्विनीही कार्यकर्ती होती. सोलापुरासारख्या ठिकाणी असल्यामुळे अनिल आणि स्मिता यांची तोंडदेखली ओळख होती, पण मैत्री वगैरे नव्हती. यानंतर स्मिता 'संचार' या दैनिकात उपसंपादक म्हणून 'जॉईन' झाली. कामासाठी आवश्यक म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता पदवीसाठी तिनी प्रवेश घेतला. या कोर्सच्या वेळेला अनिल, त्याचा आणि स्मिताचा 'कॉमन' मित्र रंगनाथ अशा काही जणांचा ग्रुप जमला. या काळात अनिलच्या मनात स्मिताविषयी काही हळुवार भावना रुजायला लागल्या. मात्र स्मिता त्याच्याकडे मित्र म्हणूनच पाहात होती. आपल्या एक- दोन मैत्रिणींची स्थळंही त्याला तिनी सुचवली होती.

या काळात अनिलची बहीण अश्विनी त्याच्यावरून स्मिताला चिडवायला लागली. बऱ्याचदा स्मितानी समज देऊनही ती ऐकत नव्हती. दोघांचंही एकमेकांच्या घरी येणं-जाणं सुरू होतं. 10 एप्रिल 2001 ला स्मिताला चोविसावं संपून पंचविसावं वर्ष लागलं. आता मात्र तिच्या घरी लग्नासंबंधी एकदमच घाई व्हायला लागली. स्मिताची आई आणि काकू यांच्या मनात अनिल एक चांगलं स्थळ म्हणून होता. मात्र स्मिताला अनिलशी लग्न करायचं नव्हतं. वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला अनिल आणि रंगनाथ घरी आले तेव्हा स्मिताच्या आईनी रंगनाथला आमच्या मनात अनिलला विचारायचं आहे असं सांगितलं. नंतर रंगनाथनी अनिलला विचारलं व त्यानीही होकार दिला.

स्मिताच्या आई व काकूनी अनिलच्या घरी जाऊन पत्रिका दिली. त्यावेळेस अनिलच्या आईचा असा गैरसमज झाला की या दोघांचं आधीचंच ठरलं आहे आणि आपल्याला मात्र आत्ता सांगताहेत. त्यानंतर आठ दिवसांनी स्मिताची आई अनिलकडे पत्रिकेबाबत विचारण्यास गेली असताना त्यांनी पत्रिका जुळत नाही, तुम्ही दुसरं स्थळ बघा, असं सांगितलं. त्यामुळे दुसरं स्थळ बघूया असं ठरलं. 15 दिवसानंतर अनिल स्मिताच्या घरी आला आणि त्यानी तुम्ही घरी का आला नाहीत, असं विचारलं. तुझ्या आईनी आम्हाला असं सांगितलं असं सांगताच त्याच्या काय झालं ते लक्षात आलं.

वास्तविक त्या वेळेस ज्या काही 2-3 मुलींच्या पत्रिका अनिलसाठी आल्या होत्या, त्यांत अनिल आणि स्मिताचीच जुळत होती, बाकीच्या नाही. मग अनिलनी स्मिताच्या घरच्यांना स्पष्ट सांगितलं की तुम्ही स्मितासाठी दुसरं स्थळ बघू नका. मी लग्न करीन तर फक्त स्मिताशीच. अनिलच्या आईवडिलांच्या हेकेखोर वागण्यामुळे बरेच अपमान, वाद असं होऊन शेवटी 4 नोव्हेंबर

2001ला अनिल आणि स्मिताचं लग्न पारंपरिक पद्धतीनी सोलापुरात पार पडलं. या दरम्यान दोघांचं लग्नासंदर्भात काही बोलणं झालं. ते लिहिलं आहे.

1. लग्नानंतर स्मिताला तिच्या पत्रकारिता, गायन, अभिनय, कविता या क्षेत्रांमधे आवडीचं काम करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य राहील. लग्नाआधीची तिची ओळख प्रस्थापित असल्यामुळे ती तिचं आधीचं स्मिता पाटील हे नाव कायम ठेवेल.
2. लग्नानंतर स्मिता तिच्या घरी गरज असल्यामुळे तिचा पगार माहेरी देईल. तर अनिलच्या वडिलांचं कर्ज अनिल फेडेल. घरखर्च दोघं मिळून करतील.
3. दोघांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य असेल. मात्र हे करताना घर ही 'प्रायॉरिटी' असेल.
4. बाहेर काम करताना स्त्री आणि पुरुषांशी संपर्क येत असल्यामुळे दोघंही एकमेकांवर संशय घेणार नाहीत. एकमेकांशी सगळ्याच बाबतींत पारदर्शकता ठेवतील.
5. स्वावलंबन हे महत्त्वाचं सूत्र दोघंही पाळतील.
6. स्मिताला एक मूल दत्तक घ्यायचं आहे. याला अनिलची संमती असेल तरच लग्न करता येईल. मात्र जे नैसर्गिक मूल होईल त्याच्या विरुद्धलिंगी मूल दत्तक घ्यायचं असं ठरलं. अनिलची मात्र दोन्हीही मुलं दत्तक घेण्याची तयारी आहे.
7. मुलांची सगळी जबाबदारी दोघांनी मिळून पार पाडायची. अगदी शी, शू, जेवण, झोप ते अभ्यास, 'क्वालिटी टाईम' देणं वगैरे सगळं.
8. घरातली कामं फक्त बायकांची असं न मानता सर्व कामं दोघांनी मिळून करायची.
9. दोघांनीही एकमेकांच्या कामात ढवळाढवळ करायची नाही. ऑफिसमधल्या अडचणींवर मिळून चर्चा करायची. मात्र कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करायचा नाही.
10. घर म्हणून जी जी त्या दृष्टीनी आवश्यक कामं आहेत ती दोघांनीही करणं अपेक्षित आहे.
11. घरच्या लोकांची जबाबदारी मग ती कष्टानी असो, पैशाची असो किंवा भावनिक असो, दोघांनीही एकमेकांच्या लोकांची मिळून पार पाडायची.
12. एकमेकांशी आर्थिक व्यवहाराबाबत कायम पारदर्शकता ठेवायची.

13. नोकरी बदल किंवा नवीन क्षेत्रातला प्रवेश याबाबतीत सामंजस्यानी एकमेकांशी नीट चर्चा करूनच निर्णय घ्यायचा.
14. जातधर्म न पाळणं, लिंगभेद न पाळणं, सर्व माणसं समान, श्रमाला प्रतिष्ठा, कोणत्याही कामाला कमी न लेखणं, माणुसकी ही मूल्यं पाळून आपली माणूस म्हणून वाढ करायला संसारात अग्रक्रम राहील.
15. पर्यावरणपूरक जगणं, साधेपणा, भौतिक सुखाच्या मागे न धावणं हे मूल्य दोघांच्याही दृष्टीनी अत्यावश्यक असेल. त्यापायी जे जे करायचं असेल ते ते करण्याची दोघांची तयारी असेल.
16. जाणीवपूर्वक, विचारपूर्वक जगणं, समाजासाठी आपापल्या परीनी काही करत राहणं हे महत्त्वाचं असेल आणि यासाठी मोजाव्या लागणाऱ्या किंमतीचंही भान दोघांना ठेवावं लागेल.
17. मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांच्यामधे एकमेकांचा सन्मान, आदर राखून बोललं जाईल.
18. सणवार, देवधर्म, रूढी-परंपरा पाळण्याची सक्ती दोघांनीही एकमेकांवर करता कामा नये. ज्या गोष्टीतून आनंद मिळतो त्या गोष्टी स्वतंत्रपणे किंवा एकमेकांसोबत करण्याचं स्वातंत्र्य आणि मुभा दोघांनीही एकमेकांना द्यायची आहे.
19. एकमेकांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी लागेल ते सहकार्य दोघांनी करायचं आहे.
20. दोघांचाही आत्मसन्मान महत्त्वाचा आहे याचं भान दोघांनीही पाळलं पाहिजे. त्यामधे काही समस्या आली तर चर्चा करून मार्ग काढला पाहिजे.
21. दोघांनीही मुलांसमोर त्यांना कुठल्याही प्रकारचा वाईट संदेश पोहोचला नाही पाहिजे याची सजगता सतत बाळगली पाहिजे.
22. स्थावर मालमत्ता, आर्थिक ठेवी यांवर दोघांचाही हक्क समान पाहिजे. त्यासंदर्भातला कोणताही निर्णय सामंजस्यानी घेतला गेला पाहिजे.
23. स्मिताच्या नाजूक तब्येतीच्या बाबतीत अनिलनी सहृदयता बाळगली पाहिजे.
24. एकमेकांमधल्या सकारात्मक, नकारात्मक गोष्टींबाबत एकमेकांचे सल्ले विचारात घेतले पाहिजेत आणि त्यांवर काम करण्याची तयारी असली पाहिजे.
25. एकमेकांसाठी ‘क्वालिटी टाईम’ देणं हे मनापासून निभावलं पाहिजे.

26. संसार हा दोघांचाही असतो, तो टिकवण्याची, निभावण्याची जबाबदारी ही दोघांचीही समान असली पाहिजे हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे आणि तशीच कृतीही झाली पाहिजे.
27. दोघांचेही स्वभाव, आजवरचे अनुभव, गरजा, आवडीनिवडी वेगळ्या असतात, त्यानुसार घडणारी कृती, विचार वेगळे असतील याचं भान दोघांना ठेवता आलं पाहिजे.
28. कुठल्याही गोष्टीची वेळ असते, ती निघून गेल्यावर हळहळ करण्यात अर्थ नसतो म्हणून ती वेळ जाणीवपूर्वक पाळता आली पाहिजे.

सही
(स्मिता पाटील)

सही
(अनिल वळसंगकर)

जीवनसाथच्या सदस्यांमधे शेकडो विवाहित जोडपी आहेत. मधूनमधून नियमित येणारीही बरीच जोडपी आहेत. त्यांनी अशा प्रकारचा विवाहाच्या कराराचा नमुना पाठवायला हरकत नाही. पण प्रत्यक्षात तसं झालेलं नाही. हा लेख वाचून कुठल्याही विवाहित जोडप्याला स्फूर्ती झाली आणि त्यांनी लग्नापूर्वी जसा करार केला असता तसा आम्हाला लिहून पाठवला तर पुढच्या आवृत्तीत तो आनंदानी छापू. लग्न ठरलेल्या दोघांनी भावी जोडीदाराबरोबरचा खराखुरा करार लिहून पाठवला तर आम्हाला जास्त आनंद होईल. पुढच्या आवृत्तीत तो आम्ही अगदी उत्साहानी छापू.

●●●

जीवनसाथ पुस्तक संच
संपूर्ण यादी

पुस्तक क्र.	पुस्तकाचं नाव
1.	विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय ● कौटुंबिक विसंवाद
2.	जोडीदाराची निवड ● लैंगिक शिक्षण
3.	व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ ● पुरुष पालकांचं शिक्षण
4.	आर्थिक व्यक्तिमत्त्व ● करीअरचं नियोजन
5.	व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं
6.	स्वावलंबन, आत्मसन्मान ● स्त्री-पुरुष असमानतेची रूपं
7.	उत्सवी प्रवृत्ती ● लग्नसमारंभ

8.	खरे उपयोगी संस्कार ● सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य
9.	रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान ● समतोल विचारांचं महत्त्व
10.	ज्येष्ठांशी संवाद ● मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार
11.	समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती ● जीवनसाथ समुपदेशन संस्था
12.	कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय ● जीवनसाथमधले खेळ

जीवनसाथ संचामधली अनिल भागवत यांची इतर पुस्तकं

पुस्तक-1

विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय

●

कौटुंबिक विसंवाद

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय?

1. या कल्पनेची थोडक्यात ओळख 2. विवाहाचा तत्त्वज्ञानाशी संबंध 3. वैवाहिक आयुष्यासाठीची काही महत्त्वाची तत्त्वं 4. रोजच्या आयुष्यातली साधी तत्त्वं 5. भावनांविषयीचा अभ्यास 6. विचारांचं भावनेत रूपांतर 7. भावनांवर नियंत्रण 8. कुटुंबाबरोबरच्या आयुष्याचं महत्त्व 9. व्यवस्थापनशास्त्राचा उपयोग 10. कुटुंबाचं समुपदेशन 11. आपुलकी, प्रेम, या भावना व्यक्त करणं 12. नाती सांभाळण्यासाठीची तत्त्वं आणि तंत्रं 13. प्रश्न सोडवण्याची पद्धत– मिश्रगट कार्यशाळा म्हणजेच 'ग्रुप काउन्सेलिंग' वर्कशॉप्स 14. खरं बोलणं 15. पैशाबद्दलची विचारसरणी 16. स्वावलंबन आणि आत्मसन्मान 17. स्त्री-पुरुष समतेची आणि समानतेची समज 18. लोकशाहीचं मूल्य आणि स्वतंत्र किंवा एकत्र कुटुंब 19. उत्सव, समारंभ याबद्दल भूमिका 20. असणं, दिसणं आणि दाखवणं 21. आधुनिक आणि पारंपरिक 22. वैयक्तिक समुपदेशन 23. या पुस्तकासंबंधीच्या सूचना

2) कुटुंबातले आणि नवराबायकोमधले मतभेद म्हणजेच कौटुंबिक विसंवाद

1. प्रश्नाचा नेमका शोध आणि उपायाचा शोध 2. विवाहाच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानात काय सांगितलंय 3. कौटुंबिक विसंवाद या विषयातली आकडेवारी 4. विचार, भावना यांचे गट आणि नवरा-बायकोचं नातं 5. कुटुंबातली इतर नाती / एकत्र कुटुंब 6. पैशावरून वाद 7. आत्मसन्मानावरून वाद 8. मुलांसंबंधीचे वाद 9. सासर-माहेर याविषयी वाद 10. स्त्री-पुरुष समानतेची समज नसण्यावरून विसंवाद 11. आधुनिक किंवा पारंपरिक विचारांमुळे विसंवाद 12. व्यसनं आणि भांडणं 13. नवराबायको आणि कुटुंबातले समाईक धागे 14. कुटुंबासाठी वेळ देणं 15. व्यवस्थापन कौशल्यांचा वापर 16. विवाहाचा अर्थ कळणं 17. सर्वात महत्त्वाची गोष्ट– संवाद 18. राग, धमक्या, रागवारागवी, रुसणं 19. मारहाण– हिंसेचे प्रकार 20. लग्न ठरवण्याची पद्धत– सगळ्याचं मूळ 21. लग्नाचा करार 22. मानसशास्त्राची मदत 23. करण्याजोग्या गोष्टी 24. खरं प्रेम म्हणजे काय ते न समजणं 25. भांडणांचं टोक– घटस्फोट

3) मी आणि शोभामधले विसंवाद

4) मी आणि शोभा यांचं सहजीवन, आम्ही काढलेले उपाय

5) राग आवरण्याचे मार्ग

6) आभार

●

पुस्तक-2

जोडीदाराची निवड

●

लैंगिक शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना 5. प्राथमिक प्रश्नावली 6. सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप 7. सविस्तर प्रश्नावली– पत्रिका 8. सविस्तर प्रश्नावली– शिक्षण/ व्यासंग 9. सविस्तर प्रश्नावली– आरोग्य 10. सविस्तर प्रश्नावली– स्वभाव 11. सविस्तर प्रश्नावली– पैशांबद्दलची विचारसरणी 12. सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती 13. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता 14. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध 15. सविस्तर प्रश्नावली– कुटुंब 16. सविस्तर प्रश्नावली– मुलं 17. सविस्तर प्रश्नावली– लग्न समारंभ 18. सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार 19. सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला? 20. त्रोटक सविस्तर माहिती 21. भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय 22. जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया 23. जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते? 24. निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी समुपदेशन 25. जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर) 26. अविचाराची शक्यता 27. लग्न ठरल्यानंतरची कर्तव्यं 28. जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ

9) लैंगिक शिक्षणाची गरज

1. या लेखाची पार्श्वभूमी 2. भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती 3. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधाबद्दलची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप 5. लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा 6. लैंगिक संबंधातलं समुपदेशन

10) लैंगिक शिक्षण– जन्मापासून 5 वर्षांपर्यंतच्या मुलामुलींबद्दल

11) लैंगिक शिक्षण– 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

12) लैंगिक शिक्षण– 10 ते 16 वयापर्यंतच्या मुला-मुलींसाठी

13) लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी

1. सध्याची परिस्थिती 2. लैंगिक भावनांचा गोंधळ 3. मुलग्यांच्या विकृत गप्पा 4. हस्तमैथुन 5. वेश्येकडे जाण्याचा मोह 6. मुलींच्या मनातल्या कल्पना 7. मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री 8. लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा 9. चुकीच्या गोष्टींची शक्यता– रेव्ह पार्टी 10. प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध 11. लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन 12. परदेशातली परिस्थिती 13. लैंगिक संबंधांमागची मानसशास्त्रीय बैठक

●

पुस्तक-3

व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ

●

पुरुष पालकांचं शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) संवादकला

1. संवादामागचं तत्त्वज्ञान 2. मानसशास्त्रातला एक महत्त्वाचा प्रयोग 3. चांगला संवाद म्हणजे काय? 4. आयुष्यभरातल्या सगळ्या नात्यांचे फक्त 3 गट 5. जोडीदाराबरोबरचा किंवा जवळच्या व्यक्तीबरोबरचा संवाद 6. संवादातल्या चुकांची उदाहरणं 7. व्यवसाय, धंदा, दुकानदारी यामधले संवाद 8. चांगला संवाद– त्यासाठीचे मार्ग आणि तंत्रं 9. संवादकलेबद्दलच्या गटचर्चा 10. संवादातल्या भाषेचा प्रश्न आणि हावभाव, हालचाली यांच्यामधून संवाद

2) व्यक्तिमत्त्व विकास

1. आत्मविश्वास– व्यक्तिमत्त्वाचा पाया 2. बाह्यरूप 3. बोलणं 4. चेहऱ्यावरचे भाव 5. चुकीच्या लकबी 6. फसवेगिरी - खोटेपणा 7. कुचाळक्या - एक विकृती 8. अंगचे कलागुण 9. छंदापासून व्यसनापर्यंत 10. शिस्त आणि व्यवस्थापन 11. आयुष्याचा संतुलित दृष्टिकोन 12. अष्टपैलू– चतुरस्त्र– अष्टावधानी व्यक्ती 13. विकासाचे दोन मार्ग 14. मिश्रगट समुपदेशनाचे व्यक्तिमत्त्वासाठी फायदे

3) खरं बोलणं – अठ्ठ्याण्णव टक्के

4) नकार देण्याची कला

5) मी केलेल्या चुका

6) मी जोडीदाराकडून/विशिष्ट व्यक्तीकडून काय शिकलो/शिकले

7) इ.क्यू. (इमोशनल कोशंट) म्हणजेच भावनिक गुणांक

1. भावनिक गुणांकाची (इ.क्यू.) मूळ कल्पना 2. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या भावनांकातला फरक 3. भावनांक सुधारण्याचं शिक्षण 4. समुपदेशनातले अनुभव 5. शोभा आणि मी यांचं उदाहरण 6. भावनांक आणि समाजकार्य यांचा संबंध 7. भावनांकावर वय, आरोग्य यांचा परिणाम

8) पुरुष पालकांचं शिक्षण

1. माझं स्वतःचं लहानपण 2. पालक शिक्षणाची थिअरी आणि प्रॅक्टिस 3. शोभाचं आणि माझं पालक-शिक्षणातलं काम 4. मूल कशासाठी? 5. मुलाची शारीरिक वाढ 6. सर्वसाधारण पुरुष पालकाची सध्याची वागणूक 7. पालकत्वाचे नवे प्रश्न / उपायांचा शोध 8. मुलांना अपमानास्पद वागणूक 9. मुलं बिघडण्याची कारणं 10. आईवडलांचं एकमेकांशी नातं 11. आजोबांची भूमिका 12. शिक्षण-शाळा-अभ्यास-समुपदेशन 13. मुलांचा भाषाविकास 14. मुलांना केलेल्या शिक्षा 15. मुलांना स्वच्छतेचं शिक्षण 16. मुलांसाठी लैंगिक शिक्षण 17. मुलांसाठी वेळ काढणं 18. मुलांची पैशाबद्दलची समज 19. मुलांचे खेळ - आरोग्य 20. मुलांमुळे करिअरमधे खंड 21. भावंडांचे संबंध 22. समाजाचं मुलांकडे दुर्लक्ष 23. संस्कार 24. 'स्पेशल' मुलं 25. तरुणांचे पालक म्हणून जबाबदाऱ्या 26. पालकत्वामागचा समतोल विचार

9) आभार

●

पुस्तक-4

आर्थिक व्यक्तिमत्त्व

●

करीअरचं नियोजन

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) पैशाबद्दलची विचारसरणी

1. पैशाबद्दलच्या विचारसरणीची प्रक्रिया 2. विवाहापूर्वी आर्थिक व्यक्तिमत्त्वाची पारख 3. मिश्रगट कार्यशाळा– प्रश्नावलीचा उपयोग 4. कामाचं स्वरूप आणि करिअर प्लॅन 5. मिळवती बायको 6. पिढीतला फरक 7. गरिबीमुळे येणारी समृद्धी 8. उसनवारी, कर्ज, परतफेड 9. बचतीच्या सवयी 10. प्रामाणिकपणा– रास्त भूमिका 11. मध्यमवर्गीय असण्याचे फायदे 12. मोह, फसणं, फसवणं 13. दातृत्व, 14. भ्रष्टाचार– काळा पैसा 15. व्यसनं 16. पैशाबद्दलचा कौटुंबिक सुसंवाद-विसंवाद 17. आर्थिक विषमता– देशाची धोरणं

2) शिक्षण आणि करिअर

1. सध्याची परिस्थिती 2. परीक्षांची पद्धत 3. शिक्षणाची योग्य पद्धत 4. शैक्षणिक इमारती, इतर सोयी 5. वैवाहिक आयुष्यात शिक्षणाचं महत्त्व 6. आयुष्यात करिअरचं महत्त्व 7. जीवनशिक्षणासाठी योग्य मार्ग 8. करिअरचं नियोजन आणि बदल 9. भागीदारीतली करिअर 10. तीन मिनिटांचा खेळ

3) परदेश

4) बचत

1. बचत 2. विमा

5) आभार

●

पुस्तक-5

व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-6

स्वावलंबन, आत्मसन्मान

●

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-8

खरे उपयोगी संस्कार

●

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

टीप : जीवनसाथ पुस्तक संचातल्या पुस्तक क्र. 7 चा सविस्तर अनुक्रम या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात दिला आहे.

8) रूढी– परंपरा– चालीरीती– व्रतवैकल्यं– कर्मकांडांबद्दल चर्चा

1. या लेखामागची मूळ कल्पना 2. सध्याची रूढींबद्दलची परिस्थिती 3. दैवी शक्तींवरचा विश्वास 4. नाट– पायगुण, शकुन वगैरे 5. बारसं, वाढदिवस, मुंज इत्यादी 6. खाण्यापिण्याबद्दलच्या रूढी 7. लग्नसमारंभाशी जोडलेल्या रूढी 8. पोषाखाच्या रूढी 9. हिंसा-अहिंसा 10. नमस्कारासंबंधी रूढी 11. सामाजिक कार्यक्रमातल्या रूढी 12. रूढीमधले झालेले आणि करण्याजोगे बदल 13. पाप-पुण्य, मृत्यूसंबंधीच्या रूढी 14. कुटुंबकारणातल्या आणि सामाजिक अधिकाराच्या रूढी 15. काय बदल करता येतील?

9) आधुनिक-पारंपरिक म्हणजे नेमकं काय?

1. या लेखामागची कल्पना 2. बाह्यरूपातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 3. मनातली आणि विचारातली पारंपरिकता किंवा आधुनिकता 4. निष्कर्ष

10) खरे संस्कार म्हणजे नेमकं काय?

1. आहाराविषयीचे संस्कार 2. आरोग्याविषयीचे संस्कार 3. पोषाखाविषयीचे संस्कार 4. निवाऱ्यासंबंधीचे संस्कार 5. विवाहासंबंधीचे संस्कार 6. मुलांवरचे संस्कार 7. पैशांबद्दलचे संस्कार 8. कामाबद्दलचे संस्कार 9. अभिरुचीचे संस्कार 10. मृत्युसंबंधीचे संस्कार 11. संस्कारांबद्दल करण्याजोग्या गोष्टी

11) स्वतःची होकारांची आणि नकारांची यादी

12) समाजकार्याच्या दिशा

1. या लेखामागची कल्पना 2. 'फंडिंग' असलेली कामं 3. सामाजिक प्रथा बदलण्याची कामं 4. धार्मिक प्रकारची सामाजिक कामं 5. शिक्षणक्षेत्रासाठी सामाजिक कामं 6. बालकांच्या हक्कांसंबंधी कामं 7. पत्रकारितेमधून सामाजिक काम 8. ग्राहकहितासाठी सामाजिक काम 9. शहरी सुविधांसाठी चळवळ 10. वैद्यकीय क्षेत्रातली सामाजिक कामं 11. शिष्यवृत्त्यांसाठी, पारितोषिकांसाठी पैशाची सोय 12. नैसर्गिक आपत्तीनंतरची कामं 13. शहरांमधल्या झोपडपट्ट्यांच्यामधे काम 14. पर्यावरण रक्षण-शिक्षण 15. कोणालाही जमतील अशी साधी कामं

13) आभार

●

पुस्तक-9 (नऊ)

रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

समतोल विचारांचं महत्त्व

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

5) सरकार

6) राजकीय लोकशाही

7) बहुमत

8) सहकारी संस्था

9) राजकारण

10) निवडणूक

11) राष्ट्र

12) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व/विश्वशांती

13) कायदा आणि पोलीस यंत्रणा

14) स्वतःच्या आयुष्याविषयी समतोल विचार

15) आभार

●

पुस्तक-10

ज्येष्ठांशी संवाद

●

मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-11

समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

जीवनसाथ समुपदेशन संस्था

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

5) वैयक्तिक समुपदेशन

1. या लेखाची मूळ कल्पना 2. घरातल्या किंवा ओळखीतल्या ज्येष्ठांचा सल्ला 3. मार्गदर्शन आणि समुपदेशनातला फरक 4. समुपदेशनातली मूलतत्त्वं किंवा गृहितं 5. भारत आणि पाश्चात्त्य देशातली परिस्थिती 6. समुपदेशकाची खास कौशल्यं– ऐकणं, बोलणं 7. समुपदेशनाची सुरुवात आणि प्रगती 8. समुपदेशकानी स्वतःविषयी सांगणं 9. समुपदेशनाचे प्रकार 10. क्रिटिकल ॲनॅलिसिस पद्धतीचं समुपदेशन 11. आत्मविश्वास वाढविण्यासाठी समुपदेशन 12. समुपदेशनातली तंत्रं 13. समुपदेशनातली पथ्यं 14. समुपदेशनातल्या अडचणी 15. समुपदेशकांच्या श्रेणी 16. विवाहपूर्व समुपदेशन 17. घटस्फोटापूर्वीचं समुपदेशन 18. ग्रुप काऊन्सेलिंग– एक उत्तम पर्याय 19. निष्कर्ष

6) रिफर्ड काऊन्सेलिंग ऊर्फ अप्रत्यक्ष समुपदेशन किंवा कॅरम बोर्ड काऊन्सेलिंग

7) जागा-पद्धत-व्यवहार, सूत्रधार तयार करणं वगैरे

8) या पुस्तकाचा उपयोग

9) अभ्यास मंडळात न येण्याची कारणं

10) आभार

●

पुस्तक-12

कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय,

●

जीवनसाथमधले खेळ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

अनिल भागवत यांनी लिहिलेली आणखी पुस्तकं

पुस्तक-1

घर पाहावं बांधून (पाचवी आवृत्ती)

■ प्रस्तावना ■ प्रमोटर बिल्डर्सविषयी ■ आर्किटेक्टस्‌विषयी ■ बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरविषयी ■ आर. सी. सी. डिझायनरविषयी ■ मटेरियल सप्लायरविषयी ■ बांधकाम कामगारांविषयी ■ पेटी कॉन्ट्रॅक्टर्सविषयी ■ गळणारं छप्पर ■ ॲग्रीमेंटवर सही ■ सिस्टिम बिल्डिंग ■ बांधकाम आणि सरकार ■ बांधकाम, कर्ज, सरकारी कर आणि आपण ■ कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंटविषयी ■ बांधकामातले तांत्रिक शब्द आणि चेकलिस्ट

पुस्तक-2

लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)

पुस्तक-3

व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (दुसरी आवृत्ती)

■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - एक आवश्यक व्यवस्थापनशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटची मूलतत्त्वं ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटमधल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि फायलिंग ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि कामगार ■ क्वालिटी मॅनेजमेंट आणि सुपरवायझर ■ स्पीड मॅनेजमेंट - एक जादूसारखं तंत्र ■ कॉस्ट मॅनेजमेंट ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि इतर तज्ज्ञ ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि मालक ■ डिझास्टर मॅनेजमेंट - आपत्ती निवारणशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - मोहीम फत्ते करण्याचं शास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - बहुउपयोगीशास्त्र ■ तुम्ही कोणीही असा - ते वापरता येईल

●

लेखक अनिल भागवत यांचे ऋणी आहेत.

- डॉ. उल्हास लुकतुके - 1997 साली जीवनसाथ सुरू करताना स्पष्ट विचारांची जीवनभर साथ हा उद्देश स्पष्ट होता, पण त्याची सुरुवात करण्यासाठी यांची खूप मदत झाली.
- जीवनसाथ - मुंबई शाखा माझ्या आईसाठी सुरू केली. मुंबईतल्या लोकांना या अभ्यासाची प्रचंड गरज होती, अजूनही आहे. तिच्या घरीच कार्यक्रम व्हायचे.
- मुंबई जीवनसाथचा भक्कम आधार होता सुशील आणि विनीता हाटे. त्यांची निष्ठा, संयोजनकौशल्य आणि आमची वैयक्तिक मैत्री मला खूप महत्त्वाची वाटते.
- पुण्यातलं जीवनसाथ अभ्यास मंडळ पहिल्या दिवसापासून जोरातच चाललं. बरीच वर्षं ते शनिवार पेठेतल्या आमच्या घरी होतं. आता आमच्याच कर्वेनगरच्या घरी अभ्यास मंडळ चालतं. गेली दोन वर्षं मी हा पुस्तकसंच लिहीत असताना मला अनेकांनी मदत केली. त्यातल्या काहींनी या पुस्तकांसाठी काही विषयांसाठी मजकूर लिहिला, काहींनी टायपिंगची, डिक्टेशन घेऊन लिहिण्याची मदत केली. मजकुरावरच्या त्यांच्या प्रतिक्रियादेखील महत्त्वाच्या होत्या. त्यांची नावं मी आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानी देतोय. ती आद्याक्षरं इंग्लिश अल्फाबेटाप्रमाणे रचली आहेत.

  बोकील डॉ. आशा, बोरोटीकर तुषार, भोइटे आमोद, दंडवते मानसी, डिंबळे रामभाऊ, देगवेकर दिलीप, देशपांडे केशव, देवराज शिल्पा, गोवित्रीकर सुनीति, जाधव विजय, कानेटकर श्रद्धा, कुळकर्णी पौर्णिमा,

क्षेमकल्याणी ममता, लिमये हर्षद, लिमये गौरी गोळे, मेढेकर शैवल, मोहाडीकर डॉ. लीना, मुद्‌गल दीपा, मुद्‌गल स्मिता, मुळे अंजली, म्हैसकर मकरंद, नागपूरकर माधव, पाटणकर राजेश, पाटील मोहिनी, पाटील स्मिता, पाटील विक्रांत, राऊळ श्यामल, रावराणे गीता, साठे आशा, शुक्ल डॉ. भूषण, संचेती अपूर्वा, संचेती आदिती, वळसंगकर अनिल, तेलंग डॉ. नीलू.

- जीवनसाथ अभ्यास मंडळाचे सगळे सभासद. जीवनसाथ समुपदेशन केंद्राचे सगळे समुपदेशनार्थी.
- शोभा तर या पुस्तकसंचाच्या थोड्या भागाची सह-लेखिकाच आहे. मी आमच्या वैवाहिक आयुष्यात तिच्यावर केलेल्या अन्यायाचा मी अनेक ठिकाणी उल्लेख केलाच आहे. शिवाय या पुस्तक-प्रक्रियेच्या दोन वर्षांच्या काळातही तिच्या मदतीशिवाय, टीकेशिवाय, सूचनांशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय मी इथपर्यंत पोचलोच नसतो.

  शोनील आणि आभामुळे तर जीवनसाथ संस्था सुरू झाली. अनास्तेसिया, श्रेयस आणि आमची नातवंडं ओजस, तुहिन आणि डॉमिनिक यांना पुढे त्यांच्या आयुष्यात माझ्या या कार्यशाळांचा आणि त्याबद्दलच्या लिखाणाचा उपयोग व्हावा हा माझा ऊर्जास्रोत होता.
- हे पुस्तक या अवस्थेपर्यंत आणण्यात श्री. हेमंत जोशी आणि सौ. संगीता सरदेसाई यांचा मोठा वाटा आहे.
- मी पुस्तकसंचात म्हटलं आहे तेच पुन्हा सांगतो. वाचकांच्या प्रतिक्रिया नाव, फोटो पत्त्यासह पुढच्या आवृत्तीत छापणार आहे. कौतूक, टीका दोन्हीचं स्वागत असेल. अशा प्रत्येकाचं माझ्यावर ऋण असणार आहे.

– अनिल भागवत
वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच – चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वतःला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

या पुस्तकाविषयी

आयुष्यात आनंद वाटण्याजोगे एवढे प्रसंग आहेत म्हणून तर प्रत्येकजण जगतो. आशा हे तर जगण्याचं इंधन आहे. याच मूलतत्त्वाचं भ्रष्ट स्वरूप म्हणजे प्रत्येक प्रसंगाचा जाहीर उत्सव बनवणं.

त्यात चूक काय, बरोबर काय, या विषयी सांगणारं पुस्तक.

लग्न समारंभाऐवजी खरा उपयोगी आधुनिक मार्ग म्हणजे काय हे यात सविस्तर सांगितलं आहे.

प्रत्येकानी हे वाचलंच पाहिजे.

लेखकानी विवाहाचा लेखी करार ही कल्पना मांडली आहे. सध्याच्या बिघडत चाललेल्या जमान्यात अभ्यासकांनी, समुपदेशकांनी आणि पुढे कायदा यंत्रणेनीदेखील त्याचा विचार करावा.